गुरु तूंहि, अर्जुनहि; म्यां आज्ञा तुमची कधीं न मोडावी. ।
सोडावी प्राणाची, प्रभुचीच प्रीति पूर्ण जोडावी.' ॥ २५
वदुनि असें, मान्य करी धर्मवचन सबहुमान सत्वर तें. ।
[1]गुरुकार्यासचि कविचें, निज कार्या न, बहु मानस [2]त्वरेतें. ॥ २६
तो वीर [3]वीरपान, द्विजपूजन करुनि, सत्वराशि कवी ।
शीघ्र निघे; ज्याला बहु गुरुभक्ति [4]समररसत्वरा शिकवी. ॥ २७
व्यूहीं सहसा सात्यकि शिरला, जैसा दवाग्नि शुष्कवनीं; ।
खंडन करी प्रतिपदीं [5]कंटकीं, [6]दोषज्ञ जेंवि [7]दुष्कवनीं. ॥ २८
सुर म्हणति, 'अहा ! शिरला हा या जलधींत काय हो [8]मकर. ।
वा ! दुसरा [9]जिष्णुचि तूं. हूं ! [10]धर्मारातिकायहोम कर.' ॥ २९
व्यूहीं शिरे महाबल, [11]करिहरिणकुलीं जसाचि [12]हरि शिरतो. ।
कमल जसा लीलेनें [13]द्विरद, अरीचें तसाचि [14]हरि शिर तो. ॥ ३०
द्रोण तयाला गांठी, रोधी, जैसा [15]महाचल नदास. ।
गुरुसा [16]समरप्रेक्षकपक्ष्मीं नुरवीच तो [illegible]लन [17]दास. ॥ ३१
सात्यकिला द्रोण म्हणे, 'त्वद्गुरु [18]शुभ्राश्व हात जोडूनी, ।
करुनि प्रदक्षिणा मज, गेला केल्या [19]पणासि सोडूनी. ॥ ३२
म्हणशिल [20]यशोर्थ वेंचिन सर्वस्वा मी, सदा समरशील; ।
तरि तूं[21], पावोनि मला [22]स्वगुरुस्वामीस, दास मरशील.' ॥ ३३
सात्यकि म्हणे, 'गुरुगुरो ! स्वस्ति असो तुज सदैव आर्यास. ।

---

१. अर्थांतरन्यासालंकार. २. त्वरा करतें. (नामधातु). ३. सुरापान. ४. युद्धकौशल्याची त्वरा. ५. सैन्यामध्यें. ६. दोषजाणता, विद्वान्. ७. दुष्ट काव्यांत (वाईट कवनांत). ८. मगर. ९. इन्द्र. १०. धर्मराजाच्या शत्रूंच्या देहांचा होम. ११. हत्तीच्या किंवा हरिणांच्या समुदायामध्यें. १२. सिंह. १३. हत्ती. १४. हरण करी. १५. महा+अचल=मोठा पर्वत. १६. युद्ध पाहणाऱ्यांच्या डोळ्यांचे पापणींत. १७. सात्यकी. 'गुरूचा समरप्रेक्षक' असाही पाठ आहे. १८. शुभ्र आहेत अश्व ज्याचे असा अर्जुन. १९. प्रतिज्ञेला. २०. यशप्राप्त्यर्थ. 'यथार्थ' असें पाठांतर. २१. तूं दास (सात्यकी). २२. आपल्या गुरूच्या (अर्जुनाच्या) स्वामीस (मला, द्रोणास). पावणें=पोंचणें, तद्रूप होणें.

[1]कालक्षेप नसावा विजय[2]परामर्शधर्मकार्यास. ॥ ३४
ज्या वाटेनें गेले गुरु, धरिती छात्र त्याचि वाटेतें. ।
आचार्यें पार्थें जें केलें, मजहि प्रशस्त वाटे तें.' ॥ ३५
एवं वदोनि, वंदुनि, घालुनि [3]गुरुगुरु रणांगणीं उजवा, ।
सात्यकि निघे; म्हणे, 'कुरुभट हो! शंख करुनि मुख सुजवा.' ॥ ३६
कर्णाचें बळ भंगुनि, कृतवर्म्यातें[5]हि संगरीं उडवी; ।
[4]नलिनवनासि गज जसा, त्या कुरुकटकासि तो तसा तुडवी. ॥ ३७
मागुनि उठले पांडव सात्यकिच्या रक्षणार्थ जे, त्यांतें ।
भग्न करी कृतवर्मा, भ्यावें ज्यां [5]पविकरेंहि [6]जेत्यांते. ॥ ३८
मुरडे, सात्यकि, सर्पचि, जाणों बलपुच्छ तुडविलें, मागें. ।
[7]भोजातें विरथ करी, मर्दी तत्काल [8]तच्चमू रागें. ॥ ३९
पुनरपि परते मार्गी [9]माधव, [10]हरिसा शिरे [11]गजानीकीं; ।
[12]अजितचि तो, वरिला नरनारायणपादुकारजानीं कीं. ॥ ४०
मथुनि [13]गजघटा मारी शक्रप्रतिमप्रभाहि जलसंधा; ।
कीं सर्वदाहि सत्या [14]सत्संधा, निष्फलाचि [15]खलसंधा. ॥ ४१
गांठी गुरु सात्यकिला; तों दुःशासन, सुयोधनहि [16]राया; ।
जैसे वनांत सधना बहु तस्कर वेढिती, धन [17]हिराया. ॥ ४२
[18]युयुधानें दुर्योधन करुनि विरथ, पळविला पळांत रणीं; ।

---

१. कालविलंब, उशीर. २. अर्जुनाचा परामर्श (विपत्ति दूर करणें) घेणें व धर्मराजानें सांगितलेलें काम करणें, ह्या गोष्टींस. ३. आपला गुरु जो अर्जुन, त्याचा गुरु (द्रोणाचार्य). 'कुरुगुरु' असें पाठांतर. ४. कमलवनाला. ५. इन्द्रानेंहि. ६. जिंकणारांस. ['जि' धातूला 'ता' प्रत्यय लागून 'जेता' असें रूप झालें. 'ता' हा कर्तृत्ववाचक प्रत्यय लागण्यापूर्वी अंत्य लघुस्वरास गुण होतो, असा नियम आहे. जसें:–कृ–कर्ता, हृ–हर्ता.] ७. जसें सर्पाचें पुच्छ तुडविलें असतां तो मागें वळतो, तद्वत् सात्यकीचें बळरूप पुच्छ तुडविल्यामुळेंच तो जाणों मागें वळला. ८. त्याची सेना. ९. सात्यकि. १०. सिंहसा. ११. गजसमुदायांत. १२. कृष्णार्जुनांच्या पादुकारजांनीं जो वरिला, म्हणजे जो कृष्णार्जुनांचा सेवक झाला, तो अजितच असायाचा. १३. गजसमुदाय. १४. साधूची प्रतिज्ञा. १५. खलाची प्रतिज्ञा. १६. 'गांठी' इति शेषः. १७. लुटाया. १८. सात्यकीनें.

शोषी बळां शरांनीं, जेंवि करांनीं[१] नदीजळां तरणी[२]. ॥ ४३
हांसति धृतराष्ट्रसुता शीघ्रपलायनपरा सुर विमानीं, ।
'हा[३] ! मंदा ! तेजस्वी स्वाधिक, होतां परासु, रवि मानी.' ॥ ४४
गुरुसात्यकिमुक्ताशुगपटल[४] न दे लेश मार्ग वातातें. ।
त्यां विउनि[५] मिळविलें यश, जें भीष्मा आणि भार्गवा[६] तातें[७]. ॥ ४५
समरीं सारथि मरतां, द्रोणासि स्वैर[८] पळविती घोडे. ।
मोडे सैन्य. स्वामिव्यसनीं स्थिर वीर राहते थोडे. ॥ ४६
द्रोण व्यूहद्वारीं राहे. मग शीघ्र सात्यकि निघाला; ।
घनपटलांत पवनसा, परकटकीं तो सुदुर्धर[९] रिघाला[१०]. ॥ ४७
काय[११] इतर गज ? देता जंभारातीभ[१२] वाट वीरा या. ।
त्या सुझा[१३] सेना[१४] बहुसंभारा[१५] ती भवाटवी[१६], राया ! ॥ ४८
सात्यकि जातां, मथिलें द्रोणें पांचालकटक बहुत रणीं. ।
धृष्टद्युम्नें केला तो[१७], नव्हता समय म्हणुनि, न हुत रणीं. ॥ ४९
चढला होता धांवुनि ईषेवरि[१८], नग्न करुनि तरवारी; ।
परि गुरु वितस्तिमितें[१९] शर हाणुनियां, त्यासि शीघ्रतर वारी. ॥ ५०
तें पाहुनि कवि वदले, 'झड घाली लावकीं[२०] असि[२१] ससाणा. ।

---

१. किरणांनीं. २. सूर्य. सूर्य जसा आपल्या किरणांनीं नदीजळाला शोषितो, तसा तो (सात्यकि) बाणांनीं सैन्याचें बळ शोषी. पर्जन्योत्पत्तीचें कारण यांत स्पष्ट सांगितलें आहे, असें सहज लक्षांत येईल. असाच उल्लेख पंतकृत आदिपर्व, अध्याय २३।१७ येथें आहे. ३. हा रे ! मूर्खा !. स्वाधिक तेजस्वी परासु (मृत) होतां, [त्यास] रवि मानी (सूर्य मान देतो) [असें असतां पळण्याचें कारण काय ?]–असा भाव. ४. द्रोण आणि सात्यकी ह्यांनीं सोडिलेल्या बाणांचें आवरण. आशुग=बाण. 'आशुगोऽर्के शरे वायौ' इति हेमचंद्रः । 'आशुगौ वायुविशिखौ' इत्यमरः । ५. प्रसवून, जन्म देऊन. ६. परशुरामास. ७. भीष्म आणि परशुराम यांना जन्म दिल्यामुळें त्यांच्या वडिलांची जशी कीर्ति झाली, तशीच द्रोणाचार्य आणि सात्यकि यांनीं सोडलेल्या बाणांमुळें त्यांची झाली. ८. स्वच्छंद. ९. धरावयास अत्यंत कठीण. १०. गिरला. ११. सात्यकीस इंद्राचा ऐरावत वाट देता, मग इतर हत्तींची कथा काय ? **काव्यार्थापत्ति** अलंकार. १२. जंभ+अराति+इभ=इंद्राचा गज. १३. सात्यकीस. १४. कौरवांचें सैन्य. १५. सर्व साहित्यानें परिपूर्ण (सेना). १६. संसाररूप अटवी म्हणजे वन. १७. द्रोण. १८. धुरेवर. १९. वीतभर लांबीचे असे. २०. पक्षिविशेषीं, (लाव्याचे ठायीं). २१. अशी.

गुरुशिक्षा उग्रत्वचि देती, उग्रा जशा असिसें[1] साणा.[2]' ॥ ५१
वधिले शिशुपाळजरासंधात्मज[3] वीर संगरीं बहुत; ।
गुरुनें, पुढें न झाला जो, केला तोचि रणमुखीं[4] न हुत. ॥ ५२
'अर्जुन, सात्यकि चिंताकुल', धर्म असें वृकोदरास वदे, ।
'आम्हां उत्साह तुझा. दे अभय, जसें सुरांसि वासव दे. ॥ ५३
भीमा ! धनंजयाचा[5] घ्याया क्षम तूं मरुत्[6] समाचार. ।
तत्कुशलवृत्त मौक्तिकसम; तें मज सितगरुत्समा[7] चार.[8] ॥ ५४
सात्यकि बळेंचि म्यां कुरुकटकमहासंकटांत शिरकविला. ।
गेला शरसम. समयीं[9] बा ! धावें लागतेंचि शिर कंविला.[10] ॥ ५५
कां पाठवितों ? कळतें जरि करिल व्यूहनद गंडप[11] यातें. ।
तूं सेतु, तरेल इतर न कुरुबला, जेंवि न दगड पयातें[12]'. ॥ ५६
तों पांचजन्य[13] ऐकुनि धर्म म्हणे, 'हा ! अभाग्य बहुधा मीं. ।
कृष्णा[14], पृथा, सुभद्रा, उत्पात विलोकितील बहु धामीं.[15] ॥ ५७
बा ! स्पष्ट पावलाचि क्रूरारिगणांत[16] वत्स मरणातें. ।
सख्य स्मरोनि करितो अभिमानी कृष्ण तत्सम रणातें'. ॥ ५८
भीम म्हणे, 'आहे प्रभुवर सारथि; अर्जुनासि भय नाहीं. ।
तूं त्या कृतप्रतिज्ञाप्रति[17] शीघ्र विलोकिसील नयनाहीं. ॥ ५९
आज्ञा धरुनि शिरीं, हा मी जातों. सर्व शत्रु पळवीन. ।
मळवीन सुयोधनयश, शंखरवें कृष्णकुशल[18] कळवीन.' ॥ ६०
धर्मा देवीच गमे, केली भीमें असी प्रतिज्ञा ती. ।

---

१. खङ्गास. २. सहाणा. ३. येथें 'आत्मज' ह्याचा अर्थ 'वंशज' असा समजावयाचा. ४. रणरूप यज्ञामध्यें. ५. अग्नीचा; (पक्षीं) अर्जुनाचा. ६. वायु; (पक्षीं) भीम. ७. हंसासारिखा जो मी त्याला. सित (शुभ्रवर्ण) आहेत गरुत् (पंख) ज्याचे असा हंसपक्षी. ८. खाऊं घाल. हंसपक्षी मुक्ताफळ व मृणाल भक्षण करितात, असा कविसंकेत आहे. (मोरोपंत–कर्णपर्व–अध्याय २८।१७ पहा). ९. संकटसमयीं. अर्थांतरन्यासालंकार. १०. झाल्याला. ११. नाहींसा. १२. उदकातें. १३. कृष्णाच्या शंखाचा ध्वनि. १४. द्रौपदी. १५. घरीं. १६. क्रूर+अरि+गणांत. १७. प्रतिज्ञा खरी केली ज्यानें अशा अर्जुनाप्रति. १८. कृष्णार्जुनांचें कुशल.

द्विज म्हणति, 'तुझे होउत अहित[1] वश तुझ्या असीमति ज्ञाती'.॥ ६१
पूजुनि नमुनि द्विजगुरुचरण, निघे पिउनियां नव-सुरेतें. ।
हा तों ईशेचि[2]; न परां मी, जो जन्मे सुमानव सु-रेतें[3]. ॥ ६२
बळ[4] जलधि[5] गमे शिरतां, जो भीमहि मत्त, तो खरा मकर. ।
वर्षे शर परनिकरीं[6], जेंवि सुहृद्दत्ततोख[7] रामकर. ॥ ६३
तों भीमातें वारुनि, गुरुनें[8] नाराच हाणिला अलिकीं[9]. ।
तो अमृतकनककलशीं भासे कृष्णाहि[10], नीरजीं[11] अलि[12] कीं. ॥ ६४
द्रोणमनीं कीं, 'वश हा मज गुरुतें, जेंवि हरि[13] लगामातें.' ।
नमिल; म्हणेन, 'सुखें जा, त्वद्भुज परतेज हरिल; गौं[14] मातें[14].'॥ ६५
गुरु हांसूनि म्हणे, 'या व्यूहीं भीमा ! तुला न शिरवेल. ।
शिरसिल जरि, तरि घालुनि वांचेल दवानलांत[15] शिर, वेळे[16].॥ ६६
मज वंदुनि, मदनुमतें शिरला व्यूहांत कृष्णसारथि[17] रे ! ।
शरभापुढें टिकेना सिंहहि; मग काय कृष्णसार[18] थिरे[19] ? ॥ ६७
अक्षत[20] जरि मी, शिरणें तुज या व्यूहीं अशक्य मद्रचितीं[21], ।
जाणे करावया जीं कर्में भलतींच[22] एक मद्रचि[23] तीं.' ॥ ६८
रक्तेक्षण[24] भीम म्हणे, "झालासि ब्रह्मबंधु[25], चळलास. ।
कळलास अधम कीं तूं, खळसंग, धनुष्य, धरुनि मळलास.॥ ६९
योग्य नव्हे, घ्याया तव अनुमत तो वासवि[26] प्रवेशाला. ।

---

१. रिपुरूप भाळबंद. २. महादेवच. ३. उत्तम (तेजस्वी) वीर्यानें. ४. सैन्य. ५. समुद्र. ६. शत्रुसमुदायांत. ७. सज्जनाला दिला आहे संतोष ज्यानें. ८. द्रोणानें. ९. ललाटीं. १०. कृष्ण+अहि=कृष्णसर्प. ११. कमलीं. १२. किंवा. १३. अश्व. १४. मातें स्तव. १५. दावाग्नीमध्यें. शिर=मस्तक. १६. वळी. येथें संभावनालंकार आहे. १७. अर्जुन. १८. मृग. १९. स्थिरावे, टिके. २०. सुरक्षित, ज्याला जखम झाली नाहीं असा. २१. मत्+रचितीं=म्यां रचलेल्यांत. २२. अचाट, अघटित कर्में. २३. शल्य (?) २४. रक्त+ईक्षण=आरक्तनेत्र. २५. ब्राह्मणाधम. 'बंधु' शब्द सामासिक शब्दाचे शेवटीं आल्यास तो तिरस्कारदर्शक समजावा. उदाहरणार्थ—ब्राह्मणबंधु, क्षत्रबंधु. २६. तो तव अनुमत (तुझा आवडता) वासवि (इंद्रपुत्र, अर्जुन) प्रवेशाला (प्रवेशसाधन जें द्वार त्याला, अर्थात् चक्रव्यूहाच्या द्वाराला) घ्याया (काबीज करण्यास) योग्य (दक्ष, तत्पर) नव्हे (नाहीं, नव्हता)—असा अन्वय.

कुतुकें सभ्य प्रभुहि न बहु मानिति काय विप्र[1]-वेशाला ? ॥ ७०
हें किति तुच्छ[2] ? मदनुज स्वबळेंचि घसेल शाक्र-कटकांत. ।
वचकेल काय शिरतां, हंसाद्यनिरुद्ध[3] गरुड, चटकांत ? ॥ ७१
मी भीम त्वदरि[4], नव्हें त्वत्पूजक; सदय तो धवळवाजी. ।
मज मद्गदा[5] म्हणतसे, 'तेजेंचि खलारियोध[6] वळवा[7] जी !' ॥ ७२
'आपण पुत्र, पिता तूं,' म्हणतों, द्रव परि न हें तुला लव दे; ।
पदपतितरजां[8], देउनि पात्रत्व[9], गुण स्वयें कुलाल[10] वदे ! ॥ ७३
म्हणतों नित्य निजमना कीं, 'या द्विज[11]नायका पिता मान.' ।
परि तूं निर्दय; इतर[12] प्रणतांची काय कापिता मान ? ॥ ७४
तूं काय गा ? स्वधर्मचि, सर्वांची पुरविणार आळ, पिता ? ।
किति नागकालपाश ? स्वान्यायचि करकरूनि आळपिता[13] ?॥ ७५
जरि आपणासि मानुनि शत्रु असें, पातलासि कळहातें[14], ।
तरि या कर्माचें घे, देतों मी भीमसेन, फल हातें." ॥ ७६
ऐसें बोलुनि सोडी, ती द्रोणरथीं उडी गदा घाली; ।
अनिवार्याचि[15] खवळली, जसि पाडाया कुडी[16] गदाघाली[17]. ॥ ७७
तों स्वरथावरुनि उडी टाकुनियां, त्या गदेशि गुरु चुकवी, ।
अभिमान त्यजुनि; जसा काळगतिस[18] आत्मयोगपटु सु[19]-कवी. ॥ ७८

---

१. वेशधारी ब्राह्मणाला जसा सभ्य प्रभु मान देतो, त्याप्रमाणें तुला मान दिला—असा भाव. भीमानें द्रोणाचार्यांवर बरीच कडक टीका केली आहे. २. ह्या तुझ्या (द्रोणाचार्यांच्या) सैन्याची कथा काय ? **काव्यार्थापत्ति** आहे. ३. हंसादिकांनीं रोधिला जात नाहीं असा. ४. त्वत्+अरि=तुझा शत्रु. ५. मत्+गदा=माझी गदा. ६. खल+अरि+योध=दुष्ट शत्रूंकडील योद्धा. ७. 'वळवा' ह्या शब्दावरून 'गुराखी गुरें वळवितो त्याप्रमाणें शत्रूंस वळवा,' असा अर्थ ध्वनित होतो. ८. पायांपासून पडलेल्या धुळीला. ९. भांड्याचा आकार. १०. कुंभार. ११. ब्राह्मणश्रेष्ठाला, द्रोणाचार्यांना. १२. इतर [जन] प्रणतांची मान कापिता काय ? तुझ्या ठिकाणी दुसरा कोणी असता तर त्यानें त्याच्या ठिकाणीं नम्र असणाऱ्यांची मान कापिली असती काय ? १३. बांधणारा. नागपाश किंवा कालपाश हे आपणांस बंधनकारक होत नाहींत, आपण केलेले अन्यायच आपणास बंधनकारक होतात—असा भाव. १४. युद्धातें. १५. निवारण करण्यास शक्य नव्हे अशी. १६. शरीर. १७. गद+अघ+आली= रोग आणि पाप यांची पंक्ती. १८. मृत्यूस. १९. ज्ञाता. 'चुकवी' इति शेषः.

पडतां रथीं गदा, तो स्वसुसा[1] पळ वीर विप्र भासेना. ।
कौरव वेष्टिति भीमा; तों त्या पळवी रविप्रभा[2] सेना. ॥ ७९
भंगी भीमगदाशनि[3] सतुरगसूतध्वजा[4] रथनगा[5] ती. ।
रुद्रचि वृकोदर गमे. त्या त्रिपुराचेंचि ते[6] मथन गाती. ॥ ८०
"सुखवध्यें त्वदपत्यें[7] भीमशरां, जेंवि हरिनखां बकरीं. ।
म्हणुनि तुज म्हणत होतों, कीं 'खळ कुलमंडपा न खांब करीं.'"॥ ८१
भीमें एकैकशरें[8] दृढबाहु सुषेण दीर्घनेत्र असे, ।
वधिले सुदर्शनादि[9] त्वत्सुत दश, मृगवरें जसेचि ससे. ॥ ८२
द्रोणें पुनरपि केलें दारुण शरवर्ष[10], धरुनि वाटेतें; ।
वर्षे व्रजीं प्रलयघनवृंद[11], तसें गुरुधनुष्य वाटे तें. ॥ ८३
भीम रथावरुनि उडी टाकुनि, गुरुयश[12] करावया गोळा, ।
धांवे, यंत्रांपासुनि[13] वेगानें जेंवि उसळला गोळा. ॥ ८४
शरवृष्टींत वृकोदर, लेशहि न धरुनि साध्वस[14], रिघे; तो ।
वांटे[15], डोळे झांकुनि वृष[16] त्या लीलेंकरुनि सरि[17] घेतो. ॥ ८५
द्रोणरथातें[18] कवळुनि, तो नित्य नवा युवा, सवाहातें[19] ।
दूर झुगारी; म्हणवी शतवार सवायुवासवा[20] 'हा!'[21] तें.[22] ॥ ८६

---

१. सु+असु+सा=जिवंतसा. २. सूर्यासारखी तेजस्वी. ३. भीमाचा गदारूप अशनि (वज्र). ४. अश्व, सारथी आणि ध्वज यांसहित. ५. रथरूप पर्वतातें. ६. सैनिक. 'तें' असें पाठांतर. ७. त्वत्+अपत्यें=दुर्योधनादि मुलें. ८. 'एकैक' असें पाठांतर. ९. 'सुदर्शनान्त' असें पाठांतर. १०. बाणवृष्टि. ११. प्रलयकाळच्या मेघांचा समुदाय. एकदां नंदानें इंद्रयज्ञ करण्याची तयारी करविली; पण कृष्णानें इंद्रयज्ञ करण्यापेक्षां त्याच साहित्यानें ब्राह्मणादि चतुर्वर्णांस व गोमहिषशुनकादि सर्व भूतांस संतुष्ट करणें चांगलें असें सांगून त्यानें नंदाकडून तसें करविलें. त्यामुळें इंद्रास फार राग आला व त्यानें सात दिवस-पर्यंत गोकुळावर भयंकर वृष्टि करविली. त्या वेळीं कृष्णानें गोवर्धनपर्वत एका बोटावर उचलून त्याखालीं गोपगोपींचें व धेनूंचें संरक्षण केलें, अशी कथा आहे. त्या कथेस अनुलक्षून हें वर्णन आहे. १२. मोठें यश; (पक्षीं) द्रोणाचार्यांनीं आजपर्यंत मिळवि-लेलें यश. गोळा करणें=जमविणें, मिळविणें, संपादन करणें. १३. तोफेपासून. १४. भय. १५. उत्प्रेक्षालंकार. १६. बैल. १७. पावसाची सर. १८. द्रोणाच्या रथाला. १९. अश्वसहिताला. २०. वायुसह इंद्रातें; वायु (भीमपिता) आणि इंद्र (अर्जुनपिता) यांतें. २१. 'हा' शब्दातें. एथें धन्यतार्थक हा शब्द आहे. २२. तें=अश्वांसह रथास दूर झुगारून देणें.

गुरु मनिं म्हणे, 'विलोकुनि हें, गरुडहि चित्रसा उगा राहो. ।
ऐसेचिं[1] वेत्सभुज हो! दूर[2] [3]समस्तारिमद भुगारा हो!' ॥ ८७
[4]स्वरथीं भीम बसविला शीघ्र विशोकें, जसा [5]तपन अरुणें. ।
[6]नवयानीं गुरुहि बसे, ज्या 'वृद्ध' असें म्हणों नये तरुणें. ॥ ८८
द्रोण[7] द्वारीं राहे; मागें सोडूनि, पद, विरोध, सरे. ।
मारुति म्हणे, 'विशोका! हूं! व्यूहीं, शत्रुमद[8] विरो, धंस रे!'॥८९
भीम करी वीरांचें, वृक्षांचें, मथन, वातसा [9]वाटे; ।
निर्मोवा जेंवि वनीं दहनें, तो पथ नवा तसा वाटे. ॥ ९०
[10]कल्पांतीं कदन जसें रुद्र, तसें तो [11]गदीन भीम करी. ।
तीहि गदा कुरुकटकीं शिरतां, जैसी नदीं, न भी, [12]मकरी. ॥ ९१
परसेना लीलेनें, शिरतां, तत्काल तो विदारी ती. ।
रामशरांची बहुधा आली त्या [13]युद्धकोविदा रीती. ॥ ९२
दूरुनि सात्यकि अर्जुन पाहुनि, दे भीमयोध हाकेला. ।
धर्माला कळवी कीं, 'आहेत स्वस्ति, शोध हा केला.' ॥ ९३
तें परिसुनि, कृष्णसखे सात्यकिसह, गर्जले सुखें फुगले. ।
असतिल मयूर, परमप्रिय[14]घननादोदयीं, कसे [15]उगले? ॥ ९४
भीम धनंजय माधव सात्यकि हे वीर गर्जतां चवचे, ।
धर्म म्हणे, "शीतल हो[16] [17]कर्णयुगा! या [18]सुधोर्मिची चव घे. ९५

---

१. 'ऐसेचि' असें पाठांतर. २. हें भाषण भीमाच्या भुजांना उद्देशून द्रोणाचार्यांनीं केलें आहे. ३. समस्त+अरि+मद=सर्व शत्रूंचा गर्व. ४. विशोक नामक सारथ्यानें. ५. सूर्य. ६. नव्या रथावर. ७. [द्रोणाचार्य आपलें] पद (पदवी) [आणि] विरोध (वैर) सोडूनी मागें सरे—असा अन्वय. भीमाच्या पराक्रमामुळें चकित होऊन त्यानें असें केलें. आपण कौरवसैन्याचे अधिपति आहों, ही गोष्ट तो जणुं काय विसरला! ८. धैर्यानें शीर. ९. वाटेमध्यें. भीमाची युद्ध करण्याची रीति नेहमीं अशीच आडदांडपणाची असे. तो वृक्षपाषाणांदिकांनीं शत्रूला जर्जर करी, असेंच वर्णन ठिकठिकाणीं आढळतें. १०. विश्वाचे प्रलयकालीं. 'कल्पः शास्त्रे विधौ न्याये संवर्ते ब्रह्मणो दिने' इति मेदिनी. ११. गदी+इन=गदाधरांत श्रेष्ठ. १२. मगरी. १३. युद्धपंडिताला. १४. अत्यंत आवडत्या मेघांची गर्जना झाली असतां. १५. उगेच. हा **अर्थान्तरन्यास** आहे. १६. शांत हो. १७. दोन्ही कानांनो! १८. सुधा+ऊर्मि=अमृतलहरी.

वत्सा ! जेंवि निववविती इंदुकर[1] चकोरदृष्टिला गोरे[2]; ।
तेंवि सुहृन्नयना[3] तव भुज; यांसि न पापदृष्टि लागो रे ! ॥ ९६
बा ! चिंतातटिनीच्या[4], गिळिले बहु देव–दैत्य–नर, डोहें. ।
श्रीगुरुनेंचि म्हणावें[5], कीं, त्वां 'स्वाश्रित कदापि न रडो,' हें.॥ ९७
बा ! तूं ज्यांचा द्वेष्टा, कैसे जय पावतील ते जन गा ? ।
शक्रापुढें[6] टिकावें, ऐसें कैंचें प्रचंड तेज नगा[7] ? ॥ ९८
श्रीकृष्ण कृष्ण[8] सात्यकि कुशली आहेत, धन्य मी आजी. ।
आजिक्रतूंत[9] गिळिती रिपुं[10], काळीसी करूनियां आ[11] जी ॥ ९९
आजिसी बहु मान्या गांडीवलता[12] परायुध-ग्रामा[13] ।
विजया जय देउ, जसी कोदंडलता[14] परायुधग्रामा[15]. ॥ १००
रवि अस्तासि न जातां, मारूनि जयद्रथासि धवल-हरी[16] ।
उठविल काय सुखाच्या, जेंवि पयोधींत रात्रिधव[17], लहरी ? ॥१०१
सैंधव[18] मेल्यावरि तरि कौरवपति करिल काय सामातें ? ।
तो[19] दुःखप्रदहि प्रिय, सर्वस्वांवरिल[20] कायसा[21], मातें ?" ॥ १०२
अंध म्हणे, 'हा भीमोत्कर्ष मला संजया ! परिसवेनों[22]. ।

---

१. चंद्रकिरण. २. गौरवर्ण. ३. सुहृत्+नयन=आप्तांच्या नेत्रांस. ही उपमा फारच सुंदर आहे. ४. चिंतारूप नदीच्या डोहानें. ५. श्रीगुरूनें किंवा त्वां म्हणावें. ६. इंद्रापुढें. 'शक्नोति दुष्टजये इति शक्रः' (दुष्टांस जिंकण्यास समर्थ म्हणून शक्र)–अशी ह्या शब्दाची व्युत्पत्ति आहे. ७. पर्वताला. इंद्रानें पर्वतांचे पंख तोडिले, अशी कथा आहे. (पुढें अध्याय १२।५२ वरील टीप पहा.) ८. अर्जुन. 'कृष्णः सत्यवतीपुत्रे वायसे केशवेऽर्जुने' इति. ९. रणयज्ञांत. १० शत्रूंना. ११. जी (गांडीवलता) कालीदेवीसारखी आ करून (आ पसरून) आजिक्रतूंत रिपूंना गिळून टाकिते. १२. गांडीवधनुष्य. 'गांडीव' हें अर्जुनाच्या धनुष्याचें नांव. वल्ली अथवा लता हें पद भ्रू, विद्युत्, भुज, खड्ग, चाप या शब्दांशीं अथवा अशा अर्थाच्या शब्दांशीं अन्वित होऊन त्याचा अर्थ सौंदर्य, सौकुमार्य, सूक्ष्मता, तनुता, असा होतो. जसें:–भुजलता, भुजवल्ली, चापलता, धनुष्यवल्ली, विद्युल्लता, भ्रूलता. १३. शत्रूंच्या शस्त्रसमूहाला आजीसारखी फार मान्य, अशी गांडीवलता. १४. रामचंद्राच्या धनुष्याचें नांव. १५. पर+आयु+धक्+राम=शत्रूचें आयु जाळणारा जो राम त्याला. १६. श्वेताश्व (अर्जुन). १७. रात्रिपती (चंद्र). १८. जयद्रथ. १९. कौरवपति दुर्योधन. २०. सर्वस्वावरचा, पेक्षां. येथें 'सर्वस्वाधिक देहसा' अशी पंतांच्या हातची टीप आहे. २१. माझ्या देहासारखा. २२. ऐकवेना.

गमला नसेल दुःसह मुनिधिक्कृति[1]गंज शापरिस वेना[2]. ॥ १०३
कांपविला कीं व्यूह, व्याघ्रानें जेंवि कातराक्ष[3] ससा ! ।
सुत शेष राहिले जे, त्यांचाही करिल घात राक्षससा. ॥ १०४
चुकवावें हरिणाच्या, कैसें क्षुब्धा[4] हरीस[5], कळपानें ? ।
वधिल मुलें तो, तरुचीं जेंवि महानिल[6] हरी सकळ पानें. ॥ १०५
कुरुकटकीं भीम करी कर्म कसें काय, तें कळीव मला; ।
उग्राहि सूग्र[7] न जिरे, बा ! कर्कोटाहिविष कली[8] वमला.' ॥ १०६
सूत म्हणे, 'श्रवण करीं, कथितों मी भीमकर्णसमरा, ज्या ।
पाहुनि सुर मुनि वदले, 'रणपंडित भीम कर्ण सम' राजा! ॥ १०७
केला तें रोमांचित भीमानें कर्ण, वासवें[9] कांय[10]. ।
गमलें प्रलयीं भिडतो तो अर्णव[11] अर्णवासवें काय ? ॥ १०८
नरहरिचे लाजविती जैसे बालार्कवर्ण[12] नख पविला[13], ।
भीमशर तसेचि; तिहीं केला परिभूत[14] कर्ण, न खपविला. ॥ १०९
होउनि विरथ पळाला कर्ण, तया घे सुषेण निर्जयानीं[15]. ।
भीमभुजांनीं[17] केलें त्रस्त[16] सकलसैन्य, लब्धविजयानीं[17]. ॥ ११०
भीमाच्या सिंहरवें भ्याले बहु; एकही न पर[18] परते. ।
जे शूर मदांध द्विप, हंगले[19] बलधैर्यहीन परपर, ते. ॥ १११
केळला[20], कर्णपराभव झाला, हें भीमसेनसिंहरवें. ।
धर्म म्हणे, 'जोडावें वत्सा ! ऐसेंचि यश तुवां बरवें.' ॥ ११२

---

१. मुनींनीं केलेला धिक्काररूप अवमान. २. वेनराजाला. वेनराजाचें ब्राह्मणांशीं वैर होतें. ३. भयानें चंचल नेत्र ज्याचे असा. ४. क्षोभ पावलेल्या. ५. सिंहास. ६. मोठा वारा. ७. सु+उग्र=अधिक उग्र. ८. कली. नलराजाच्या शरीरांत कलीनें प्रवेश केल्यानंतर त्याला द्यूत खेळण्याची इच्छा झाली. तेथें सर्व राज्य घालवून तो वनांत भटकत असतां, कर्कोटकनामक सर्पानें त्याला दंश केला. त्यामुळें त्याच्या शरीरांतील कलीला तें विष फार असह्य झालें–अशी कथा आहे. (मोरोपंत–वनपर्व–अध्याय ४ पहा). ९. इंद्रानें. १०. आपला देह रोमांचित केला. ११. समुद्र. उत्प्रेक्षालंकार. १२. बालसूर्यासारखे रक्त वर्ण. १३. वज्राला. १४. पराभूत केला. १५. निजरथीं. १६. भयशील. १७. ज्यांना विजय मिळाला आहे अशा भीमाच्या भुजांनीं. १८. शत्रु. १९. पंताच्या काव्यांत क्वचित् ग्राम्य प्रयोग आढळतात. त्यांतीलच हा एक होय. पुढें अध्याय १६ गीति ६९ पहा. २० समजला. याचा कर्ता 'धर्म'.

कर्णपराभवहर्षें वाजविले शंख बहु अनीकांहीं; ।
त्या आनंदा मोया नाहीं अवकाश जनमनीं कांहीं. ॥ ११३
परिसुनि वैरदररव, बहु वाजविती शंख तावकहि मानी; ।
तो प्रभुशंख तव चमूभा, जेंवि प्रळयपावक हिमानी. ॥ ११४
गांडीवपांचजन्यध्वनिही लीलेकरूनि लोपविले ।
भीमरवें; मग योगी पळ तरि नसतील काय कोपविले ?॥ ११५

अध्याय बारावा.

शिरतां अर्जुन सात्यकि भीम व्यूहीं, गजव्रजीं[9] हरिसे[10], ।
धांवत जाय गुरुकडे दुर्योधन, षडरि[11] ज्यों[12] सरिसे. ॥ १
द्रोणासि म्हणे, 'गुरुजी ! शिरले व्यूहीं कसे तिघे अरि ते ? ।
तुमच्या प्रतापतपनें[13] केले तुच्छ प्रवाह कां न रिते[14] ? ॥ २
गेले अर्जुन सात्यकि भीम महाबळ जयंद्रथाजवळ, ।
साक्षात् कालांतक[15] यम जाणों त्यांचा[16] करावया कवळ[17]. ॥ ३
तुज जिंकिलें तिहीं हें अद्भुत[18] लोकांत कां न वाटावें ? ।
भीष्मीं[19] जेंवि तडागें, तेंवि समद्रेंहि काय आटावें ? ॥ ४

---

१. सैन्यांनीं. 'अनीकोऽस्त्री रणे सैन्ये' इति मेदिनी. २. मावायाला. ३. शत्रूच्या शंखाचा ध्वनी. ४. तुझे (धृतराष्ट्राचे) लोक देखील. ५. सैन्याचें तेज. 'तों प्रभु शंख, तव चमूभा, जेंवि प्रळयपावकहिमानी' असा पाठभेद–पदच्छेदच म्हणावयाचा– रा० पराडकरांच्या प्रतींत आहे. ६. पुष्कळ बर्फ. प्रलयाग्नीमध्यें हिमापेक्षां अतिशय तेज आणि हिमाला तत्क्षणीं वितळून टाकण्याचें जसें सामर्थ्य आहे, तसेंच कृष्णाच्या शंखामध्यें तुझ्या सेनेच्या तेजाहून अतिशय तेज, आणि ध्वनीच्या योगानें त्या सेनेला हतधैर्य करून टाकण्याचें सामर्थ्य आहे–असा अभिप्राय. ७. पळभर तरी. ८. त्यांच्या योगसमाधीला विघ्न झाल्यामुळें–असा अर्थ. ९. हत्तींच्या समुदायामध्यें. १०. सिंहसे. ११. षट्+अरि=कामादि सहा शत्रु. १२. ज्याच्या बरोबर. १३. प्रतापसूर्यानें. १४. रिकामे. १५. काल, अंतक, यम हीं तिन्ही यमाचींच नांवें. परंतु तिघांचीही मोठी योग्यता दाखविण्याकरितां वेगवेगळे शब्द दिले आहेत. तिघांना तीन नांवें अनुक्रमें लावावीं. १६. जयद्रथाचा. १७. ग्रास. १८. 'अद्भुत लोकां न काय वाटावें ?' असाही पाठ आहे. १९. उन्हाळ्यांत. 'भीष्में' असें पाठांतर. २०. तळ्यानें.

हतभाग्य मीच बहुधा; आहे मांझाचि नाश या केलहें; ।
कीं, जें तुझें त्रिलोकालंघ्य, तिघांनींच लंघिलें बल हें. ॥ ५
आतां काय करावें ? कैसी होईल सिंधुराजगती ? ।
झाली त्या पार्थमयी, सिंहमयी जेंवि सिंधुरां, जगती.' ॥ ६
द्रोण म्हणे, 'सर्वाधिक भीताभयदान सत्य, जावेंच; ।
शिरतिल पर यास्तव, हें म्यां व्यूहद्वार न त्यजावेंच. ॥ ७
कल्याण. त्वत्साहित्याविषयीं आहें मी नित्य अनलस मराया; ।
जा सैंधव रक्षाया, परदुःसह तूंहि अनलसम, राया ! ॥ ८
दिव्यकुरुक्षेत्र पट, ग्लेह सैंधव, ढळति अक्ष हे बाण; ।
या युद्धद्यूतींचे जयपरिभव सत्य, ते मृषा, जाण. ॥ ९
मी द्वारीं नसतां, गज सरसीसी, पर चमू ढवळतील, ।
शत्रुकरांतें सैनिकपति दत्ताभय अमूढ वळतील. ॥ १०
जाणें युक्ति, बळाचा जीस्तव, कुरुनायका ! पुरावा, ती. ।
सु. शिवतांचि पराभूति स्वच्छ यशा खाय, कापुरा वाती.' ॥ ११
मानुनि शासन गुरुचें व्यूहाबाहेरुनि क्षितिप तूर्ण ।
जाय, कराया जीवनकाम-जयद्रथ-मनोरथा पूर्ण. ॥ १२

---

१. 'माझा विनाश' असें पाठांतर. २. युद्धानें. ३. त्रिलोकाला अलंघ्य. ४. जयद्रथाची गती. ५. सिंधुराजाला. ६. अर्जुनप्रचुरा (सर्वत्र अर्जुन आहे अशी). ७. गजाला, हत्तीला. ८. मी त्याच्या संरक्षणासाठीं जाणें योग्य आहे–असा भाव. 'द्रोण म्हणे......जा वेंच । शिर, शिरतिल......म्यां व्यूहद्वार......॥' असा पाठ आदर्शप्रतींत होता. (वेंच=खर्च कर). ९. शत्रूंना दुःसह. १०. अग्नितुल्य. ११. कुरुक्षेत्र हा दिव्य (सोंकट्याचा) पट, जयद्रथ हें पणद्रव्य, बाण हे फांसे चालले आहेत. सारांश हें जें युद्ध तें एक द्यूतच होय. यामध्यें जय पराजय हे खरोखरीचे होत. १२. पणद्रव्य. १३. बाण हेच अक्ष (फांसे) चालताहेत. १४. खरोखरी. १५. पूर्वींच्या द्यूतांतले. मृषा=लटके, खोटे. १६. सरोवरासारिखी. १७. शत्रु. १८. शत्रूच्या पक्षास जाऊन मिळतील. १९. ज्यांना अभय दिलें आहे असे जाणते सेनापति. २०. जिच्या योगानें बळाचा पुरवठा होतो, तीच खरी युक्ति, हें तूं जाण. २१. पूर्ति, पुरवठा. २२. पराभव. २३. अर्थात् दिव्याची ज्योति. जेंवि कापुरा वाती खाय, तेंवि पराभूति शिवतांचि (ती) स्वच्छ यशा खाय–असा अन्वय. २४. आज्ञा. २५. दुर्योधन. २६. जिवंत राहूं इच्छिणारा जो जयद्रथ, त्याचा मनोरथ पूर्ण करायाला.

तों वीर उत्तमौजा, तद्बंधुहि देखिला युधामन्यू; ।
तत्काल तिघांकरवीं[1] धरवी युद्धार्थ आयुधा मेन्यू[2]. ॥ १३
होऊनि उत्तमौजा विरथ, युधामन्युच्या रथीं चढला. ।
रथ भंगितां [3]तिहीं, बहु कुरुपति कोपें-करूनियां कढला. ॥ १४
भूप गदा पडताळुनि[4], सिंह गजांवरि जसा तसा, तूर्ण ।
धांवे, दोघे भ्राते वीर कराया रथासकट चूर्ण. ॥ १५
आयु[5] म्हणे त्यांसि, 'मरण आलें हें, टाकुनी उडी, दवडा. ।
वधिलचि हा, शूळार्ता[6] वांटुनि केला जसा उडीद[7] वडा.' ॥ १६
ते[8] भूपृष्ठीं पहिली, मग घाली तद्रथीं, उडी, दरदा[9]; ।
तो[10] झाला पीठ, जसा सांपडला चर्वणीं उडीद रदां[11]. ॥ १७
परिभूतिनें[12] तळमळे, जेंवि नखीं विद्ध[13] मानव सुयानीं[14]. ।
भूप चढे शल्यरथीं, तेही राजोत्तमा ! नवे-सु-यानीं[15]. ॥ १८
पार्थाकडेचि गेले ते त्याचे चक्ररक्षक[16] रयानें[17]. ।
राया ! मग दुर्योधनराजाही युक्त होय वर-यानें[18]. ॥ १९
पुनरपि गांठूनि करी भीमाला कर्ण, कौरवा[19] ! रण गा ! ।
सर्वासुरराज बळी[20] जेंवि चतुर्दंतगौरवारणगा[21]. ॥ २०
वृद्ध म्हणे, 'भग्न करी भीम बळें, करुनि संगरा, ज्याला, ।

---

१ दुर्योधन, युधामन्यु, उत्तमौजा यांकडून. २. क्रोध. ३. उत्तमौजा व युधामन्यु यांहीं. ४. अजमावून व नंतर ज्याप्रकारें धारण. करावयाची त्याप्रकारें धारण करून. ५. आयुष्य. येथे **चेतनधर्मारोपोक्ति** नामक अलंकार आहे. ६. शूलरोगपीडितास. ७. उडीद वांटुनि केला (केलेला) वडा जस शूलार्ता वधील—असा अन्वय. ८. ते भूपृष्ठीं पहिल्यानें उडी घालिती;मग त्याची (दुर्योधनाची) दर-दा (भयदा) गदा तद्रथीं (उत्तमौजा व युधामन्यु ह्यांच्या रथामध्यें) उडी घाली—असा भाव. ९. ती भय देणारी (गदा). १०. तो रथ. ११. दांतामध्यें. १२. पराभवानें. १३. टोंचलेला. १४. 'सुई' शब्दाचें तृतीया बहुवचन. १५. नव्या उत्तम रथीं. १६. चक्ररक्षक होण्याकरितां. १७. वेगानें. १८. उत्तम रथानें. १९. हे धृतराष्ट्रा ! २०. बळीनें इंद्राचें राज्य घेण्याचा प्रयत्न केला होता, परंतु विष्णूनें वामनावतार घेऊन त्यास फसविल्यामुळें तो त्याचा बेत सिद्धीस गेला नाहीं, ही कथा प्रसिद्धच आहे. २१. चतुर्दंत व गौर अशा गजावर (ऐरावतावर) असलेल्या इंद्राला. ऐरावतादि दिग्गजांना चार चार सुळे आहेत, अशी समजूत आहे.

त्यावरि जाया झाला कैसा उत्साह अंगराजाला[1] ? ॥ २१
ज्याच्या भयें न लागे धर्माचें पळहि पातया पातें[2], ।
तो कर्ण भग्न झाला, केला लघु नहुषपात[3] या पातें. ॥ २२
भीष्मद्रोणभयाधिक ज्याचें भय मानितो अजातारी[5], ।
त्यां[6] भीमशक्ति भंगी ! हरिभीतें[7] गजा न कां अजा तारी ? ॥ २३
जो उपजला सकुंडलकवच[8] नवचमत्कृतिप्रति प्रसवे, ।
रसवेत्ता[9], दाता, ज्यां[10] ब्राह्मणपदपूजनाविना न संवे[11]; ॥ २४
देते परघूकांतें[12], सुहृदब्जांचे[13] प्रभाकर, दरीं[14] जे, ।
ते सर्वहि ज्यां[15] एकें[16] केले, हरुनि प्रभा, करदें राजे; ॥ २५
त्या वीरवरा कर्णा सर्व-सु-विद्या-दया-कळा-वांसा[17] ।

---

१. कर्णाला. २. डोळ्यांचें पातें. ३. या पातें नहुषपात लघु केला. त्या नहुष-पाताहून हा पात मोठा झाला—असा अर्थ. ही नहुषपाताची कथा अशी आहेः—नहुष हा सोमवंशीय प्रसिद्ध राजा होता. इंद्रानें ब्रह्महत्या केल्यामुळें तो पदच्युत झाला. तेव्हां सर्व देवांनीं नहुषाला इंद्रपदाभिषिक्त केलें. याला कांहीं काळानें इंद्राणीचा उपभोग आपणास घडावा अशी प्रबल इच्छा झाली. परंतु ती त्यास वश झाली नाहीं. 'तूं अपूर्व वाहनांत बसून मजकडे ये म्हणजे तुझी इच्छा पुरवीन' असें एकदां तिनें नहुषाला सांगितलें. तेव्हां तो सप्तर्षींस व अगस्त्यमुनीस वाहनास लावून तिजकडे यावयास निघाला. त्याला जाण्याची घाई होती म्हणून त्यानें मुनिवाहकांच्या मस्तकास पाय लावून 'चला चला' (सर्प सर्प) असें म्हटलें. तेव्हां संतप्त होऊन अगस्त्यमुनीनें त्याला शाप दिला कीं, 'तूं सर्प होऊन पतन पावशील.' त्याप्रमाणें नहुष राजा अजगर होऊन यामुनगिरीवरील सरोवरांत पडला. (वनपर्व अध्याय १७९—१९१. उद्योग-पर्व—अध्याय ११—१७.) नंतर नहुषानें त्या मुनीची प्रार्थना केली, तेव्हां 'जो तुझ्या प्रश्नांचीं उत्तरें देईल तो तुला शापमुक्त करील' असा त्यानें उःशाप दिला. पुढें पांडव वनवासांत असतां भीमाची व याची गांठ पडली, व तो भीमास गिळूं लागला. तेव्हां धर्माशीं याचें संभाषण होऊन तो शापापासून मुक्त झाला. (मोरोपंत—वनपर्व—अध्याय ६ गीति १—३१ पहा). ४. कर्णपतनानें. ५. ज्याला शत्रु जन्मला नाहीं असा, अजातशत्रु, धर्म. ६. कर्णाला. ७ सिंहाला भ्यालेल्या हत्तीचें संरक्षण शेळी करणार नाहीं काय ? असंभवालंकार आहे. ८. कवचकुंडलसहित. ९. वीररसज्ञ. १०. कर्णास. ११. संवय. १२. शत्रुरूप घुबडांस. रूपकालंकार. १३. सुहृत्+अब्ज=आप्तांच्या हृदयकमलाचे प्रभाकर (सूर्य), आप्तांना आनंदकारक. १४. भीतीला. १५. ज्या एकट्यानें. १६. करभार देणारे, मांडलिक. १७. वास=स्थान.

भीम कसा विक्रमगति[1] रोधक झाला, ह्या कळोपासा[2] ? ॥ २६
पुत्रांस[3] सखा, आश्रय, सर्वस्व, अभेद्य कर्ण तो कवच, ।
यश बहु रुचे[4] जयाचें, जैसें अस्पष्टवर्ण तोक-वच[5]. ॥ २७
नुरविल शेष[6] परांच्या, मथुनि सकल, सितहयासकट[7], कटकीं; ।
ज्याच्या भरवंसियानें केली, न धरुनि भयास, कटकट[8] कीं. ॥ २८
त्या कर्णासीं कैसा पुनरपि तो भीमसेन समर करी ? ।
अत्यद्भुत[9] हें प्रतिभट[10] मर्त्य करी एक, एक अमर करी[11]. ॥ २९
आधींच सदय;[12] कळलें बंधुत्व;[13] कथी स्वयें पृथा नो तें[14] ? ।
मग केलें युद्ध कसें ? न करावें साधुनें वृथा नातें. ॥ ३०
दोघांत कोण विजयी झाला तें सांग, आयकों दे गा ! ।
कांहीं काल सुखें, कीं दुःखें, संसारिकाय[15] कोंदे गा !' ॥ ३१
सूत[16] म्हणे,—भीम निघे बंधुकडे जावयासि वातगती[17], ।
त्याच्या दृष्टिपुढें परशक्ति न, हरिच्या जशा शिवा[18], तगती[19]. ॥ ३२
धांवुनि कर्ण म्हणे, 'रे ! दावुं नये पृष्ठ संगरोपरतें[20]. ।
परतें[21]; रणींच मरणावधि[22], जरि खातील अंग रोपे[23], रतें. ॥ ३३
तुजसीं युद्ध घडो, हें स्वप्नींहि न चिंतिलें परांनीं[24] कीं, ।
तो तूं भीमा ! मजला पृष्ठ कसें दाविसी परानीकीं[25] ? ॥ ३४

---

१. पराक्रमी आहे गमन ज्याचें तो. २. पायबंदासारखा, पायखुंटासारखा. ३. माझ्या पुत्रास, दुर्योधनास. ४. मला रुचे. ५. बालशब्द. ६. अवशेष. ७. अर्जुनासहित. ८. कलह. ९. अति+अद्भुत=मोठें आश्चर्य. १०. प्रतिपक्षी योद्धा, शत्रु. ११. देवांचा गज (ऐरावत). १२. 'आधींच सदय कळवी' असाही पाठ आहे. १३. कर्ण हा कुंतीचाच पुत्र, म्हणून पांडवांचा भाऊ; ही गोष्ट स्वतः कुंतीनेंच कर्णाला कळविली होती. (मोरोपंतकृत उद्योगपर्व–अध्याय ११ गीति १–३१ पहा). १४. तें पृथा स्वयें कथी ना [काय] ? तें (बंधुत्वाचें नातें) स्वतः कुंतीनेंच सांगितलें नाहीं काय ? १५. संसारी जनांचा देह. १६. संजय. १७. वाऱ्याप्रमाणें अत्यंत वेगानें. १८. कोल्ह्या. १९. टिकती, टिकाव धरिती. २०. संगर+उपरतें=युद्धापासून पराङ्मुख असा जो तूं (भीम), त्यानें पाठ दाखवूं नये–असा अर्थ. २१. परत ये, मागें फीर. २२. रणींच मरणावधि रतें (रममाण हो). २३. जरी बाण [तुझें] अंग खातील. २४. शत्रूंनीं (कौरवांनीं). २५. शत्रुसमुदायांत.

सर्वस्व जीविताधिक यशचि सुखास्पद, न भाउ[1]; परतें रे !
रणनिजधर्मापासुनि नैं, मळाया वदनभा[2], उपरतें[3] रे ! ॥ ३५
शत्रूसि पाठ दाविसि, हें तुज कुंतीसुतासि[4] अनुचित रे ! ।
क्षत्रिय लब्धजयचि, कीं खरतरपरशरें[5]विशीर्ण तनुचि, तरे[6]. ॥ ३६
भीम प्राण हराया अपकारें, तापसापसा[7], परते; ।
विनविति गमे, करुनि त्या आत्रेया[8] तापसा पसा, पर[9] ते. ॥ ३७
मृदुपूर्व[10] युद्ध रविसुत[11], भीम करी क्रोधपूर्व, गा राजा ! ।
कांपविती इषु[12] त्यांच्या बहु; थोडें त्या[13], शुचींत[14] गारा ज्या. ॥ ३८
भीमातें आच्छादिति वृषशर[15], जे पत्रिपतिसम[16] रय-ज्ञ[17]. ।
या दोघांचा, बहु दे नारदनयनांसि रति[18], समर-यज्ञ. ॥ ३९
कर्ण करी स्मित, तेणें भीमाला बहुत राग ये; रचितें[19] ।
हास्यचि बहु ताप, न विष; मानधन न साहतात, येरचि[20],तें.॥४०
जरि होय भीम, जैसा बहु पुष्पित पळस, लालभडक, वनीं, ।

---

१. बंधु. २. मुखावरील तेज, अब्रू. ३. पराङ्मुख होऊं नको. ४. स्वतः आपण कुंतीसुत आहों, आणि आपण पाठ दाखवीत नाहीं, असा अंतरंग अभिमान प्रदर्शित करून कर्ण भीमाला बोलत आहे, असा भास होतो. ५. विच्छिन्न, अत्यंत तीक्ष्ण अशा शत्रूंच्या बाणांनीं गलित. येथील 'र'काराची आवृत्ति मनोहर आहे. ६. क्षत्रियाला जय मिळविणें, किंवा युद्धांत मरणें हेंच भूषण आहे. 'हतो वा...भोक्ष्यसे महीम्' असें भगवंतांनीं गीतेंत अर्जुनास सांगितलें आहे, त्याचा हा भावार्थ. ७. तापासारखा आणि सापासारखा. ८. दुर्वासास. 'अंजलि कृत्वा क्षुब्धं दुर्वाससं प्रार्थयंत इव भीमप्रेक्षकाः कौरवा अभूवन्'–पंत. (म्हणजे हात जोडून क्षुब्ध अशा दुर्वासाचीच जणूं प्रार्थना करीत आहेत, असे भीमाला पाहणारे कौरव भासले). दुर्वासाची तामसी वृत्तीविषयीं प्रसिद्धी आहे. ९. ते पर पसा करुनि (हात जोडून) त्या आत्रेया तापसा विनविति (भीतीनें नमस्कार करिती), [असें] गमे–असा अन्वय. १०. सौम्यवृत्तिपूर्वक, धिमेपणानें. पूर्व=पूर्ण. ११. कर्ण. १२. त्यांचे बाण. एथें 'इषु' शब्द स्त्रीलिंगी आहे. 'यात इषुः शिवतमा' असा वैदिक प्रयोग प्रसिद्ध आहे. १३. त्या गारा थोडें कांपविती–इत्यर्थ. १४. ज्येष्ठ किंवा आषाढमासांत. १५. कर्णाचे बाण. १६. गरुडतुल्य. १७. वेग जाणणारे. १८. आनंद. १९. उत्पन्न करितें. हास्यचि बहु ताप रचितें, विष [ताप] न [रचितें]–असा अन्वय. २०. इतर मात्र. ज्यांना मान हेंच धन, ते तें (हास्य) न साहतात; इतर (मानहीन) मात्र तें साहतात.

कठिणींहि रणीं न पडे त्या, गुरुभक्तासि जेंवि, जड[1], कवनीं.॥ ४१
तें भीमवपु विना[2]शर, शैल्य[3]वपु जसें विना[4]शलल, नाहीं. ।
केला इषुनीं त्याचा न, शुका[5]चा जेंवि, नाश, लल[6]नाहीं. ॥ ४२
भीमें आठविला स्त्रीवस्त्रहरण हा नि[7]कार भारी हो ! ।
[8]कर्णहि, मुख्यत्वें जो करणारा हानि, कारभारी हो ! ॥ ४३
केला पुन्हा[9], मथुनि धनु-हय-सारथि, तो रणस्थ विरथ कवी; ।
वाटे घ[10]नरवसमरीं, क[11]पि, रोधुनि तोर[12]णें, स्थ[13]विर थकवी. ॥ ४४
अन्यरथीं क्षिप्र चढे, मोह प्रकट न करूनि आ[14]धिरथी, ।
कीं होवूत न विकल स्वव्या[15]मोहें, धरूनि आ[16]धि, रथी. ॥ ४५
कर्णचि धन्य ! न होता अन्य तसा मानव क्ष[17]म रणातें. ।

---

१. अवघड. गुरुभक्तासि जेंवि कठीणही कवनीं (काव्यामध्यें) कांहीं जड वाटत नाहीं, तसें त्याला कठीण युद्धामध्यें देखील कांहीं जड वाटलें नाहीं. २. शरावांचून. ३. साळूचा देह. ४. कंटकावांचून. शलल=साळू नामक प्राण्याच्या आंगावरील कांटा, ज्यास सालपीस म्हणतात तें. ५. हा कृष्णद्वैपायन व्यासाचा शुकीचें रूप धारण केलेल्या घृताची नामक अप्सरेपासून झालेला पुत्र. हा उपजत मोठा वैराग्यशील, ज्ञानसंपन्न आणि परमभागवत होता. त्याच्या तपाचा भंग करावयास इंद्रानें रंभेस पाठविलें होतें; पण तिचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले. ६. स्त्रियांनीं. ७. अपकार. ८. आठविला—इति शेषः ९. पुन्हा तो रणस्थ कवि (कर्ण) विरथ केला. १०. मेघनादाच्या (इंद्रजिताच्या) युद्धांत. इंद्रजित् हा रावणाचा पुत्र. ह्यानें स्वतपश्चर्येनें ब्रम्हदेवास संतुष्ट करून त्याजपासून वरदान मिळविलें होतें. तें असें कीं, निकुंभिला नामक यज्ञभूमींत अभिचारिक होम यथासांग समाप्त करावा, म्हणजे यज्ञाग्निकुंडांतून कामगामी अश्वांनीं युक्त असा रथ आणि ब्रह्मशिरोस्त्र नामक आयुध त्यास प्राप्त होईल व त्यांच्या योगें तो सर्वांस अवध्य होईल. रावणानें सीतेस हरण करून लंकेंत नेल्यामुळें जीं रामपक्षीय वानरादि योद्ध्यांशीं युद्धें झालीं त्यांत ह्यानें अवर्णनीय पराक्रम गाजविला होता. ह्यानें जन्मतांच मेघासारखी गर्जना केल्यामुळें याचें नांव मेघनाद असें ठेविलेलें होतें. रावण देवांस जिंकण्यासाठीं स्वर्गांत गेला असतां, तेथें देवांचा व राक्षसांचा घोर संग्राम झाला. त्यांत मेघनादानें इंद्रास आपल्या शस्त्रास्त्रांनीं जर्जर करून पराजित केलें. म्हणून त्यास इंद्रजित् असें नांव पडलें. ११. मारुती. १२. बहिर्द्वार. १३. जुना कपि (मारुती). १४. अधिरथ नामक सारथ्याचा पोषित पुत्र (कर्ण). १५. आपल्या मूर्च्छेनें. सेनापति स्थिर असल्यानें सैन्य स्थिर असतें, पण तो भितरा असल्यास सैन्याची दाणादाण होते, हें जगत्प्रसिद्ध आहे. १६. मनोव्यथा. १७. समर्थ.

देतें कां न [१]क्षतशतचित [२]तितउसमान वक्ष [३]मरणातें ? ॥ ४६
कर्णपराभव [४]म्हणवी, येउनि कानास, 'हाय !' [५]हा, [६]निबरा. ।
रोदन वृथा खरें परि, साहेल कसी [७]सहायहानि [८]बरा ? ॥ ४७
[९]मोहे वाहुनि हृदयीं चिंतेतें वृद्ध, जेंवि [१०]सांगेतें; ।
पुनरपि तद्वृत्त पुसे. परिसा, संजय तयासि सांगे, तें. ॥ ४८
कर्ण पुन्हा क्रोधानें धांवे. तें देखतां, असें बहुत ।
वदले [११]तावक, '[१२]पावकवदनीं झालाचि भीमसेन हुत.' ॥ ४९
[१३]हय [१४]वृषहयांत मिसळी, जे वर्णे स्पष्ट [१५]आसविल; याला ।
देखुनि तव विजयाची पावे सारीच [१६]आस विलयाला. ॥ ५०
अपकार तुम्हीं केले जे जे, त्यांतें स्मरोनि [१७]तो खवळे; ।
[१८]कर्णदवीं [१९]घनचि गमे; याया [२०]श्रितचातकांसि [२१]तोखें, वळे. ॥ ५१
एकें मुखें किति करूं [२२]अत्यद्भुत युद्धयज्ञवर्णन गा ! ।
वाटे प्रवर्तला तो भेदाया [२३]मूर्तवज्र [२४]कर्णनगा. ॥ ५२
तोडुनि धनु, कर्णाची शक्तिहि भंगी, जसीच [२५]मूठ [२६]कवी ।

---

१. क्षतशतानें व्याप्त. २. चाळणीसारखें. ३. तितउसमान क्षतशतचित वक्ष [इतराला] मरणातें कां न देतें ?–असा अन्वय. ४. हा कर्णपराभव कानास येऊन, निबरा (वृद्धाकडून) 'हाय !' म्हणवी. हा कर्णपराभव ऐकतांच त्या वृद्धानें 'हाय !' म्हटलें. ५. हा कर्णपराभव. ६. म्हाताऱ्या धृतराष्ट्राकडून. ७. सहायकर्त्यांचा नाश. ८. भला, सज्जन. ९. 'मोहें' असें पाठांतर. मोह=चित्तवैकल्य, भ्रांति. १०. सांग=शस्त्रविशेष (बर्ची). ११. त्वत्पक्षीय. १२. [बाणरूप] अग्नीच्या मुखीं. १३. 'भीम' हा अध्याहृत कर्ता. 'हय' हें कर्म. १४. कर्णाच्या घोड्यांत. १५. आखलासारखे काळे. १६. आशा. ही गीति वाचीत असतां, पंतकृत सभापर्व–अध्याय ५, गीति ६५ हिचें स्मरण झाल्यावांचून राहात नाहीं. १७. भीम. १८. कर्णरूप दवानळीं. १९. मेघ. २०. आपले आश्रित हेच कोणी चातकपक्षी त्यांस. **परंपरितरूपक** आहे. **उत्प्रेक्षा** देखील आहे. २१ आनंद. २२. अति+अद्भुत. २३. भीम हा मूर्तिमान् वज्र. २४. कर्णरूप पर्वतास. पूर्वी हिरण्याक्षाचे मायेनें सपक्ष झालेले पर्वत यथेच्छ संचार करीत आणि तेणेंकरून मुनिजनांस त्रास देत. म्हणून इंद्रानें आपल्या वज्रानें पर्वतपक्षशातन करून त्यांस यथास्थान स्थिर केलें आणि मुनिजनांस होणारा त्रास बंद केला—अशी पौराणिकी कथा आहे. २५. मरणकारक मंत्रप्रयोग. मूठ मारणें= मंत्रप्रयोगानें एखाद्यास ठार मारणें. २६. मंत्रशास्त्रज्ञ.

कीं जैंवि मथुनि मन, मुनि विप्रांची दारुणा चमू ठकवी. ॥ ५३
भेदी भीम शरांनीं बहु शीघ्र परी[1], [2]शरासनादानीं. ।
भिववि[3] ति वृषा न ते[4], निशि[5]चर जैंवि पराशरास, [6]नादानीं. ॥ ५४
करिती ते[7] वृषभ, गज-व्याघ्र-हरि-शरभ-सुराऽसुर-[8]सम, रणा. ।
ब्रह्मरस तसा न गणूं दे, वीररसचि [9]सुरा सुरस, मरणा. ॥ ५५
भीमें पुनरपि [10]कार्मुक तोडुनि, वधिले सु[11]शंखधवलहरी. ।
नवल [12]हरि करी; प्रसवे बहुत तदानंदसिंधु नव लहरी. ॥ ५६
भ्रात्यासि म्हणे कुरुपति, '[13]तूंवरक पिटोनि दूर लाव कसा.' ।
[14]दुर्जय धांवे, व्हाया श्ये[15]नांपासूनि चूर [16]लांवकसा. ॥ ५७
[17]शरपातदेश सोडुनि, सेना होती उगीच बाहेरी. ।
जरि जाय एकला अरिवरि दुर्जय, तरि उगीच बा ! [18]हेरी. ॥५८
लागे [19]स्वर्गफलद शर भीमक्षेत्रीं सुधीट पे[20]रांया. ।
यश साधाया, घालुनि [21]अंजन नेत्रीं, सुधी टपे, राया ! ॥ ५९
[22]सातांनीं मग, आधीं भीम उरीं ताडिला नवशरांनीं. ।
[23]नासाकेश उपडि[24]तां गज होय हरीस कां न [25]वश रानीं ? ॥ ६०

---

१ कर्णास. २. शर+आसन+आदानीं=बाण फेंकणारें (धनुष्य), त्याचें ग्रहण करून. ३. कर्णाला. ४. भीमशर. ५. राक्षस. ६. पराशराच्या पित्यास राक्षसांनीं भक्षिलें होतें; म्हणून त्यानें राक्षसांना मारण्याचें सत्र केलें. राक्षसांच्या भयंकर ध्वनीला तो भीत नसे. ७. भीम व कर्ण. ८. एथें 'गज'पासून 'सम'पर्यंत सर्व एकपद घ्यावें; केवळ समजुतीस्तव पदच्छेद केला आहे. 'सम' शब्दाचा संबंध तीन्ही जोड्यांशीं घ्यावा. ९. मद्यप्याला सुरा जशी सुरस वाटते तिजप्रमाणें वीररस मरणाला सुरस वाटवी. १०. धनुष्य. ११. सु+शंख+धवल+हरी=सुंदर शंखासारिखे पांढरे घोडे. १२. कृष्ण. १३. मिशा नसलेला, खाइ (भीम). 'तूं वरक' असें पाठांतर. वरक=नीच. १४. दुर्योधनभ्राता. १५. ससाण्यापासून. १६. पक्षिविशेष, लावासा. १७. बाणाच्या आटोक्यांतील प्रदेश. १८. पाहे. १९. स्वर्गफल देणारा, अर्थात् मृत्यु देणारा. २०. तो सुधीट भीमक्षेत्रीं स्वर्गफलद शर पेराया लागे. २१. डोळ्यांत काजळ घालून, अत्यंत सूक्ष्म लक्ष पोंचवून. २२. सात बाणांनीं. २३. गज हा सिंहाला सहज साध्य आहेच; त्यांत पुनः जर गजानें सिंहाच्या नाकांतील केश ओढले, अर्थात् त्याला ढुश्या दिल्या, तर तो पूर्णपणें त्याच्या हस्तगत कां न होईल ! २४. उपटणारा. 'उपडितां' असें पाठांतर. २५. सहजसाध्य.

तो साश्वसूत[1] दुर्जय वधिला तत्काल न करितां गलबा; ।
जाणों भीम म्हणे, 'घे स्वर्ग, त्यागुनि कुसंग[2] हा. चल, बा !' ६१
रडतचि दुर्जय कर्णे त्या समरमखांत[3] घातला उजवा. ।
मौनें म्हणे कुमार[4], 'व्यर्थ नयन सुजवितां, सुखें सुजवा.' ॥ ६२
कर्णे गणिले न विशिखें[5], भीमाचे लागले कचाकच ते; ।
नच, तेजस्विज[6] नसतां, पचते; तदवयव खळखळां खचते[7]. ॥ ६३
स्थविर[8] म्हणे, 'हा ! कर्णी बळ बहु. परि पांडवांपुढें न चले. ।
अंगारें[9] सर्वदुर्जर[10], तदपि चकोरांसि[11] ते सुखें पचले.' ॥ ६४
सूत[12] म्हणे, 'होय पुन्हा कर्ण कलहरत, चढोनि नव-यानीं; ।
आचार्यचि[13] ते, कीं रणसव[14] राखविला सुरांसि नवें[15] यांनीं[16]. ॥ ६५
कर्णाचे हय चारी मारी खवळोनि तो गदाघातें. ।
भीमबळातें वारूं न शके तो,[17] जेंवि भोगदाघातें[18]. ॥ ६६
केतु[19] च्छेदुनि सूतहि[20] वधिला. अत्युग्र तेज राया ! तें. ।
वृष मंदोत्साह गमे. आली परिभूति[21] ते जरा[22] यातें. ॥ ६७
राहे कोदंडबळें[23] तो, दंडबळें उभा जसा जीर्न[24]. ।
तेजस्वी नच वांके. स्वीकारिल केसरी[25] कसा जीनें[26] ?' ॥ ६८

---

१. अश्व आणि सारथी यांसह. २. दुष्ट दुर्योधन याची संगति. ३. यज्ञाहुतीला प्रदक्षिणा करायाची, तिजप्रमाणें कर्णानें रडतच्चि दुर्जयाला प्रदक्षिणा केली. ४. दुर्जय. हा मृत असल्यामुळें बोलला नाहीं. तेव्हां त्याचें मौन हेंच भाषणकर्तें झालें–असा अर्थ. ५. बाण. ६. वीरपुत्र; पक्षी, सूर्यपुत्र. 'तेजस्विज' हा शब्द साभिप्राय आहे; म्हणून परिकुरांकुरालंकार. ७. गळते. ८. म्हातारा धृतराष्ट्र. ९. निखारे. १०. सर्वांना पचण्याला कठीण. ११. चकोरपक्ष्यास. (चकोराचें भक्ष्य निखारे आहेत, असा कविसंकेत आहे.) १२. शौनकादिकांप्रत म्हणतो. १३. धनुर्वेदगुरू. 'आश्चर्यचि तें' असा पाठ आदर्शप्रतींत होता. १४. रणयज्ञ. १५. नवा. १६. भीम आणि कर्ण यांनीं. १७. कर्ण. १८. कर्मफळाचा भोग देणाऱ्या अघातें (पातकातें). १९. ध्वज. २०. सारथी. २१. पराभव. २२. अंमलशी. 'जरा' हा शब्द आरबी आहे. पंतांच्या काव्यांत यवनी शब्द आल्याच्या कित्येक उदाहरणापैकीं हें एक आहे. एथें 'जरा' म्हणजे वार्धक्य असाही अर्थ कोणी करतील; पण तो प्रशस्तपणें लागत नाहीं, असें आम्हांस वाटतें. २३. धनुष्याच्या आधारानें. २४. म्हातारा. २५. सिंह. २६. खोगीर. अर्थांतरन्यासालंकार.

भूप म्हणे, 're दुर्मुख[1] ! धाया कर्णासि अभय वा ! धावें. ।
आपण देखत असतां अरिचें स्वसल्यासि न भय बाधावें. ॥ ६९
केला कीं कर्ण विरथ; चापीं गुण, आधिरथि[2] रथीं, चढवीं. ।
तो[3] शर जसा प्रतापें त्यां[4], या जलधीस[5] तूंहि जा, कढवीं.' ॥ ७०
गेला वाराया जों दुर्मुख, देखुनि समक्ष याला हो ! ।
प्रेषी शर भीम; म्हणे, 'सत्वर हाही यमक्षया[6] लाहो[7].' ॥ ७१
वाराया[8] गेला तों आपणचि, न लागतांहि पळ, वारे[9]; ।
जाणों शरां म्हणे धनु, 'कार्य[10] पुढें, नीट हात वळवा रे !' ॥ ७२
दुर्मुखरथ सांपडला विरथा कर्णासि आयता, राया ! ।
दैवत्यक्तासि[11] शके न सखा न पिता न माय ताराया. ॥ ७३
राधेयाला न[12] धरे, होतां दुर्मुख परासु[13], रोदन हो ! ।
स्नेहगुण असाचि; कसा मोहद मज्जनपरा[14] सुरोद[15] न हो ? ॥ ७४
नांदे सुखें सदोदित संसारीं तोचि, जो अनय[16] न करी. ।
न तिघे इतर जन; बुडे व्यसनीं, पंकीं जसा अंधयन[17] करी[18]. ॥ ७५
करि साश्रु दुर्मुखाच्या, तो कर्ण कवि प्रदक्षिणा, देहा. ।
समरीं भीम[19] गमे श्रुतिगोतर्णकविप्र[20], दक्षिणा दे हो[21]. ॥ ७६

---

१. धृतराष्ट्राचा एक पुत्र. २ कर्णाला. चापीं गुण चढवीं, आणि कर्णाला रथावर चढवीं. ३. तो प्रसिद्ध परशुरामशर. ४. त्या प्रसिद्ध जलधीस (पश्चिम समुद्रास). एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करून तिचें ब्राम्हणांस दान केल्यानंतर आपणास राहाण्यासाठीं परशुरामानें पश्चिम समुद्राजवळ जागा मागितली, परंतु ती तो देईना. तेव्हां रामांनीं त्यावर एक बाण सोडून त्याला मागें हटविलें व जागा मिळविली—अशी कथा आहे. ५. या जलधीस (भीमास). ६. यमसदनास. ७. पावो, लाभ होवो. ८. निवारण्याला. ९. मरे. १०. मुख्य कार्य अजून पुढें आहे म्हणून. ११. दैवानें ज्याला सोडिलें आहे अशास, दुर्दैवी मनुष्यास. १२. नाटोपे. १३. गतप्राण. १४. मज्जन+परा=बुडी मारणाऱ्यास. १५. सुरासमुद्र. संसार हा सुरेप्रमाणें मोहद आहे. तेव्हां त्यामध्यें निमग्न होणाऱ्याला मोह उत्पन्न झाल्यास नवल कशाचें ? पंत अन्यत्र असेंच म्हणतातः—' प्रेमभरचि विकळ करी धीरा, न तसा पडोनि नगहि वर ।' (भीष्मपर्व—अध्याय १२।७५). १६. अन्याय. १७. अंध. १८. गज. १९. 'भीमः सुपात्रं महावदान्यः कर्णः'—पंत. (भीम हा सत्पात्र ब्राह्मण व कर्ण हा महान् दाता.) २०. श्रुति+गो+तर्णक+विप्र=वेदरूपी गाईचा वत्सच असा ब्राह्मण. २१. कर्ण.

[1]रडतां प्रहार केले होते, ते सर्व उगविले तिपट. ।
निपट प्रखरशरांहीं, वाटे चित्तांत पाडिलें [2]विपट. ॥ ७७
[3]सव्यभुजीं भीमाच्या कर्णें [4]नाराच अर्पिले चवदा. ।
[5]चैव दाखवुनि [6]वदान्यें [7]खरसें ते[8] अतिथि तर्पिलेच वदा. ॥ ७८
भीम न चळला; जरि [9]हत खळ खळखळ विपुळ भुज [10]वमे रुधिर. ।
गमलें त्यजिता, शिरतां रविसुतनाराचें[11] [11]सु-जव, मेरु [12]धिर. ॥ ७९
भेदी भीम तिहींचें[13], क्रोधभरें त्या वृषास, रोपांनीं.[14] ।
जाणो म्हणती ते [15]हय त्यां[16] डोहीं, '[17]द्रुत तृषा सरो पानीं.' ॥ ८०
[18]करिती तद्धैर्यातें ते,[19] कामक्रोधलोभसे, नाहीं. ।
वृष निरखिला, [20]हरिनखक्षतगजसा [21]नष्टशोभ, सेनांहीं. ॥ ८१
ते सत्य सर्प, न विशिख; कर्णहि न, तदीय[22]सदनवारुळ तो;[23] ।
कीं [24]माणिक्यसर, [25]जयश्रीवरणीं, शरगळां नवा [26]रुळतो. ॥ ८२
[27]बहुरक्त दिसे, खेळुनि होय जसा [28]काय बा ! गुलालातें. ।
पळतां कर्ण, [29]स्मरलें, भिउनि पळे बाळ बागुलाला तें. ॥ ८३
[30]उच्चैःश्रवःखसेसीं, भी त्यागुनि, न रमते [31]जवन वाजी. ।

---

१. रडत असतां. २. विपर्यास. ३. डाव्या भुजावर. ४. बाण. ५. येथें **दामयमक** आहे. ६. दात्यानें (भीमानें). ७. खरके. ८. ते बाणरूप अतिथि. ९. हत (घायाळ) भुज जरी खळखळ खळ विपुल रुधिर वमे, तरी भीम न चळला—असा अन्वय. १०. ओके. ११. वेगवान् असे कर्णाचे बाण. १२. रविसुताचे सुजव नाराच शिरतां मेरु [देखील] धीर त्यजिता, असें गमलें. 'धैर्य' अथवा 'धीर' असा मूळ शब्द. याचें 'धिर' असें अंमळ अशुद्धरूप येथें छंदोवशत्वास्तव योजिलें आहे. १३. तीन बाणांचीं. १४. बाणांनीं. १५. ते रोप (बाण) हेच हय (अश्व). १६. कर्णाच्या रक्ताच्या डोहांत (डबक्यांत). १७. लवकर. १८. नाहींसें करिती. १९. ते तीन बाण. २०. सिंहांच्या नखांनीं घायाळ झालेल्या हत्तीसारखा. २१. शोभाहीन. २२. त्या बाणरूपी सर्पाचें वारुळ (भीम). २३. कर्ण. येथें **अपन्हुति** अलंकार आहे. २४. [रक्तप्रवाह च] नवा माणिक्यांचा हार त्या बाणांच्या गळ्यांसभोंवतीं शोभतो असें वाटे. रक्तधारामुत्प्रेक्षते—पंत. बाण लागल्यामुळें आंगांतून निघणाऱ्या रक्ताच्या धारांवर ही **उत्प्रेक्षा** आहे. २५. त्यांनीं जयश्री मिळविली म्हणून. २६. शोभतो. २७. अत्यंत रक्तवर्ण. २८. देह. २९. आठवलें. **स्मरणालंकार** आहे. ३०. इंद्राचा अश्व उच्चैःश्रवा, त्याच्या बहिणीशीं. ३१. चपल.

प्रकटिति, [1]कशाप्रतोदावांचूनचि; परम ते [2]जव नवा जी ! ॥ ८४
[3]तृप्ति वरि सदुत्कर्षे विहित[4]जयस्वान नारद नविच; कीं ।
[5]ब्रह्मरसहि म्हणतो, 'हरिजनसुयशा,' [6]स्वानना, '[7]दंत विचकीं.' ८५
कर्ण पळे भीमभयें, जैसा राक्षस [8]पराशरभयानें. ।
[9]तैं आपणा हरि करुनि दाखविलें बा ! परा शरभ [10]यांनें. ॥ ८६
भासे भीम भयंकर [11]बहु, जैसा देव [12]अंधकाराती. ।
जे[13] भीतभंगवेळीं[14] जी कीं ते स्पष्ट अंध [15]कारा ती. ॥ ८७
वृद्ध म्हणे, "बहु देतो दुर्योधन [16]परममंद राग मला. ।
सांगे नित्य, 'स्वयशोहर कर्ण असेल [17]मंदरा [18]गमला. ॥ ८८
दिधलें, देइलहि यशोमृत, परबलजलधि मथुनि, [19]अतिबळ हा. ।
कलहा करितां मजसीं भंगचि पावेल [20]सामरहि [21]बल-हा'. ॥ ८९
लज्जाहानि न झाली त्या [22]मुग्धा, मजहि [23]मुग्धताता, कीं, ।

---

१. कशा=चाबूक; प्रतोद=चाबुकाचा तडाखा. २. वेग. ३. सज्जनांचा (पांडवांचा) उत्कर्ष झालेला पाहून नारद नवीच तृप्ति वरी, ग्रहण करी. ४. केला आहे जयध्वनि ज्यानें असा नारद. ५. ब्रम्हानंद. ६. आपल्या मुखाला म्हणतो, 'हरिजनांच्या (भक्तांच्या) सुयशाला [गाण्यासाठीं] दात विचक', म्हणजे 'तोंड पसर'. ७. दांत. ही लोकोक्ति आहे. ८. पराशर ऋषीच्या भीतीनें. मागें ५४ व्या गीतीवरील टीप पहावी. ९. तै (तेव्हां) यानें (कर्णानें) आपणा हरि (सिंह) करुनि [आणि] परा (शत्रूस, भीमास) शरभ [करुनि] दाविलें—असा अन्वय. शरभ नांवाचा एक सहा पायांचा पक्षी असून तो सिंहास मारितो, असा कविसंकेत आहे. १०. कर्णानें. ११. एथें—भा भी भ ब ह्या वर्णांच्या सांनिध्यानें भयानकरस विशेष अधिक पोषित होतो. १२. अंधक+अराति=अंधकासुराचा शत्रु, रुद्र. (अध्याय ८ गीति ९१ वरील टीप पहा.) १३. पंत म्हणतात, जे भीत (भ्याले) ते अंध (आंधळे) [आणि] जी भंगवेळा (पराजयाची वेळ) ती कारा (कारागृह)च कीं (कीं काय) [असें] स्पष्ट [वाटतें]—असा अन्वय. ह्या गीत्यर्धांत उत्प्रेक्षा आणि यथासंख्य अलंकार आहेत. १४. पराजयवेळा. १५. बंदिशाळा. १६. महामूर्ख. १७. मंदरपर्वतास. मंदरा कर्ण स्वयशोहर (आपल्या यशाची हानि करणारा) गमला असेल—असा अन्वय. १८. पूर्वी अमृताच्या प्राप्तीसाठीं देवदैत्यांनीं मंदरगिरीचा मंथनदंड व वासुकी नागाची रज्जु करून क्षीरसागराचें मंथन केलें, अशी कथा आहे. १९. अत्यंत बलवान् असा हा कर्ण. २०. अमरांसहित, देवांसहवर्तमान. २१. इंद्र. २२. त्या मूर्ख दुर्योधनाला. २३. मूर्खपित्यास.

म्यां कल्पिली प्रबलता अल्पबळीं, जेंवि दुग्धता ताकीं. ॥ ९०
जय[१]भीमवधाविषयीं कर्ण[२]-सुयोधन करोत बकबक[३] रे ! ।
कैसे करितील तिमिग्रास[४] दहनमेषभंग[५] बक बकरे ?" ॥ ९१
सूत म्हणे, 'धृतराष्ट्रा ! बा ! कारण तूंचि या विनाशाला. ।
शून्या होत्या न तुझ्या, सच्छलपरमानयाविना[६], शाला. ॥ ९२
कपटद्यूतादि कुमत, गुरुसुमतसम प्रभावि[७], लेंकाचें, ।
त्वां, पकहि शांतनवव्यासविदुरवचन, भाविलें[८], कांचें[९]. ॥ ९३
झाले भीष्मद्रोणव्यासविदुरसदुपदेश तुज कुंचले[१०]. ।
कर्णशकुनिदुःशासनदुर्योधनमंत्र[११] अमृतसे रुचले. ॥ ९४
उरलेंहि घालिसी बा ! काळमुखीं स्वकुळ; घातलें कांहीं. ।
कां देसी दोष परा ? त्वां हा केला, न घात लेंकांहीं. ॥ ९५
स्वयशोरक्षणचि[१२] करिति बहु, न, तुजे[१३], अंगरक्षण, नयज्ञ[१४]; ।
कीं तत्काळचि देतो सद्गतितें संगर[१५]-क्षण, न यज्ञ. ॥ ९६

---

१. अर्जुन व भीम त्यांच्या वधाविषयीं. २. ह्या गीतींत अर्जुन व भीम यांचा वध करणारे अनुक्रमें कर्ण व दुर्योधन, व तिमिमत्स्याचा ग्रास करणारे व मेंढ्याचा पराजय करणारे अनुक्रमें बक बकरे, अशी योजना असल्यामुळें **यथासंख्य** नामक अलंकार आहे. ३. बडबड. ४. तिमिनामक महामत्स्याचा ग्रास. ५. अर्जुन आणि भीम यांचे वध कर्ण आणि सुयोधन हे काय करणार आहेत ? त्यांनीं तोंडची बकबक मात्र करावी. तिमिनामक जो महाबलिष्ठ मत्स्य त्याचा ग्रास [सामान्य मत्स्याचा ग्रास करणाऱ्या] बकाकडून काय व्हायचा आहे ? त्याप्रमाणेंच दहन म्हणजे अग्निदेव याचें [वाहन असा जो मोठा] मेष (मेंढा) त्याचा भंग (पाडाव) सामान्य बकऱ्याकडून काय व्हावयाचा आहे ? यांत अर्जुन आणि भीम हे अनुक्रमें तिमि आणि अग्निवाहन मेष यांशीं समान; तसेंच कर्ण आणि सुयोधन हे अनुक्रमें बक व बकरा यांच्याशीं समान मानिले आहेत. तेव्हां यांच्या हातून त्यांना मारणें किंवा पराभवणें कसें होईल ? अर्थात् होणार नाहीं—असा मथितार्थ. येथें 'दहनमेष' ह्या शब्दावर रा० पराडकर यांच्या प्रतींत 'विशिष्ट जातीचे मेंढे' (?) अशी टीप आहे. ६. सज्जनांचा छळ हाच मोठा अन्याय, तो केल्यावांचून. ७. प्रभावयुक्त, श्रेष्ठ. ८. 'भाविलें' हें क्रियापद दोहों अर्थांमध्यें घ्यावयाचें. ९. कचें. १०. काजरे, काजऱ्यासारखे विषवत्, कडू. ११. मंत्र=सल्ला मसलत, उपदेश. १२. तुझे नयज्ञ (त्वत्पक्षीय नीतिज्ञ द्रोणकर्णादि) स्वयशोरक्षणचि बहु करिति, अंगरक्षण (स्वतःच्या शरीराचें रक्षण) न [करिती]—असा अन्वय. १३. त्वत्पक्षीय, द्रोणकर्णादिक. १४. नीतिज्ञ, तुझे द्रोणकर्णादिक. १५. युद्धसंबंधीं उत्सव.

भंगे, परि न समितितें कर्ण, सतीतें जसा न विटे, लाजे; ।
क्षणभरि म्हणोत याला ते जन, म्हणतील 'राहु, विटला' जे. ॥ ९७
कर्णपराभवकोपें भीमावरि धांवले तुझे सुत ते, ।
दुर्धर, दुर्दम, दुःसह, दुर्मर्षण, जयहि, जे मर्द उठते. ॥ ९८
भीमें त्या पांचांचे केले तत्काळ पांच विलय महा. ।
कर्ण म्हणे, 'आयुविना याचा रिपु कोण वांचविल ? यम हा.' ॥ ९९
छेदी धनु, हय सारथि मारी, खंडी पुन्हाहि चापातें; ।
भीम करी कर्णातें विरथ. कथूं कर्म काय बापा ! तें ? ॥ १००
भासे कर्ण क्षितिवरि झाला, सोडून गगन, रवि पत्ती. ।
आल्या नसतां भीतो, मग न गणी, सत्वनग नर, विपत्ती. ॥ १०१
कर्ण गदा भिरकावी, क्रोधभरें चावुनी रदन-वासा. ।
तीतें वारुनि, वर्षे विजयाचा भाउ नीरद नवासा. ॥ १०२
मुरवि, करुनि परकवचा अंगप तितउ, पळसमय मनिं भानें. ।

१. युद्धातें. समिति=युद्ध. 'स्त्रियः संयत्समित्याजि समिद्युधः' इत्यमरः । 'समितिर्युधि संगमे । साम्ये सभायाम्' इति हेमचंद्रः । २. जार, उपपति. पतिव्रतेनें उपपतीचा धिक्कार केला असतांही त्यास लाज वाटत नाहीं. त्याप्रमाणें कर्णाचा पराजय झाला असूनही तो समितीला (युद्धाला) वश करण्याची पुन्हा पुन्हा खटपट करीत होता, अर्थात् त्यास युद्ध करण्याविषयीं लाज वाटली नाहीं–असा भावार्थ. ३. जे जन 'हा विटला (युद्धाला कंटाळला), तो राहू (राहो, आतां त्याला राहूंद्या)' असें म्हणतील, ते [तसें] क्षणभरी म्हणोत. [पण तो खरोखर कंटाळला नाहीं]–असा भाव. ४. उन्मत्त. ५. नाश. त्यांस पंचत्वातें पोंचविलें. ६. या भीमाच्या रिपूला कोण वांचवूं शकेल ? त्याच्या आयुष्याची दोरी बळकट असेल तरच तो वांचेल. ७. हा भीम यमच होय. ८. एथें 'क' अक्षराचा प्रास श्रवणीय आहे. ९. रवि हाच गगन सोडून क्षितिवर पादचारी कर्ण झाला असें भासे. १०. पादचारी. ११. जो सत्वनग नर आहे तो विपत्ति येण्याच्या पूर्वी त्यांना भितो, पण त्या प्राप्त झाल्यानंतर त्यांना मानीत नाहीं. १२. सत्वाचा पर्वत. १३. दांतांचें झांकण ओंठ, त्यांतें. १४. बाणवृष्टि करी. १५. 'विजयाचा' ह्या शब्दाची योजना साभिप्राय दिसते. विजयाच्या भावाला (भीमाला) जय मिळणारच असें पंतांनीं मोठ्या खुबीनें दर्शविलें आहे. परिकरालंकार. १६. अर्जुनाचा भाऊ भीम. १७. नव्या मेघासारखा; अर्थात् मोठ्या वेगानें. १८. अंगप, परकवचा तितउ करुनि, पळभर मनीं भानें मुरवी–असा अन्वय. १९. अंगराज, कर्ण. २०. चाळण. २१. पळभर. २२. प्रेक्षकांच्या मनांत–पंत; किंवा, शत्रूच्या मनांत. २३. स्मृतीतें.

भीमानें शर गणिले अंगपतित[1] उपलसम[2], यमनिभानें[3]. ॥ १०३
कवच[4] शतच्छिद्र करुनि, दक्षिण भुजहि व्रणोत्थशतधार[5], ।
केला कर्ण[6] शिखरिसख[7] भीमें[8], निजविशिखनिकर[9] शतधार[10].॥ १०४
पुनरपि होय पराङ्मुख वृष, होतां शक्ति बाहुची शिथिला[11]. ।
भीमाला मानवली[12] जनता[13], जसि रामबाहुला मिथिला[14]. ॥ १०५
ज्येष्ठाज्ञेनें[15] धांवति, रक्षाया कर्ण, चित्र, उपचित्र, ।
चित्राक्ष, चित्रवर्मा, चित्रायुध. करिति ते रणहि चित्र[16]. ॥ १०६
सर्वहि वधिले भीमें, न करुनि बहु युद्ध, गलबला कांहीं. ।
आम्ही[17] विलोकिला तो, गरुड जसा रुद्धगल[18] बलाकांहीं[19]. ॥ १०७
वृष बहु रडे, हळहळे; होय विदुर[20]सूक्तिचीच आठवण. ।
हेंचि[21] चुकाया, घेती स्वांगीं सत्प्रणत[22] करुनि आठ वण[23]. ॥ १०८
बसुनि नवरथीं वृष करि, जिंकाया अरिस, जो निकर[24] कांहीं, ।
वाटे वर्षे गोवर्धनगिरिवरि[25] हरि[26] सजोनि[27] करकांहीं[28]. ॥ १०९
व्याकुळ करी[29] विदारुनि कर्णा[30] रिपुनाशकोविदा[30], राया ! ।

---

१. आंगावर पडलेले शर. २. खड्यांप्रमाणें. ३. यमसदृश अशा (भीमानें). ४. कर्णाचें कवच. ५. व्रण+उत्थ+शत+धार=क्षतांनीं उत्पन्न झालेल्या शतशः रक्त-धारा ज्यामध्यें असा. ६. एथें 'करून' हें अध्याहृत कृदंत ध्यावें. ७. पर्वतसखा. ८. वज्रानें पर्वत पीडित केले त्याप्रमाणें भीमाच्या बाणसमुदायांनीं कर्ण पीडित केला–असा अर्थ. ९. आपल्या बाणांचा समुदाय. १०. वज्रतुल्य. एथें 'केला' अध्याहृत. ११. क्षीण, ढिली. १२. मान देती झाली. १३. जनांचा समूह. १४. जनक-राजाची राजधानी. येथें राजधानी म्हणजे राजधानींतील लोक असा अर्थ समजावयाचा. हें उपादानलक्षणेचें उदाहरण होय. १५. ज्येष्ठ भ्राता दुर्योधनाच्या आज्ञेनें. १६. चमत्कारिक. १७. संजयादिकांनीं. १८. गळ्याभोंवतीं बगळयांनीं वेढा दिला आहे ज्याच्या असा. १९. बगळयांनीं. २०. विदुराच्या उपदेशाची. २१. हें पश्चात्ताप-दुःख. २२. साधूंस नम्र असे लोक. 'सत्प्रणति' असे पाठांतर. २३. ललाट, वक्ष, कर, जानु, चरण, या स्थळीं नमस्कारशीलांना वण म्हणजे घट्टे पडत असतात. २४. बाणांचा वर्षाव, राशी. २५. गोकुळामध्यें कृष्ण असतां इंद्रपूजा न केल्यामुळें, इंद्रानें क्रुद्ध होऊन अतिवृष्टि मांडिली. त्या गोष्टीची एथें उत्प्रेक्षा आहे. २६. इंद्र. २७. सज्ज होऊन. २८. गारांनीं. २९. एथें 'भीम' हा अध्याहृत कर्ता. ३०. रिपुनाश-कुशल अशा कर्णाला.

तैं प्रभु म्हणे, 'असाचि सुयोधनहृदया शको विदाराया.' ॥ ११०
कृष्णार्जुन—सात्यकि बहु [1]मानवले भीमसेनबाहूंतें. ।
त्यांचें आम्हां पाहूं तेज [2]सहायां हि दे, न बाहूं, तें. ॥ १११
[3]प्रेतें कुमार विलोकुनि, तप्त करी [4]कोपशोक राधेया. ।
तो [5]धात्रीस म्हणे, 'कां वाढविलें, श्रम करूनि, [6]राधे ! या ?' ११२
मग आपणा म्हणे, 'धिक् ! कर्णे ! [7]त्वांमनपहृतनरवराधे !'।
दाइस म्हणे, 'पृथावत् त्यजितां तुज लागता न [8]रव, राधे !' ११३
गांठी सुरुचि [9]वृषविशिखतति भीमा [10]परमदारुणास्तनगा, ।
[11]यायी श्रीकृष्णाला जेंवि बकी परम [12]दारुणा स्तन गा. ॥ ११४
दुःसह भीम कुरुबळीं होय, जसा दहन [13]तरकटुन रानीं. ।
गणिलें त्या समयाहुनि [14]हळहळही न [15]बहुतर कटु नरांनीं. ॥ ११५

---

१. मान देते झाले. २. साह्यकर्त्यांस. त्यांचें (त्याच्या बाहूंचें) तें तेज आम्हां सहायांनाहि [त्याजकडे] पाहूं, [किंवा त्याला] बाहूं (त्याच्याशीं बोलूं) न दे—असा अन्वय. ३. चित्र, उपचित्रांदि मृत कुमार. ४. कोपयुक्त शोक राधेयाला तप्त करी. ५. दाईस. कुंतीनें त्यागिल्यानंतर ज्या राधानामक धात्रीनें त्याचें रक्षण केलें, तिला. ६. येथें '**परोक्षजनसंबोधनोक्ति**' अलंकार झाला आहे, कारण येथील कथानकाशीं राधेचा कांहीं संबंध नसूनही हें कर्णाचें भाषण तिला उद्देशून आहे. ७. त्वां+अनपहृत+नरवर+आधि=नाहीं हरण केली दुर्योधनाची मानसव्यथा ज्यानें अशा तूतें धिक्. (संबुध्यर्थी 'आधे'). ८. शब्द (लोकांचें दूषण). ९. कर्णशरांचा समूह. १०. परमद+अरुण+अस्त+नगा=शत्रुवर्गरूप अरुणास अस्ताचल (निस्तेज करणारा) अशा भीमा गांठी—असा अन्वय. अरुणाच्या सादृश्याला कर्णाचे सुतेजस्क बाण योग्य आहेत. पण शेवटीं अस्ताचलीं अरुण निस्तेज होतो, तद्वत् ते भीमाच्या शरीरावर निरुपयोगी झाले—असा भाव. ११. जेंवि बकी, स्तन याया गांठी—असा अन्वय. १२. दारुणा बकी, पूतना. ही कंसाच्या आज्ञेनें गोकुळांतील बाळकांचा संहार करीत, शेवटीं तरुण स्त्रीचें रूप धारण करून नंदाच्या घरीं गेली. परंतु तें तिचें कपट कोणास न कळल्यामुळें तिचें कोणीं निवारण केलें नाहीं व ती कृष्णास मांडीवर घेऊन पाजूं लागली. कृष्णास तिचें कपट समजून आल्यामुळें त्यानें तिचें स्तनपान करितां करितां तिच्या प्राणांचेंही आकर्षण केलें. त्या वेदनेनें ती मरण पावली—अशी कथा आहे. १३. आवेशानें पेटून. १४. विषही. 'हालाहलं हालहलं वदंत्यपि हलाहलम्' इति द्विरूपकोशः । या शब्दाचीं अशीं तीन रूपें आहेत. 'हळहळ' असें एक आणखी रूप पंतांच्या काव्यांत आढळतें. (राम-गीति—गीति ६० पहा). १५. अधिक कटु.

रामाची शक्ति जसी, बा ! भीमाचीहि शक्ति [1]चवकळ ती. ।
वीररसाची, श्रवणें थोडी, नेत्रें उदंड, चव कळती. ॥ ११६
युयुधान उत्तमौजा [2]जिष्णु युधामन्यु कृष्ण हे ति[3]कडे ।
वदले, 'कर्ण किति[4] ? [5]कनकगिरिचे भेदील [5]भीमहेति [6]कडे.' ११७
भूरिश्रवा, [7]गुरुतनय, कृप हे तों [8]सुज्ञ, मानवावेच. ।
कवि म्हणति, '[9]वाणि ! वर्णुनि देवा, कीं [10]सुज्ञ मानवा, [11]वेंचं.' ११८
[12]समयीं गुण जाणुनियां, शब्देंही सुयश साधु साधुनि घे. ।
हें [13]चित्रें जयद्रथकुरुपतिवदनांतूनि 'साधु ! साधु !' निघे. ॥ ११९
भीमशराच्छादित रविसुत झाला जेधवां दिसेनासा, ।
त्याला कुरुपति, जाणों त्याची त्याला न ती दिसे [14]नासा. ॥ १२०
भूप म्हणे, 'धांवा रे ! म्हणतां [15]काकासि काय [16]पायस खा ?' ।
मागें ठेविल, [17]माझा, नच, रक्षाया स्वकाय, पाय, [18]सखा.' ॥ १२१
गेले अग्रजवचनें, धरुनि मनीं लाज, [19]सात वाराया ! ।
ते तोयबिंदु झाले; तो[20], [21]तापविला जसा तवा, राया.! ॥ १२२
शत्रुंजयादि तव सुत झाले, यापरिस [22]सोजिरे नाकीं. ।
जो [23]हरिभाग, [24]वृकांलों तो भक्ष्यहि, परि, ससा, जिरेना कीं. ॥ १२३

१. पुष्कळ. २. अर्जुन. ३. सैन्यामध्यें. ४. कर्णाची कथा काय ? **काव्यार्थापत्ति** अलंकार. ५. भीमाचा खड्ग. ६. मेरुपर्वताचे कडे. ७. द्रोणपुत्र अश्वत्थामा. ८. ज्ञाते, खरे गुण जाणणारे. अर्थात् त्यांनींही भीमाची स्तुति केली. जरी ते शत्रुपक्षीय, तरी ते मानवावेच; सुज्ञत्वास्तव त्यांची प्रशंसा करणेंच योग्य होय. ९. हे वाग्देवते ! १०. भूरिश्रवादिकांला. ११. खर्चे, कामीं लाग. १२. योग्य वेळीं. १३. आश्चर्यकारक. १४. नासिका. ज्याचें मरण जवळ आलें आहे अशा मनुष्याचें नासिकाग्र त्यास दिसत नाहीं, अशी समजूत आहे. सारांश, आपलें मरण जवळ आलें असें दुर्योधनास वाटलें. १५. कावळ्याला. १६. क्षीर, परमान्न. 'पायसस्तु क्लीबपुंसोः श्रीवासपरमान्नयोः' इति मेदिनी । पय संस्कृतम्=पायसम् । १७. माझा सखा (कर्ण) स्वकाय रक्षाया पाय मागें नच ठेवील. १८. कर्ण. १९. सात बंधु. २०. भीम. २१. तापविलेल्या तव्यावर जलबिंदु पडतांच ते जसे झटकन् नाहींतसे होतात, तसे हे त्या भीमावर पडतांच तत्क्षणीं नष्ट झाले. हें गीत्यर्ध वाचतांच 'संतप्तायसि संस्थितस्य पयसो नामाऽपि न ज्ञायते ।' ह्या भर्तृहरीच्या उक्तीचें स्मरण होतें (नीतिशतक—श्लोक ६७ पहा). २२. शोभायमान. २३. सिंहाचा भाग (ससा). २४. लांडग्यांना.

न विकर्णेतरपातें रणरंगीं भीमसेन, गदिवरता; ।
न गेदी, जगदीश्वरसा, गजबजता, पडलिया नेगहि बरता.॥ १२४
भीम म्हणे, 'अर्पावें सर्वस्व तुला, न सायक, विकर्णा ! । –
कीं वृत्ति तुझी रुचली बहु, रसिका जैंवि साय, कविकर्णा. ॥१२५
योग्या नव्हे प्रतिज्ञा, गुर्वाज्ञा जेंवि भार्गवा, त्यागा. ।
असुख रची खलसंगति, जैसी कुग्राममार्गवात्या, गा ! ॥ १२६
सोडावीच कुसंगति सर्वार्थदकाय पाळणारांनीं, ।
स्वर्गपरें पुत्राचा बांधावा काय पाळणा रानीं ? ॥ १२७

---

१. विकर्ण+इतर+पातें=विकर्णाहून इतरांच्या पातानें. २. गदाधारी असा तो भीम. ३. गडबडता. अर्थात् विकर्ण पडला हें पाहून भीम फार दुःखित झाला. ४. पर्वतहि. जगदीश्वर=कृष्ण; तत्पक्षीं नग=गोवर्धन पर्वत. ५. बाण. ६. विकर्ण हा धृतराष्ट्राच्या शंभर पुत्रांपैकीं एक. हा महारथी असून मोठा न्यायी होता. हा दुर्योधनादिकांस प्रिय नसून पांडवांस प्रिय होता. ७. दुधाची साय जशी. ८. कवीच्या कानाला. सभेमध्यें द्रौपदीला भीष्मादिकांनीं तिच्या स्वातंत्र्याविषयीं स्पष्ट निर्णय सांगितला नाहीं. तेव्हां 'हा सर्व अन्याय चालला आहे', असें विकर्णानें उठून म्हटलें होतें. त्याला लक्षून हें भाषण आहे. (मोरोपंती सभापर्व–अध्याय ५ गीति ४५–५५ पहा.) ९. 'मी सर्व कौरवांस मारीन' अशी भीमानें प्रतिज्ञा केली होती. १०. परशुरामास. परशुरामाची माता रेणुका एके कालीं नदीवर स्नानाला गेली होती; तेथें चित्ररथ नामक राजा स्त्रियांसह क्रीडा करीत होता. त्याला पहात ती तेथें क्षणभर राहून घरीं आली. तिचा पति जमदग्नि यानें अंतर्दृष्टीनें ती गोष्ट जाणिली आणि तिचा वध करण्याची क्रोधानें आपल्या पुत्रांना आज्ञा केली. परंतु कोणीही ती आज्ञा मान्य करीना. त्यामुळें ते त्याच्या शापानें मृत्यु पावले. शेवटीं परशुराम हा पुत्र बाहेरून येतांच त्यालाही तीच आज्ञा केली. त्यानें लागलाच तिचा वध केला. जमदग्नि त्यावर प्रसन्न झाला. तेव्हां परशुरामानें वर मागितला कीं, 'माझी माता आणि बंधु जिवंत व्हावे.' त्याप्रमाणें ते जिवंत झाले व त्यांना आपल्या मृत्यूचें स्मरण राहिलें नाहीं. अर्थात् पित्याची आज्ञा मोडणें ही गोष्ट परशुरामाला अगदीं अयोग्य वाटली. तद्वत् माझी शत्रूला मारण्याची प्रतिज्ञा मला मोडतां आली नाहीं. यामुळें तुला मारणें अवश्य झालें. ११. दुःख. १२. कुग्राममार्गांतील वाहुटळ. १३. सर्व-अर्थदायक जो देह त्याचें पालन करूं इच्छिणारांनीं. १४. स्वर्गप्राप्तीची ज्याला इच्छा आहे, त्यानें आपल्या पुत्राचा त्याग करावा काय ? पुत्राच्या अभावीं पिंडोदकादि क्रिया लुप्त होतात व पूर्वज नरकांत पडतात, असें धर्मशास्त्रांत सांगितलेलें आहे.

साधु बिभीषण कीं[1] तूं, जरि खळसंसर्ग करुनि मळले शें,[2] ।
स्पष्ट तुम्हां दोघांस स्पर्श न केला कु-संग-मळ-लेशें[3]. ॥ १२८
होतासि सखा तूं त्यों पुण्यश्लोका,[4] अजा[5] मिळाल्याला; ।
दोघांसहि लाभ, प्रभु, देउनि, सयश, अजामिळा[6],त्याला.'॥ १२९
[7]ऐसें शोचुनि, पुनरपि सिंहापरि होय गर्जना करिता. ।
झाला, रणोत्सवीं त्या, वृक्षप्रासादवर्ज[8] नाक[9] रिता. ॥ १३०
धर्मास कळे, नेला भीमें वृषगर्व[10] सकळ विलयाला. ।
तो सिंहनाद कळवी स्वर्गी जय; केंवि न कळविल, यांला[11]?॥ १३१
इकडेहि हृष्ट धृष्टद्युम्नादि व्योम[12] भरिति गजरानीं, ।
जैसे यूथपतीच्या[13] विजयोत्कर्षें[14] करुनि गज रानीं. ॥ १३२
व्यूहद्वारीं देती, जिंकाया गुरुसि, वीर तर[15]मुंडी; ।
न धरिति तिळहि तनुपतनभय[16], जेंवि विरक्त धीरतर[17] मुंडी.॥ १३३
जरि दिव्यभोगभोग्या, स्वर्गी पावति सुयोध, नव देहा, ।

---

१. आणि. २. शतशः. ३. कुसंगतिरूप मळाच्या लेशानें. ४. युधिष्ठिराला. 'पुण्यश्लोको नलो राजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः । पुण्यश्लोका च वैदेही (सीता) पुण्यश्लोको जनार्दनः ॥' याप्रमाणें चौघांना 'पुण्यश्लोक' ही श्रेष्ठ पदवी आहे. 'पुण्य' म्हणजे 'प्रशस्त,' 'श्लोक' अर्थात् 'कीर्ति' आहे ज्याची, तो पुण्यश्लोक. 'तूं त्या अजा (कृष्णाला) मिळालेल्या पुण्यश्लोका (युधिष्ठिराला) आणि अजा (नारायणस्वरूपाला) मिळालेल्या अजामिळाला सखा (योग्य मित्र) होतास. इतके दिवस तूं इहलोकीं युधिष्ठिराचें सख्य केलेंस; परंतु आतां अजामिळाचें सख्य करण्यास्तव तुला परलोकीं पाठविलें. यांत युधिष्ठिर आणि अजामिळ या दोघांनाही तुझा लाभ देऊन प्रभु (ईश्वर) सयश (उत्तम प्रकारचें यश) त्याला (मिळविता झाला). ५. अज=अजन्मा=ईश्वर, विष्णु, कृष्ण. ६. अजामिळ=एक आचारभ्रष्ट ब्राह्मण. हा एका नीच स्त्रीशीं लुब्ध होऊन सर्वदा विषय सेवन करीत असे. त्यानें आपल्या पुत्राचें नांव 'नारायण' असें ठेविलें. त्या निमित्तानें त्याला सर्वदा 'नारायण' नामाचा उच्चार घडून त्यापासून त्याचा उद्धार झाला आणि तो नारायणस्वरूपास पोंचला—अशी कथा आहे. ७. असा शोक करून. ८. वृक्ष आणि प्रासाद यांवांचून स्वर्ग रिकामा झाला (म्हणजे सर्व देव युद्ध पहावयास पृथ्वीवर आले). ९. स्वर्ग. १०. कर्णगर्व. ११. धर्माला. १२. आकाश. १३. कळपाचा अधिपति, त्याच्या. १४. विजय+उत्कर्ष=जयाच्या आनंदें. १५. मुसांडी. १६. शरीर पडण्याचें (मृत्यूचें) भय. १७. संन्यासी.

तरि ऐकोनदशनमितसोदरमरणें[1] सुयोधन वदे 'हा[3]'! ॥ १३४
स्मरलें सुयोधनातें, जें जें कांहीं कनिष्ठतात[4] वदे. ।
राया ! हें फळ तुजला भीम न, लोभैकनिष्ठता[5] तव, हें. ॥ १३५
ऐक पुन्हा, न पृथेला गाय अशी, बा ! सुरप्रसू[6] नाहीं. ।
ते[7] झांकिले शरांहीं आधीं, मग भासुर[8] प्रसूनांहीं[9]. ॥ १३६
मोहे, भीमशरांच्या, सर्वत्रहि विद्धकाय[10] होय, घातें; ।
तरि विमुख नव्हे. गातिल न सकल सुर[11]-सिद्ध काय हो ! यश तें? १३७
पडलें क्षितिवरि उडुसें[12] भीमशरें कर्णकुंडल, हरी तें. ।
वृषमुख[13] गमे जलधिच्या, सांपडलें अग्निकुंड, लहरीतें. ॥ १३८
पाडूनि एक कुंडल, मग दश नाराच[14] हाणिले अलिकीं[15]; ।
ते शोभले, सरोजें[16], पाजाया स्वमधु, आणिले अलि[17] कीं. ॥ १३९
होउनि मुहूर्त मूर्छित कर्ण उठे, तन्मनांतही रंग[18]. ।
तो पद्मरागनगसा गमला रक्तार्द्र कठिण हीरेंग[19]. ॥ १४०
केले रोमांचित सुरनर कर्णें, अमितबाणसंधानें[20]. ।

---

१. एक+ऊन+दशन+मित+सोदर+मरणें=एकंदर दांत बत्तीस असतात त्यांत एक कमी असलेल्या दांतांइतक्या भावांच्या मरणानें. २. एकतीस बंधूंच्या मरणामुळें. ३. खेदोद्गार. ४. धाकटा पिता; पित्याचा धाकटा भाऊ, विदुर. कर्नाटकी भाषेंत अद्यापि चुलत्यांना 'थोरला बाप' (दोड्डप्प), 'धाकटा बाप' (चिक्कप्प) अशा संज्ञा चालत आहेत. ५. लोभावरील अत्यंत आसक्ति. 'लोभें कनिष्ठता' असाही पाठ आहे, कनिष्ठता=हलकटपणा. ६. देवमाता. ७. पृथापुत्र. ८. शोभायुक्त, तेजस्वी, दकटवीत. ९. पुष्पांहीं. १०. छिन्नदेह. ११. सुर (देव) आणि सिद्ध (ज्याला अणिमादि आठ सिद्धि प्राप्त झाल्या तो सिद्ध). देवांना सुर म्हणण्याचें कारण त्यांनीं सुरेचें (मद्याचें) ग्रहण केलें हें होयः–'सुराप्रतिग्रहाद्देवाः सुरा इत्यभिविश्रुताः । अप्रतिग्रहणात्तस्या दैतेयाश्चासुरास्तथा ॥' (वाल्मीकिरामायण). १२. नक्षत्रसें. १३. वृषमुख (कर्णाचें तोंड) हें जलधिच्या (समुद्राच्या) लहरीतें (लाटेमध्यें) सांपडलेलें अग्निकुंड गमे, अर्थात् काळें ठिक्कर पडलें. मोठें तेजस्वी अग्निकुंड खरें, पण समुद्राच्या लाटेपुढें त्याचा काय टिकाव लागणार आहे ? येथें पर्यायोक्तालंकार आहे. १४. बाण. १५. ललाटीं. १६. कमळानें. १७. भ्रमर. येथें उत्प्रेक्षालंकार आहे. १८. रंग उडे. १९. तो हिऱ्याच्या पर्वतासारखा शुभ्र आणि कठिण, पण रक्तानें भिजल्यामुळें माणिकांच्या पर्वतासारखा दिसला. २०. असंख्य बाण जोडून, अमर्याद सोडून.

न गणुनि तें, तत्कार्मुक केलेंचि च्छिन्न [1]सत्यसंधानें. ॥ १४१
वृष घे अन्य धनु, म्हणे, 'शवपूर्णा करिल [2]बंधु [3]समुदि [4]रसा.'।
क्रोधें वर्षोनि भरूं पाहे भीमास [5]अंधुसे [6]मुदिरसा. ॥ १४२
'मोठें संकट आलें होतें; परि,' म्हणति जों [7]नरप, 'टळतें,'।
तों जलदपटलसें त्या [8]वातसुतें उडविलें शरपटळ तें. ॥ १४३
त्यांचे [9]तूण उघडले, जाणों [10]उग्राहिगर्भपेटारे.।
नारद म्हणे, 'भले, हूं ! जाळा [11]दृग्दोषदर्भ, पेटा रे !' ॥ १४४
[12]पवनतपनसुत गमले शक्र-[13]प्रल्हाद, राम-रावण [14]वा.।
[15]वाटे गगनीं तच्छ[16]रसंघर्षज दहन [17]पामरा वणवा. ॥ १४५
[18]शरपट असे प्रकटिती कीं, रवि न दिसे, न वा पवन वाहे.।

---

१. सत्यप्रतिज्ञ जो भीम त्यानें. २. भीम. ३. सानंद अशी (?) ४. प्रेतपूर्णा पृथ्वी. ५. कूपास. ६. मेघसा. ७. राजे. ८. भीमानें. वात म्हणजे वायु हा मेघांच्या पटलांना उडवून देतो, तेव्हां त्या वायूचा पुत्र जो भीम, त्यानें बाणांच्या पटलांना उडवून दिलें ही गोष्ट योग्यच झाली, असा ध्वनितार्थ आहे. येथें **परिकरालंकार** आहे. ९. भाते. १०. उग्र+अहि+गर्भ+पेटारे=उग्र सर्पांनीं भरलेले पेटारे. उत्प्रेक्षालंकार. ११. प्रेक्षकांची शंका हेच दर्भ (तृण) जाळा. १२. पवनसुत आणि सूर्यसुत असे भीम आणि कर्ण. येथें क्रमानें उक्त असलेले जे भीम व कर्ण, त्यांचा क्रमानेंच शक्र व प्रल्हाद आणि राम व रावण यांच्याशीं अन्वय असल्यामुळें येथें **यथासंख्य** नामक अलंकार आहे. १३. इंद्र व प्रल्हाद यांच्या युद्धाचा प्रसंग हरिवंशांत असा आढळतोः—एकदां दैत्यांनीं प्रल्हाद आम्हाला इंद्र पाहिजे असा हट्ट धरिला. तेव्हां पुरूरव्याच्या वंशांतील रजिनामक राजा राज्य करीत होता. दोघांच्या भांडणांत आपला फायदा करून घेण्याच्या इरायानें रजीनें असा विचार केला, कीं देवदैत्यांपैकीं जे आपणाला इंद्र करण्यास कबूल होतील, त्यांचा पक्ष आपण धरावा. पुढें देवांनीं रजीला इंद्रपद देण्याचें कबूल केलें, व रजीनें अधिष्ठित इंद्रादि देव व प्रल्हादप्रभृति दैत्य यांचा घनघोर संग्राम झाला. त्यांत दैत्य हरले व रजीस इंद्रपद मिळालें. पुढें रजीनंतर त्याचे पुत्र इंद्रपदाचा उपभोग घेऊं लागले. तेव्हां बृहस्पतीनें तयार केलेल्या कुतर्कशास्त्राच्या योगें इंद्रानें रजिपुत्रांस मोह घालून धर्मलंड बनविलें व स्वतः इंद्रपद पटकाविलें. (मोरोपंत–हरिवंश, अध्याय ४ गीति १९–२९ पहा.) १४. अथवा. १५. ह्या गीत्यर्धांत **भ्रांतिमान्** अलंकार आहे असेंही म्हणतां येईल, किंवा **उत्प्रेक्षाही** समजतां येईल. १६. त्याच्या बाणांच्या घर्षणापासून उत्पन्न झालेला अग्नि. १७. सामान्य मनुष्याला. १८. ह्या गीतींत **अत्युक्ति** नामक अलंकार आहे. वा=किंवा.

एकाहुनि एक अधिक करिति चमत्कार बा ! नव नवा हे. ॥१४६
त्या वृषवृकोदरांवरि दिव्यकुसुमवर्ष लेखे रचिती जी ! ।
मुनि आशी बहु, थोडी श्री, पुत्रीं हर्षले खरचिती जी. ॥ १४७
यत्न न चाले म्हणुनि, प्रकट करी कर्ण अस्त्र-मायेतें; ।
भीमपराभव इच्छी, चित्तीं पसरूनि वज्र मायेतें. ॥ १४८
चुरिले वृषविशिखांनीं वायुसुताचे धनुष्यशरभाते. ।
झाले महाशरभ, जरि पहिले हरि, त्या मनुष्यशरभा ते. ॥ १४९
हय मारुनि, तत्सूतहि, मर्मी हाणूनि बाण पांच, कसों ।
उतरें, म्हणुनि म्हणे वृष जाणों त्या, 'जा पळोनि; वांच कसा.' १५०
सूत युधामन्युरथीं चढला, सोडूनि पवनतनयातें; ।
जरि होय विरथ विक्षत, होऊं दे धैर्य अवनत न यीतें. ॥ १५१
भीमें झुगारिली रथशक्ति, प्रकटावया ठळक लीला. ।
अशनीच मानिलें, बहुजननयनांहीं, नभीं झळकलीला. ॥ १५२
खंडी तिला, नव्हे तो वृष, नागीला जसा, वश, शिखंडी; ।

१. दिव्य पुष्पांची वृष्टि. २. देव. ३. अजी. ४. झाते. ५. पुत्रीं हर्षले मुनी जी श्री खरचिती [ती] थोडी, आशी बहु [होय]–असा अन्वय. भीमकर्णावर प्रसन्न होऊन मुनींनीं त्यांस पुष्कळ आशिर्वाद दिले–असा भाव. ६. माया=कपट, दुष्टपणा. ७. मायेतें (मायेवर) वज्र पसरून=ममतेतें विसरून. ८. कर्णाच्या बाणांनीं. ९. धनुष्य, बाण, भाते. १०. सिंह. ११. भीमशरभातें. शरभ हा सिंहालाही मारतो. त्या मनुष्यशरभाला (भीमाला) ते पूर्वी सिंहासारखे (अर्थात् क्षुद्र) होते, तरी ते (धनुष्य, शर, भाते) आतां महाशरभासारखे भयंकर झाले. १२. कसोटीस. १३. नम्र. धैर्यामुळें हा भीम नम्र झाला नाहीं. १४. भीमाला. १५. रथांतून फेंकावयाची शक्ति, भाला. १६. अशनी=वज्रपात; विजेचा लोळ. भ्रांतिमान् अलंकार. १७. नभीं झळकलीला (रथशक्तीला) बहुजननयनांहीं अशनीच मानिलें. 'अशनीच मानिली' असा पाठ आदर्शप्रतींत होता. हा शब्द 'अशनि' असा मूळचा ऱ्हस्वान्त असून उभयलिंगी आहे; पण एथें स्त्रीलिंगीच घेतला आहे आणि दीर्घान्त योजिला आहे. १८. तोडी. १९. तिला खंडी आणि तिला वश नोहे, असा दोहोंकडे संबंध. २०. सर्पिणीला. सर्पमयूरांचें नैसर्गिक वैर असून, मयूर सर्पास भक्षण करितात, अशी प्रसिद्धी आहे. २१. मयूर.

की रतिपतिच्या[1] इषुला[2] लीलेनें जेंवि देव शशिखंडी[3]. । १५३
तों खड्गचर्म घेउनि युद्धासि त्वत्कुमारकाळ[4] सजे. ।
ते धन्य पुरुष, धर्मी[5] नेणति आयास भीति आळस जे. ॥ १५४
तोडुनि चर्म[6], शरगणाकरवीं तो प्रबळबाहु घेरविला; ।
वाटे तेव्हां जैसा गांठूनि मुखांत राहु घे रविला. ॥ १५५
छेदी वृषचापातें, भिरकावुनि परम-भीम[8] करवाळा[9]; ।
राया ! रविच्यांहि[10] म्हणे ओष्ठांला विजयिभीमकर, 'बोळा[11].' १५६
हास्य करी कर्ण, बहुत[12] शर वर्षे कार्मुकें मग नवीनें, ।
आक्रमिलें[14] भीमें, विषदृगहि[13] धराया जसें, गगन[14], [15] वीनें. ॥ १५७
राधेय[16] रथोपस्थीं[17], भीम नभीं देखतां, दडाला [18]जी ! ।
हे तीच भीति गरुडापासुनि त्या काळिया[19] जडाला जी. ॥ १५८
ध्वजतरुभीम[20] शिखी[21], वृष मूलबिलनिलीनसर्पसा[22], राया ! ।

---

१. मदनाच्या. २. बाणाला. 'लीलेनें देवदेव शशिखंडी' असा अन्य पाठ. मदनाचे बाण पांच आहेत:–'अरविंदमशोकं च चूतं च नवमल्लिका । नीलोत्पलं च पंचैते पंचबाणस्य सायकाः ॥' किंवा 'उन्मादनस्तापनश्च शोषणः स्तंभनस्तथा । संमोहनश्च कामस्य पंचबाणाः प्रकीर्तिताः ॥' ३. चंद्रखंड, म्ह० अर्धचंद्र मस्तकी आहे ज्याच्या, असा महादेव. एथें 'खंडी' असा अध्याहार आहे. ४. तुझ्या पुत्रांना (कौरवांना) मारणारा (भीम). ५. कर्तव्यकर्माचे बाबतींत. ६. ढाल. ७. कर्ण. ८. फार भयंकर. ९. खड्ग. १०. कर्णाचे ओष्ठ शुष्क झाले हें साहाजिक होतें, पण कर्णाचा पिता जो सूर्य त्याच्या तोंडचेंही पाणी पळालें –असा भाव. ११. शुष्क व्हा. १२. 'बहुतशरवर्षे' असा पाठ आदर्शप्रतींत होता. १३. विष+दृग्+अहि=विषदृष्टि, चक्षुर्विष सर्प. १४. आकाश आक्रमिलें, आकाशांत उड्डाण केलें. १५. वि+इन=पक्षिश्रेष्ठ गरुडानें. १६. कर्ण. १७. रथाच्या गुप्त भागीं. १८. अजी. १९. जी काळिया जडाला (काळिया नामक मूर्ख सर्पाला) गरुडापासुनि भीति, ते (ती भीती) हेच (अशीच, अशाच प्रकारची) [होय]–असा अन्वय. काळिया नांवाचा सर्प यमुनेंत राहात होता, म्हणून ह्याच्या विषानें दूषित झालेलें डोहांतील पाणी पिऊन गोकुळांतील गुरेंवासरें मरूं लागलीं. हें जाणून कृष्णानें कदंबवृक्षावरून मोठ्या वेगानें डोहांत उडी टाकून याला इतकें चेंचलें, कीं याचे प्राण कासावीस झाले. असें शासन झाल्यावर तो शरण आला, आणि तेथून तो समुद्रांत राहावयास गेला (भागवत–स्कंध १०) ही कथा येथें अनुसंधेय आहे. २०. ध्वजरूप वृक्षावर असणारा भीम. २१. मोर. परंपरितरूपक आहे. २२. झाडाखालीं बिळामध्यें दडून (लपून) राहिलेल्या सर्पासारखा कर्ण.

वाटे प्रवर्तला तो मारुति [1]घननाददर्प [2]सारोया. ॥ १५९
कर्णध्वजीं विलोकुनि, बहु [3]आशीर्वृष्टि करिति सुर भीमीं; ।
सत्पुरुषकथा अद्भुत रसदा; म्हणतों इलाचि '[4]सुरभी' मीं. ॥ १६०
'वा ! [5]साधु ! साधु !' वदले, केवळ [6]तद्भंगकाम जे पर, ते. ।
बहुधा [7]स्वानुजभागस्मृति वारी, म्हणुनि न वधितां परते. ॥ १६१
क्षितिवरि येतां, झांकी शरपटलें कर्ण पुनरपि [8]तयातें. ।
रवितेंहि लोपवी हो ! सुगुणगुणें जेंवि सु-[9]नर [10]पितयातें. ॥ १६२
विरथ विशस्त्र वृकोदर चुकवाया [11]कर्णबाणपात रणीं ।
[12]विजयहतगजांत शिरे, [13]गगनीं [14]जलदांत जेंवि बा ! [15]तरणी. १६३
अघटितहि करायाचें जें [16]कपिला, जें कळे [17]वराहा, तें ।
वाटे जाणे भीमहि, [18]कीं उचली [19]गजकळेवरा हातें. ॥ १६४
त्या गजकलेवरातें कर्ण च्छेदुनि चहूंकडे [20]विखरी; ।
वाटे [21]पविप्रहारें केला विध्वस्त [22]वासवें [23]शिखरी. ॥ १६५
रोधिति [24]वृषशरपटलें भीमबळा, जेंवि [25]यमुना [26]गांगें. ।

---

१. इंद्रजिताचा गर्व. २. संपवाया. ३. आशीर्वादरूप वृष्टि. ४. कामधेनु. सत्कथांना कामधेनूची उपमा देण्याचा पंतांचा प्रघात आहे. 'कथासुरभि ह्या भल्या स्वजननीहुनी वाटती' (केकावली–५८). ५. वाहवा ! शाबास ! ६. त्याच्या पराभवाची इच्छा करणारे शत्रु देखील. ७. हा अर्जुनाचा भाग आहे अशी आठवण. ८. भीमातें. ९. चांगला मनुष्य. १०. पित्यातें. कर्णाची कर्तबगारी 'बापसे बेटा सवाई' असें म्हणावयास लाविते. ११. कर्णाच्या बाणाचें पतन. १२. अर्जुनानें वधिलेल्या गजांमध्यें. १३. आकाशांत. १४. मेघांमध्यें. १५. सूर्य. १६. मारुतीला. १७. यज्ञवराहाला. १८. 'कीं' ह्या शब्दाचे मराठींत जणों, विकल्प, प्रश्न, आधार, कारण असे अनेक अर्थ आहेत. येथें शेवटचा अर्थ संभवतो. १९. मारुतीनें द्रोणगिरि उचलिला होता, आणि वराहानें पृथ्वी दाढेवर उचलून धरिली होती. तसेंच हें भीमाचें कृत्य. त्यानें हत्तीचें कलेवर (प्रेत) उचलिलें. २०. अस्ताव्यस्त फेंकी. २१. वज्रप्रहारें. २२. इंद्रानें. २३. पर्वत. इंद्रानें पर्वतांचे पंख तोडिले, ह्या कथेस अनुलक्षून येथील उत्प्रेक्षा आहे. २४. कर्णाच्या बाणांचीं पटलें. २५. यमुनाजलास. २६. गंगोदकें. 'जल' हा शब्द संस्कृतांत अनेकवचनीं वापरण्याचा प्रघात आहे. प्रयागक्षेत्रीं जेथें गंगा आणि यमुना यांचा संगम आहे, तेथें गंगेच्या मोठ्या प्रवाहानें यमुनेच्या प्रवाहाचा वेग थबकवून मागें लोटल्यासारखा दिसतो, त्याचें हें सूचन आहे.

तरि बा ! झुगारिलीं जीं, विच्छिन्नें[1] काय तींच, नागांगें[2].॥ १६६
तेंचि झुगारी, जें ये रथचक्र तुरंगगजकुणप[3] हाता. ।
रोमांचित होय अरिहि, जो भीमीं सत्ववर गुण पहाता[4]. ॥ १६७
तें तें कर्णी पावे, पाषाणीं जेंवि भंग, ढेंकूळ. ।
वृषमत्तेभ[5] शररदन[6] भीमवपु गमे तयापुढें कूळ[7]. ॥ १६८
मग भीम क्रोधभरें, चावुनियां दांत ओंठ, मूठ वळी; ।
चित्तांत म्हणे, 'घालू मत्तवृषीं[8] आजि काळ[9] मूठवळी[10].' ॥ १६९
तों स्मरला अर्जुनपण[11], आटोपी म्हणुनि भीम हातातें. ।
प्रबळहि कुपितहि[12] सुपुरुष धर्मातें, द्विरद[13], भी[14], महातातें[15]. ॥१७०
कर्णहि कुंतीवचन[16] स्मरलें म्हणउनि, वधी न भावातें; ।
त्यजिलें सर्वस्वहि परि न पळहि सत्या बुधें, नभा वातें. ॥ १७१
जवळि भिडोनि कुरुपते ! डिंवची[17] भीमासि कर्ण कोदंडें[18]. ।
सद्वाजिस[19] प्रतोदें[20], कीं केला स्पर्श अहिस तो दंडें. ॥ १७२
कृष्ण करिरदांसि[21] तसा, घे त्या चापास भीम हिसकून. ।
तेणें कर्णासि शिरीं हाणी, न वधी, वधासहि सकून[22]. ॥ १७३
वादे महातरंगेंकरुनि[23] थडक अर्णवासि[24] अर्णव दे. ।

---

१. हत्तींचींच अंगें त्यानें विच्छिन्न झालीं; भीमाला कांहीं बाधा झाली नाहीं. २. गजशरीरें. ३. अश्वाचें शव किंवा गजाचें शव (प्रेत). ४. पहाणारा, पाहून, असा इत्यर्थ. ५. कर्णरूप मदोन्मत्त हत्ती. ६. बाणरूप दंत. ७. नदीतट. ८. एथें 'वृष' शब्दावर श्लेष आहे. एकदां 'वृष' म्हणजे 'कर्ण' आणि एकदां 'बैल'. ९. यम. १०. मूठ आणि वळी. ओझें वाहणाऱ्या बैलाच्या पाठीवर खोगिरासारखें जें त्याच्या पाठीच्या रक्षणाकरितां सामान घालतात तें. ११. 'कर्णाला मी मारीन' अशी अर्जुनानें केलेली प्रतिज्ञा. १२. क्रोधयुक्तहि. १३. गज. १४. भितो. १५. माहुताला. 'प्रबळ' आणि 'कुपित' हीं विशेषणें 'सुपुरुष' आणि 'द्विरद' या दोहोंकडे लावावयाचीं, त्याप्रमाणें 'भी' शब्दही दोहोंकडे. १६. पांडव हे तुझे भाऊ आहेत, असें कुंतीनें त्याला सांगितलें होतें त्याचें स्मरण करून. १७. टोंची. १८. धनुष्यानें. १९. सत्+वाजिस=उत्तम अश्वास. २०. चाबुकानें. दंडें=काठीनें. हे दोन्ही स्पर्श असह्य होतात-असा भाव. २१. कुवलयापीड नामक गजाच्या दंतास. २२. शक्त (समर्थ) असून. २३. मोठ्या लाटेनें. उत्प्रेक्षालंकार. २४. समुद्रास.

साहुनि धनुःप्रहार, स्मित करुनि, वृकोदरासि कर्ण वदेः—॥ १७४
'तूंवरका ! औदरिका ! टाकुनि आलासि कां महानस रे ! ।
भ्याडा ! अणिकांत सरो दुसरा, वीरांत, काम हा, न सरे.॥ १७५
बहु अशनसूदताडनपंडित, तूं रणमखीं न [६]कोविद रे ! ।
भीरु जयश्रीस तसे, कन्येला वर जसे, नको, [७]विदुरे. ॥ १७६
मजसीं भिडसी भ्याडा ! सिंहासीं जेंवि [८]वि-प्रताप ससा. ।
[९]बाळा ! [१०]तपोवनाश्रित हो तूं रणभीरु, विप्र-तापससा.॥ १७७
किंवा हो [११]अनुजाश्रित, तोचि तुझें करिल आजि [१२]अस्वनें. ।
मूढा ! मृगें शिरावें [१३]मृगराजवनीं, त्यजूनि न स्व-वन.॥' १७८
भीम म्हणे, "राधेया ! जरि [१४]असकृत् भंगिलें तुला [१५]आजी, ।
निर्लज्जा! तरि म्हणसी, 'मज ठावी, काय तुज, मुला! [१६]आजी?'॥ १७९
ये रे ! भुजयुद्ध करूं. हो जैसा [१७]बकहिडिंबकीचकसा. ।
असतां असु [१८]त्रिदोषी, जेंवी, बडबड त्यजील नीच कसा?"॥ १८०
भीमाचें मत जाणुनि राहे राधेय मूकसा उगला, ।
कीं भुजयुद्धोत्साहें बहु, [१९]अकुलज धनमदें, तसा [२०]फुगला. ॥ १८१
तों प्रभु म्हणे, '[२१]सख्या ! हूं ! कांहीं इकडेहि शर उडीव कसा.' ।
विरथीं वृकोदरीं तो घालितसे वृष, [२२]झषीं उडी [२३]वकसा. ॥ १८२

---

१. नपुंसका. २. खादाडा. ३. पाकशाळा. ४. हा दुसरा काम, म्हणजे खादाडपणावांचून भिन्न असा जो शौर्य दाखविण्याचा काम (इच्छा) तो अणिकांत (अन्यजनांत) चालो, पण वीरांपाशीं चालणार नाहीं. ५. खाण्यामध्यें आणि पाककर्त्यांना मारण्यामध्यें चतुर. ६. पंडित. ७. विद्रूप. ८. पराक्रमहीन. ९. पोरकटा ! १०. तपोवनांच्या आश्रयानें राहिलेला. ११. अर्जुनाच्या आश्रयानें राहिलेला. १२. असु+अवन=प्राणरक्षण. १३. सिंहाच्या रानांत. १४. वारंवार. १५. आज. १६. संग्राम. १७. बक, हिडिंब हे राक्षस, व कीचक हा विराटाचा मेहुणा, या सर्वांस पूर्वी भीमानें बाहुयुद्धानें मारिलें होतें. १८. वातपित्तकफांनीं नीच प्राणी व्याप्त झाला असतां म्हणजे अंतकाळ समीप आला असतां देखील, तो आपली बडबड सोडीत नाहीं. त्याप्रमाणें तूं बडबड करीत आहेस. यावरून तुझाही नाश समीप आला आहे, असें भीम ध्वनित करितो. १९. हीनकुलोत्पन्न. २०. फुशारला, ऐटीस चढला. २१. अर्जुना. २२. मत्स्यीं. २३. बकसा (बकासारखा). येथें पंतांनीं यमकपोषणार्थ 'बवयोः सावर्ण्यम्' या नियमानें 'बक' हा शब्द 'वक' असा लिहिला आहे. 'रलयोर्डलयोश्चैव शषयोर्बवयोस्तथा । वदंत्येषां च सावर्ण्यमलंकारविदो जनाः ॥'

प्रेरी[1] अतित्वरेनें प्रभु पार्थी, पार्थही शरसमूह; ।
कर्णहि सूता, सूतहि अश्वांतें; तें म्हणे कुरुचमू 'हा !' ॥ १८३
सात्यकिरथीं वृकोदर चढला, रा[2]धासुतापसरणीं हो ! ।
म्ह[3]णति, 'यशस्वी' यां[4],कीं, म[5]थितविराधा,सुतापस,'रणीं हो.' १८४
जो श[6]क्रें हि परांचा नाशाया मद, बलाविला पार्थ, ।
तो ना[7]राच प्रेषी कर्णावरि, त[8]दबलाविलापार्थ. ॥ १८५
त्यां[9]तें खंडुनि, गु[10]रुसुत वारी बाधा जसी अ[11]हिमगु रुजा' ।
विकळ करुनि, पळवी तें मित्रें[12] प्रभुचें म[13]हीमहिम गु[14]रुजा. ॥१८६

अध्याय तेरावा.

सात्यकि आला पाहुनि, देव बहु महत्व देत नौ[15]वाजी. ।
हें किति ? यां[16]स भु[17]जाधिक, जे वाहति की[18]शकेतना, वाजी. ॥ १
'पार्था ! सख्या ! तुझा प्रियशिष्य सखा पातला, पहा यातें. ।

---

१. 'प्रेरी' हें क्रियापद चोहों वाक्यांत घ्यावयाचें. येथील वाक्यरचनेनें अतित्वरा दर्शित होते. येथे **दीपकालंकार** आहे. २. राधासुत+अपसरणीं=कर्णपलायनसमयीं. ३. नागपाशीं श्रीरामासि 'यशस्वी हो रणी' असें जसें सुतापस म्हणत होते, तसेंच आतां भआाही भीमास म्हणतात-**पंत**. ४. ह्या भीमाला. ५. विराधराक्षसास मारणाऱ्या रामास. ६. निवातकवच नामक दैत्य इंद्रालाही असह्य झाले होते. ते मारण्याला त्यानें अर्जुनाला बोलाविलें होतें व अर्जुनानें त्यांचा संहार केला—या कथेचें एथें सूचन आहे. ७. बाण. ८. तत्+अबला+विलाप+अर्थ=त्याच्या स्त्रियांस विलाप देण्यासाठीं; अर्थात् त्यास मारण्यासाठीं. **पर्यायोक्तालंकार**. ९. नाराचांतें. १०. अश्वत्थामा. ११. सूर्य-**पंत**. नाहींत थंड किरण ज्याचे असा सूर्य. रुजा=रोग. सूर्याच्या किरणांत रोगनाशक गुणधर्म असतात, हें पंतांस माहीत होतें, असें वाटतें. १२. प्रभुचें मित्र, अर्जुन. 'मित्र' शब्द नपुंसक आहे. अश्वत्थामा अर्जुनाच्या बाणाला तोडून, कर्णाची (कर्णाला होणारी) बाधा जशी (जेव्हां) निवारी, तेव्हां अर्जुन त्या आपल्या सन्मान्य गुरूच्याही पुत्राला (अश्वत्थाम्याला) व्याकुळ करून पळवून लावी. १३. मोठी योग्यता ज्याची असा. १४. अश्वत्थाम्याला. १५. वर्णी. १६. देवास. १७. आपल्या भुजांपेक्षां ते वाजी (अश्व) अधिक प्रिय वाटत. १८. कपिध्वजाला (अर्जुनाला). पृष्ठ १४८ टीप ८ पहा.

या कुरुबळवेगातें, तूं, कीं क्षम एक हा, सहायातें. ॥ २
शिरतो पैंराबारीं परि कैंचा वेग बा ! असा मकरीं ? ।
आजि कळेलचि भावि स्वक्षय, दुर्योधना अ-सैाम-करा.' ॥ ३
[6]श्वेताश्व म्हणे, 'प्रभुजी ! कांपति चळचळ अरी पहाते ज्या, ।
तो सात्यकिवरि उठला कीं, हो ! भूरिश्रवा महातेजा. ॥ ४
झाला [8]युयुधान परिश्रांत, न भूरिश्रवा; सम[9]-रयांसीं ।
समबळ-साहित्यांसीं गांठि बरी; वि[10]षम बा ! समर यांसीं. ॥ ५
सिंधु तरुनि, न बुडो [11]हा, खाउनियां गो[12]ष्पदीं [13]गटकलीला; ।
बा ! बहु [15]करीत आले त्वन्नामपदा[14]श्रयें [15]गटे कलीला. ॥ ६
[16]त्वत्करुणामृतपूरीं सर्वसुखें [17]प्रणतयाद वागावें. ।
केवळ न सात्यकिमुखा, 'अजित' असें म्हणत, यादवा गावें.'[18] ॥ ७
तों तो कौ[19]रव्य म्हणे, 'मृग, होउनि सिं[20]हदृष्टिविषय, मरे. ।
तसि [21]माधवा ! [22]मदरिगति; कीं [23]मामकतेज-बाणविष-यम रे ! ॥ ८
तुज पशुतें [24]कुरुपतिदृग्दुर्गादेवीपुढेंचि कापीन; ।
होईल सुप्रसन्ना, कीं तूं आहेसि बहु [25]निको [26]पीनें. ॥ ९
कर जा वराप्सरांसीं, अर्पुनि [27]मन्मार्गणा शिर, [28]विलास. ।

---

१. सात्यकि. २. सोसायाला. ३. सागरांत. ४. सुसरीस. ५. सख्य न करणाराला. ६. अर्जुन. ७. मोठा पराक्रमी. ८. सात्यकी. ९. समवेगांसीं. ज्यांचा वेग समसमान, बळ आणि साहित्य समसमान, त्यांची गांठ (युद्धासाठीं भेट) योग्य होय. पूर्वी युद्धनीति कशी होती हें ह्या गीतीवरून स्पष्ट दिसून येतें. १०. असम, अतुल्य, पक्षपाती. ११. सात्यकि. १२. गाईच्या पायानें झालेलें लहानसें डबकें, त्यांत. १३. 'गटकळी' शब्दाची द्वितीया. १४. तुझें नांव आणि तुझे पाय यांच्या आश्रयानें. १५. कलीला गिळीत आले. १६. तुझ्या करुणारूप अमृताच्या पुरामध्यें. १७. भक्तरूप जलजंतु. १८. सात्यकिमुखा (सात्यकिप्रमुखा) यादवा केवळ (विनाकारण) 'अजित' असें म्हणत न गावें—असा अन्वय. 'म्हणत'बद्दल 'म्हणति' असें पाठांतर. १९. भूरिश्रवा. २०. सिंहदृष्टीला गोचर. २१. हे सात्यके ! २२. माझ्या शत्रूंची गति. २३. कांकीं, माझें तेज हें विषासारखें, आणि माझे बाण हे यमासारखे आहेत. यथासंख्यालंकार. २४. दुर्योधनाची दृष्टिरूप दुर्गादेवी तिजपुढें. २५. चांगला. २६. पुष्ट. २७. माझ्या बाणास. २८. वराप्सरांशीं विलास कर; अर्थात् मरण पाव. जे वीर धारातीर्थी मरण पावतात, त्यांच्या गळ्यांत अप्सरा माळ घालितात, अशी समजूत आहे. (पृष्ठ १७ टीप १७ व पृष्ठ १२० टीप १४ पहा).

जाजो रहो युधिष्ठिर, जेणें व्यूहांत तूं शिरविलास. ॥ १०
निःसंशय धर्मार्जुन-कृष्ण समर सोडितील शोकानें; ।
स्पष्ट निरुत्साह सकल होइल, हें आयकेल जो कानें.' ॥ ११
हांसुनि शैनेय[1] म्हणे, 'कौरव्या! यमहि भय न शिववील[2] या; ।
नें करुनि निरायुध रणीं, नेइल न ज्वलनेंनयन[4] शिव विलया. ॥ १२
कोणासि भिववितां हो? हा यादव अजितदास[5], कळलें कीं? ।
जेव्हां होय[6] भजक, दे भाग्य पिता अजि तदा सकळ लेंकीं.[7] ॥ १३
भज तव गर्जित, शारदघनगर्जितसेंचि[8], हांसवीतें, हो! ।
या गर्जनेसि होइल फल, तरि पय कां न कांसवीतें[9] हो[10]? ॥ १४
रे कौरवाधमा! तुज वधिल्यावांचूनि मी न परतेन. ।
होते जे जे, झाले शैनेयेषुबकमीन[11], पर, ते, न?' ॥ १५
येणें तो, तेणें हा, बोलुनि बहु तीक्ष्ण वचन, कोपविला. ।
साहेल कोण हो? अतिकठिणाहीं, तीक्ष्णवच नको, पविला[12]. ॥ १६
भिडले अत्यावेशें ते सात्यकि सौमदत्ति[13] बहुत रणीं; ।
तच्छरनिकरें[14] केला छन्न[15], तसा राहुनें न बहु, तरणी[16]. ॥ १७
विरथ निरायुध होउनि शुद्ध नियुद्धीं[17] प्रवर्तले जग ते. ।
जरि[18] नसते धर्मज्ञ ब्रह्मज्ञ कुलीन, कां न डगमगते? ॥ १८

---

१. सात्यकि. २. मला. ३. याला (मला सात्यकीला) रणामध्यें शस्त्रहीन केल्यावांचून, अग्निनेत्र जो शिव तोही याचा नाश करूं शकणार नाहीं. जोपर्यंत माझ्या हातीं शस्त्र आहे तोपर्यंत मला अगदीं भय नाहीं—असा अर्थ. ४. शंकरास तीन नेत्र असून त्यांपैकीं एकांत अग्नि असतो—अशी समजूत आहे. ५. कृष्णाचा दास. ६. भजकीं पुत्रीं पिता भाग्य अर्पितो तसें दासीं अजितत्व देव; देवप्रसादें देवसाच मींहि अजित, असा अर्थ—पंत. ७. जेव्हां लेंक (मुलगा) आपला भजक होय, सर्वथा आज्ञांकित होय, तेव्हां पिता लेंकीं सकळ भाग्य दे—असा भाव. ८. शरत्कालींच्या मेघगर्जनेसारिखेंच ("अर्थात्—निरर्थक). ९. कांसवीला दूध, म्हणजे अशक्य गोष्ट. १०. होवो. संभावनालंकार आहे. ११. शैनेय+इषु+बक+मीन=सात्यकीचे बाण हेच बक त्यांस मांसासारखे. जे जे पर (शत्रु) होते ते ते सात्यकिबाणरूप बकाला मीन झाले न—अर्थात् त्यांकडून मारले गेले नाहींत काय? १२. वज्राला. १३. भूरिश्रवा. १४. त्यांच्या बाणसमुदायानें. १५. झांकलेला. १६. सूर्य. १७. बाहुयुद्धीं (मल्लयुद्धीं). १८. जरि=जर, यदि. एथें 'जरी' म्हणजे 'यद्यपि' असा अर्थ घ्यावयाचा नाहीं.

कृष्ण म्हणे, 'श्रांत दिसे **सात्यकि**, **कौ**[1]रव्य नागबिल याला; ।
पार्था ! पे[2]त्रिपतिपुढें पावेना काय ना[3]ग बिलयाला ? ॥ १९
रक्षाया व्यसनीं त्वां **मा**[4]धव आला तुझ्याचि कार्याला[5]. ।
सु. <u>स्वजनपरित्राणाहुनि अन्य व्रत म[6]त नसेचि आर्याला[7].</u>' ॥ २०
अर्जुन म्हणे, 'गमे मज, देतो मत्ते[8]भ यू[9]थपा टकरा; ।
प्रभुजी ! **सात्यकि**रक्षण संकट मोठें; तुम्हींच वाट करा.' ॥ २१
कृष्णार्जुन बदति असें; तों त्यांचा, करुनि बा[10]हुसमर, ग[11]डी, ।
विधु[12]सम मृ[13]दु होय; तया **कौरव्य** क्रूर **राहुसम** रगडी. ॥ २२
आपटिला भूपृष्ठीं, केश धरुनि ओढिला; जना गमला ।
वधिलाचि; भू[14]रिदक्षिण ता[15]र्क्ष्य, क्ष[16]ण, वृष्णि[17]वीर ना[18]ग मला[19]. ॥ २३
सु. <u>ईश्वर-वर-लाभ जया, तो काळावरि करील स[20]त्तेतें.</u> ।
कीं **सौ**मदत्ति हाणी **सा**[21]त्यकिवक्षस्थळींहि लत्तेतें. ॥ २४
कृष्ण म्हणे, 'मजपासुनि जें शासन होय **का**[22]लियाहीतें, ।
झालें त्व[23]न्नाथवरें यां[24]पासुनि, देवि **का**[25]लि ! यां[26]ही तें.' ॥ २५
पाहे, अ[27]सिनें **सा**त्यकिमस्तक खंडावयासि, जो सु[28]कवी, ।

१. भूरिश्रवा. २. गरुडापुढें. ३. सर्प. ४. सात्यकि. 'माधव' हा शब्द त्याचाच वाचक घेतला आहे. ५. तुझें कार्य करण्यासाठीं आलेला. ६. मान्य, पसंत. ७. आर्य कोणाला म्हणावें हें पुढील श्लोकांत सांगितलेलें आहे:—'कर्तव्यमाचरन् काममकर्तव्यमनाचरन् । तिष्ठति प्रकृताचारे स वै **आर्य** इति स्मृतः ॥' ८. मत्त हत्ती. ९. यूथपतीस, कळपाचा जो मोहोरक्या त्याला. १०. बाहुयुद्ध. ११. मित्र, सात्यकि. 'गडी'—गडावर, किल्ल्यावर रक्षणार्थ राहणारे विश्वासू मनुष्य, अर्थात् मित्र; हा 'गडी' शब्दाचा मूळचा अर्थ. गडी म्हणजे चाकर हा 'गडावरील विश्वासू मनुष्य' यापासूनच निघालेला अर्थ दिसतो. १२. चंद्रासारखा. १३. चंद्रपक्षीं सौम्य, सात्यकिपक्षीं अशक्त. १४. भूरिश्रवा. १५. गरुड. १६. क्षणभर. १७. सात्यकि. १८. सर्प. १९. 'गमला' अध्याहृत क्रियापद. **उत्प्रेक्षालंकार**. २०. सत्ता=अधिकार. २१. सात्यकीच्या हृदयावर. 'त्या सात्यकिच्या उरांत लत्तेतें' असा अन्यपाठ. २२. कालिय+अहीतें=कालिय नामक सर्पाला. (मागें अध्याय १२ गीति १५८ वरील टीपा पहा.). २३. त्वत्+नाथ+वरें=तुझ्या पतीच्या, शंकराच्या वरानें. २४. या भूरिश्रव्यापासून. २५. हे कालिदेवी! संस्कृत व्याकरणाच्या नियमानुसार 'काली', 'देवी', हे शब्द संबोधनीं र्‍हस्वान्त झाले आहेत. २६. या सात्यकिलाही. २७. तरवारीनें. २८. चतुर (भूरिश्रवा).

भ्रमवी [1]कुलालचक्रापरि शिर चिर, खड्गपात तो चुकवी. ॥ २६

तों प्रभु म्हणे, 'अरे ! रे ! [2]श्वेताश्वा ! वीरनायका ! पावें, ।

वा ! त्वत्समक्ष अरिनें सात्यकिशिर आजि काय कापावें ?'॥ २७

अर्जुन [3]शैलाग्रजातें चिंतुनि चित्तांत [4]मानवे शतदा. ।

[5]तद्दक्षिणभुज खंडी. 'हा !' म्हणती सर्व [6]मानवेश तदा. ॥ २८

केवळ जडली होती जरि दृष्टि जयद्रथीं, तरि [7]सुजातें ।

पार्थें [8]प्रिय सोडविला, तोडुनि त्या भूरिदक्षिणभुजातें. ॥ २९

सांगद[9] सखड्ग तो [10]कपिकेतुशरच्छिन्न वीर[11]भुज, [12]गमला ।

सहसा [13]खगपतिखंडितभोग [14]तदाननविमुक्त भुजग मला. ॥ ३०

सोडुन सात्यकिस म्हणे [15]कौरव, 'रे पांडुपुत्र ! [16]कपिकेतो ! ।

धर्म कृपादिगुरुकथित हा, कीं अन्योक्त[17] ? [18]जीर्ण न पिके[19] तो[20]. ॥ ३१

यादवसहवासें तूं झालासि तैसाचि; कर्म हें, स्वमतें ।

तुजला नसेल सुचलें; रुचलें बहुधा कुकार्य कृष्णमतें. ॥ ३२

[21]अन्यांसीं रण करितां, माझा भुज खंडिला कैसा सहसा ? ।

धर्मासि काय कथिसिल, शास्त्रें बुडवूनि [22]गुरुयशासह [23]सां ?'॥ ३३

जें [24]श्रितरक्षणदक्षप्रभुसखनरवीरकर्म, निंदी तें; ।

---

१. पुष्कळ वेळपर्यंत कुंभाराच्या चाकाप्रमाणें मस्तक फिरवी. २. अर्जुना. ३. भूरिश्रव्यातें. शल नांवाचा भूरिश्रव्याचा कनिष्ठ बंधु होता. ४. प्रशंसा करी. मानवे= मान डोलवी; मानवणें=मान डोलविणें. ['मानवणें' याचा सांप्रत अर्थ 'सुखावह होणें, सहन होणें,' असा आहे.] ५. त्याचा (भूरिश्रव्याचा) उजवा हात. ६. राजे. ७. कुलीनानें (पार्थानें). ८. आवडता सात्यकि. ९. स+अंगद=बाहुभूषणांसहित. १०. कपिध्वज (अर्जुन) याच्या बाणांनीं तुटलेला. ११. भूरिश्रव्याचा भुज. १२. **भ्रांतिमान्** अलंकार आहे. पण 'पंतांच्या भ्रांतिमानामध्यें उत्प्रेक्षेचाच स्वाद पुष्कळ येतो' (अलंकारमीमांसा–पृष्ठ २६). १३. गरुडानें तोडिलें आहे भोग (वेंटाळें) ज्याचें, असा भुजग (सर्प). भोग=सर्पाची फणा, सर्पाचें शरीर. १४. त्याच्या तोंडांतून खालीं पडलेला. १५. भूरिश्रवा. १६. अर्जुना ! १७. दुसऱ्या कोणीं सांगितलेला. १८. जुना. १९. जुनें धान्य फळ देत नाहीं तसा, फल देणारा नव्हे तो. २०. अधर्मी. २१. मी अन्य मनुष्याशीं (सात्यकीशीं) युद्ध करीत असतां. २२. मोठ्या यशासह. **सहोक्ति** अलंकार. २३. सहा शास्त्रें–सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा आणि वेदांत. २४. आश्रिताच्या रक्षणाविषयीं दक्ष जो प्रभु, त्याचा सखा जो अर्जुन, त्याचें शूर कर्म.

[१]जननीतितें भजे, [२]सुरवल्लीतें त्यजुनि जेंवि [३]सिंदीतें. ॥ ३४
पार्थ म्हणे, 'कौरव्या ! वृद्धपणीं स्पष्ट बुद्धि मंदावे. ।
कुलजांहीं जीर्णपु[४]रुष ते पुण्ययशोर्थ मात्र वंदावे. ॥ ३५
भगवन्मतासि, [५]भगवन्मतनिष्ठा मजहि, ला[६]विसी बोल; ।
जो लक्षसुज्ञमान्य [७]श्रितरक्षणधर्म, मानिशी फोल ? ॥ ३६
माझा साक्षा[८]द्दक्षिणभुज सात्यकि, हा कसा न रक्षावा ? ।
समरीं सहाय जो जन, तो प्राणांहूनि अधिक लक्षावा. ॥ ३७
त्वां आत्मा निंदावा, कीं जो असमर्थ [९]भुजहि राखाया; ।
योग्य [१०]श्रितावनाक्षम, कीं परमासाध्य[११]रुजं, [१२]हिरे खाया. ॥ ३८
स्वभुजावन जड ज्याला, श्रितरक्षण करिल काय तो काचा ? ।
तो धन्य, जया आश्रित उत्संगावरिल [१३]काय तोकांचा.' ॥ ३९
कौरव्य न दे उत्तर, जाणों पार्थोक्ति नायके कांहीं. ।
त्याचा [१४]नरोक्तिहीं मद, [१५]सर्पाचा जेंवि, जाय, [१६]केकांहीं. ॥ ४०
करुनि [१७]शरासन, मग तो होय [१८]प्रायोपविष्ट, मौन धरी, ।
योग[१९]बळें [२०]विधिलोकांप्रति जाया [२१]उपनिषद्विचार करी. ॥ ४१
कुरुंनीं केली कृष्णार्जुननिंदा फार; न कथवे गा ! ती, ।
ज्यांला देवर्षीचे, [२२]कामाद्यरिमीनबक थवे गाती. ॥ ४२

---

१. ग्राम्यजनांच्या रीतीला भजे. २. तुळशीला. ३. सिंदीच्या झाडापासून दारू तयार करितात, म्हणून तें झाड त्याज्य समजतात. ४. वृद्ध पुरुष. ५. भगवन्मताच्या ठायीं निष्ठा (श्रद्धा) ज्याची, अशा मलाही. ६. दोष. ७. आश्रितसंरक्षणधर्म. ८. साक्षात्+दक्षिण+भुज=प्रत्यक्ष माझा उजवा हात, मोठा सहाय्यकर्ता. ९. भुज राखण्याला असमर्थ. १०. श्रित+अवन+अक्षम=आश्रिताचें रक्षण करण्याविषयीं असमर्थ मनुष्य. ११. रोग. ज्याचा रोग परम असाध्य असा मनुष्य. १२. हिरा खाया=हिरा खाऊन आत्महत्या करण्यास, जीव देण्यास. १३. बाळाचा देह. ज्याला मांडीवरील मुलाच्या शरीराप्रमाणें आश्रित हा अत्यंत प्रिय असतो, तो पुरुष धन्य होय. १४. नर+उक्ति=अर्जुनाच्या भाषणांनीं. १५. सर्पाचा मद. १६. मोराच्या टाहोंनीं. १७. बाणांचें आसन मांडून. १८. मरणाचा निश्चय करून उपवासी बसलेला. १९. प्राण चढवून. २०. ब्रह्मलोकाला जाण्यासाठीं. २१. उपनिषद्+विचार. २२. काम+आदि+अरि+मीन+बक=कामक्रोधादि षड्रिपुरूपी मत्स्यांना बक (म्हणजे संहार करणारे).

[1]कुरुकृतनिंदासारवर्ष — लेश विषाद न दे [1]कुरुकृतनिंदासारवर्ष वीरा या. ।
त्या भूरिदक्षिणासहि न कुरुकृत स्तवन हर्षवी, राया ! ॥ ४३
पार्थ म्हणे, '[2]कौरव्या ! जें [3]मद्व्रत लेशही नसे मळलें, ।
सर्वांसि विदित असतां, तुज एकासचि कसें नसे कळलें ? ॥ ४४
जो, माझ्या [4]शरविषयीं असतां, प्रबलहि, धरील [5]हनननाशा, ।
न शकावाच कधीं तो शत्रु, कराया [6]मदीय-जन-नाशा. ॥ ४५
खड्गें सात्यकिमस्तकखंडन [7]करितां, तुझा भुजच्छेद ।
हा जरि अधर्म म्हणतां, या कर्में बहुत पावतां खेद; ॥ ४६
विरथ विशस्त्र सुभद्रासुत, तुमचें [8]धर्मतोक [9]सामान्य, ।
केला तुम्हीं तशाचा वध कीं, '[10]हो धर्म तो कसा मान्य ?' ॥ ४७
ऐसें जिष्णु वदे, तें ऐकुनि तो [11]स्पर्शला शिरें महितें; ।
उडवी तयाकडे [12]भुज वामभुजें, पक्षिपति जसा अहितें. ॥ ४८
किमपि न वदतां प्रेमें कृष्णसख म्हणे तया [13]अगाधाला, ।
'पाहुनि तुला मदात्मा, ऐसा न [14]सुराश्रया अगा, [15]धाला. ॥ ४९
धर्मीं भीमीं नकुळीं सहदेवीं प्रीतिरीति परमा जी, ।
तीच तुझ्या ठायीं बा ! आहे; मति, तुज म्हणे न 'पर,' माजी.॥ ५०
तूं माझ्या कृष्णाच्या आज्ञेनें पुण्यलोक पाव कसा. ।
हो सुगतिपात्र [16]शिबिसा, तेजस्वी चंद्रसूर्य[17]पावकसा.' ॥ ५१

---

१. कौरवकृत निंदारूप झडीचा वर्षाव. येथें रा० पराडकर यांचे प्रतींत 'निंदागारवर्ष' असा पाठ असून त्यावर 'निंदारूप निखाऱ्यांची वृष्टी' अशी टीप आहे. २. अर्जुनास. ३. माझें व्रत (गीति ४५ मध्यें वर्णिलेलें). 'मद्यश' असें पाठांतर. ४. शर+विषय=बाणाच्या आटोक्यांत. ५. मारण्याची इच्छा. ६. माझ्या मनुष्याचा नाश. ७. तूं करीत असतां. ८. धर्मपुत्र. ९. अल्प. १०. धर्म कसा मान्य होईल. ११. त्यानें भुईला डोकें टेकलें. महितें=पृथ्वीला. १२. डाव्या हातानें उजवा (तुटलेला) भुज अर्जुनाकडे फेंकला. १३. गंभीराला (भूरिश्रव्याला). १४. देवतास्थान अशा मेरुपर्वताला पाहून. १५. तृप्त झाला. १६. शिबिराजा हा भोजनगरीच्या उशीनर राजाचा पुत्र. ह्याचें सत्त्व पाहण्यासाठीं इंद्र व अग्नि हे अनुक्रमें श्येन व कपोत ह्यांचीं रूपें घेऊन आले असतां, शिबीनें त्या कपोताचे प्राण वांचविण्यासाठीं आपल्या शरीराचें मांस दिलें—अशी कथा आहे. १७. पावक=अग्नि. 'आश्रयाशो बृहद्भानुः कृशानुः पाव-

प्रभुहि म्हणे, 'कौरव्या ! घे देतों सुवर, [1]वरदवर, गा ! 'मी।
[2]साधो ! वैकुंठाप्रति जा. हो [3]मत्तुल्य [4]पक्षिवरगामी.' ॥ ५२
साधु म्हणति, "हा [5]घनसा दाता, [6]सतताग्निहोत्रयाजी; [7]या, ।
निजलोकीं अवलोकुनि, चतुराननही म्हणेल, 'या जी ! या" ५३
इतक्यांत [8]सासि सात्यकि धांवे, कापावया शिर तयाचें ।
ब्रह्मीं गुरुप्रसादें न पुन्हा तापावया [9]शिरतयाचें. ॥ ५४
वारी कृष्ण धनंजय भीम; तरी क्रूर तो तयास वधी. ।
सात्यकिधी त्या वीरीं तैशी, [10]वृत्रीं जसीच [11]वासवधी. ॥ ५५
वारित होते कर्ण-द्रौणि-जयद्रथ-कृपादि हाकांहीं; ।
परि तो त्यजिता झाला न [12]शैलाग्रजवधदुराग्रहा कांहीं. ॥ ५६
जरि सर्व म्हणत होते, 'रे [13]युयुधाना ! नको नको परतें,' ।
हरिलेंचि भूरिदक्षिणशिर, [14]वारण ऐकिलें न [15]कोपरतें. ॥ ५७
सात्यकि विश्वमुखें त्या [16]कर्मकलंकें उदंड निंदुनि घे. ।

कोऽनलः' इत्यमरः । 'पावकोऽग्नौ सदाचारे वन्हिमंथे च चित्रके । भल्लातके विडंगे च शोधयितृनरेऽपि च ॥' इति कोषः । पुनातीति पावकः.

१. मी वरदश्रेष्ठ. २. 'साधु' शब्दाचें संस्कृत व्याकरणाच्या नियमानुसार संबोधन. ३. माझ्यासारिखा. ४. गरुडावर बसून जाणारा. ५. मेघासारखा. ६. निरंतर अग्निहोत्रहवनकर्ता. ७. या भूरिश्रव्यास. ८. स+असि=खड्गासह. ९. गुरुप्रसादें ब्रह्मीं शिरतयाचें शिर पुन्हा न तापावया (न तापावें, संतप्त न व्हावें म्हणून) कापावया सात्यकी सासि धांवे–असा अन्वय. १०. वृत्रासुराविषयीं. त्वष्टा नामक प्रजापतीचा पुत्र विश्वरूप यास इंद्रानें मारिल्यामुळें, त्याच्या नाशाकरितां त्वष्ट्यानें अग्नीमध्यें हवन आरंभून वृत्रासुरास उत्पन्न केलें व त्यास इंद्रास मारण्याची आज्ञा केली. तेव्हां हा इंद्राशीं युद्ध करण्यास गेला व त्यानें इंद्रास गिळून टाकिलें. यामुळें देवांनीं त्याच्या ठायीं जृंभा (जांभई) उत्पन्न केली. तेव्हां त्याचें तोंड पसरलें जाऊन इंद्र बाहेर पडला. पुढें ह्या दैत्याचें देवांशीं अनेकवार युद्ध होऊन, त्यांत त्यांचा पराभव झाला. तेव्हां दधीचि ऋषीच्या अस्थींपासून विश्वकर्म्याकडून वज्र तयार करवून, तें त्याच्यावर सोडिलें. तेव्हां हा इंद्राच्या हातून मरण पावला–अशी कथा आहे. (महाभारत–वनपर्व–अध्याय १०१ पहा.) ११. इंद्रबुद्धि. नाशाविषयीं अत्यंत उत्कट, असा अर्थ. १२. भूरिश्रव्याच्या वधरूप दुराग्रहास. १३. हे सात्यके. १४. निवारण. १५. रागीट अशानें. १६. या कर्माच्या कलंकामुळें त्यानें सर्वांकडून आपणाला अत्यंत निंदून घेतलें.

संकोचांतुनि बाहिर बहुधा तैंपासुनीच [1]इंदु निघे. ॥ ५८
जो सात्यकि, [2]हेतयूथपहरिसा अत्युग्र, पूर्ण उत्साहें ।
कुरुवीरांसि म्हणे, "विष पीतां, करितां मदीय कुत्सा, हें. ॥ ५९
धर्मकथा धार्मिकसे कथितां, न विचारितांहि अन्या, 'या ।
न वधावा, न वधावा,' म्हणतां आपण करूनि अन्याया. ॥ ६०
जेव्हां केलें विरथविशस्त्रसुभद्राकुमारवधकर्म, ।
तेव्हां गेला होता सोडुनि कोठें तुम्हांसि हा [3]धर्म ? ॥ ६१
जो मज पाहुनि समरीं, हाणिल माझ्या उरांत लात अरी, ।
[4]तन्मथनमत्प्रतिज्ञा, ती म्यां केली, वधूनि यासि, खरी. ॥ ६२
'जें कर्म [5]अमित्रांला पीडाकर होय, सर्व तें [6]कार्य,' ।
रामायणांत वदला म्हणती कवि [7]आद्य ज्यासि, तो [8]आर्य". ॥ ६३
ऐसें सात्यकि बोले; उत्तर इकडील कर्णही न करी. ।
वाटे, झाले, परिसुनि, [9]हरिगर्जितशक्तिवर्णहीन [10]करी. ॥ ६४
खलदुर्जय, बलजलधी, छलरहिताचार, जलदसा दाता, ।
नलसम शुचि, [11]शलपूर्वज, [12]हलभृदनुजलोक पावला, [13]तां ता ! ॥ ६५

---

१. चंद्रानें बृहस्पतीस्त्रीशीं व्यभिचार केल्यामुळें त्याला जो कलंक लागला, त्यामुळें त्याला बाहेर तोंड दाखविण्याला लज्जा वाटूं लागली. परंतु युद्धांतून विरक्त झालेल्या वीराचा वध सात्यकीनें केलेला पाहून त्याची (चंद्राची) लज्जा उणी झाली, आणि तेव्हांपासून तो उघडपणें बाहेर तोंड दाखवूं लागला, असें वाटतें–असा अभिप्राय. २. गजपतीला मारणाऱ्या क्रूर सिंहासारखा. ३. समानार्थक गीतिः–'अभिमन्युबाळ बहुतीं वधितां, त्वां वारिलें न तें कर्म । तेव्हां गेला होता कोठें राधासुता ! तुझा धर्म ? ॥' [मोरोपंतकृत–कर्णपर्व–अध्याय ४९।१०.] ४. अशी प्रतिज्ञा करण्याचें कारण, भूरिश्रव्यानें त्याच्या बापाचा सूड घेण्याकरितां केलेला निश्चय होय. (पुढें गीती ६६-७३ पर्यंत कथाभाग, आणि त्यावरील टीपा पहाव्या.) ५. शत्रूंना. ६. करण्याला योग्य होय. [धातूंस 'तव्य,' 'अनीय' आणि 'य' हे प्रत्यय लागून विध्यर्थक शक्ति, योग्यता, आवश्यकता, इत्यादि अर्थ दाखविणारीं विशेषणें होतात. जसें:–रमणीय, रम्य, रंतव्य; कार्य, करणीय, कर्तव्य.] ७. ज्याला सर्व लोक आद्य कवि म्हणतात. ८. वाल्मीकि. ९. सिंहाची गर्जना ऐकून शक्ति+वर्ण+हीन झालेला. १०. हत्ती. ११. शलपूर्वज= शलाचा वडील भाऊ, भूरिश्रवा; हा विष्णुलोकास गेला. 'खलदुर्जया'दि पांच विशेषणें शलपूर्वजाचीं होत. खल म्ह० दुष्ट, यांकडून जिंकला जाण्याला कठीण; बलाचा, शक्तीचा

शिनिनें[1] स्वयंवरीं जें श्रीवसुदेवार्थ देवकी हरिली[2], ।
तें बहुत सोमदत्तें[3] आत्मपरिभवव्यथा[4] मनीं धरिली[5]. ॥ ६६
बहु, वीरमंडळीं यश, जिंकुनि[6] त्या युद्धसत्वरा[7], शिनि घे[8]; ।
श्रीरुद्रासि शरण तो विजयार्थी, शुद्धसत्त्वराशि[9], निघे. ॥ ६७
विचकूं[10] न देचि, इतरां दात्यांपरि, जो दयालु देव, रदं, ।
तो आशुतोष[11], दर्शन देउनि, 'वद वर,' असें वदे वरद. ॥ ६८
तो सोमदत्त नमुनी, स्तवुनि प्रेमें परोपरि, भवातें[12], ।
मागे, 'शिनिपुत्राच्या, मत्पुत्र रणीं करो, परिभवातें. ॥ ६९
मत्सुतकरें वरावें, वरिलें जें काय हो ! यश, शिनिकरें. ।

जलधि, समुद्र; कपटरहित आचार ज्याचा; जलद, मेघ, त्यासारखा म्ह० सर्वांना सारखा दाता; नलराजासारखा पवित्र, असा तो शलपूर्वज. या आर्येमध्यें खल, बल, इत्यादि आठ दहा शब्दांत 'अल' या उच्चाराचे कर्णमधुर प्रास आले आहेत, हे लक्षांत धरण्यासारखे आहेत. १२. हलभृत्+अनुज+लोक=बलरामाच्या कनिष्ठ बंधूचा लोक. १३. हे धृतराष्ट्रा.

१. सात्यकीचा आजा शिनि त्यानें. २. 'जेव्हां स्वयंवरीं वसुदेवें श्रीरत्न देवकी वरिली' असा पाठ पंतांनीं पोथीच्या समासांत लिहिलेला आहे. ३. भूरिश्रव्याचा पिता सोमदत्त त्यानें. ४. आपल्या पराभवामुळें झालेला अपमान. ५. मागील अनुसंधान असें आहेः—ज्या वेळेस वसुदेवाचें देवकीशीं लग्न झालें, त्या वेळेस त्या लग्नाला विघ्न करण्यासाठीं सोमदत्त पुढें आल्यामुळें शिनि नामक यादवानें त्याचा पराभव करून, त्याची शेंडी धरून त्याला खालीं पाडिलें, आणि त्याच्यां उरांत लात मारिली. तेव्हां सोमदत्त फार खिन्न झाला, आणि त्या अपमानाचा सूड घेण्याकरितां त्यानें तपश्चर्येच्या साधनानें शंकराला प्रसन्न करून, त्यापाशीं वर मागितला कीं, 'या शिनीचा सूड उगविणारा असा पराक्रमी पुत्र मला होवो.' त्यानें 'तथास्तु' म्हटलें. त्याप्रमाणें सोमदत्ताला भूरिश्रवा, शल इत्यादि पुत्र झाले. पण तोंपर्यंत शिनि हा मेला होता. त्या शिनीचा नातू हा सात्यकि ! त्याला भूरिश्रव्यानें खालीं पाडून त्याच्या उरांत जेव्हां लत्ताप्रहार केला, तेव्हां सात्यकीनेंही आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें त्याचा वध केला. (मूळ द्रोणपर्वाचा अध्याय १४४ पहा). ६. 'जिंकुनियां' असें पाठांतर. ७. युद्धामध्यें चपळ, सोमदत्त, त्याला. ८. वीरमंडळीं त्या युद्धसत्वरा जिंकुनि शिनि बहु यश घे—असा अन्वय. ९. शुद्ध सत्वाचा राशी असा. १०. दांत. दांत विचकणें=गयावया करून (दीनवाणीनें) कांहीं मागणें. 'दांत विचकणें' ही लोकोक्ति आहे. ११. तत्काळ होतो संतोष ज्याचा असा रुद्र, सदाशिव. १२. शिवाला.

नासे तव प्रसादें ताप न, नाहींच होय, शशिनिकरें[1].' ॥ ७०
प्रभु '[2]एवमस्तु' ऐसें बोलुनि, दे प्रार्थिला वर प्रणता. ।
हें किति ? देता, जरि तो 'बल कालपराभवार्थ द्या,' म्हणता. ॥ ७१
शिनिनें जैसा परिभव केला होता रणीं [3]स्वताताचा, ।
तैसाचि भूरिदक्षिण करि, ईशवरें, [4]तदंगजाताचा. ॥ ७२
यास्तव सात्यकि [5]भंगे; कीं जाया [6]तदरिखेद हर पावे; ।
नातरि, तयापुढें तों शत्रूचे सर्व वेद [7]हरपावे ! ॥ ७३
ब्रह्मद्रव्य, ज्ञातिद्रव्य, गुरुद्रव्य, रक्षिति, न हरिती; ।
[8]ब्रह्मण्य, सत्यवादी, दीनजनीं तातसे दया करिती; ॥ ७४
बहु शांत, दांत, दाते, [9]अविकत्थन, धर्मनीतिनिष्ठ तसे, ॥
सत्पुरुष तेचि यादव, ज्यांपासीं जय सदैव [10]तिष्ठंतसे. ॥ ७५
[11]अजितपदाश्रित सर्वहि यादव, [12]अजितचि सुरासुरजना कीं; ।
गाती यांसि, सजुनि बहु [13]मधुररव नवे नवे [14]मुरज, नाकीं. ॥ ७६
[15]त्यांसीं कैसा लावूं दिधला त्वां [16]पुत्रवत्सला ! [17]दावा ? ।
काय म्हणों ? [18]वृषदुर्वहहस्तिभरें केंवि वत्स लादावा ? ॥ ७७

---

१. चंद्रसमूहासारख्या तव प्रसादानें ताप नासे (दूर होई) इतकेंच नव्हे, पण नाहींसाच होय. 'नश्' धातूचा मूळचा अर्थ 'अदर्शन' म्हणजे 'न दिसणें' असा आहे; त्यावरून 'दूर होणें' असा अर्थ. गुजराथी भाषेमध्यें 'नासी गयो' म्हणजे 'पळून गेला, अदृश्य झाला,' असाच अर्थ आहे. २. एवं+अस्तु=असें असो. ३. आपल्या म्हणजे भूरिश्रव्याच्या पित्याचा. ४. शिनीच्या नातवाचा, सात्यकीचा. ५. पराभव पावे. ६. सात्यकीच्या शत्रूचा मनःसंताप. ७. भूरिश्रव्याचें सर्व धनुर्वेदपांडित्य व्यर्थच झालें असतें. ८. भक्तिमान्, भजनशील. 'ब्रह्मज्ञ' असाही पाठ आहे. ९. आत्मश्लाघा न करणारे. १०. उभा असतो. मूळ धातु 'स्था' म्हणजे 'असणें, उभें असणें'; परंतु त्याच धातूला वर्तमानादि कित्येक आख्यातीं 'तिष्ठ' आदेश होऊन 'तिष्ठति' इत्यादि रूपें होतात, त्यावरून हें मराठी रूप झालें आहे. ११. कृष्णाच्या पायाचे आश्रित. १२. अजय्य, जिंकण्यास अशक्य. सुर=देव, आणि असुर=दैत्य; या जनांला अजिंक्य. १३. ज्यांचा आवाज मधुर आहे असे (मृदंग). १४. मृदंग. १५. यादवांशीं; कृष्ण, सात्यकि आदिकरून यादवकुलोत्पन्न वीरांशीं. १६. पुत्रावर प्रेम करणाऱ्या धृतराष्ट्रा ! हें संजयाचें भाषण औपरोधिक दिसतें. १७. द्वेष, भांडण. १८. मोठ्या बैलालाही उचल-

अध्याय चौदावा.

अशि यूपकेतुची[1] गति होय. मग म्हणे सिताश्व[2], 'देवा ! हूं
श्रीरुद्रचरणकमलीं शीघ्र जयद्रथशिरोब्ज[3] दे वाहूं. ॥ १
थोडा उरला वासर[4] बा ! सरसिजलोचना[5] ! तुरग हांकीं[6]. ।
मारावाचि खल; अनुपकारज्ञ[7], खराखुरा उरग[8] हा कीं. ॥ २
बा ! केव्हांही झालें यामागें जें मुधा[9] न दासाचें, ।
तें आजहि प्रतिज्ञावच होवोचि[10], दयासुधानदा[11] ! साचें[12].' ॥ ३
तो भक्तवत्सल प्रभु ती पार्थाची मनांत मात[13] लिही[14]; ।
रथ चालवी त्वरित; तें पाहुनि लाजे मनांत मातलिही[15]. ॥ ४
कुरुवीर धांवले बहु, येतां नररथ[16] जयद्रथाजवळ. ।
कुरुपति कर्णासि म्हणे, "न परमुखीं सिंधुराज[17] हो कवळ. ॥ ५
प्रकट करीं बळ; चिंतित होतों बहु दिवस, या समर-समया. ।
सुकवि म्हणोत, 'महाद्भुत, ठावा नाहींच यासम[18], रस मया[19].' ॥ ६
हें[20] पण कीं, अस्तासि न रवि जातां, सिंधुराज मारावा. ।

ण्याला अशक्य, असें जें हत्तीनं उचलण्याचें ओझें, तें लहानशा वांसरावर लादणें योग्य आहे काय ? अर्थात् नाहीं.

१. भूरिश्रव्याची. २. अर्जुन. ३. जयद्रथाचें शिरकमळ. ४. दिवस थोडा राहिला. ५. कमलनेत्रा ! ६. घोडे हांक. ७. उपकार न जाणणारा, कृतघ्न. ८. उरानें चालणारा (सर्प). ९. खोटें. १०. होवोच. ११. दयारूप अमृताच्या नदा ! (नद=मोठी नदी). १२. खरें. (सत्य-सच्च-साचें). १३. मात=भाषण. वाद-वात-मात; किंवा भणित-वात-मात, असा अपभ्रंशक्रम दिसतो. कानडी 'मातु' (भाषण) हेंही 'मात' याचेंच रूपांतर असावें. १४. मांडी, कोरून ठेवी. कोरल्याप्रमाणें पक्केपणीं मनांत धरी. 'लिह्' धातूचें मूळचें रूप 'लिख', याचा अर्थ 'कोरणें' असा आहे. १५. इंद्रसारथीही. १६. अर्जुनाचा रथ. १७. जयद्रथ, हा शत्रूच्या मुखामध्यें कवळ (घांस) न होवो. १८. या युद्धरसासारिखा महा अद्भुत रस मयासुरालाही ठाऊक नाहीं. १९. मयासुरास. मयासुर हा असुरांचा शिल्पी. हा 'शिल्पचमत्कारकोटिजनक' होता (पंतकृत सभापर्व-अ० १।२ पहा). २०. अर्जुनाचा पण असा आहे कीं.

अल्पावशिष्ट वासर वेंचे[1] तों मात्र पार्थ वारावा[2]. ॥ ७
जातां वृथा प्रतिज्ञा[3], पावेल श्वेतवाह विलयाला. ।
ज्वलनीं[4] शिरतां सत्यत्राणा, केवि[5] कोण राहविल याला ? ॥ ८
होतील बंधुशोकें धर्म-पवनपुत्र[6] बुद्धि-बळ-हीन; ।
जलहीन मीनसे ते चवघेही, वांचतील पळही न. ॥ ९
पावेल हरिहि, तापापासुनि[7] बहु जेंवि आज्यप[8], दराला[9]. ।
एवं सुखेंचि येइल निष्कंटक[10] सर्व राज्य पदराला. ॥ १०
शल्यकृपद्रौणि[11]सहित, करिशिल तूं[12] स्पष्ट रत्नसानु-जया[13]. ।
सेना तव साहित्या योजिन मी, करुनि यत्न, सानुज[14] या." ॥ ११
कर्ण म्हणे, "कुरुराजा ! मज गमला भीम अहिमकरसा[15] च. ।
त्याचे सायक[16] नायक उग्रांचे शुद्ध अहि-मकर[17] साच. ॥ १२
अमरांतेंही, मर्म च्छेदुनि, म्हणतील, 'करुनि आ, वांका.' ।
बहु विकल मी; असावें म्हणुनचि आहें धरूनि आवांका[18]. ॥ १३
मज बळ न, चाळवाया[19] निजकरपाद, क्षताकुला[20] लेश. ।
भीमा मी, दाखविता विधिस जसा दक्षता[21] कुलालेश[22]. ॥ १४
परि समयीं न चुकावें म्हणुनि, यथाशक्ति करिल संगर हो[23]. ।
दैवीं[24] जय प्रतिष्ठित आहे. तूं धरुनि धैर्यसंगें[25] रहा. ॥ १५

---

१. थोडा राहिलेला दिवस संपे तोंपर्यंत मात्र. २. टाळावा, जवळ येऊं देऊं नये. ३. प्रतिज्ञा खोटी झाल्यास. ४. सत्य भाषणाच्या रक्षणास्तव अग्नींत प्रवेश करितांना. ५. शाहणा मनुष्य. ६. भीम. ७. तापा(ज्वरा)मुळें. अशा वैद्यशास्त्रविषयक उपमा पंतांच्या काव्यांत मधूनमधून चमकतात. (सभापर्व–अध्याय ४।८७ पहा.) ८. तूप पिणारा. ९. भयाला. १०. शत्रुहीन. ११. द्रौणि=द्रोणपुत्र, अश्वत्थामा. १२. कर्ण. १३. मेरुजयातें. १४. स+अनुज=बंधूसह. या सेना तव साहित्या योजिन–असा अन्वय. १५. अ+हिम+कर+सा=ज्याचे किरण थंड नाहींत अशासारखा, सूर्यासारखा तेजस्वी. १६. त्याचे बाण हे उग्रांमध्यें अत्युग्र आहेत. १७. खरोखरी सर्प आणि मगर यांसारखे. १८. अवसान. १९. हातपाय हालविण्यास. 'चालवाया' असें पाठांतर. २०. जखमा झाल्यानें व्याकूळ जो मी त्या मला. २१. कुशलता. २२. श्रेष्ठ कुंभार. भीमाशीं माझी तुलना केली असतां मी कसा आहें ? तर, सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाला, मडकीं घडण्यामध्यें आपलें चातुर्य दाखविणाऱ्या एकाद्या कुंभाराप्रमाणें. हें पंतांचें ठरीव यमक आहे (सभापर्व–अध्याय ४।८९).२३. हा मी, कर्ण.२४. तुझ्या प्रारब्धीं जय नेमलेला आहे. २५. धैर्याची संगति.

मी युद्ध करित असतां [1]सैंधव न धनंजयासि [2]गांवेल. ।
[3]अभिमुख वात [3]वहातां, तरुला व्यापील काय गा ! वेल ?" ॥ १६
ऐसें जों कुरुपतिसीं, उत्साह [4]वेंळें धरूनि, [5]कर्ण वदे, ।
नर शरजालें मथि त्यां बहु, [6]गरळें जेंवि ताप अर्णव दे. ॥ १७
छेदी पार्थ तडतड [7]द्विरदांचे, कुरुबळीं शिरोनि, [8]कर; ।
झांकी क्षितिला, विखरुनि [9]वीरधनुर्बाणभुजशिरो[10]निकर. ॥ १८
[11]किंबहुना, बहु शोणितपूरीं योधबळ वाहवी, राया ! ।
तेव्हां सुरर्षि वदले, 'सद्यश [12]यो [13]धवलवाहवीरा या !' ॥ १९
कुरुकटकजलदपटलचि, शिरतां [14]अर्जुनसमीर, वितुळे तें. ।
ने नृप [15]ऋक्षतुळेतें, पावे [16]तो [17]विक्रमीं रवितुळेतें. ॥ २०
जेंवि क्षम लीलेनें, सर्व [18]परमदा, [19]पिनाक, साराया, ।
नरचाप तसाचि, परां, उग्र परम, दापिना कसा ? राया ! ॥ २१
दुर्योधन दुःशासन कर्ण कृप द्रौणि शल्य हे [20]मानी, ।
[21]पार्थीं बहुशस्त्रांनीं वर्षति, [21]पात्रीं [22]जेसेंचि [23]हेमांनीं. ॥ २२
विजयासिं बाण हाणिति ते सर्वहि एकदांचि कडकडुनी; ।

---

१. जयद्रथ. २. सांपडेल. ३. तोंडासमोरचा वारा वाहत असतां. ४. खरा उत्साह नव्हे, ओढाताणीनें उत्साह धरून. ५. कर्णादि कौरवपक्षीयांस. 'मथित्यां' असें पाठांतर. ६. समुद्रांत पसरलेलें वह्नीचें जाळें, त्याच्या योगानें समुद्र जसा तारवांना त्रास देतो त्याप्रमाणें. ७. हत्तींचे कर (सोंडा). ८. शुंडादंड. ९. वीरांचीं धनुष्यें, बाण, हात आणि मस्तकें यांचा समुदाय पसरून पृथ्वीला झांकी. अथवा, वीर (अर्जुन) हा 'झांकी' याचा कर्ता घ्यावा. १०. समूह. ११. हें तर काय ? पण रक्ताच्या पुरामध्यें वीरांची मोठी संख्या वाहवी. अतिशयोक्ति अलंकार. १२. खरें यश येवो. १३. श्वेताश्व वीर जो अर्जुन त्याला. १४. अर्जुनरूप वायु शिरतांच कुरुसैन्यरूप मेघपटल वितळून गेलें. रूपकालंकार. १५. नक्षत्राच्या तुलनेला, क्षुद्रत्वाला. १६. तो अर्जुन. १७. पराक्रमाच्या बाबतींत. 'विक्रमी' असें पाठांतर. १८. शत्रूच्या मत्तपणाला लीलेनें नाहींसा करण्याला. क्षम=समर्थ. १९. शिवचाप. २०. अभिमानी. २१. सत्पात्रीं (ब्राह्मणीं) सुवर्णानीं वर्षती, सुवर्णाच्या राशी ओतितात. २२. 'जसेचि' असें पाठांतर. २३. हेम (सोनें) त्यांनीं. हा शब्द मागें अध्याय ४ गीति ८२ मध्यें अनेकवचनांत योजिला आहे. पदार्थवाचकनामांचा प्रयोग अनेकवचनांत केल्यास त्या पदार्थाच्या निरनिराळ्या जाती किंवा प्रकार यांचा बोध होतो.

गमलें, अमृतरसातें, केली, जिंकावया निकंड[1] केडुनीं[2]. ॥ २३
करिती, प्रसन्न व्हाया जो, सादर नारदादिभक्त पैंसे[3], ।
त्या प्रभुच्याही मर्मीं हाणिति शर, दशमुखादि रक्तपसे[4]. ॥ २४
परशरशतें[5] त्यजि न धृति विजय[9], सुयति[6] जेंवि अंतराय-शतें[7]. ।
रामयशासीं तुळितां, न धरी तिळमात्र अंतरा[8], यश तें. ॥ २५
दुर्योधन दुःशासन शल्य कृप द्रौणि भंगतां, क्रुद्ध ।
कर्ण पुढें होय; करी अत्यद्भुत शक्रसूनुसीं युद्ध. ॥ २६
सात्यकिचे, भीमाचे, पावुनि वित्रास[10], 'हाय !' हात, रणीं ।
म्हणती; वाटे, 'झाला[11] प्रियसुतमित्रा सहाय हा तरणी.' ॥ २७
पार्थ न साहे जें, वृष कृष्णीं, क्षत करुनि, होय अधिक रणीं, ।
वेदांती परविरचित[12] दूषणपांडित्य जेंवि अधिकरणीं[13]. ॥ २८
शरजालासह[14] सहसा[15] पाडी तोडूनि पार्थ तो धनुतें. ।
तों सज्ज दुजें केलें निमिषार्धें त्या समस्तयोधनुतें[16]. ॥ २९
कर्णें शरवृष्टि पुन्हा केली; तिस विसकटूनि, माराया, ।
पविसम[17] सायक सोडी, रचितनिर्लिपार्थ[18] पार्थ बा राया ! ॥ ३०
जों हांसत पार्थ म्हणे, 'अर्पुनि[19] बाणास अंग, पावन[20] हो,' ।
छेदुनि दुर्वार शर, द्रौणि[21] करी क्षिप्र अंगपावन[22], हो, ! ॥ ३१

---

१. घाई, धामधूम. २. निषांनीं. उत्प्रेक्षालंकार. ३. अंजली. ४. रक्त पिणारे राक्षससे. ५. शत्रूंच्या शेंकडों बाणांनीं. ६. इंद्रियदमन ज्यानें उत्तम प्रकारें केलें आहे असा संन्यासी. ७. विघ्नशतें. ८. भेदा. ९. इंद्रपुत्र अर्जुन, याशीं. १०. भय, भीति. ११. हा तरणी (सूर्य) आपल्या प्रिय पुत्राच्या (कर्णाच्या) मित्राला (जयद्रथाला) सहाय झाला. (अर्जुनाच्या मरणास्तव लौकर अस्तास चालला.) १२. दूषण देण्याविषयीं परपक्षानें केलेलें पांडित्य. १३. सिद्धांतप्रतिपादनांत, न साहे. विषयोपन्यास, तद्विषयक संशय, पूर्वपक्ष, उत्तरपक्ष व सिद्धांत (निर्णय) या पांच अंगांच्या अनुरोधानें जें एका विषयाचें प्रतिपादन, त्यास अधिकरण असें म्हणतात. १४. बाणांच्या जालासहित. १५. झपाट्यानें. १६. सर्व वीरांनीं स्तुत जो कर्ण त्यानें. १७. वज्रासारखे बाण. १८. रचित+निर्लिप+अर्थ=संपादित आहे देवांचा कार्यार्थ जेणें, असा. निर्लिप=देव, सुर. १९. 'अर्पुनियां यास' असा पाठभेद. यास=बाणास. २०. पवित्र. २१. अश्वत्थामा. २२. अंगप+अवन=कर्णरक्षण.

केला पार्थ वृषें, वृष पार्थें, शतदा शरीं दिसेनासा. ।
[1]साध्वस न धरिति; [2]जाणों साम्रा, दोघांसही, दिसे नासा. ॥ ३२
तों [3]स्वभटांसि [4]नृपें म्हणे, 'वृष, विजया न वधितां, न परतेल; ।
साहित्य करा. दीपचि हरि [5]तम; त्या पाहिजेच [6]पर तेल. ॥ ३३
मग [7]नगभित्सुत, मारुनि [8]हरिसारथि, कर्णकीर्तिला मळवी. ।
त्यातें अश्वत्थामा सत्वर, वाहोनि निजरथीं, पळवी. ॥ ३४
[9]गुरुसुत कृप [10]मद्रप [11]वृषसेन [12]झटति, पार्थशर [13]सहात, रणीं. ।
इच्छिति सर्व असें कीं, 'अस्तंगत होउ शीघ्र हा तरणी.' ॥ ३५
सिंधुपतीच्या जाऊं नच द्यावा पार्थ हा निकट कांहीं, ।
तुमच्या, असाचि निश्चय केला, साहोनि हानि, कटकांहीं. ॥ ३६
बहु [14]वर्षतां परांस न नर मानी, जेंवि न [15]नग मेघांस, ।
भासे धनंजय [16]धनंजयचि, सकळ शत्रुजन गमे [17]घांस. ॥ ३७
गमलें, आंगें करितो [18]रतिरमणक्षयकराक्ष समरा या; ।
[19]कीं श्रीमद्रामातें वेढुनि, झटतात राक्षस मराया. ॥ ३८
हयगजभटांसि [20]नरशर अहि, द्याया मृत्यु रोकडा, डसले.।
[21]मृगहृदयीं [22]हरिवेसा, [23]कुरुप-मनीं फार तो [24]कडाड सले. ॥ ३९

१. भय. २. आपल्या नाकाचें अग्र दिसणें हें मृत्यु दूर असल्याचें सूचक मानिलें आहे. ३. आपल्या वीरांना. 'भटः स्यात्पुंसि वीरे च विशेषे पामरस्य च' इति मेदिनी. ४. दुर्योधन. ५. अंधकार, काळोख. ६. परंतु. 'परंतु' ह्या शब्दाच्या ठिकाणीं 'पर' हा शब्द समंजस लोकांच्या भाषणांत कधींही येत नाहीं. शूद्रादि अडाणी लोक मात्र ह्या शब्दाचा प्रयोग करितात. इतर मराठी कवींच्या काव्यांतही हा शब्द आढळत नाहीं. असें जरी आहे, तरी पंतांनीं ह्या शब्दाचा प्रयोग पुष्कळ ठिकाणीं केलेला आढळतो. (सभापर्व–अध्याय ५ गीति ३५ पहा.) ७. पर्वत फोडणारा जो इंद्र त्याचा सुत (अर्जुन). अर्जुन असें सरळ न म्हणतां 'नगभित्सुत' म्हटल्यानें **पर्यायोक्तालंकार** होतोच, पण तो अत्यंत पराक्रमी आहे, हें दर्शविण्याच्या हेतूनें त्यास हें विशेषण लाविल्यामुळें **परिकरालंकारही** झाला आहे. ८. कर्णाचे अश्व व सारथी. ९. अश्वत्थामा. १०. शल्य. ११. कर्णपुत्र. १२. अंतःकरणपूर्वक प्रयत्न करिती. १३. सहन करीत. १४. [कौरवांनीं] बाणांचा वर्षाव केला असतां. १५. पर्वत. १६. अग्नि. १७. गवत. १८. रति+रमण+क्षयकर+अक्ष=मदनमारक नेत्र ज्याचे असा शिव. १९. किंवा. २०. अर्जुनाचे बाण हेच सर्प. २१. हरिणांच्या मनांत. 'मम हृदयीं' असा

गरुडें गांठावा अहि, गरुदनिलें जेंवि जळधि कडवूनी, ।
बा ! गांठिला जयद्रथ तेंवि नरें बहुत सैन्य बुडवूनी. ॥ ४०
कपिवेरि एक, हयांवरि [3]वसु, [4]हरिवरि तीन, अर्जुनावरि सा, ।
शर योजी [6]सैंधव [7]विगतायु, [8]शरभहंतुकाम तो हरिसा. ॥ ४१
ते[9] छेदुनि पार्थे [10]क्षततनु केला बाण साठ सोडुनी, ।
तत्काळ पाडिले [11]शरयुग्में [12]तत्सूतकेतु तोडूनी. ॥ ४२
तों प्रभु म्हणे, "सख्या ! हा [13]व्याघ्रीच्या जेंवि सार थानींचा. ।
वधिसिल कसा, न करितां भग्न रणीं प्रथम [14]सौ रथां,[15]नीचा ? ॥ ४३
तुज थोड्या तरि व्हाव्या [16]जिंकाया सा रथांसि सा घटिका. ।
थोडा उरला [17]वासर. सन्मान्या ! पण तुझा न हो लटिका. ॥ ४४
सैंधव, आजि कसातरि तुजकरवीं, पाहिजेच मारविला. ।
यास्तव मी [18]योगें तम निर्मुनियां, झांकितोंचि या रविला. ॥ ४५
वाटेल सैंधवांसह सर्वांसहि, 'सूर्य सत्य मावळला. ।

'पाठभेद. २२. सिंहाच्या ध्वनीसारखा. २३. कुरुपति (दुर्योधन) याच्या मनाला. २४. कडकडाट.

१. गरुत्+अनिलें=पक्षवातानें. पंखांच्या झपाट्यानें जो वायु लोटेल, त्याच्या वेगानें समुद्रोदक देखील वर उडेल अशा रीतीनें. २. ध्वजावरील मारुतीला. ३. आठ. ४. कृष्णावर. ५. सहा. ६. जयद्रथ. ७. ज्याचें आयुष्य संपलें आहे, असा तो सैंधव. ८. शरभ नामक महाबलिष्ठ जो प्राणी, त्याला मारण्याची इच्छा धरणाऱ्या सिंहासारखा. शरभ हा सिंहालाही असह्य असतो, अशी कविकल्पना आहे. हंतुकामः–धातुपुढें 'तुम्' प्रत्यय लागून त्यांतील 'म्' चा लोप होऊन 'काम' शब्द लागून हें रूप सिद्ध झालें. कर्तुकाम, गंतुकाम, जेतुकाम इत्यादि अन्य उदाहरणें आहेत. 'काम' शब्दाप्रमाणें 'मनस्' शब्दाचाही प्रयोग होतो. गंतुमना, दातुमना, कर्तुमना इत्यादि. 'काम' आणि 'मनस्' यांच्या योगें 'इच्छिणारा' असा अर्थ होतो. उदाहरणें–कर्तुकाम, कर्तुमना, गंतुकाम, गंतुमना, इत्यादि. ९. जयद्रथानें सोडिलेले बाण. १०. घायाळ. ११. बाणाच्या जोडीनें, दोन बाणांनीं. १२. त्याचा सारथी आणि ध्वज. १३. व्याघ्रीच्या थानींचा सार, म्हणजे वाघिणीच्या दुधासारखा मिळविण्यास कठीण. १४. दुर्योधन, दुःशासन, कर्ण, कृप, द्रौणि, शल्य, या सहा योद्ध्यांना (गीति २२ वी पहावी). १५. नीचा (सैंधवाला) कसा वधिसिल ! १६. 'माराया' असाही पाठ आहे. १७. दिवस थोडा राहिला. १८. योगबळानें, अचिंत्य सामर्थ्यानें अंधकार उत्पन्न करून.

चुकला, सुकला अर्जुन, भलतें शोकज्वरांत बोवळला.' ॥ ४६
चुकलें मरण म्हणुनि, बहु हर्षेल, न आपणास रक्षील. ।
हांसेल, म्हणेल, 'भलें झालें, पार्थासि वह्नि भक्षील.' ॥ ४७
त्या रंध्रींचें[३] अधमशिर उडवीं, शंका धरूं नको कांहीं; ।
करितांहि शोक, विरहज्वरभय[४] चित्तीं धरून, कोकांहीं[५]." ॥ ४८
पार्थ 'अवश्य' म्हणे. प्रभु झांकी, निर्मुनि महातमा, रवितें. ।
अरिस, नरकुंजरीं हरितेजचि[६] होउनि महात, मारवितें. ॥ ४९
करुनि तमें तरणीतें, पुरवाया श्रितमनोरथा[७], पिहित[८], ।
यद्यपि दुर्घट होतें, प्रभु लीलेनें करी तथापि हित. ॥ ५०
बहु जोडिलें सुयशधन[९], ऐसा हा भरुनि हांट[१०] कपटाचा, ।
महिमा सहस्रवदनाहि[११] न वदवे, दिव्यहाटकपटाचा[१२]. ॥ ५१
तरणि न दिसतां, लावी सकळ कटक तोहि, दृष्टि गगनींच. ।
त्यां[१३], आपणाहुनि बहुत, हर्षभरें, होय मेरुनग नीचें[१४]. ॥ ५२
देव म्हणे, 'सिततुरगा[१५] ! देखतसे सिंधुपाल तो खांत[१६]. ।

---

१. पुत्रशोकाच्या संतापांत असतां. २. ज्वरभयादि कारणामुळें भलतेंच बोलून गेली, बडबडला. ३. त्या उत्तम संधीला. ४. 'विरहज्वरभर' असें पाठांतर. सूर्यास्त झाला असें समजून चक्रवाक पक्षी शोक करावयास लागतांच—असा भावार्थ. ५. चक्रवाकपक्ष्यांनीं. चक्रवाक नामक एक पक्षी आहे. त्यांत पुरुष (नर) व स्त्री (मादी) यांचा रात्रीं ऋषिशापामुळें नित्य वियोग होतो. त्यांचा परस्परांवर अनुराग फार असल्यामुळें त्यांना वियोगाचें दुःख अत्यंत असह्य होतें. पण रात्र सरून सूर्योदय झाला म्हणजे त्यांची परस्पर भेट होते व तीं सारा दिवस एक ठिकाणीं राहून घालवितात, अशी कविप्रसिद्धि आहे. ६. नरकुंजरीं (अर्जुनरूप गजावर) हरितेजचि (कृष्णाचें तेज हाच) महात होऊन अरितें (शत्रूला) मारवी. ७. आश्रित जो अर्जुन त्याच्या मनोरथाला. ८. आच्छादित. 'अपिधान' (झांकणें), 'अपिहित' (झांकलेला) यांतील 'अ' ह्या वर्णाचा विकल्पें लोप होऊन 'पिधान,' 'पिहित' अशीं रूपें होतात. त्यांतीलच हें एक आहे. ९. सुयश हेंच धन जोडिलें. १०. बाजार. ११. शेषाला देखील. १२. दिव्य+हाटक+पट= उत्तम सुवर्णापरी पीतपट ज्याचा असा जो कृष्ण त्याचा. १३. त्याला (जयद्रथाला). १४. तुच्छ. १५. हे अर्जुना ! १६. आकाशांत. 'खमिन्द्रियं समाख्यातं खमाकाश-मुदाहृतम्' इत्येकाक्षरकोशः.

तन्मस्तक खंडुनि, मज, बा! [1]लक्ष्मणसाचि, घाल [2]तोखांतें.'।। ५३
[3]प्राप्तस्मरहरवर नर, खरतर शरवृष्टि करुनि, कुरुसैन्य ।
मारी, सुदूर सारी चापबळें, [4]अचळकुळ जसें [5]वैन्य. ।। ५४
[6]आनाभि बुडति चक्रें ऐसें क्षितिवरि पळांत [7]पळ सांचे; ।
वाटे खरे विखुरले रणरंगीं पुष्पराशि पळसांचे. ।। ५५
[8]शौरिसख करी सहसा द्रौणि कृपाचार्य गाढ विद्ध रणीं; ।
बहु कांपवी [10]पतद्गजवृंदभरें पार्थ [11]गाढवित् धरणी. ।। ५६
[12]वृषवृषसेनधनुष्यें खंडी, भ्रमवी सुयोधन-मनातें; ।
[13]मद्रपसूतासि वधी. करिति भयें बहु [14]सुयोध नमनातें. ।। ५७
शरवर्षे रथरक्षक सकळ, विकळ करुनि, पळविले वधिले; ।
कार्यार्थ सुचों न दिले त्या वध्य जयद्रथा मनामधिले. ।। ५८
मग घे शर, जो होता [15]अर्चित, दुःसह अरीस, भात्यांत, ।
वज्रास्त्रें मंत्रुनि, बहु आणी पहिल्यापरीस [16]भा त्यांत. ।। ५९
देव म्हणे, "ऐक, अशी झाली, हा जन्मतां, [17]नभोवाणीः– ।
'हें सुतरत्न निजकुळा वृद्धिप्रद, जेंवि [18]वारिजा पाणी. ।। ६०
होईल शूर मानी, बहु संपत्ति प्रसिद्ध जोडील; ।
परि समरांत [19]अलक्षित अरि याच्या मस्तकासि तोडील.' ।। ६१
सुतशोक जसा, न तसा दुःसह संताप, भो [20]सखे! [21]दवे, दे, ।
याचा पिता बृहद्रथ, ऐसें, होऊनि तो सखेद, [22]वदे, ।। ६२

---

१. लक्ष्मणानें इंद्रजिताचा वध करून (रामावतारीं) मला संतोषांत घातलें होतें त्याप्रमाणें. २. तोषांत, हर्षांत. हेंच यमक पुढें अध्याय १९ गीति ४५ च्या शेवटीं आहे. ३. स्मरहर जो शिव त्याचा वर प्राप्त केला आहे ज्यानें, असा अर्जुन. ४. पर्वतसमुदाय. ५. वेनराजाचा पुत्र तो वैन्य, पृथुराज. यानें शिवप्रसादानें समर्थ होऊन पर्वत खणून टाकून पृथ्वी पुष्कळ सम केली होती. यावरूनच 'पृथ्वी' हें नांव. ६. नाभीपर्यंत. ७. मांस. ८. कृष्णाचा मित्र, अर्जुन. ९. दृढ. १०. पतन पावणाऱ्या हत्तींचा समूह, त्याच्या भारानें. ११. गाढवित्=गाढज्ञानवान्, महाज्ञानी. अत्युक्ति अलंकार. १२. कर्ण आणि कर्णपुत्र यांचीं धनुष्यें. १३. शल्यसारथ्याला. १४. मोठे योद्धे. १५. पूज्य, पूजित. १६. तेज. १७. आकाशवाणी. १८. कमळास. १९. अवचित, कोणाच्याही लक्षांत न येतां. २०. मित्रा अर्जुना! २१. वणवा. २२. ऐसें वदे.

'क्षितिवरि जयद्रथाचें पाडिल मस्तकसरोज जो जन, हो ! ।
शतधा त्याचेंहि फुटो मस्तक; तो श्वापदांसि भोजन हो[1].' ॥ ६३
जपतो, तपतो तप तो,[2] कीं निजबाचा कधीं न हो वंध्या. ।
संप्रति[3] स्यमंतपंचकदेशाबाहेर[4] करितसे संध्या[5]. ॥ ६४
याचें[6] मस्तक याच्या जनकोत्संगीं[7] हळूच पाडावें; ।
कंदुकसें[8] गगनपथीं वरिचेवरि, शरकरेंचि[9] ताडावें." ॥ ६५
अर्जुन म्हणे, 'बहु बरें.' गांडीवगुणीं सुबाण तो जोडी, ।
सोडी सणणणणणणण, वध्यजयद्रथशिरोंबुरुह[10] तोडी. ॥ ६६
नेलें, करें कमळसें, शरनिकरें[11] सांवरूनियां शिर तें, ।
अंकीं[12] उतरिलें बा ! हितचि अहित, दैव जेधवां फिरतें. ॥ ६७
बैसोनि करित होता जप, तुमचा[13], स्वस्थचित्त, तो व्याही. ।
प्रभुयश किति वर्णिल कवि ? करु आर्या लक्षकोटि, ओव्याही. ॥ ६८
अंकीं काय गुरु[14] ? असें म्हणुनि पहावें; परंतु मन भुललें. ।
उठतां जप करुनि, पडे क्षितिवरि सुतशीर्ष[15]; तच्छिरहि उलें[16]. ॥ ६९
प्रभुनें यापरि तुमचा जांवाई आणि खपविला व्याही. ।
भगवल्लोभें, नवकुश[17] शमविल गरुडाहि, न पवि लाव्याही[18]. ॥ ७०
ब्रह्मादि सर्व भूतें, तें पाहुनि, अतुलविस्मया वरिती. ।
करिती बहु नर हरिनुति[19], तद्ध्यानचि भक्त दृढ मनीं धरिती. ॥ ७१
अक्षौहिणी खपविल्या या युद्धीं श्वेतवाहनें[20] आठ, ।
कार्मुकवेद[21], हरिहरस्तवराजहि[22] राजया[23] ! ज्या[24] पाठ. ॥ ७२

---

१. होवो. २. बृहद्रथ. ३. आतां. ४. कुरुक्षेत्रासमीपचा एक तीर्थप्रदेश. ५. संध्यावंदन. ६. जयद्रथाचें. ७. जनक+उत्संगीं=बापाच्या मांडीवर. ८. चेंडूसारखें. ९. बाण हाच हस्त त्यानें. १०. वध करण्यास योग्य अशा जयद्रथाचें शिरकमल. ११. बाणसमुदायानें. १२. पिता बृहद्रथ याच्या मांडीवर. १३. तुमचा, अर्थात् धृतराष्ट्राचा, व्याही. १४. जड. १५. पुत्राचें शिर. १६. फुटलें. याच्या हातून जयद्रथशिर भूमीवर पडल्यामुळें, याचेंही शिर फुटलें. (गीति ६३ वी पहावी). १७. कोमलदर्भ. १८. लावापक्ष्यासही. १९. कृष्णाची स्तुति. २०. अर्जुनानें. २१. धनुर्वेद. २२. विष्णु व शिव यांचें स्तवन. 'हरिहरस्तव' या नांवाचें एक पंतकृत लघुकाव्य आहे. (पंतकृत स्फुटकाव्यें, भाग पहिला, पृष्ठ १८९ पहा). २३. हे धृतराष्ट्रा ! २४. ज्या अर्जुनाला, श्वेतवाहनास.

मग जगदीश सुहृत्तम पुरुषोत्तम त्या क्षणासि आटोपी. ।
हा टोपी[1] घालिल जलनिधिसहि; मशका म्हणेल, 'आटो,पी.'[2] ॥७३
दिनमणि[3] दिसतां देवक्यात्मजमाया[4] असें तयां उमजे. ।
कपटें जिंकोनि, करित होते वृद्धांसमक्षही[5] धुम[6] जे. ॥ ७४
केलें तव तनयांनीं, पाहुनि सैन्धव परासु[7], रोदन हो ! ।
श्रमद कविमतें स्नेहचि, ऐसा सेवनपरा सुरोद[8] न हो[9]. ॥ ७५
श्रीकृष्णें प्रथम, मग श्वेताश्वें, शंखराज वाजविला. ।
भीमाच्या सिंहरवें[10] कल्पांतपयोदनाद[11] लाजविला. ॥ ७६
त्या नादें धर्माला, विजयें अरि मर्दिला, असें कळलें. ।
टळलें दुस्तर संकट, कृष्णपदध्यान जयफळें[12] फळलें[12]. ॥ ७७
होऊनि जयोन्मत्त, द्रोणासि न वचकतीच, भट कांहीं; ।
हर्षें बहुविध वाद्यें वाजविलीं धर्मराज-कटकांहीं. ॥ ७८
'गुरु मारावाचि' म्हणति पांचाळप्रमुख[13] सकळ वीर-मणी; ।
उत्साहशक्ति[14] योधा श्रम, भर्त्या जैंवि, न कळवी, रमणी. ॥ ७९
अस्तातें रवि जातां, जगदेकयथार्थसंध[15] सितवाजी ।
निज विजयश्रीस हरी[16], सांपडली पथ चुकोनि कितवा[17] जी. ॥ ८०

अध्याय पंधरावा.

बहु शर वर्षति कृप, गुरुसुत[18], घालुनि शक्रसूनुला[19] मध्यें, ।
ज्याच्या धनुला झालीं, दैत्यांचीं उद्धतें बळें, वध्यें. ॥ १

१. टोपी घालणें=फसविणें. हा=श्रीकृष्ण. २. जलनिधि आटो--असा अर्थ. ३. सूर्य. ४. देवकी+आत्मज+माया=कृष्णमाया. ५. भीष्मादिकांसमक्ष. ६. धुमाळी. ७. गतप्राण. ८. सुरा+उद=मद्यसागर. ह्या गीतीशीं अध्याय १२, गीति ७४ ही ताडून पाहण्यालायक आहे. ९. न होवो, न होय. १०. सिंहाच्या ध्वनीसारख्या ध्वनीनें. ११. प्रलयकालच्या मेघांचा नाद. १२. जयरूप फळाच्या प्राप्तीमुळें फलदायक झालें. १३. द्रुपदादिक. १४. जैंवि रमणी भर्त्या श्रम न कळवी, तैंवि उत्साहशक्ति योधा श्रम न कळवी--असा अन्वय. योध=योद्धा, शूर. १५. जगतामध्यें एक सत्यप्रतिज्ञ. १६. हरण करी. १७. ठकाला. १८. अश्वत्थामा. १९. इंद्रपुत्र जो अर्जुन त्याला.

चित्तीं पार्थ म्हणे, 'कृप गुरु, गुरुसुत हाहि गुरु असामान्य; ।
निष्ठुर कैसें व्हावें ? [1]द्रोणेतर जन नसे असा मान्य. ॥ २
शरें [2]मंदवेग, तो [3]गुरुवत्सल, रक्षावया स्वयश हाणी. ।
परि [4]तन्मति गडबडली, स्त्री बहु कार्यांत जेंवि न शहाणी. ॥ ३
त्या [5]विप्रयुगीं न पडति, जरि [6]पार्थप्रहित मंद [7]रोपें, रिते;[8] ।
गाववितित, [9]अमृतरुचिशुचि [10]गुणवशयश, मेरुमंदरोपरि, ते. ॥ ४
[11]पार्थशरार्त कृप [12]कृपणसम, [13]समयज्ञहि, करून 'आ', रडला; ।
पडला मूर्छित; जैसा, बहु, बाल [14]व्यालदष्ट, आरडला. ॥ ५
[15]वाटेल तत्तनुपुढें, बहु कांटे काय काढिले [16]पणसें ! ।
आलें कृपासि, पन्नगपाशीं [17]रघुनायका ढिलेपण-सें. ॥ ६
मेलाचि असें मानुनि, सूतें रथ [18]तूर्ण काढिला मागें. ।
केला [19]गुरुशोक प्रभुपाशीं त्या अर्जुनें [20]महाभागें. ॥ ७
'गुरु, माय, बाप, ईश्वर, तरले गुरुचीच धरुनि नर कास. ।
मजसम मीच कृतघ्न; प्रभुजी ! पावेन मरुनि नरकास. ॥ ८
[21]स्मरतां, कृपगुरु, घालिल मज बहु, [22]अभिमन्युपरिस, शोकांत. ।

---

१. द्रोण वेगळा करून इतर. २. ज्याचा वेग (गति) मंद आहे असा शर. ३. गुरुवर प्रेम करणारा (अर्जुन). ४. त्यांची (कृपाचार्य व अश्वत्थामा यांची) मति. ५. कृप आणि अश्वत्थामा, या दोन विप्रांच्या ठायीं. ६. अर्जुनानें सोडलेले. ७. बाण. ८. विफल. ९. चंद्रकांतीसारखें शुभ्र. १०. अर्जुनाच्या सद्गुणांमुळें त्यास वश असें यश; (पक्षीं) धनुष्याच्या दोरीच्या अधीन असणारें यश. श्लेषालंकार. ११. पार्थाच्या बाणांनीं पीडित. १२. कृपण=नीच, हलकट. १३. वेळप्रसंग पाहून वागणारा, धोरणी. १४. सर्प डसला आहे ज्याला, असा बालक. १५. त्याच्या समोर फणस ठेविला असतां, फणसानें आपल्या आंगावरचे पुष्कळ कांटे काढून टाकिले कीं काय असें वाटेल. अर्थात् फणसाच्या कांट्यांपेक्षां त्याच्या शरीरावर बाण अधिक लागत होते—असा अभिप्राय. ही अतिशयोक्ति आहे. १६. फणसनामक फळानें. १७. रामायणांत इंद्रजितानें सर्पपाशामध्यें धरलेल्या रामचंद्राला जसें ढिलेपण आलें, तसें या वेळीं कृपाला आलें. १८. सत्वर. १९. मोठा शोक; अथवा गुरुसाठीं शोक. २०. मोठा भाग्यवान् अशा. २१. जेव्हां जेव्हां आठवण होईल तेव्हां. २२. मृत अभिमन्यूच्या स्मरणानें जें दुःख होतें, त्याहून अधिक दुःख मृत गुरूच्या स्मरणानें मला होईल.

ज्याला गुरुचा वध मंत[1], अधमतम असा नसेल लोकांत.' ॥ ९
करितां विलाप, दाटे, बाष्पाच्या[2], पार्थकंठ, वेगानें; ।
कीं गुरुशोकीं सुजना स्वर्गीहि न काल कंठवे[3] गानें[4]. ॥ १०
तोंचि जयद्रथमथनव्यथितहृदय[5] कर्ण धांवला कोपें. ।
सात्यकि होय पुढें हो ! पार्थ म्हणे, "यास हें नव्हे सोपें. ॥ ११
रथ चालिव, बालिवधाद्यतुलयशा[6] ! यादवास[7] राखावें. ।
सुरभी[8] म्हणेल काय, 'व्याघ्रें स्वसमक्ष वासरा[9] खावें ?'' ॥ १२
देव म्हणे, 'वत्स गमे प्रेमें, परि हां[10] निको[11] महर्षभ[12] रे ! ।
समयीं गुरु-भक्त-मनीं दुर्धरअरिहानिकाम[13] हर्ष भरे. ॥ १३
एकचि सात्यकि आहे कर्णाच्या परिभवास[14] पर्याप्त[15]; ।
करिती साहित्य तुझे चक्रत्रातेहि[16] वीरवर्याप्त[17]. ॥ १४
घालिन गांठि, करूं दे आधीं हरिदत्तशक्तिचा[18] वेचें[19]. ।
व्याघ्री, नागी, कृत्यां[20], तशि अरिला शक्रशक्ति चावे च. ॥ १५
शक्ति दिली, देऊं दे; न सुतवधें अयश अंजु[21] नाकेश[22]. ।
सर्वस्व बुडो, न तुझा एकहि हो वक्र, अर्जुना ! केश. ॥ १६
स्वच्छगुणा ! तूं ठाउक अससी सुरनायका पुरारीस[23]. ।

---

१. मान्य. २. अश्रूंच्या. ३. क्रमवे. ४. गाण्यानें. ५. जयद्रथाच्या मृत्यूनें व्यथित झालें आहे हृदय ज्याचें, असा कर्ण. ६. बालिवधादिक अनुपम्य यश मिळविलें आहे ज्यानें अशा (कृष्णा). ७. सात्यकीस. ८. कामधेनु. ९. वत्सातें. १०. सात्यकि. ११. खरोखर, वस्तुतः. १२. महा+ऋषभ=मोठा बैल. १३. शत्रूला मारण्याची इच्छा ज्याला, असा हर्ष. हा 'भरे' याचा कर्ता. १४. पराभवाला. १५. पुरेसा, भरपूर. १६. चक्ररक्षक. १७. वीर-वर्य+आप्त=वीरश्रेष्ठ असे सुहृत्. १८. इंद्रानें दिलेल्या शक्ति नामक अस्त्राचा. इंद्रानें आपल्या पुत्राच्या (अर्जुनाच्या) कल्याणार्थ कर्णापाशीं त्याच्या आंगचीं कवचकुंडलें मागितलीं. त्या वेळीं वदान्यश्रेष्ठ कर्ण आपल्या सत्यापासून ढळला नाहीं. त्यानें आत्मरक्षणार्थ इंद्राची शक्ति मात्र त्याजपासून मागून घेतली व ती घेतल्यानंतर त्यानें आपल्या हातानें आपलीं सहज कुंडलें व कवच हीं त्यास आपल्या शरीरापासून कापून दिलीं. त्या इंद्रदत्त शक्तीचें नांव 'वासवी शक्ति' असें होतें. ही अमोघ (फलप्रद) दिव्य शक्ति कर्णाचें रक्षण करणारी होती. (मोरोपंतकृत वनपर्व—अध्याय १४ मध्यें हा कथाभाग आहे. तो रसिकांनीं वाचून पाहावा, अशी शिफारस आहे.) १९. व्यय. २०. उग्र देवता. २१. संपादो. २२. नाक+ईश=इंद्र. २३. पुर+अरीस=सदाशिवास. तुझा पराक्रम

प्राकृत जाणेल कसा ? बा ! जाणे काय कापुरा रीसें ? ॥ १७
घालिन गांठि वृषाशीं, त्याच्या येतांचि समय मरणाचा. ।
मग चिंता कां ? घेइल [2]पंथकर जरि दाससम यम रणाचा.' ॥ १८
सात्यकिला विरथ करिल [3]यूपध्वज, हें भविष्य जाणोनी, ।
प्रभु, [4]कल्पविला दे निज रथ, दूरिल [5]दररवेंचि आणोनी. ॥ १९
त्या [6]अजितरथीं सात्यकि, [7]शक्ररथीं रामभद्रसा, [8]वेंघे; ।
कर्णाभवते बहु, उरगाभवते जेंवि गरुड, [9]कावे घे. ॥ २०
रक्तें न्हाले, झाले योग्य सखे [10]पुष्पिंता पळाश-नगा. ।
[11]गंधर्वे म्हणति, 'एका राघव, एका म्हणा [12]पलाशन.' गा ! ॥ २१
वृषसात्यकिरणसमयीं [13]प्रेक्षकनिकरीं न देहभान वसे. ।
[14]दानवसेनापतिसे गमले कीं देवसे, न मानवसे. ॥ २२
विरथ करूनि [15]पळों दे वृष, न करी [16]नैकबाणविद्धांत. ।
मुख्य धनुर्धर कृष्णार्जुन सात्यकि, हाचि होय सिद्धांत. ॥ २३
भीमार्जुनभाग, म्हणुनि [17]तवसुत-राधेय मारिले नाहीं. ।
लीलेनेंचि निवटिता, दुर्घट नव्हतेंचि [18]माधवा कांहीं. ॥ २४
[19]भूपरथीं जाउनि वृष सोडी [20]अत्युष्ण दीर्घ सुसकारे; ।

शंकरास माहीत आहे. येथें किरातार्जुनीय कथा अनुसंधेय आहे. (मोरोपंत–वनपर्व, अध्याय ३ पहा.)

१. आखल. २. पत्कर, जबाबदारी. ३. कर्ण. ४. सिद्ध करविलेला. ५. शंखाच्या ध्वनीनें. ६. कृष्णाच्या रथावर. ७. रावणवधाच्या वेळेस इन्द्रानें पाठविलेल्या रथावर रामचंद्र चढला, त्यासारखा. ८. चढे. ९. घिरट्या. कावा=घोडा भरधांव चालत असतां त्यास वांकडातिकडा फिरविणें. १०. प्रफुल्लित अशा पळसाच्या झाडास. ११. देवांचे गवई. गंधं सौरभमर्वंतीति गंधर्वाः. १२. पल+अशन=मांसभक्षक=राक्षस, रावण. १३. प्रेक्षकसमुदायामध्यें. १४. दैत्यसेनापतीसारखे. १५. सात्यकि हा कर्णाला पळवून लावी, त्याचा अंत न करी–असा अर्थ. १६. न+एक+बाण+विद्ध+अंत=अनेक बाणांनीं विद्ध जो कर्ण त्याचा अंत. १७. तुझा पुत्र दुर्योधन हा भीमाचा भाग, आणि राधापुत्र कर्ण हा अर्जुनाचा भाग; म्हणून त्यांना सात्यकीनें मारिलें नाहीं. यथासंख्यालंकार. १८. सात्यकीला. १९. दुर्योधनाच्या रथावर. २०. अति+उष्ण.

हलुचि म्हणे, 'हा देवा ! कां केला, तपनसुतहि[1] फुसका[2] रे !' ॥२५
कृतवर्मा, गुरुनंदन, इतर महारथहि भांडले सर्व. ।
परि एकेंचि धनुर्ध्ये त्यांचा साराहि सारिला गर्व. ॥ २६
सात्यकि कुरुकटकांचा, पवन घनांचा तसा, करि मैणाण[3]. ।
पुसतां, 'कसे सुत' असें, आपणचि 'कृपा'पुढें तरि म्हणा 'णें.'[4] ॥ २७
तों दारुकानुजानें[5] सिद्ध करुनि आणिला सुरथ, राजा ! ।
प्रभुनें तो केला त्या, योग्य, न शक्रादिही सुर थेरा[6] ज्या. ॥ २८
माधव चढे नवरथीं, आज्ञा दे दारुकास[7] मातलिला; ।
जेंवि श्रीराम, मथुनि खचरचमूला[8] उदंडमातलिला[9]. ॥ २९
सात्यक्यवनयशाचा[10] पांघुरवी देत्र दारुका शेला. ।
प्रभु केंवि न ? तारी जडही लावुनि देवदारु[11] कासेलो[12]. ॥ ३०
तैसाचि कर्णहि चढे विधिवत्[13]कल्पितरथीं विमानसमीं[14]. ।
झाले विमनस्क[15] सकल तत्वज्ञहि, जाहलों विमनस[16] मीं[17]. ॥ ३१

---

१. मी सूर्यपुत्र पराक्रमी असतां मला असा निस्तेज कां केला ? २. जी बळकटी ज्यांत असावी तद्रहित असा, निर्बळ. ३. नाश, ओसाडी. ४. ही गोष्ट अशी कशी झाली, म्हणून पुसतां काय ? तर याला उत्तर हेंच कीं-तुमचे पुत्र आहेत कसे?—पण मी कशाला सांगूं ?—तुम्हीच 'कृपा' शब्दापुढें 'ण' लावा म्हणजे झालें. अर्थात् ते 'कृपाण' म्हणजे खड्ग, तरवार आहेत. त्यांनींच सर्व वंशाचा घात केला असें समजा. येथें पंतांनीं 'कृपण दीन जाले' अशी टीप दिली आहे. पण तिच्यामुळें अर्थ-बोध कांहींच होत नाहीं. 'सर्वसंग्रहां'त 'पुसतां कसें, श्रुत असे'. असा पाठ आहे. ५. कृष्णसारथी दारुक, त्याच्या बंधूनें. ६. ज्या स्थितीस. ७. इंद्राचा सारथी जो मातली त्याच्यासारखा सारथ्यकुशल दारुक, त्यास. ८. आकाशचर राक्षस, त्यांच्या सैन्याला. ९. जी फार माजली तिला. १०. सात्यकि+अवन+यशाचा=सात्यकीरक्षणाचें यश हाच शेला. ११. काष्ठविशेष. १२. जडही (निर्जीव देखील) देवदारु कासेला लावुनि तारी (रक्षण करी), [असें आहे तर] प्रभु केवीं न [तारी] ? -असा अन्वय. लांकडाचा आश्रय केल्यानें बुडणारा वांचतो, तर तो प्रभुकृपेनें वांचणार नाहीं काय ? अर्थात् वांचेल, हें उत्तर. १३. यथाशास्त्र सिद्ध केलेल्या रथीं. १४. विमानसदृश अशा रथीं. विमान=आकाशमार्गानें जाणारें असें देवादिकांचें यान. 'व्योमयानं विमानोऽस्त्री' इत्यमरः । 'विमानो व्योमयाने च सप्तभूमिगृहेऽपि च । घोटके यानमात्रे च पुंनपुंसकयोर्मतः ॥' १५. विरस अंतःकरण ज्यांचें असे. १६. विमनस्क, व्याकुळचित्त. १७. संजय.

भीमें वधिले दुर्मुखमुख तव सुत एकतीस, त्यां कथिलें. ।
भगदत्तभीष्ममुख बहुशत विजयें, सात्वतें, रणीं वधिले. ॥ ३२
या बहुलक्षजनाला, बा ! हेतु तुझाचि अपनय, मराया. ।
बहु काम, कोप, लोभचि खर; न प्रळयाग्नि तपन, यम, राया! ॥ ३३
अनुजाला भीम म्हणे, "विरथ करुनि गांजिलें मला कर्णें. ।
तें म्यांचि साहिलें बा ! आइकता नच दुजा भला कर्णें. ॥ ३४
'तूंवरका !' 'औदरिका !' 'मूढा !' 'संग्रामकातरा !' 'बाळा!' ।
ऐसें पुनः पुन्हां मज वृष वदला, अर्जुना ! असत्काला ! ॥ ३५
'ऐसें म्हणेल त्यातें मारावें तत्क्षणीं, न सोडावें,' ।
हें त्वांचि मत्प्रतिज्ञावच, दीनापत्यसेंचि, पोसावें. ॥ ३६
जसि आपली, तसि बुडों दे बुध पंकांत गाय न, पराची, ।
गानपटु[11] सखा समयीं सांवरितो तान गायनपराची[12]". ॥ ३७
नेला वृषाकडे रथ, कथितां अवमान हा निज गदीशें[13]; ।
सोसावी स्वजनाची कैशी नव मानहानि जगदीशें ? ॥ ३८
पार्थ म्हणे, 'ऐक वृषा ! जय अपजय वासवींहि[14]. आढळला; ।
नहुषमहाराज[15] भदें इंद्रपदाहुनि न काय गा ! ढळला ? ॥ ३९
आतांच कीं न वधितां सात्यकिनें सोडिलासि, हा नीचा ! ।
सत्वर पावसिल[16] फळा, केल्या सत्कुलजमानहानीच्या. ॥ ४०

---

१. दुर्मुखप्रमुख. २. सात्यकीनें. ३. दुर्नीति. या बहुलक्षजनांला (लक्षावधी मनुष्यांना) मराया तुझाचि अपनय, हेतु (कारणीभूत) [होय]—असा अन्वय. ४. कानानें. ५. नपुंसका. ६. हे भुकेलेल्या, खादाडा. ७. संग्रामाविषयीं भ्याडा, ८. पोरा, मूर्खा. ९. दुष्टांच्या काळा (नाशकर्त्या). १०. दीन+अपत्यसें=निराश्रित मूलसें. ११. गायनकुशलमित्र. १२. गायनतत्पराची. १३. गदी+ईश=गदाधरांमध्यें श्रेष्ठ अशा भीमानें. १४. इंद्राच्या ठायीं देखील. देवांचा राजा इंद्र हा विश्वरूप (त्रिशिरा) नामक ब्राह्मणाच्या वधामुळें व वृत्रासुरास अभय देऊन त्याचा वध केल्यामुळें स्थानभ्रष्ट झाला होता, अशी कथा आहे. (मोरोपंत—उद्योगपर्व—अध्याय २ गीति २३—२७ पहा.) १५. वृत्रासुराच्या भीतीनें इंद्र पळून गेला होता, तेव्हां नहुष राजा इंद्र झाला असतां, त्यानें इंद्राणीची इच्छा धरल्यामुळें तो पतन पावला होता. (मागें पृष्ठ १७८, टीप ३ पहा.) १६. केल्या मानहानीच्या फळा पावसिल—असा अन्वय.

बहुदां विरथ करुनि तुज, भीम न कांहींच बोलिला खोटें; ।
जो टेंक धरुनि भिडला, ज्याचें यश वीरमंडळीं मोठें. ॥ ४१
करुनि यदृच्छेनें[1] त्या आर्यातें[2] एकदां विरथ, अकुळा[3] ! ।
उपहासिलें कसें त्वां ? हांसावें काय बब्बुळें[4] बकुळा ? ॥ ४२
वधिला सौभद्र[5] तुम्ही बहुतांहीं मत्तकरिसमानाहीं. ।
कर्में सुदुर्जरें[6] खरगररसपानाहिपरिस माना हीं. ॥ ४३
केले[8] जेणें वैर, ज्याचे विपिनीं विशाळ वृषसे[7], न; ।
तो अभिमन्यु जसा प्रिय मज, तुज जो प्रिय तसाचि वृषसेन[9],॥४४
कथितों यथार्थ, करितों शपथ, स्पर्शोनि आयुधा, त्यांतें[10] ।
वधिन, तुजपुढें, दुर्मिळ यश देतां नवहि आयु, धात्यातें[11]. ॥ ४५
आधीं सुतशोकास्य[12] प्रेक्षीं[13]; मग दूर काय कालास्य[14] ? ।
करितील शिवा[15], चुंबुनि तुजभवत्या, जेंवि बायका लास्य[16]. ॥ ४६
उरकुनि घे कार्य, उचित ठेवाया न वृषसेनजनका[17], जें. ।
आमरण कष्ट न सुटति; बहु परवश न वृषसे न जन कार्जे[18]. ॥ ४७
प्रकटे महाप्रतिज्ञा सर्वत्रहि कुरुबळांत झटकरि ती. ।
भट करिती 'हा हा !' कीं न करिल तिसें[19] देवदैत्यकटक रिती.[20]॥४८
रवि मावळला, वाटे गेला देशांतरीं धरुनि शोक; ।
कोक[21] वरडति[21]; न रडतिल तेजस्व्याश्रयलयीं[22] कवण लोक ? ॥ ४९

१. सहज, दैववशात्. २. भीमातें. ३. हे कुलहीना. ४. बाभळीनें. ५. अभिमन्यु. येथें 'सौभद्र' शब्दानें त्याचें कोमलत्व आणि त्यावर हत्तीसारख्या दांडग्यांनीं तुम्ही चढाव करून त्याला मारिलें, हा दुष्टपणा दाखविला. ६. प्रखर विषरसाच्या पानांपेक्षांही सुदुर्जर (जिरायास अत्यंत कठीण) अशीं हीं तुमचीं कर्में मनांत आणा. ७. बैलासारखे. ८. न केले, नाहींतसे केले. ९. नामविशेष (कर्णपुत्र). १०. वृषसेनातें. ११. ब्रह्मयातें. ब्रह्मा त्याला दुर्मिळ यश जरी देईल, आणि नवें आयुष्य जरी देईल तरी त्या ब्रह्मयालाही वधीन. १२. पुत्राचें शोकयुक्त मुख. १३. पहा. १४. काळाचें मुख, अर्थात् मरण. १५. कोल्ह्या. १६. नृत्य. १७. वृषसेनाच्या पित्याला तुला (कर्णाला). १८. लोक कांहीं कार्याच्या निमित्तानें वृषासारखे (अथवा) वृषभासारखे अत्यंत पराधीन होत नाहींत, असें नाहीं. बलवानासही पराधीन व्हावें लागतें-असा भाव. १९. त्या प्रतिज्ञेला रिती (पोकळ) न करील. २०. फोल, निष्फळ. २१. चक्रवाकपक्षी आपला आश्रयदाता सूर्य अस्त पावला हें पाहून ओरडूं लागले. २२. तेजस्वी+आश्रय+लय=तेजस्वी

जें सुख सुखमूर्ति वरी, देउनि विजयासि सुपरिरंभातें, ।
नच वैरिती शतवत्सर, शुक वश झाल्याहि उपरि, रंभा तें.।। ५०
भगवान् म्हणे 'प्रिय सख्या ! जीतें तरलासि तूं, प्रतिज्ञा ती.।
इतराला न तरवती; झाले गतगर्व संप्रति ज्ञाती. ।। ५१
मोठीं मोठींहि बळें लवतिल तुजला न कां बळेशाला ? ।
जरि लांब रुंद बळकट, होतिल सम काय कांबळे शाला ? ।। ५२
मज तों तसा दिसेना, जो एकाकी घसेल या कटकीं ।
त्वत्तुल्य, त्वदधिकही; बहु मेळविले सुयोधनें भट कीं. ।। ५३
हें कर्म कराया जरि शक्राचें सैन्य एक कंट करितें ।
होतें, भिडतां यांसीं, सर्पांसीं जेंवि भेककटक[11], रितें. ।। ५४
हें भुजयुग कुतुक[12] करिल अणिकहि, पावेल कर्ण विलयाला. ।
[13]भाट करुनि मज, याचा जय, याहुनि अधिक वर्णविल याला.' ५५
पार्थ म्हणे, 'न विसरवे पळ तव पदनीरजाप्रति[14], ज्ञात्या ! ।
देवा ! सफळ[15] करितें हें,[16] करिती धीर[17] ज्या प्रतिज्ञा, त्या. ।।५६
केला धन्य त्रिजगीं तुझिया, हा [18]वासवि, प्रसादानें; ।
संतानें[19], जन्म सुदुर्गतिचा आवास, विप्रसा दानें[20]. ।। ५७

आश्रयाच्या नाशीं. पराक्रमी पुरुषाचा आश्रय नाहींसा झाला असतां कोणाला दुःख होणार नाहीं बरें ?

१. सुखाची केवळ मूर्तिच असा कृष्ण. येथें 'सुखमूर्ति' व 'विजय' ह्या शब्दांची योजना सहेतुक असल्यामुळें परिकरालंकार झाला आहे. २. उत्कृष्ट आलिंगनातें. ३. तें सुख रंभा न वरिती, म्हणजे–तशा उच्च प्रतीचें सुख रंभेलाही प्राप्त झालें नसतें. ४. शंभर वर्षें. ५. अप्सराविशेष. हीस इंद्रानें शुकाच्या तपाचा भंग करावयास पाठविलें होतें. 'शुकरंभासंवाद' हा मुक्तेश्वर, अमृतराय, विठ्ठलादि मराठी कवींचा आवडता विषय आहे. ६. नम्र होतील. ७. बळवंताला. ८. कांबळे [आणि] शाला सम (सारखीं) होतील काय ? अर्थात् नाहीं, हें अपेक्षित उत्तर. ९. एकटा. १०. कट=बेत; संप. ११. मंडूकसेना, बेडुकांचा समुदाय. १२. कौतुक. १३. याचा जय, मज भाट करुनि, [मजकडून] याला (अर्जुनाला) याहुनि अधिक वर्णविल–असा अन्वय. १४. पदकमळास. १५. 'सुफळ' असें पाठांतर. १६. त्वत्पदकमल. १७. धैर्यशाली पुरुष. १८. इंद्रपुत्र, अर्जुन. १९. संततीनें. दुर्गतिचा आवास [असा] जन्म, दानें विप्रसा, [धन्य केला]–असा अन्वय. ज्याप्रमाणें दान मिळालें असतां ब्राह्मणास धन्यता वाटते, किंवा पुत्रप्राप्तीमुळें अत्यंत दुर्गतीचें वसतिस्थान असा

तूं ज्यांचा नाथ, तयां जरि जय तरि काय नवल ? [1]वणव्याला ।
प्याला, त्या अरि[2]जीवन किति ? सागर काय नव लवण [3]व्याला ? ॥ ५८
जे त्वच्चरणाश्रित, ते गरुडचि, [4]शमनकरवाल-[5]कालांही. ।
शिर दूर, बळें त्याच्या लाविल यम न कर, [6]वालकालाही. ॥ ५९
झाले कृतार्थ, तरले, अगणित या पादपल्लवध्यानें. ।
व्यर्थ फुगविले, न गणुनि तुज जगदीशासि, [7]गल्ल, [8]वध्यानें. ॥ ६०
[9]शतकोटि मेळविल जरि [10]शतकोटिकरहि सुयोध नव, धरणी ।
वरिलचि तव प्रसादें धर्मा; होइल सुयोधनवध रणीं. ॥ ६१

जन्म धन्य होतो म्हणजे स्वर्गप्राप्तीस योग्य होतो, त्याप्रमाणें श्रीकृष्णाच्या प्रसादानें अर्जुन धन्य झाला—असा स्पष्टार्थ. जे निपुत्रिक असतात त्यांस स्वर्गलाभ होत नाहीं, असें शास्त्रांत सांगितलें आहे. याविषयीं पंतांनीं उद्गार अन्यत्र काढिले आहेतः—[१] संतति नसतां स्वर्गी पितरांसि बसावया नसे ठाव । (आदिपर्व—अ० ४।५), [२] अनपत्यत्व स्वर्गद्वारनिरोधासि हेतु हें व्यक्त । (आदिपर्व—अध्याय १८।३३). २०. गृह, रहाण्याचें स्थान. २१. 'धन्य केला' हें वाक्य दोहोंकडे अध्याहृत घ्यावयाचें.

१. कृष्णावतारीं गोकुळांतील लोकांवर दया करून, भगवंतानें बारा गांवें पसरलेला व व्रजवासी जनांस जाळावयास प्रवृत्त झालेला अग्नि गिळून टाकिला, अशी कथा आहे. (भागवत, दशमस्कंध, अध्याय १७–१९. पहा). २. शत्रुरूपी जल. ज्यानें दावाग्नि गिळून टाकिला, त्याच्यापुढें शत्रूंची कथा काय ? तो शत्रूंचा नाश सहज करील. **काव्यार्थापत्ति** अलंकार. ३. प्रसवला. सागर (समुद्र) लवण (मीठ) व्याला, [हें] नव (नवीन) काय ? समुद्रापासून मीठ उत्पन्न होणें ही कांहीं नवीन गोष्ट आहे काय ? समुद्रापासून मीठ होणें ही सहज गोष्ट आहे, त्याप्रमाणेंच श्रीकृष्णास शत्रूंचा नाश करणें सुलभ आहे, असा भाव. **दृष्टांतालंकार**. ४. यमाचा खड्ग. ५. काल+अहि=कृष्णसर्प. त्या भक्तरूपी गरुडांना यमाचा खड्ग हा कृष्णसर्पाप्रमाणें होय. तुझ्या भक्तांपुढें प्रत्यक्ष यमाचें सुद्धां कांहीं चालत नाहीं—असा भाव. **परंपरित रूपक** आहे. ६. केशालाही. वाल किंवा बाल म्हणजे केंस. [वाल (केंस)+'क' हा अल्पत्वदर्शक प्रत्यय आहे.] 'बालो ना कुंतलेऽश्वस्य गजस्यापि च बालधौ' इति मेदिनी. 'बालः कचे शिशौ मूर्खे ह्रीबेरेऽश्वेभपुच्छयोः' इति विश्वः. येथें रा० पराडकर यांच्या प्रतींत 'कांकडीला' अशी टीप आहे. पण ती आम्हास बरोबर वाटत नाहीं. यमाच्या हातून भक्ताचा केंस सुद्धां वांकडा होणार नाहीं, मग मस्तकास इजा करण्याची गोष्ट तर दूरच—असा ह्या गीत्यर्धाचा अर्थ. ७. गाल. ८. वधार्हानें, वधास योग्य जो त्यानें. ९. अरी [दुर्योधन] शतकोटिकरहि शतकोटि नव सुयोध मेळविल, [तरी] तव प्रसादें धरणी धर्मा वरिलचि—असा अन्वय. १०. वज्रधरहि.

जयहि प्रभावहि तुझा; प्रेष्यां दीनांस[1] मानदा[2]! मानें[3] ।
गौरविसि. घेतलें त्वां बांधुनि[4] दीनासमान दांमानें[5].' ॥ ६२

प्रभु हास्य करुनि, हरुनि श्रित[6]तापा, परतवी रथा, राया! ।
न शकति जयापुढें खलसंगति पापरत वीर थैराया[7]. ॥ ६३

समराजिरांत[8] हरि[9], करि, नरवर, बहुलक्ष मारिले होते ।
जेणें, त्यासि मुकुंदें दाखविले सर्व तारिले, हो! ते. ॥ ६४

स्वकटकसमीप जाउनि जगदीशें पांचजन्य वाजविला. ।
आज विलापें राया! त्वां शोक, तसाचि हर्ष माजविला. ॥ ६५

धर्म धणी[10], ब्रह्माच्या[11], बहु घे, घालुनि उडी, सु[12]–खेंवेची, ।
यज्ज्ञानार्थ[13] महाजन सर्वस्वासह कुडी[14] सुखें वेची.[15] ॥ ६६

धर्में दोघे[16] कृष्ण प्रेमें आलिंगिलें, जसे तातें; ।
तत्स्पर्श[17] तन्मनातें बहु सुखवी, जेंवि मेघ सेतातें. ॥ ६७

आनंदाश्रुपरिप्लुत[18] होय प्रभुचें, पुसी, वदन, पदरें. ।
जेणें रमाधराहुनि शबरीचीं[19] मानिलीं[20] मधुर बेंदरें[21]. ॥ ६८

---

१. दीन दासांना. २. मान देणाऱ्या. ३. मानानें. ४. एकदां कृष्णानें मोठीच खोडी केली. तेव्हां त्याच्या अपराधाची क्षमा न करितां यशोदा त्यास दांव्यानें उखळास बांधावयास लागली. तेव्हां पहिलें दांवें पुरेनासें झालें, म्हणून तिनें त्यास दुसरें जोडिलें. दुसरेंही पुरेना, म्हणून तिसरें जोडिलें. अशा रीतीनें पुष्कळ दांवीं तिनें एके ठिकाणीं केलीं. ती दांवीं जोडून जोडून थकली. तेव्हां कृष्णाला तिची दया आली व त्यानें तिला आपणास उखळाशीं बांधूं दिलें, अशी भागवतांत कथा आहे. ५. दांव्यानें. ६. आश्रित अर्जुन त्याच्या तापाला हरून. ७. स्थिर व्हाया. ८. समरांगणांत. ९. घोडा. 'हय' असें पाठांतर. १०. तृप्ति. ११. परब्रह्मस्वरूप जो श्रीकृष्ण त्याच्या. १२. सु+खेंवेची=उत्तम आलिंगनाची. १३. यत्+ज्ञान+अर्थ=ज्याच्या ज्ञानार्थ. १४. देह. १५. खर्ची. १६. कृष्णार्जुन. १७. त्या उभयतांचा स्पर्श. १८. आनंदाश्रूंनें भरलेलें असें. १९. श्रमणा नामक भिल्लीणीचीं. श्रीरामचंद्र सीतेच्या शोधार्थ दंडकारण्यांत फिरत असतां, त्यांना एक शबर जातीची स्त्री भेटली ती मातंगऋषीची शिष्या होती. तिनें श्रीरामास सीतेचा शोध सांगितला व मोठ्या प्रेमानें प्रथम आपण चाखून रसाळ म्हणून निवडून ठेविलेलीं बोरें त्यांना तिनें खावयास दिलीं व प्रभु रामचंद्रांनीं शबरीच्या भक्तीस्तव तीं मोठ्या आवडीनें खाल्लीं, अशी कथा अध्यात्मरामायणांत आहे. (अरण्यकांड, सर्ग १०. श्लोक ४–१० पहा). २०. मागें रामावतारीं मानिलीं. २१. बोरें.

मग तें[1] पुसिलें, ज्यातें देखुनि शतदा वदे [2]अचलकन्या, ।
'पाहे हें पुत्रमुख स्त्री जी, सर्वस्त्रियांत ती[3] धन्या.' ॥ ६९
प्रभुसि [4]म्हणे, "वधिला कीं अधम नराकार, पाप [5]रासभ जो ! ।
व्हाया कृतघ्न, विसरुनि तुज, न स्वप्नींहि [6]हा परास भजो. ॥ ७०
येणेंचि सिद्धि[7] कळली, जाणति एकेंहि; बायका, [8]शीतें. ।
सद्यः परमार्थद हे पाय न लाजविति काय काशीतें ? ॥ ७१
बा ! बाळ मीन येतां 'छायेंत सुखें' म्हणेल बक 'राहो,' ।
देइल पाय [9]हरिशिरीं, होतां तुमचा [10]प्रसाद, बकरा, हो ! ॥ ७२
स्वपदीं पांडव बसतिल, करुनि अरींतें [11]परासु, वासवसे. ।
[12]शिशुपशुहित हा लोकीं पदपद्माचा वरा सुवास वसे. ॥ ७३
शकहि जयद्रथातें, आजि असा पण करूनि, न खपविता. ।
वरिली तव [13]दृक्पातें, वरिते झालेचि हेहि [14]नख, [15]पविता.' ॥" ७४
कृष्ण म्हणे, 'धर्मा ! तूं सिद्ध [16]कपिलसाचि, करुनि [17]सु-तपातें. ।
क्षोभविलासि खळांनीं [18]स्वांतार्थ [19]प्राणतुल्य-सुत-पातें. ॥ ७५
तुझिया, वधिला, सैंधव बहु अपराधी म्हणून, कोपानें. ।
[20]सत्पुरुषलंघनें मीं कां गरळाचीं, म्हणूं नको, पानें ? ॥ ७६

---

१ अर्जुनाचें मुख. २. पार्वती. ३. कुंती. ४. धर्मराज म्हणे. ५. गाढव; अर्थात् जयद्रथ. ६. हा मी. ७. 'सिद्धि' हें याचें अध्याहृत कर्म. एकेंही=ह्या एका गोष्टीवरूनच. ८. 'एका शितावरून भाताची परीक्षा' ही म्हण प्रसिद्धच आहे. येणेंचि=जयद्रथवधामुळें. ९. सिंहशिरीं. १०. अमुक झालें तर (तुमची कृपा असली तर) अमुक होईल (बगळा माशाला खाऊन टाकणार नाहीं व बकरा सिंहाच्या मस्तकावर पाय देऊं शकेल) अशा अर्थाचें हें वर्णन आहे; म्हणून हा **संभावनालंकार** होय. ११. पर+असु=गतप्राण, मृत. १२. ध्रुवबाळ व गजेंद्र यांना हितकर जो कृष्ण, त्याच्या पदकमलांचा हा सुवास. १३. दृष्टीनें. १४. विष्णूनें नृसिंहावतारीं हिरण्यकशिपूचें उदर नखांनीं फाडिलें होतें; त्या कथेचा एथें उल्लेख आहे असें दिसतें. १५. वज्रपणा. १६. कपिल–हा कर्दमप्रजापतीपासून देवहूतीस झालेला पुत्र. हा सांख्यशास्त्राचा प्रणेता होता व ह्यानें आपल्या मातेस ब्रह्मतत्त्वज्ञानाचा बोध केला होता. त्याच्याच कोपाग्नीनें सगरपुत्र भस्म झाले होते. (भागवत स्कंध ३, अध्याय २५–३३ पहा.) १७. उत्तम तपातें. १८. आपल्या नाशासाठीं. १९. प्राणासारख्या प्रिय अशा अभिमन्यूच्या वधानें. २०. सत्पुरुषलंघनें (सत्पुरुषांचे उपमर्द) हीं गरळाचीं (विषाचीं) पानें (पिणीं) होत,' असें का म्हणूं नको ?

त्वत्क्षोभा साहेसें कैंचें सामर्थ्य सैंधवीं अल्पीं ! ।
कल्पीं रविसा[1], पडला, इच्छामरणहि[2] नदीज[3] शरतल्पीं[4]. ॥ ७७
करिल क्षोभ तुझा, बा धर्मा ! उरल्याहि खळजना, भेसिव[5]. ।
हें न चुकेलचि, होइल जरि शिव घननील[6], जलजनाभ[7] सित[8].' ७८
तों नमिति भीम सात्यकि; त्या दोघां, जेंवि नर्मदा[9] यांदां[10], ।
प्रभुची पदयुगुली[11] दे[12], कीं जैसी माय, शर्म[12], दायादां[13]. ॥ ७९
तातापरि धर्मप्रभु बहु त्यां क्षतविग्रहांसि[14] कुरवाळी; ।
बोले सत्य, मनोहर, साधु, न अमधुर, जसा न-कुरवाळी[15]. ॥ ८०
'आलें कुरुबळजलधिस्थ[16] यशोमौक्तिक हरूनि, हे मकर. ।
भुजहो ! वेष्टावे, धनरुचिनीं[17] जैसे वदान्य[18] हेमकर[19],' ॥ ८१
ऐसें प्रेमें गद्गद बोलत, आलिंगिले[20] सुचिरें[21]. दोघे. ।
वाटे भुजंग[22], भोगें[23] वेष्टुनि त्यां चंदनांसि[24], सुख तो[25] घे. ॥ ८२
यश भीममाधवांचें वर्णी, घे धर्म भाटपण साचें; ।
प्रकटी अंग तयांचें तें, कंटक जेंवि दाट पणसाचें. ॥ ८३

---

१. कल्पातींच्या रवीसारखा प्रखर भीष्मही. २. इच्छेस येईल तेव्हां ज्यास मृत्यु येतो तो इच्छामरणी. 'मर्जीस येईल तेव्हां तुला मरण्याची शक्ति असो' असा आशीर्वाद शांतनूनें भीष्मास दिला होता म्हणून त्यास 'स्वाधीनमृत्यु,' 'स्वेच्छामृत्यु' असेंही म्हणतात. 'दिधली सुदुर्लभा त्या सत्पुत्रें त्या पित्यासि सत्यवती । स्वच्छंदमृत्यु हो अशि आशी तातेंहि त्यासि सत्यवती. ॥ (मोरोपंतकृत आदिपर्व–अध्याय १३।१०० पहा). 'देवव्रतः शांतनवो गांगो गांगायनिश्च सः । भीष्मः कोणपदंतश्च स्वेच्छामृत्युः पुरावसुः॥' (त्रिकांडशेष). ३. भीष्म. ४. बाणांच्या शय्येवर. ५. भस्म. ६. कर्पूरगौर शिव जरी मेघासारखा काळा होईल. संभावनालंकार. ७. नीलवर्ण कमलनाभ, विष्णु जरी शुभ्र होईल. ८. पांढरा. ९. नर्मदा नदी. १०. जलजंतूंस. ११. पदयुग्म. १२. सुख देई. १३. पितरांचें धन विभागून घेणाऱ्यांना (पुत्रांस). १४. ज्यांच्या शरीरांवर क्षतें पडलीं आहेत अशा त्या दोघांस. १५. न+कु+रव+अळी=अमधुर शब्द न करणारा भ्रमर जसा मनोहर बोलतो तसा. १६. कौरवसैन्यरूप समुद्रांतील यशोरूप मौक्तिक हिरावून घेऊन हे मकर आले. रूपकालंकार. १७. याचकांनीं, धनाची ज्यांना इच्छा आहे अशांनीं. १८. दानशूर, दाते जन. १९. सुवर्णानें युक्त कर ज्यांचे असे दाते जन. २०. 'धर्मानें' असें अध्याहृत आहे. २१. दीर्घकालपर्यंत. २२. सर्प. २३. देहें. २४. त्या भीमसात्यकीरूप चंदनवृक्षांस. सर्प हे चंदनवृक्षास चिकटून असतात, अशी प्रसिद्धि आहे. २५. तो धर्म हा भुजंग.

मुक्त अजगरापासुनि केला कृष्णेंचि तो जसा नंद[1]; ।
धर्महि, महा[2]धिपासुनि सोडवितां, होय सा[3]प्त सा[4]नंद. ॥ ८४
रडला कुरुराज, गळां अभिमानें शोक घोर पडला हो ! ।
कोण म्हणेल चतुर नर, 'म[5]करररणीं विजय घोर[6]पड लाहो ?'॥ ८५
'हाय!' म्हणत दुर्योधन जाय द्रोणाकडे; म्हणे, 'गुरुजी ! ।
पार्थें खरी प्रतिज्ञा केली कीं, आजि ती तशी गु[7]रु जी. ॥ ८६
अक्षौहिणी सि[8]तहयें नेल्या कीं सात आठ विलयाला. ।
हे क्षिति[9], जो म्यां केला हा बहुजनघात, आठविल याला. ॥ ८७
सु[10]स्तवभाजन हा जन, दुःसह धिक्कार यास; हा[11] वेनों[12] ।
गारी क्षणांत, कीं उपहासा हिक्का[13]रया सहावेना. ॥ ८८
केला शर[14]तल्पांगीकार बळें काळदुर्जयें भीष्में. ।
परिभव वरिला त्वांही, पर[15]सेनासिंधुजीवनग्रीष्में. ॥ ८९

---

१. नंद हा गोकुळांतील संपूर्ण गोपाळांचा स्वामी. हा वसुदेवाचा परम मित्र होता, म्हणून त्यानें आपली स्त्री रोहिणी व पुत्र कृष्ण यांस नंदाकडे ठेविलें होतें. कथासंदर्भ;– कंसानें अघासुर नामक राक्षसास गोकुळांत कृष्ण व बळिराम यांच्या नाशार्थ पाठविलें असतां त्यानें तेथें जाऊन चार योजनें लांबीचा सर्पदेह धारण केला, व कृष्ण व इतर गोप यांच्या गाई चारण्याच्या मार्गांत आपलें शरीर पसरिलें. तसेंच यानें आपलें मुख इतकें विस्तीर्ण केलें कीं, ती मोठी गुहा असून गाई चारण्यास योग्य स्थळ आहे, असें संपूर्ण गोपांस वाटलें व ते गाईसह तींत शिरले. हें कृष्णानें पाहून तो त्याच्या मुखांत शिरला व मोठा देह धारण करून त्यानें त्याचें मुख फाडिलें. तेणेंकरून तो तत्काळ मरण पावला. [अजगर=अजं गृणाति गिरति वा सः=सबंध बकरा अथवा शेळी गिळणारा साप.] २. अंतःकरणास होणारी मोठी व्यथा तीपासून. ३. स+आप्त=आपल्या मित्रांसह. ४. सं+आनंद=हर्षयुक्त. ५. सुसरीशीं युद्ध करीत असतां. ६. प्राणिविशेष. ७. मोठी. ८. अर्जुनें. ९. पृथ्वी. अर्थात् पृथ्वीवरील लोक. हें उपादानलक्षणेचें उदाहरण आहे. १०. उत्तम स्तुतीचें पात्र. ११. हा धिक्कार. १२. वेन=चक्षुर्मनूचा प्रपौत्र (विपणतू) आणि अंगराजाचा पुत्र. हा अत्यंत दुष्ट राजा होता. म्हणून ऋषींनीं याला शापदग्ध केलें. पुढें त्याचा देह मंथन करून, ऋषींनीं पृथु आणि अर्चि असें मिथुन उत्पन्न केलें. वेन राजा आपल्या दुष्टाचरणाविषयीं प्रसिद्ध आहे. १३. उचकीच्या वेगाला उपहास सोसवत नाहीं. येथील स्पष्टार्थ नीटसा कळत नाहीं. १४. बाणांच्या शय्येचा स्वीकार. १५. शत्रुसेनारूप सिंधूदकाला शोषविणाऱ्या ग्रीष्मऋतुप्रमाणें तीक्ष्ण जो तूं (द्रोणाचार्य) त्यानें. रूपकालंकार.

जरि न करितां[1] उपेक्षा, माझी सर्वस्वहानि कां होती ? ।
साधूंस मता[2] समता; सत्कीर्ति उपेक्षिलीत कां हो ती[3] ? ॥ ९०
प्रिय पार्थ; न मी; देतां परिभव त्रिदां[4] कशास हा ? याला ।
या मरणाक्षा; अनुचित सुकुलजनिंदाकशा[5] सहायाला.' ॥ ९१
द्रोण म्हणे, "वागिषुनीं[6] कां मातें पीडितोसि विंधून ? ।
वदलों प्रथमचि 'अर्जुन दुर्जय, दुस्तर, नव्हेचि सिंधून[7].' ॥ ९२
करुनि निमित्त शिखंडी, भीष्ममहाराज अर्जुनें मथिला. ।
या कर्में उमजावें, कीं पार्थ अजय्य[8] मज, खरा कथिला. ॥ ९३
जैं देवदनुजदुर्जय[9] देवव्रत[10] देव पावला पतन, ।
कळलें, सर्व बुडालों, न करिल ईश्वरहि आपणां जतन. ॥ ९४
संप्रति झाले पविरविसम[11] समरीं पार्थबाण ते फांसे[12], ।
ज्यां शेवटवरिहि शकुनिमामा ढाळूनि, खदखदां हांसे. ॥ ९५
त्वां कां न ऐकिलें, जें विदुर वदे सूक्त[13], 'अनय न करा,' तें ? ।
तो च्युतचि[14], डोळसाच्या जो झिडकारील, अनयन[15], करातें. ॥ ९६
भरतसभेंत[16] सती त्वां आणविली, करुनि हानि रीतीची; ।
वृद्धांसमक्ष, फरफर फेडविलि, दुराग्रहा[17] ! निरी तीची. ॥ ९७
त्याचें फळ हें. 'केलें न सुटे,' म्हणती सुरर्षिमुख[18] सु-कवी. ।

---

१. आपण न करितां, तुम्ही (द्रोणाचार्यांनीं) उपेक्षा केली नसती तर. २. मान्य. ३. सत्कीर्ति. ४. तीनदां=पुन्हा पुन्हा. ५. चांगल्या कुळीं जन्मलेल्या मनुष्याला निंदारूप कशा (चाबूक) सोसण्याला अयोग्य होय. ६. वाक्+इषु=वाग्बाणांनीं. ७. सिंधु+ऊन=सागराहून उणा नाहीं, दुस्तर आहे. ८. जिंकण्यास अशक्य. ९. देवांना आणि दैत्यांनाही दुर्जय. १०. भीष्म. गंगा म्हणतेः– 'म्यां देवव्रत ऐसें याचें अन्वर्थ ठेविलें नांव. ।' (मोरोपंत–आदिपर्व–अध्याय १३।६९) मागें पृष्ठ २ टीप ९ पहा. ११. वज्रासारखे कठोर; आणि सूर्यासारखे तेजस्वी. १२. शकुनीच्या फांशांसारखे आज्ञांकित. १३. सु+उक्त=चांगलें भाषण. १४. पतित. १५. आंधळा. १६. भरताच्या नांवानें प्रसिद्ध जो वंश त्याच्या सभेंत. १७. हट्टवाद्या ! (दुर्योधना !) 'दुराग्रहें' असें पाठांतर. १८. नारदप्रमुख देवर्षि. [देवर्षि, ब्रह्मर्षि आणि राजर्षि असे तीन प्रकार ऋषींचे मानितात. ह्या तीन प्रकारांशिवाय महर्षि, परमर्षि, श्रुतर्षि आणि कांडर्षि असे चार प्रकार कोणी कोणी मानितात.]

असतें प्रथम सु[1]विकसित; परि बहु, केला[2] अधर्म मुख सु[3]कवी.॥ ९८
जे नित्य पुत्रधर्मी रत, त्यांचा द्रोह करिल बा ! कोण ? ।
'ब्राह्मण आपण,' ऐसें बोलोनि दहांत, जो नव्हे द्रोणें[4]. ॥ ९९
होता अश्वत्थामा, कृप, मद्रप, तूं, तुझा सखा कर्ण; ।
म्हणसि, 'उडविलें पार्थें शिर, वातें जेंवि वाळलें पर्ण.' ॥ १००
मा[5]नी कीं तूं श्रितवध[6] कथितां आम्हांस कां न लाजसि रे ! ।
सूतींच कसी, द्याया विदुरसदुक्तींस कान, लाज शिरे ? ॥ १०१
असतां सजीव, सायुध, सन्निध, सोत्साह, शूर, सावध; रे ! ।
रा[7]व ध[8]रेश्वर ब[9]हुशत, केला एकेंचि बा ! कसा व[10]ध रे ? ॥ १०२
ज्यां[11]पासुनि क[12]नकध्वज रविभीष्माचा न कुरुबळीं झळके, ।
जळके न[13]गसे झालों आम्हीं अपकीर्तिकज्जलें, मळके. ॥ १०३
भीष्मामागें न दिसे मज कोणीं, जो तरेल उ[14]र्वरितें. ।
हीं गं[15]धर्वपुरेंसीं दिसती कटकें, उगीच उ[16]र्वरितें. ॥ १०४
कु[17]रुबळकलेवरांचा परिपालक भीष्म, तो खरा जीव. ।
रविदर्शनेंचि पावे, तपतांही भीष्म, तो[18]षें रा[19]जीव. ॥ १०५
स्मरतो मज क्षणक्षण धृष्टद्युम्न, स्व[20]मृत्युचा हेतु. ।
ज[21]लधिविलंघनसाधन, कपिकृतहि, न काय जाहला, सेतु ?॥ १०६
त्यासहि सूचीहि गमे अतिदुःसह, न क[22]रवाल वीरा ज्या; ।

---

१. चांगलें प्रफुल्लित, मुख. २. केला=केलेला. ३. शुष्क करी. ४. 'आपणांशीं सदोदित पुत्रधर्मानें वागणाऱ्या पांडवांचा कोणता ब्राम्हण म्हणविणारा मनुष्य मज-प्रमाणें द्रोह करील बरें ?' असें मूळांत आहे. उत्तरार्धाचा स्पष्टार्थ लक्ष्यांत येत नाहीं. रा. पराडकरांच्या प्रतींत प्रथमार्ध पुढें दिल्याप्रमाणें छापिलेलें आहे व 'बा' शब्दावर 'बाप' अशी टीप दिलेली आहे:–'जे नित्य पुत्र धर्मी रत, त्यांचा द्रोह करिल बा कोण ?'. ५. अभिमानी. ६. आश्रिताचा वध. ७. राजे. ८. पृथ्वीपति. ९. शेंकडों. साारालंकार. १०. जयद्रथाचा वध. ११. जेव्हांपासून. १२. सुवर्णध्वज. १३. नग=पर्वत. १४. उरु+अरि=महाशत्रूंतें. १५. गंधर्वपुरें=आकाशांत दिसणारीं भ्रांतिमूलक नगरें. १६. उरलेलीं. १७. कौरवपक्षीय सैनिकांच्या देहांचा. १८. आनंद. १९. कमल. २०. माझ्या मृत्यूचा हेतु, मला मृत्यु देणारा. २१. समुद्र तरून जाण्याचें साधन. २२. तरवार.

जसि वाळवी[1], दवशिखा[2] तसि न, तरुप्रकर[3] वाळवी, राजा ! ॥ १०७
तूंही व्याकुळ करिसी मज, हृदयीं शब्दबाण हाणोनी. ।
यास्तव नृपा ! प्रतिज्ञा करितों मी. ऐक सत्य जाणोनी. ॥ १०८
मारुनि पांचाळ[5] सकल, मीं क्रव्यादांसि[6] मांस वाढीन. ।
करिन खरें स्ववच, कवच हें अंगांतुनि तरीच काढीन; ॥ १०९
मज न मत अरिवधें यश; अश्वत्थामा न साधु निकरानें[7]. ।
हित म्हणुनि, जडाहि दिला अश्वत्थां[8] मान साधुनिकरानें[9]. ॥ ११०
पुत्राला कळवावा त्वां माझा भाव[10] हा निरोपांनीं, ।
कीं, 'सर्व सोमकांची[11] स्पष्ट करावीच हानि रोपांनीं[12]. ॥ १११
ब्राह्मण बहु मानावे, तुज वारंवार हाचि उपदेश. ।
कीं ब्रह्मक्षोभें अहि झाला, जो नहुष नाकसुपदेश[13].' ॥ ११२
हा जातों, हरिशीलें[14] प्रकटुनि, द्यांया[16] परां[15] शशक-शील. ।
जा तूंहि, कराया जरि पांडुसुतांचा विनाश शकशील". ॥ ११३
गेला पांडवसृंजयवीरांचें[17] सर्व तेज हरित रणीं. ।
द्रोण परबलांत गमे, मृगकुलतिमिरांत[18] जेंवि हरि-तरणी[19]. ॥ ११४

---

१. कीटकविशेष. २. वणव्याची ज्वाळा. ३. वृक्षसमुदाय. जशी वाळवी तरुप्रकर वाळवी तशी दवशिखा न वाळवी--असा अन्वय. ४. सुकवी. ५. द्रुपद आणि त्याचे पुत्र धृष्टद्युम्नादिक. ६. मांसभक्षक प्राण्यांना. ७. हट्टानें, दुराग्रहानें. अश्वत्थामा निकरानें [शत्रूचा वध करून प्राप्त होणारें यश] न साधु (न साधो, न मिळवो)--असा अन्वय. रा. पराडकर यांच्या प्रतींत 'अश्वत्थामा, न साधुनि करानें' असा पाठ आहे. ह्या गीतींत 'संदष्टक' नामक यमकालंकार आहे. ८. पिंपळास. पिंपळाची पूजा करण्याचा प्रघात आहे. अश्वत्थ वृक्ष फार पुरातनकाळांपासून पूज्य मानिला जात आहे. भगवद्गीतेंतही 'अश्वत्थः सर्ववृक्षाणाम्' असें म्हटलें आहे. ९. साधुसमूहानें. १०. अभिप्राय. ११. पांचाळांची. १२. बाणांनीं. १३. नाक+सुपद+ईश=स्वर्गस्थानाधिपति असा. (अध्याय १२ गीति २२ वरील टीपा पहा). १४. सिंहाचा स्वभाव, शौर्य. १५. शत्रूला. १६. सशाचा स्वभाव (भित्रेपणा) द्यायाला. १७. संजय=पांचाळ. १८. मृगकुलरूप अंधकारांत. १९. सिंहरूप सूर्य.

अध्याय सोळावा.

कुरुपति कर्णासि असें, होउनि सैंधववधें सखेद, वदे, ।
'देतो ताप परिभव[1], द्विरदा[2] वेढुनि जसा, सखे ! दैव[3] दे. ॥ १
केला जयद्रथाचा, कृष्णसहायें बळेंचि, घात पहा. ।
झाला दुःसह अर्जुन; शरदर्काचा[4] प्रताप आतप[5] हा. ॥ २
हांसतिल सर्व जरि तरि सोसुनि हा दाह, वेचुनी[6] कायँ[7] ? ।
नाकास लाविला, तो मानधना साहवे चुना[8] काय ? ॥ ३
गुरुनेंचि घात केला, व्यूहीं प्रियशिष्य पार्थ शिरकविला. ।
हें काय बरें ? असतें वच न तसें, रक्षणार्ह[9] शिर कविला. ॥ ४
गुरु अभय सैंधवा दे, द्वारव्यूहीं तदंतकालाही[10]. ।
सदनीं शिरल्यावरि, कां रोविल मर्मीं न दंत कालाही[11] ? ॥ ५
सैंधव पार्थी पोंवुनि[12], जेंवि दनुज[13] पाकशासना[14], शमला. ।
जाऊं देतां, याचा तापविता बा ! कशास नाश मला ?'[15] ॥ ६
कर्ण म्हणे, 'न वद असें; करिती आचार्यजनककुत्सा[16] जे, ।
त्यांसचि 'पशु' म्हणति कवि, न जरि पुच्छ विषाण[17] घनककुत[18] साजे. ॥ ७
बापा ! प्रवर्तलासि, स्वाहित जाणोनि, कां गरा[19] खाया ? ।
वृद्ध[20] यथाशक्ति समर करितो; नेणेचि आंग राखाया[21]. ॥ ८
सामर्थ्यें न विलंघिल कां वृद्धा[22] वोडवा युवा[23] ? राया ! ।

---

१. परिभव (पराभव) ताप देतो. २. गजास. ३. वणवा. ४. शरत्+अर्काचा=शरदतूंतील सूर्याचा. ५. अत्यंत तापदायक प्रकाश. ६. वेंचणार नाहीं काय ? ७. शरीर. ८. नाकास चुना लावणें=अपमान करणें. ९ संरक्षण करण्यास योग्य. 'असतें वचन, जसें रक्षणार्ह' असा पाठभेद. १०. तत्+अंतकालाही=त्याच्या नाशकर्त्या अर्जुनालाही. ११. काल+अहि=काळसर्प. १२. 'पाहुनि' असाही पाठ आहे. १३. दैत्य. १४. इंद्रास. १५. देशांतरास जाण्याविषयीं जयद्रथास आज्ञा दिली असती तर कशास हा संताप देता–असा भावार्थ. . १६. गुरु आणि पिता यांची निंदा. १७. शिंगें. १८. घन+ककुत्=मोठें कोळें (वशिंड). येथील 'पशू'ची व्याख्या लक्ष्यांत ठेवण्यास योग्य आहे. ती पंतनिर्मित आहे. १९. विषाला. २०. म्हातारा, द्रोणाचार्य. २१. आंग राखणे=आंग मोडून काम न करणें, कामाची टाळाटाळ करणें. २२. वृद्ध ब्राह्मणास. २३. तरुण.

वेगीं टिकेल कैसें, मोठेंही झाड वायु वाराया ? ॥ ९
अत्यद्भुत रथ, सारथि, चाप, ध्वज, तूण, कवच, [1]अधिकरणीं;[2] ।
ज्या साहित्य असें, त्या पार्थो न म्हणेल कवण अधिक रणीं?॥ १०
वृद्ध द्रोण ब्राह्मण, वाराया अर्जुनासि [3]अक्षम हा; ।
आतां कैंचें तें बळ, तरुणपणीं जरिहि युद्धदक्ष महा ? ॥ ११
[4]सुकरोन्मूलन होइल पहिल्यापरि काय [5]नग, [6]जरा ज्याला ? ।
किंबहुना, सांवरवे पहिल्यापरि [7]काय न गजराजाला. ॥ १२
झालें अनुकूल परां, देतें जय, संकटांत वागवितें; ।
भागवितें आम्हांला स्पष्ट, प्रतिकूल दैव, नागवितें. ॥ १३
बळ भंगे, भंगाया पंडु जें सर्वांसि, [9]वासविसकट तें, ।
जैसें [10]करिकुल, येतां [11]गंधद्विपदानवास, विसकटतें. ॥ १४
[12]अनुकूल दैव असतां, न समर्थ, करावयासि हानि, यम; ।
होतां तें प्रतिकूल, प्रबलहि दुर्बलचि होय; हा नियम. ॥ १५
[13]अहि डसविले, बुडविला भीम, दिलें उग्र विष, मरायातें; ।
[14]जतुगृहदाह, द्यूतहि झालें दैवेंचि विषम राया ! तें. ॥ १६
दृढ चित्त करुनि तूं निजें, रणधर्मप्रवण हो मरायास. ।
याहुनि दुसरा, सुफलद आवश्यक, कवण होम[16] रायास ?' ॥ १७
मित्राच्या उपदेशें, [17]सोदरसैंधववधें, दुरभिमानी ।
होय मराया सिद्ध; [18]स्वासाधुप्रकृतिला [19]सुरभि मानी. ॥ १८

---

१. बाण ठेवण्याचा भाता. २. युद्धकार्यीं. ३. असमर्थ. ४. सुकर+उन्मूलन=उपटावयास सुलभ. ५. वृक्ष. ६. वृद्धपण. ७. देह. ८. या गीतींतील पांचही क्रियापदांचा कर्ता 'प्रतिकूल दैव' हा. ९. अर्जुनासहवर्तमान. १०. गजसमुदाय. ११. गंध+द्विप+दान+वास=मत्त गजाच्या मदाचा वास. १२. अर्थसादृश्यः—'अनुकूल काळ होतो, तेव्हां बळ, बुद्धि, तेज, यश देतो । प्रतिकूल तोचि होउनि माघारें सर्वही घेतो ॥ [मौसलपर्व, अध्याय २।८४]. १३. सर्प. मोरोपंतकृत आदिपर्व, अध्याय २० पहा. १४. लाक्षागृहाचें दहन. मोरोपंतकृत आदिपर्व, अध्याय २८ पहा. १५. निजचित्त दृढ करुनि, तूं मरायास रणधर्मप्रवण हो—असा अन्वय. प्रवण=आतुर. १६. हवन, यज्ञ. १७. बंधूपासिका प्रिय जो जयद्रथ त्याच्या वधानें किंवा बंधु व जयद्रथ यांच्या वधानें. १८. आपल्या असाधु (दुष्ट) प्रकृतीला. १९. आनंदकारक, उत्कृष्ट.

पांडवसेनांसि मथी कुरुपति, सर्व प्रजांसि अंतकसा. ।
अभिमानी आप्तांचा, साहेल, असोनि शक्ति, अंत कसा ? ॥ १९
भीम, घटोत्कच[1], सात्यकि, धर्म, यम[2], द्रौपदेय[3], ताडून ।
केले विद्धें[4] सपुत्र, द्रुपद-विराटादि वीर झाडून[5]. ॥ २०
कुरुपतिबाणत्रासें, मोठे मोठेहि वीर, कंपकरती[6]; ।
सेना कांपे, यांचा[7] धरुनि, प्रभुचा[8] जसाच, वंचक[9], रती[10]. ॥ २१
धांवे धर्म, क्रोधें लक्षुनि दुर्योधनासि कुपितातें[11]; ।
द्याया तुज[12], जें पावे घननादाचा[13] कुलघ्न कुपिता, [14]तें. ॥ २२
न गणिति, सुरासुरांचे[15], भद्रासनकाम[16], [15]इंद्रसे, नातें. ।
ध्वज[17] धनु खंडुनि, ताडी भाळीं कुरुराज इंद्रसेनातें[18]. ॥ २३
भीमोपमज[19], सज्ज करुनि नवचाप[20], 'हतोऽसि[21],' म्हणुनि शर सोडी. ।
[22]तो डीनपटु[23], भुजगसा, तोडी कुरुराजकवच, उर फोडी. ॥ २४

---

१. हिडिंबी राक्षसीच्या पोटीं जन्मलेला भीमसेनपुत्र. २. नकुल व सहदेव. ३. द्रौपदीचे प्रतिविंध्यादि पांच पुत्र. ४. क्षतयुक्त. ५. सर्व. ६. दचकती, मागें सरती. ७. दुर्योधनाचा. ८. शिवाचा. ९. भय. १०. कामपत्नी. शंकरानें रतिपति जो मदन, त्याचा दाह केल्यामुळें तीस शंकराचें भय वाटलें त्याप्रमाणें; कथासंदर्भः–एकदां हिमाचलावर शिव ध्यानस्थ बसले असून पार्वती त्यांची सेवा करीत असतां, तेथें शंकरपार्वतीचें ऐक्य करावें ह्या हेतूनें इंद्रादि देवांच्या आज्ञेवरून वसंतासह काम आला व त्यानें आपले पुष्पबाण त्यांच्यावर मारण्यास सुरुवात केली. मदनबाणांच्या अनिवार माऱ्यामुळें पार्वती कामातुर होऊन शंकराला बिलगूं लागली व प्रत्यक्ष शंकराच्या मनाचीही चलबिचल होऊं लागली. असें एकाएकीं होण्याचें कारण काय हें पाहण्याकरितां शंकरानें आपले डोळे उघडिले. तों वसंतासह काम त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां आपल्या तपास त्यानेंच विघ्न केलें असें जाणून शंकरानें आपला तृतीयनेत्र उघडून त्यास भस्म केलें–अशी कथा आहे. ११. रागीटातें. १२. धृतराष्ट्राला. १३. मेघनाद इंद्रजित् याचा कुलघ्न कुपिता (रावण) जें (म्हणजे पुत्रशोक) पावे, तें तुला (धृतराष्ट्राला) द्याया. १४. तें दुःख (इंद्रजिताच्या मरणानें जें दुःख रावणाला झालें तें) तुला प्राप्त व्हावें–असा भावार्थ. येथें पर्यायोक्तालंकार आहे. १५. देवदैत्यांचे अधिपतिसे. १६. भद्रासनकाम (सिंहासनप्राप्तीची इच्छा धरणारे ते धर्म-दुर्योधन) सुर असुरांचे इंद्रसे (अधिपतिसे) एकमेकांचें नातें न गणिती. १७. धर्मराजाच्या रथाचा ध्वज व त्याचें धनुष्य. १८. धर्माच्या सारथ्यातें. १९. धर्म. २०. नूतन धनुष्य. २१. हतः असि='तूं मेलास' असें म्हणून. २२. तो शर. २३. उड्डाण करण्याविषयीं कुशल असा.

मूर्च्छा जसीच, सहसा झाली मोठी तसीच हाक रणीं. ।
मेला दुष्ट दुरात्मा, करिता जाला असीच हा करणी.' ॥ २५
तों गुरु धांवे, परिसुनि पांचाळांच्या[2], रणांत, हाकेला; ।
चित्तीं म्हणे, 'वधें तरि नुतें[3] किन्नरचारणांत हा केला.' ॥ २६
येतांचि द्रोण, उठे दुर्योधन सुप्तसर्पसा[4] हरिसा[5]. ।
परि सार्थक काय ? कसे बांचो देतील, पोषिले अरि सा[6] ? ॥ २७
तो[7] 'तिष्ठ, तिष्ठ'[8] ऐसें म्हणत, रण तमीं[9] करावया धांवे. ।
पांचाळ सकळ उठले, कीं धर्मा शत्रुशर न बाधावे. ॥ २८
पांचाळांवरि सहसा सरसावे द्रोण, कुरुप[10] राखाया; ।
कीं गुरु समक्ष असतां, कालहि न शकेल गुरुपरा[11] खाया. ॥ २९
उठली आचार्यावरि सारीही एकदांचि अरिसेना. ।
हरिसे[12] नाद करिति ते; कोणीहि परस्परोक्त[13] परिसेना. ॥ ३०
रात्रौ दाटे, वाटे लयकालाचाचि[14], अंधकार, गडी; ।
बहु पांचाळसमूहा द्रोण, जसा रुद्र अंधका[15], रगडी. ॥ ३१
भूषामणिशस्त्रद्युति[16] घनतिमिरींही[17] करी लखलखाट; ।
म्हणुनि[18] गमे, होउनि गतमद, चिंतेची धरील खल[19] खाट[20]. ॥ ३२
द्रोणाच्या सारथिला मारी, शरवृष्टि करुनि, [21]शिबि राजा; ।
त्यातें आचार्य म्हणे, 'स्वर्गासचि[22] जा; पुन्हा न शिबिरा[23] जा.' ॥ ३३
कालिंगभूपनंदन धांवे, कीं भीम होय तोतारी[24]. ।

---

१. दुर्योधन. २. द्रुपदपुत्रांच्या. ३. स्तुत. हा (दुर्योधन) वधे तरी (मरण पावल्यामुळें तरी) किन्नरचारणांत नुत केला–असा अन्वय. किन्नरचारणादि देवयोनि-विशेषांनीं (देवांनीं नव्हे !) तरी दुर्योधनाची त्याच्या पराक्रमाबद्दल स्तुति केली असेल, असा भावार्थ. ४. निजलेल्या सर्पासारखा. ५. सिंहासारखा. ६. सहा (कामक्रोधादि षड्रिपु). ७. 'तों' असें पाठांतर. ८. उभा रहा. ९. रात्रीच्या अंधारामध्यें. १०. दुर्योधन. ११. गुरुभक्ताला. १२. सिंहासारखे. १३. एकमेकांचें बोलणें. १४. प्रलयकालाचाच गडी (मित्र). १५. अंधकासुरास. (मागें पृष्ठ १३६ टीप १२ पहा.) १६. अलंकारांतील रत्नें व शस्त्रें यांचें तेज. १७. गाढ अंधकारांत. १८. गाढ अंधकारांत सुद्धां शस्त्रें व रत्नें यांचा चकचकाट दिसे यावरून. १९. दुर्योधन. २०. बाज. २१. पांडवपक्षीय एक राजा. २२. अर्थात् त्याचा वध करी. २३. सैन्यस्थावास 'न जा' म्हणे. २४. तात+अरी=पित्याचा शत्रु.

तद्बल [1]तयापुढें किति ? [2]अशनिपुढें काय कोयता तारी ? ॥ ३४
स्यंदन सोडुनि, धावुनि, त्या कालिंगासि मुष्टिनेंचि वधी; ।
कर्णानुजही मर्दुनि, तो, बहु, खलकाल तोषवी [3]शिवधी. ॥ ३५
कर्णें झुगारिली, जी [4]शक्ति [5]खरत्वें सखीच अशनीची, ।
कीं [6]आगस्कृदरक्षक [7]तक्षककन्याच, दृष्टिच [8]शनीची. ॥ ३६
तीच धरुनि भीमें त्या कर्णावरि टाकिली महावेगा; ।
फिरली कृत्याच गमे; कर्णास न तीकडे पहावे गा ! ॥ ३७
खंडी नयरीतीतें; होउनि जो काय वश कु-नीतीतें ।
स्वसहाय वृषहितार्थी तो कां खंडील न शकुनी तीतें ? ॥ ३८
स्वरथीं बैसोनि पुन्हा, आम्हांवरि भीम धांवला हरिसा. ।
त्यावरि [9]कुमार उठले. तेव्हांचें वृत्त सांगतों, परिसा. ॥ ३९
आच्छादित होते शरपटलें, ठाकुनि समक्ष, [10]यांतें हो ! ।
तों पाठविले दुर्मद-हय, सारथिसह, [11]यमक्षयातें हो ! ॥ ४०
दुष्कर्णरथीं दुर्मद बैसे, दोघे [12]कृती परि [13]लघ्वायु. ।
भीम तसेंचि परांचें मथन, घनांचें जसें करिल वायु. ॥ ४१
धरणींत बुडविला रथ, त्यांचा भीमें गदाप्रहारेंच. ।
ते मुष्टिनेंचि वधिले; उतरिल [14]शतमन्युचाहि हा [15]रेंच. ॥ ४२
होते वृष गुरुसुत नृप कृप बाल्हिक सोमदत्त साक्षी बा ! ।

१. भीमापुढें. २. वज्रापुढें. ३. शिवाची मती. ४. अस्त्रविशेष. ५. तीक्ष्णत्वें. ६. आगःकृत्+अरक्षक=अपराध करणारांचे रक्षण न करणारी. ७. तक्षकाची कन्या; अर्थात् सर्पीण. ८. शनीच्या उग्र दृष्टीची प्रसिद्धी आहेच. ९. धृतराष्ट्रपुत्र (दुर्मद व दुष्कर्ण). १०. भीमातें. ११. यमाच्या घरी. १२. कुशल. १३. अल्पायु. १४. इंद्राचाहि. १५. गर्व. रेंच उतरणें=रेंच मोडणें, खोड मोडणें, नाक-कापणी करणें. हा शब्दसमूह पंताच्या काव्यांत वारंवार आढळतोः–आदिपर्व–अ० १८।७२; अश्वमेधपर्व–अ० ५।१२; दोहारामायण–दोहा ४७; भीष्मपर्व–अ० १।१६; सभापर्व–अ० २।३९; वनपर्व–अ० ११।३२; व उद्योगपर्व–अध्याय ८।७२. हा शब्दसमूहावर ती० कै० वा. दा. ओक यांनीं विशेष शोधपूर्वक एक सविस्तर टीप मोरोपंती उद्योगपर्वाच्या आठव्या अध्यायाच्या ७२ व्या गीतीवर दिली आहे, ती जिज्ञासूंनीं अवश्य पाहावी. [काव्यसंग्रह-ग्रंथमाला—मोरोपंतकृत उद्योगपर्व, पृष्ठ १३५ टीप ९ पहा].

सम दिसतो, परि तेजें भीम परा असम, दूसा श्रीचो. ॥ ४३
पळ काढिलाचि, तुमच्या, पाहुनि तें कर्म, तडक, लेंकांहीं; ।
गमला रुद्र वृकोदर; धाकें काळीज तडकलें कांहीं. ॥ ४४
द्रुपद विराट युधिष्ठिर पूजिति होऊनि मुदित भीमातें, ।
त्या अंधका[3]सुरवधीं विधि वासव विष्णु जेंवि भीमातें[4]. ॥ ४५
सद्रोणं कुमार पुन्हा वेष्टिति कोपें वृकोदरा अरिला, ।
जैसे निजयूथपयुत मदमत्त द्विपं[6] वधावया हरिला. ॥ ४६
सात्यकिस सोमदत्त क्रोधें दाबुनि, म्हणे, 'अरे मत्ता ! ।
प्रायगता न असिलता त्वां, धर्मालाचि मारिली लत्ता. ॥ ४७
मीं आजि तव शिरातें, विसराया[9] तनयहानि, कापीन. ।
केला त्वां गृध्रोचित देह, करुनि अनय, हा निको[11] पीनें[12]. ॥ ४८
जरि जिष्णु न रक्षिल, तुज मी मारीनचि रणांत अधमातें; ।
त्वत्कृत अधर्म जैसा तापद, तैसा न पुत्रवध मातें.' ॥ ४९
[13]सात्वत म्हणे, 'यदुकुळीं अरिपासुनि सांग कोण गा ! भ्याला ? ।
यादवशक्ति पराला, कदलीच्या[14] जेंवि सांग[15] गर्भाला. ॥ ५०
तुजसि सपुत्रास रणीं दाखवितों आज मी विनाशपथ[16]. ।

---

१. दत्तात्रेयासारखा. २. मद्यप्याला. श्रीदत्तात्रेय हे आपल्यासारखेच आहेत असें मद्यप्यास वाटतें. पण ते खरोखर त्याच्यासारखे नसतात. 'गुरुचरित्रां'त असें लिहिलें आहे कीं, श्रीदत्तात्रेय हे दररोज वेष पालटून (कधीं मलंगाचा वेष, कधीं योग्याचा इत्यादि) भिक्षा मागण्याकरितां पृथ्वीपर्यटन करीत असतात. जे पुण्यवान लोक आहेत तेच फक्त दत्ताची फेरी आपल्या घरीं आली असतां हे दत्त म्हणून त्यांस ओळखितात, परंतु पापी त्यांस ओळखूं शकत नाहींत. अन्यत्र पंतांनीं हाच दृष्टांत दिला आहे:—'उघडहि निधी अभाग्या न दिसे, मलिनाजनाहि अत्रिज, गा !' [विराटपर्व—अध्याय २।२३]. ३. अंधकासुर हा महिषासुराच्या सेनेंतील एक प्रमुख असुर. त्यानें इंद्रादि देवांस युद्धांत जर्जर केलें होतें, पण शंकरानें त्याचा वध केला. ४. शिवातें. ५. आपल्या पुढाऱ्यासहित. ६. गज. ७. प्राणायामपराला. प्राणायाम करून राहिलेला जो भूरिश्रवा त्याला तूं असिलता (तरवार) मारिली असें नव्हे, तर प्रत्यक्ष मूर्तिमंत धर्मालाच त्वां लात मारिली. <u>अपह्नुति</u>अलंकार. ८. असि+लता=तलवार. (पृष्ठ १७३ टीप १३ पहा.) ९. भूरिश्रवावध. १०. गिधाडांनीं खाण्यास योग्य. ११. खरा, चांगला. १२. पुष्ट. १३. सात्यकि. १४. केळीच्या गर्भाला, खांबाला. १५. शस्त्रविशेष. १६. विनाशमार्ग.

अनुचित कृष्णपदशपथ; परि न ठसे श्रीकृता[1] विना[2] शपेय. ॥ ५१
तंडायाचीच[3] तुला युद्धांत असेल जरि संवे[4], तंड. ।
परि मज दिसतोसि तसा कौरव्या! जेंवि हरिस वेतंडे[5].' ॥ ५२
रक्षिति बहु बल घेउनि दुर्योधन शकुनि सोमदत्तातें; ।
रक्षी धृष्टद्युम्नहि सात्यकितें परम-युद्ध-मत्तातें. ॥ ५३
प्रथम नवशरांहीं तो सात्यकिला सोमदत्त बा! वेधी; ।
कौरव्याची सात्वतनवबाणांहींच मोह पावे धी. ॥ ५४
तो सोमदत्त, मूर्च्छित पडतांचि, पळांत पळविला सूतें. ।
सात्यकिवरि गुरु धांवे, बहु चळचळ कांपवीत रण-भूतें[6]. ॥ ५५
द्रोणावरि धर्म उठे, घेउनि अमित स्वकार्यघटक बळ; ।
तेव्हां गुरुशरगणघटकर्णे[7] गिळिले अनेक-भट-कवळ[8]. ॥ ५६
पडली दृष्टि जयांवरि त्या कौरवसर्वसैन्यपाळाची[9], ।
पडलीच उडी त्यांवरि तद्बाणगणासमेत[10] काळाची. ॥ ५७
केले द्रोणें बहु भट, गरुडानें नैकसर्पसे[11], नाहीं. ।
स्वीकारिलें पलायन धर्माच्या, त्यजुनि दर्प, सेनांहीं. ॥ ५८
पार्थ म्हणे, "पळत्यांतुनि ने माझा क्षिप्र हा रथ, बकारे[12]! ।
म्हण, 'करितों गुरुसि, तुम्हां ठेवुनि साक्षी, प्रहार; थंबका[13], रे!'" ५९
विजयोर्के विजयाचा रथ चालविला जसा विशोकानें[14], ।
भीमोर्के भीमाचा चालविला रथ तसा [15]विशोकानें. ॥ ६०

---

१. मूर्खास. २. शपथेवांचून. ३. पोकळ वागवाद करण्याचीच. ४. संवय. ५. गज, हत्ती. ६. रणभूमीतें. ७. द्रोणशरसमूह हाच कुंभकर्ण यानें. ८. अनेक योद्ध्यांचे ग्रास. ९. द्रोणाचार्याची. १०. येथें 'सहोक्ति' अलंकार आहे. ११. अनेक सर्पसे. १२. बक+अरे=हे कृष्णा !. बकासुर हा कंसपक्षीय असुर. यमुना तीरीं वृंदावनामध्यें एकदां गोपालांसहवर्तमान कृष्ण क्रीडा करीत असतां, तेथें यानें बकवेषानें येऊन त्यास गिळिलें. तेणेंकरून त्याच्या गलप्रदेशीं दाह होऊन, यानें कृष्णास मुखाबाहेर टाकिलें व त्यास पुन्हा मारावयास धांवला. तेव्हां कृष्णानें याची चंचू धरिली व ती फाडून यास मारून टाकिलें–अशी कथा भागवतांत आहे (स्कंध १०, अध्याय ११ पहा). १३. उभे रहा. १४. शोकरहितानें, कृष्णानें. १५. विशोकनामा जो सारथी त्यानें.

सेना सर्व मिळाल्या धांवुनि, अत्यंत शीघ्र दोघांतें, ।
जैशा तटिनी[1] गंगायमुनांच्या, श्रावणांत, ओघांतें. ॥ ६१
उत्तरपार्श्वी[2] भीमें, दक्षिणपार्श्वी सुधांशुसितवाहें[3], ।
कुरुकटक घेरिलें[4]. बा! दावयुग[5] गजा तसेंचि, कितवा हें. ॥ ६२
कुरुसेनेतें ग्रासिति ते दोघे, दाव जेंवि अटवीतें[6]; ।
किंवा श्रीमद्गीतासप्तशतीमंत्रपाठ खटवीतें. ॥ ६३
धांवे प्रायगतवधप्रकुपित[7] गुरुपुत्र सात्वतावरि; तों ।
त्यावरि उठे घटोत्कच[8] खचर, म्हणे, 'यासि आननीं भरितों[9].' ॥ ६४
अक्षौहिणिमित[10] तत्कूट[11], लोपविते प्रलयनीरदरवा[12] जे, ।
दरवाजे[13] काळाचे, बा! अरिचा ज्यांपुढें न दरें[14] वाजे; ॥ ६५
लोहमय अष्टचक्र[15] त्रिंशन्नल्वप्रमाण[16] रथ मोठा, ।
जो ऋक्षचर्मपरिवृत[17], ज्यांत नसे शस्त्रसंग्रहीं तोटा; ॥ ६६
त्याचे वाहक[18] गजसे, परि जातीनें नव्हेत गज, वाजी, ।
क्षण ज्यांपुढें, गगनमणिरथतुरगांच्या[19], नव्हे तग, जवा, जी! ६७
एवं भयंकररथीं पाहुनि रात्रौ रणांत उग्रास, ।
भ्याले कौरव; गमले ते त्या काळापुढील सु-ग्रास[20]. ॥ ६८
कटकीं होते वाजी, वारण, जे काय बहु मदें उतले, ।
ते त्यांपुढें न तगले, हगले, तो काळ[21] गर्जतां मुतले. ॥ ६९

---

१. नद्या. २. डाव्या बाजूस. ३. चंद्रासारखे स्वच्छ घोडे ज्याचे अशा अर्जुनें. ४. 'घेतलें' असाही पाठ आहे. ५. दोहोंबाजूंचा अग्नि. दाव=वणवा. ६. अरण्यातें. ७. प्रायोपवेशनास बसलेला जो भूरिश्रवा, त्याच्या वधानें प्रकुपित. ८. घटोत्कचनामा राक्षस; भीमाचा पुत्र. ९. गिळून टाकितों. १०. गज २१८७०, रथ २१८७०, घोडे ६५६१०, पायदळ १०९३५०, ही गजादि संख्या एकत्र झाली असतां त्यास अक्षौहिणी म्हणतात. ११. त्याचे वीर. १२. प्रलयकाळाच्या मेघांच्या गर्जनांस. १३. येथें 'द्वामयमक' आहे. (मागें अध्याय २ गीति ८ पहा.) १४. शंख. १५. ज्याला आठ चाकें आहेत असा (रथ). १६. चारशें हात लांबीचे प्रमाणाचा एक नल्व. (हें प्रमाण संदिग्ध दिसतें.) १७. अस्वलाच्या कातड्यानें मढविलेला. १८. घोडे. १९. सूर्याच्या रथाच्या घोड्यांचा वेग ह्या रथाच्या घोड्यांच्या वेगापुढें टिकाव धरूं शकत नसे. २०. उत्तम भक्ष्य. २१. 'तात्काळ' असा अन्य पाठ आहे.

द्रौणि, घटोत्कच दोघे न धरिति ते युद्धसमरस[1] त्रास; ।
आरंभिति, जोडाया यश लोकीं शुद्ध, समरसत्रास[2]. ॥ ७०
संध्याधिकबळ[3] राक्षस ते, जैसे धूमयोनि[4] करकांहीं[5], ।
बहु वर्षले शिळांहीं; बा ! वदवेनाचि तो निकर[6] कांहीं. ॥ ७१
केलें पलायन, मनीं धरिला संकोच न तव तनयांहीं. ।
संपादिलें न नाकीं, होउनि धर्मासि नत, वतन यांहीं. ॥ ७२
किंबहुना, कर्णहि त्या खचरत्रासें पलायन करी हो ! ।
गंधद्विप[7]गंधानें भंगेचि महाबलायन[8] करी हो ! ॥ ७३
त्या राक्षसांसि एक द्रौणि न भी, होय रामसा मान्य; ।
केलें घटोत्कचतनयमर्दन; हें काय काम सामान्य ? ॥ ७४
तो अंजनपर्वा[9]भिध बा ! अन्य तसा न वीर मायावी[10]; ।
योधीं तद्वधकीर्ति न ? जेंवि समुद्रीं नवी रमा यावी. ॥ ७५
अंजनपर्वा याचा, घननाद जसा दशाननाचा, हो ! ।
द्रौणिस भीमसुत[11] म्हणे, "जोडुनि शिशुवधयशा, न नाचा, हो! ७६
झालाचि[12] आजि वृद्धा त्या द्रोणा ब्राह्मणासि शोकद[13] हा; ।
यों[14] गुरुधर्महितकरा परि म्हणतिल 'धन्य धन्य !' लोक दहा." ॥ ७७
द्रौणि म्हणे, 'वत्सा ! जा इतरांसीं अमरविक्रमा[15] ! भीड[16]. ।
पुत्रें[17] पिता कदापि न पीडावा, सोडुनि क्षमा भीड. ॥ ७८

१. ज्यांना युद्धाची आवड सारखीच आहे असे (अश्वत्थामा व घटोत्कच). २. समररूप यज्ञास. ३. संध्या=संधिकाळ, मध्यवर्ती काळ. संध्या+अधिक+बळ=संध्यासमयीं ज्यांना बळ अधिक असतें असे राक्षस. मंदेह नांवाचे साडेतीन कोटी राक्षस सकाळीं व संध्याकाळीं सूर्याचा ग्रास करण्याकरितां उत्पन्न होत असतात. त्यांचा नाश करण्यासाठीं गायत्रीमंत्र म्हणून सूर्यास अर्घ्य देण्याचा प्रघात आहे. गायत्रीमंत्रानें तयार केलेलें पाणी वज्ररूप होऊन त्या राक्षसांचा नाश करितें, असा समज होता. ४. मेघ. ५. गारांनीं. ६. धामधूम. ७. मत्त हत्तीच्या वासानें. ८. मोठ्या बळाचें स्थानच असा हत्ती. ९. घटोत्कचपुत्राचें नांव. १०. कपटी, अनेक रूपें धारण करणारा. ११. घटोत्कच. १२. झालाच समजा, खात्रीनें होईलच. १३. शोक देणारा. १४. अंजनपर्व्यांस. १५. देवांसारख्या पराक्रमी घटोत्कचा ! १६. गांठ घाल. १७. भीमादि पांडव आणि अश्वत्थामा हे गुरुबंधु असल्यामुळें, अश्वत्थामा घटोत्कचास पुत्रवत् समजतो, हें लक्ष्यांत ठेवून गीति ७८–८० वाचाव्या.

न तुझ्याठायीं माझा रोष, असे सर्वदाहि अनुराग[1]. ।
परि येतां, तापवितो, व्यापुनि बाहेर आंत तनु, रोग[2]. ॥ ७९
नसतो विवेक कांहीं; बा ! घडतो आत्मघातही कुपिता[3]. ।
सुपिताहि क्रोधाच्या आवेशेंकरुनि होतसे कु-पिता[4].' ॥ ८०
रात्रिचर म्हणे, "द्रौणे ! न पृथग्जनसा[5] रणांत कातर[6] हो[7]; ।
भीमसुत म्हणायाचा शक्राहि, 'उगीच कीर्ति गात रहा.' ॥ ८१
जे समरीं अनिवर्ती[8] पांडव, त्यांचा कुमार हा वडिल[9]; ।
आणिल मनांत तरि, यमकासरचर्मे[10] स्वदुंदुभी मढिल. ॥ ८२
असतां तरि म्हणता, मज[11] पाहुनि रक्षोधिपासि, रावण, 'हा ।
घटकर्णाच्या[12] करिता, निजचरणप्रणमनें[13], शिरीं[14] वण[15], हा !' ॥ ८३
कठिण रणश्रद्धाव्रत[16] हें सत्य, मनांत चिंतित उजीव[17]. ।
जाणो[18] आयुष्यातें सलिल, शरीरा निजा "तितउ[19], जीवं." ॥ ८४
दापी असें, दरवडा सार्थाच्या[20] जेंवि अक्षमा[21] त्राल्या. ।
सोडी ज्या ज्या बाणा, छेदीच द्रौणि अक्षमात्रा[22] त्या. ॥
होउनि गुप्त घटोत्कच, मायेनें होय तो खरा शिखरी[23]. ।
वाटे निजोक्ति करितो, द्याया स्वजनासि तोखराशि[24], खरी. ॥ ८६
वर्णू तो कज्जलसख[25] शस्त्रप्रस्रवण[26] काय पर्वत मीं ? ।
त्या अतिभयंकरानें वीर बुडविले पळांत सर्व तमीं. ॥ ८७

---

१. प्रीति. २. क्रोध. ३. क्रोधयुक्ताला. ४. दुष्टपिता. ही गीति सुभाषितरूप आहे. ५. पामर लोकांसारिखा. ६. भयचकित. ७. मी घटोत्कच. ८. माघारे फिरणारे नव्हत असे. ९. ज्येष्ठ. १०. यमाचें वाहन जो महिष त्याच्या चर्मानें. ११. मला राक्षसाधिपास. १२. कुंभकर्णाच्या. १३. आपल्या पायाचें वंदन करायाला लावून. १४. मस्तकाला. १५. घट्टा. १६. रणश्रद्धा हेंच व्रत (नियम). 'नियमो व्रतमस्त्री' इत्यमरः । व्रियते यद्वा व्रजंत्यनेन स्वर्गम् इति व्रतम् ।. १७. उज्जीवय, ताजें कर. १८. समजो. जीव जाणो—असा अन्वय. १९. चाळण. २०. परदेशाला चाललेली व्यापारी मंडळी, तिच्या असमर्थ त्रात्याला (रक्षकाला) जसा दरवडा दापी (धमकावतो) त्याप्रमाणें. 'सार्थो वणिक्समूहे स्यादपि संघातमात्रके' इति मेदिनी ।. २१. अशक्ता अशा. २२. फाशासारख्या, अर्थात् लहान बाणाला. २३. पर्वत. २४. हर्षातिशय. २५. काजळाचा मित्र, काळा कुळकुळीत. २६. शस्त्रांचा झरा ज्यांतून वाहात आहे असा.

अतिवर्षी[1] बल्लवसे बहु आम्हीं आरडों, गेरल[2] यातें; ।
नमितें; नेवा [3]कुरुबलबालां तो [4]आरडोंगर ल्यातें. ॥ ८८
[5]म्याला तों मायानग [6]गुरुनंदनमुक्तशरनिकरपविला; ।
त्या ब्राह्मणप्रतापज्वलनें [7]खलपलभुगगम करपविला. ॥ ८९
मग होय नी[8]लतोयद, सोडी [9]असिशूलशरगदाधारा. ।
गेलों शरण गुरुसुता सर्व, जसे गोप त्या [10]सदाधारा. ॥ ९०
तो नीलमेघ, गुरुसुतयोजितवाता[11]स्त्रसायकें वितुळे. ।
सुरभीच्या सायेसीं यममहिषीचीहि साय केंवि [12]तुळे ? ॥ ९१
[13]घटजें सिं[14]धूदरसें, केलें, जीव[15]नें हरूनि, कटक, रितें. ।
नातरि घटोत्कचाचें तें बळ आम्हां पळांत गट करितें. ॥ ९२
जरि शतसहस्र मथिले, बहु राक्षस धांवले तरि नवेच. ।
द्रौणि म्हणे, 'न नृपा ! मी; मी यांचा निश्चयें करिन वे[16]चं.' ॥ ९३
कुरुप म्हणे, 'मिरविन या कंठीं तव कीर्तिरत्नाहारा मीं. ।
संप्रति तुझ्या भुजीं, बा ! होता पूर्वी प्रयत्न हा रामीं.' ॥ ९४
रामीं सीतासी, दे राहों, धर्मींहि, न, [17]महि, [18]मामा जो, ।
त्या नृप म्हणे, 'तुजपुढें अहितांचा आजि न महिमा माजो. ॥ ९५
साठसहस्र स्यंदन, निज लक्ष तुरग, मथावया अरि, घे, ।
[19]रीघचि पांडवकटकीं, ग्रीष्मीं [20]कक्षांत जेंवि [21]दीव रिघे. ॥ ९६
[22]षडयुतपत्तिसमेत त्वत्साहित्यासि कर्ण पाठवितों, ।

---

१. गोकुळामध्यें अतिवृष्टीच्या समयीं बल्लव (गोपाल) जसे ओरडत, त्याप्रमाणें. (पृष्ठ १७१ टीप ११ पहा.) २. विष. ३. कुरुसैन्यरूप बालकांना तो अजगर किंवा-डोंगर (घटोत्कच) लया नेता. ४. अजगर किंवा डोंगर. आर=अजगर-पंत. ५. मायेनें पर्वताचें रूप घेणारा (घटोत्कच). ६. गुरुनंदन+मुक्त+शरनिकर+पविला= अश्वत्थाम्यानें सोडलेला बाणसमुदाय हाच जणुं काय वज्र, त्याला. ७. खल+पलभुक्+ अगम=दुष्ट राक्षसरूपी वृक्ष (घटोत्कच). ८. निळा मेघ. ९. खड्ग, शूल, बाण, गदा यांच्या धारा. १०. सत्+आधारा=साधूंस आधारभूत अशा (श्रीकृष्णाला). ११. वाताऽस्त्राच्या साहाय्यानें सोडिलेल्या बाणानें. १२. तुलना पावेल. १३. अगस्तीनें. १४. सिंधु+उदरसें=समुद्राचें उदरसें. १५. उदक; पक्षी, प्राण. १६. खर्च, लय. १७. पृथ्वी. १८. शकुनिमामा. १९. प्रवेश करच. 'रिघवी' असें पाठांतर. २०. गवतांत. २१. वणवा. २२. षट्+अयुत+पत्ति+समेत=साठहजार पत्तींनीं युक्त. पत्तीचें लक्षण-'एको गजो रथश्चैको नराः पंच पदातयः । त्रयश्च तुरगास्तज्ज्ञैः पत्तिरित्यभिधी

आठविन परांचें असुहरण, वसुहरण जसेंचि आठवितों. ॥ ९७
द्रौणिशरांहीं व्याकुळ करितांचि, युधिष्ठिरादिमदरीतें; ।
मारुनि, घ्यावें सयश मद्धितनिरतें तुवांचि पदरीं तें.' ॥ ९८
गेला धर्मवधा, जो हेतु नृपा या इलादिलाभाचा, ।
जेणें कुबुद्धि-कृत्या जी, हे खाया इला दिला भाचा. ॥ ९९
राक्षस दशबाणांनीं, विकल करुनि गुरुसुतासि, धनु तोडी; ।
द्रौणि, नवें धनु घेउनि, त्याला, जलदासि वातसा, झोडी.॥ १००
त्रिपुराला रुद्र जसा, खचरबळाला तसाचि तो भाजी; ।
जीच सुरांत हराची, याची आम्हांत तीच शोभा, जी ! ॥ १०१
स्वबलविनाशक्षोभें भीमसुतें रुद्रनिर्मिता अशनी ।
पाठविली द्रौणिप्रति, जी कृत्या दर्शितारिच्या अशनीं. ॥ १०२
उग्रत्वमदें जीसीं करिल क्षणमात्रही न वाद शनी, ।
तें दाहकत्व न दवीं, तक्षकभुजगाचिया न वा दशनीं. ॥ १०३
ऐशीतेंहि धरी बा ! तो द्विजवर, गरुड जेंवि भुजगीतें. ।
ख्यात जगीं स्वयशाच्या, त्याचे, हरबाहु तेंवि, भुज, गीतें.॥ १०४
गुरुपुत्रें खचरीवरि तीच अशनि योजिली महावेगा. ।
फिरल्या कृत्येसि तसें, तीस न त्या राक्षसा पहावे, गा ! ॥ १०५

यते ॥' अर्थ—१ हत्ती, १ रथ, ५ मनुष्यें, ३ घोडे, मिळून एक पत्ति जाणावी. पत्ति=पायदळ.

१. प्राणहरण. २. द्रव्यहरण. ३. मदरीतें=माझ्या शत्रूंतें. ४ मत्+हित+निरतें=माझ्या हिताविषयीं तत्पर अशा तुवां. ५. पृथिव्यादि लाभाचा. या नृपा (दुर्योधनाला) इलादिभाचा (पांडवांचें राज्य हरण करून मिळवून देण्याला) जो हेतु (कारणीभूत) [व] जी हे कुबुद्धिरूपी कृत्या इला खाया जेणें (ज्यानें) भाचा (दुर्योधन) दिला, [तो (शकुनि)] धर्मवधा गेला—असा अन्वय. या गीतींत पर्यायोक्तालंकार आहे. ६. घटोत्कच. ७. राक्षससैन्याला. ८. महत्व, पराक्रम. ९. भजी (धृतराष्ट्र). १०. आपल्या सैन्याचा नाश झाल्यामुळें उत्पन्न झालेल्या संतापाच्या योगानें. ११. अग्निशलाका. १२. समर्था. १३. दाखविलेल्या शत्रूच्या भक्षणाला. १४. प्रखरता. १५. दांतांत. १६. [जेंवि] हरबाहु तेंवि त्याचे भुज स्वयशाच्या गीतें जगीं ख्यात—असा अन्वय. १७. परनाशार्थ उपासिलेली कृत्या नाम राक्षसी, ती मागें फिरली असतां उपासकाचाच नाश करिते, अशी समजूत आहे.

घाली उडी तळीं तो राक्षस जों, तों पडे रथावरि ती. ।
झाली, सगर[1]सुतगणीं कपिलाची[2] दृक् जसें, तसें करिती. ॥ १०६
देखुनि जाणत होते अशनीची ख्याति, लटिकें[3] वैरि, कवि जे, ।
ते वदले, 'न सखी तूं ईची होसील, बटिक बरिक,' विजे[4]. ॥ १०७
अशनी क्षितींत शिरली, सूताश्वासह रथासि जाळून. ।
धृष्टद्युम्नरथीं तो राक्षस बसला स्वमृत्यु टाळून. ॥ १०८
विजयश्री पांचळा, तैसीच निशाचरा गमे घरची; ।
कीं ते शरवृष्टीतें, तेंवि उदकवृष्टितें न मेघ रची. ॥ १०९
गुरुपुत्रें त्यां त्यां बहु कांपविलें, जेंवि नीरदा[6] वातें. ।
द्विजबळ परप्रतापा त्या, जैसें, होय नीर[7] दावातें[8]. ॥ ११०
तेथें बहु बळ घेउनि, सुतसाहित्यासि भीम ये; राजा ! ।
मुख्या सबळत्वत्सुतहानि; हयमखक्रिया[9]हि येरीं[10], ज्यां[11]. ॥ १११
गुरुसुत वधी, घटोत्कचभीमार्जुन यांसमक्ष, यातूतें[12]. ।
बा ! तत्वतः[13] स्वपरबल, जें पाठविलें यमक्षया[14] तूं तें. ॥ ११२
तो विष्णुजिष्णुदेखत खचरां सकळांहि लोळवि प्रखरा; ।
वाटे निर्पटें[15] खवळला प्रळयाग्नीचाचि लोळ, विप्र[16] खरा. ॥ ११३
जाणों हरचि म्हणे, 'हूं ! घे'[17] बहु फटकाळें[18], कूट हा निकर, ।

---

१. सगर नामक राजानें अश्वमेधार्थ अश्व सोडिला असतां इंद्रानें त्याचें हरण केलें. त्याच्या शोधार्थ त्याचे साठसहस्र पुत्र निघाले. फिरतां फिरतां कपिलमुनीच्या आश्रमापाशीं तो अश्व त्यांना दिसला. तेव्हां त्या मुनीनेंच आपला अश्व आणिला अशी त्यांना शंका येऊन त्या मुनीला ते मारूं लागले. मुनीनें रागानें त्यांकडें पाहतांच त्या सर्वांचें भस्म झालें—अशी कथा आहे. २. कपिलमहामुनीची. ३. खरी किंवा खोटी. ४. विद्युल्लतेस म्हणाले. ५. त्या प्रत्येकास. ६. मेघास. ७. पाणी. ८. दावानळातें. ९. अश्वमेधादिक्रिया. 'दरमखक्रियाहि' असा पाठभेद. १०. वेगळी, गौण. ११. ज्यास (भीमास). ज्याचा मुख्य हेतु तुझ्या पुत्राचा (दुर्योधनाचा) सैन्यासह नाश करणे हा होता, अश्वमेधादि करणें हा उद्देश गौण होता, असा भीम. १२. राक्षसातें. १३. वस्तुतः, खरोखर. स्वपक्षीय व परपक्षीय सेनेचा नाशकर्ता खरोखर तूंच (धृतराष्ट्र राजा) आहेस. १४. यमगृहास. १५. अत्यंत. हा शब्द पंतांच्या कवितेंत ठिकठिकाणीं आढळतो. (मागें अध्याय ९।८ पहा.) १६. अश्वत्थामा. १७. फटकाळांचा समाचार घे, फटकाळांची खोड मोड—असा भाव. फटकाळ=फटकळ=दुर्भाषण करणारा. निकर=समुदाय.

कीं, तें तेंवि खचरबळ, जेंवि निपट काळकूट[1] हानि-कर.' ॥ ११४
मारुनि रात्रिचरकटक रुधिरनदी खळखळाट[2] वाहविली, ।
चेळवळ घटोत्कचाची, मर्मी वेधुनि, मुहूर्त राहविली. ॥ ११५
नाराचांनीं[3] पांडव धृष्टद्युम्नासमेत सडकून, ।
द्रुपदसुत-शरभ केला भस्म, दवें[4] जेंवि शलभ धडकून[5]. ॥ ११६
मारुनि त्या सुरथाचे[6] बहुसुत शत्रुंजयादि झाडून, ।
द्रोणात्मजें श्रुताव्हय[7]राजातेंहि क्षणांत पाडून, ॥ ११७
पुनरपि यमदंडोपम[8] बाणातें परम तूर्ण सोडून, ।
मूर्च्छित रणीं घटोत्कच[9] केला तत्काळ, हृदय फोडून. ॥ ११८
धृष्टद्युम्न पळवि; करि, पडतां तो शूर, पळ विलापाला; ।
वांत्येनें[10] दववदहनापुढुनि[11] गमे दूर पळविला पाला. ॥ ११९
होते युधिष्ठिराच्या कटकीं भीमादि वीर्यसागर जे, ।
त्यांतें भंगुनि गुरुसुत, मोडुनि मत्तेभ[12] सिंहसा, गरजे. ॥ १२०

अध्याय सतरावा.

भारुति[13] पार्षत[14] सात्यकि धर्मादिक वीर विप्र[15]-भावातें ।
मानवले[16], ग्रहवृंदीं[17], बहु, जेंवि कवी रवि-प्रभावातें. ॥ १

---

१. विष. २. 'चकपक' असा रा० पराडकर यांच्या प्रतींत पाठ आहे. ३. बाणांनीं. ४. दावाग्नीनें. ५. जोरानें पेट घेऊन. ६. उत्तम रथी जो द्रुपद त्याचे. ७. श्रुतनामक. ८. काळदंडासारख्या. ९. घटोत्कच=घट+उत्कच=केशहीन घट (शिर) ज्याचें असा. [घट=शिर. 'घटः समाधिभेदे ना शिरः कूटकटेषु च' इति मेदिनी ।.] याचें डोकें घटसदृश आणि केशरहित होतें म्हणून, ह्याच्या मातेनें ह्याचें घटोत्कच असें नांव ठेविलें. 'मस्तक पाषाणघट्ट निष्कच । शब्द करी महा उंच । यालागीं नांव घटोत्कच । माता ठेवी तयातें. ॥' [मुक्तेश्वर–आदिपर्व–अध्याय ३७।८०]. हा हिडंबानामक राक्षसीपासून भीमास झालेला पुत्र. अंजनपर्वा हा ह्याचा पुत्र. हे दोघे मोठे पराक्रमी होते, हें माहीत आहेच. १०. वाहुटळीनें. ११. अरण्यांतील वणव्यापासून. उत्प्रेक्षालंकार. १२. मत्त हत्ती. १३. भीम. १४. पृषत्पुत्र, द्रुपद. १५. ब्राह्मणलाला, अर्थात् अश्वत्थाम्याला. १६. मान्य झाले, अश्वत्थाम्याच्या पसंतीस उतरले–असा भाव. १७. ग्रहसमुदायामध्यें, जेंवि रविप्रभावातें (सूर्याच्या तेजाला) कवी (शुक्र) ग्रहवृंदीं (नवग्रहांमध्यें) बहु [मानवे]

जरि सर्वांगीं केले होते गुरुपुत्रशरशतें विद्ध, ।
तरि धर्म, भीम, सात्वत, पार्षत युद्धासि जाहले सिद्ध. ॥ २
पुनरपि वहु युद्ध करी, सात्यकिला सोमदत्त माराया; ।
कीं फार खवळला सुतशोकें तो; भरतसत्तमा ! राया ! ॥ ३
मागें पदहि न घेतां, सात्यकिशर भीमसेनपरिघ[1] सरे. ।
बसतां उरीं शिरीं ते, धैर्यापासूनि धीर परि घसरे. ॥ ४
बाल्हीक वृद्ध; परि बहु मानी, साहेल कां पतन योचें ? ।
कांपे कोपें तों तों, जों जों धरि देह कांप तेनयाचें[2]. ॥ ५
तो काळवर्षिघनसा[3], सात्यकिवरि तीव्र विशिखवृष्टि[4] करी; ।
भीमालाहि न मानी, जैसा हरिला मदांधदृष्टि[5] करी. ॥ ६
शक्तीतें, भीमाच्या वज्रसमोरींहि[6], होय शिरकविता. ।
ती त्याचें[7] कांपवि, जसि आणुनि नेत्रांसि तोय, शिरें, कविता. ॥ ७

तेंवि धर्मादिक वीर विप्रभावातें (अश्वत्थाम्यास) मानवले–असा अन्वय. येथील **उपमा** हृदयंगम आहे. तीवरून सूर्यप्रकाशांत शुक्र दिसूं शकतो, ही गोष्ट पंतांस माहीत होती असें दिसतें. शुक्रासंबंधीं पुढील उतारा वाचनीय आहेः–'सूर्य आणि चंद्र हे जर सोडले, तर शुक्राइतका तेजस्वी तारा सर्व अंतरिक्षांत एकही आढळून येत नाहीं. शुक्र जेव्हां अत्यंत तेजस्वी दिसतो, तेव्हां त्याचें तेज असंख्य ताऱ्यांत जे अत्यंत तेजस्वी तारे समजले जातात त्यांच्यापेक्षांहि ५०।६० पट अधिक असतें ! शुक्राचें तेज इतकें मोठें आहे कीं, कधींकधीं त्याचें चांदणेंही पडतें ही गोष्ट सर्वांस माहीत आहे. भर दुपारींसुद्धां हा ग्रह निरभ्र आकाशांत न्याहाळून पाहिला असतां नुसत्या डोळ्यांनीं देखील कधींकधीं दृष्टीस पडतो.' (अंतरिक्षांतील चमत्कार–पृ० ७७।७८). 'सूर्याच्या प्रकाशास न जुमानतां दिवसासही दिसणारा सर्व ग्रहांत एक शुक्रच [होय].' (कै० वा० शं० बा० दीक्षितकृत 'जोतिर्विलास'–पृ. १६०).

१. परिघ=एक गदेसारखें शस्त्र. २. सोमदत्ताचें. ३. प्रळयकाळीं वर्षाव करणाऱ्या मेघासारखा. ४. बाणवृष्टि. ५. मदानें अंध झाली आहे दृष्टि ज्याची असा गज, हत्ती. ६. वज्रासारख्या कठिण अशा उरांत देखील. ७. त्याचें शिर. जशी कविता (उत्तम काव्य) नेत्रांसि तोय (आनंदाश्रु) आणुनि (उत्पन्न करून) शिर (मस्तक) कांपवी, [तशी] ती (बाल्हीकानें सोडीलेली शक्ती) नेत्रांसि तोय (दुःखाश्रु) आणुनि त्याचें (भीमाचें) शिर कांपवी–असा अन्वय. कल्पनासादृश्यः–(१) 'संधानशक्ति माझी कांपवि तद्धृदय, जेंवि शिर कविता ।(मोरोपंत–उद्योगपर्व–अध्याय १३।७७). (२) पुढें अध्याय २१।७९ पहा. ह्या उद्गारांवरून पंतांची रसिकता आणि मार्मिकता स्पष्टपणें व्यक्त होत आहे. [ह्यासंबंधीं सविस्तर टीप ती० कै० बा० बा० मु०

वृद्धहि महाप्रतापी, बा ! नव्हता तो मनुष्यदेव ढिला. ।
त्या भीम गदेनेंचि स्वर्गति, न धरुनि धनुष्य, दे वडिला. ॥ ८

मस्तक बाल्हीकमहाराजाचें, पांडुसूनु, चेंडु करी. ।
न करिल अपत्य यशवंकिटिसम, पोषुनि पंकिलें कुचें, डुकरी. ॥ ९

तव नागदत्त दृढरथ इत्यादि तनूज धांवले दश; गा ! ।
यश गम तूं, परि गमले ते, त्या भीमाहरीपुढें, शश गा ! ॥ १०

मेले, ज्यां धरुनि, खचरपतिचे, त्या तव कुमार दश, शीला; ।
लाजविति पृथापुत्र स्वयशें, जैसे उमारद शशीला. ॥ ११

भीमानें तव दशसुत दशबाणांनींच जेंवि बा ! वधिले, ।
पांचांनीं पांच शकुनिबंधुहि, जे शतमहारथां-मधिले[10]. ॥ १२

धर्महि बहु कुरुकटकक्षय करित क्रुद्धकाळसा सुटला. ।
तुटला मर्यादावधि, कल्पांतीं नीरनिधि[11] जसा फुटला. ॥ १३

[12]त्यांवरि नृपोक्तिनें, गुरु कन्येनें जेंवि काशिराजाच्या, ।

ओक यांनीं मोरोपंती उद्योगपर्वाच्या तेराव्या अध्यायाच्या ७७ गीतीवर दिली आहे, ती जिज्ञासु रसिकांनीं तेथें पाहावी, अशी सूचना आहे]. ८. उदक.

१. राजा. २. वडिलाला. येथील यमक पंतांच्या आवडीचें आहे. अध्याय २।३१ पहा. ३. यज्ञवराहतुल्य; अर्थात् पराक्रमी. ४. चिखलानें भरलेल्या स्तनानें. ५. पुत्र. ६. अगा राजा. ७. ज्या शीला धरुनि (अर्थात् आपल्या पराक्रमाच्या गर्वामुळें) खचरपतिचे (प्रसिद्ध राक्षसाचे, रावणाचे) कुमार मेले, त्या शीला धरुनि तव दश कुमार मेले-असा अन्वय. ह्या दहा धृतराष्ट्रपुत्रांचीं नांवें:-नागदत्त, दृढरथ, महाबाहु, अयोभुज, दृढ, सुहस्त, विरजा, उग्र, प्रमाथि, व अनुयायी. ८. पार्वतीचे दांत. उपमालंकार. यशाचा रंग शुभ्र असतो, असा कविसंकेत आहे. ९. पांच बाणांनीं. १०. 'ते वधिले' इति शेषः. ११. समुद्र. १२. ज्याच्या शिरा बिका अभयवर दिला त्यावरि, जेंवि काशिराजाच्या कन्येनें भीष्मावरि गुरु, तेंवि गुरु पाठविला-असा अन्वय. गुरु=द्रोणाचार्य; परशुराम. काशिराजाची कन्या=अंबा. कथासंदर्भः-अंबा या नांवाची काशिराजाची ज्येष्ठ कन्या भीष्मानें विचित्रवीर्या-साठीं जिंकून आणिली. परंतु तिचें प्रेम शाल्वराजावर जडलें असल्यामुळें तिला परत पाठविलें. त्यानें अंबा ही पराजिता असल्यामुळें तिचा स्वीकार केला नाहीं. तेव्हां ती परत येऊन 'मला वरा' असें भीष्मास म्हणूं लागली. ती गोष्ट भीष्मानें नाकबूल केली. तेव्हां तिनें परशुरामाकडून आपला अंगीकार करण्याविषयीं भीष्माशीं बोलणें लाविलें. भीष्म परशुरामाचें ऐकेना, म्हणून त्या दोघांचें युद्ध झालें. त्यांत परशुरामाचा पराभव झाला. (हा मनोरम कथाभाग पंतकृत उद्योगपर्व, अध्याय १२-१३, यांत सविस्तर वर्णिलेला आहे).

पाठविला भीष्मावरि, अभयवर दिला जिका शिरा ज्याच्या.॥ १४
वायव्य अस्त्र, वारुण, याम्यहि, आग्नेय, ऐंद्र, गुरु योजी. ।
त्या त्यातें प्रत्यस्त्रें[1] हरुनि म्हणे धर्म, 'अन्यही ये[2]ो, जी !' ॥ १५
मग सावित्र त्वाष्ट्र प्राजापत्यप्रयोगें[3] जो केला, ।
त्यातेंही प्रत्यस्त्रें शमवुनि, निष्कंप नृप पुढें ठेला. ॥ १६
ब्रह्मास्त्रातें योजी, तों ब्रह्मास्त्रेंचि करुनि विस्रंभ या, ।
गर्जे युधिष्ठिरप्रभु, समरीं न धरीच लेश विप्रभया[5]. ॥ १७
सैनिकमुख्य स्तविते झाले गुरुतें, तसेचि शिष्यातें[6]; ।
दे ताप तव सुतातें तो, धर्मोत्कर्ष[7] जेंवि तिर्ष्यातें. ॥ १८
गुरु धर्मातें सांडुनि, पांचाळांचेंचि बहुत कदन करी; ।
ते त्यापुढें न मिरविति गर्व, हरिसमक्ष जेंवि मद न करी[9]. ॥ १९
जैसें पांचाळकटककदन कलशसंभवें[10] स्वयें केलें, ।
तैसेंचि कौरवांचें बळ भीमें अर्जुनें लया नेलें. ॥ २०
भीमार्जुनशरनिकरें, तिमिरें, निद्राभरेंहि, मोहातें ।
पावे[11], भंगे, तव बळ, मरणत्रासें म्हणे, 'नमो' 'हो[12] !' तें. ॥ २१
गुरुनृपवचेंहि कुरुबळ, जेंवि पवननुन्न[13] अभ्र मुरडेना, ।
सेना किति ? पति रक्षाक्षम[14] होतां काय अभ्रमु[15] रडेना ? ॥ २२
कुरुपति कर्णासि म्हणे, 'नाशों देतोसि काय गा ! यश तें ? ।

१. प्रत्यस्त्र=प्रतीकार करण्यासाठीं सोडलेलें अस्त्र. २. येवो. ३. प्रयोग=योजना. ४. निस्तेज, हतवीर्य. ५. द्रोणाचार्यांचें भय. ६. धर्मराजातें. ७. धर्मराजाचा अथवा धर्मकृत्याचा उत्कर्ष. येथील उपमा योग्यच आहे. ८. कलियुगातें. ९. हत्ती. जेंवि हरिसमक्ष (सिंहासमोर) करी (हत्ती) मद न [मिरवी]–असा अन्वय. १०. द्रोणानें. द्रोण हा द्रोणीसंज्ञक यज्ञपात्रांत भरद्वाजरेतापासून उत्पन्न झाला. घृताची नामक अप्सरेला पाहतांच भरद्वाजमुनीचें अमोघ रेत कामविकारानें पतन पावलें, व त्यापासून द्रोणाचार्य झाले. ११. ह्या गीतींत समुच्चयालंकार आहे. १२. 'हातें' असें पाठांतर. १३. वातप्रेरित. १४. पति रक्षाक्षम (रक्षण करण्यास असमर्थ झाला असतां) अभ्रमु रडेना काय ? [मग] सेना किती ? सेनाधिपति सेनेचें रक्षण करण्यास समर्थ नसला तर सेना कशी टिकाव धरणार ?–असा भाव. १५. ऐरावताची स्त्री. हें पंतांचें आवडतें यमक आहे. (वनपर्व–अध्याय १३।७३ पहा).

वेढिलि चमू परबळें, जेंवि वृकांच्या, वनांत गाय, शतें[1]. ॥ २३
दुर्लभयशःप्रद समय हा, न वृथा मित्रवत्सला ! जावा. ।
सन्मैत्रीच्या कासे लागलिया, सुरभिवत्स लाजावा.' ॥ २४
कर्ण म्हणे, 'शक्ति असे कृष्णाद्यखिलाबलाविलापार्था[2]. ।
जिंकिन, रक्षाया जरि येइल वज्री, बलाविला, पार्था[3]. ॥ २५
देतों तुज जय, मारुनि विजयास, अमोघशक्तिनें आजी. ।
करितों तसीच केळी, जसि महिषैवधार्थ[4] शक्तिनें आजी[5]. ॥ २६
अर्जुन मरतां, होतिल वश्य तुला, दीन होउनि अवश्य[6] ।
किंवा पुन्हा वनाला जातिल पांडव जटाधर अवश्य. ॥ २७
असतां कर्ण, व्याकुळ कां ? स्वस्थ, त्यजुनि तूं विषाद, रहा. ।
पांडवबळ किति ? न धरिल, पीतांहि हळाहळा विषा, दर[7] हा[8].॥२८
मज हरिपुढें टिकेल न, पळही, पांचाळवाहिनी कुतरी[9] ।
शिरतां, बुडेल, मद्बळजलधींत, समग्र यदुचमू[10] कुं-तरी. ॥ २९
"[11]देतों, तुलाचि भजतिल, पळही पर, मानदा ! न वसुधेतें. ।
बा ! पावले; करुनिही 'कष्टा परमा[12] न दानव, सुधेतें.' ॥ ३०
हसुनि कृप म्हणे, "कर्णा ! तूं नाथ, म्हणुनि सनाथ हा राजा. ।
तव शब्दचि तेजस्वी; तूं यांसिचें[13] म्हण, 'करा प्रहारा, जा.' ॥३१
करिसी असें विकत्थन[14], परि न पराक्रम दिसे, न फल कांहीं; ।

---

१. लांडग्यांच्या शतें=शेंकडों लांडग्यांनीं. २. कृष्णा+आदि+अखिल+अबला+विलापार्थ=द्रौपदी आदिकरून सर्व स्त्रियांना विलाप करावयास लावणें, हाच जिचा हेतु आहे अशी (शक्ति). ३. पार्था रक्षाया बलाविला (बोलाविलेला) वज्री (इंद्र) जरी येईल [तरी] त्यासी जिंकीन—असा अन्वय. ४. महिषासुराचा वध करण्याकरितां. ५. संग्राम. ६. वश व्हावयाचे नव्हेत ते (पांडव). ७. भय. 'न धरिल, पीतां हाळाहळा विषा' असें पाठांतर. ८. कर्ण. ९. पांचाळसेनारूप कुत्री. १०. यादवसैन्यरूप भग्ननौका. ११. वसुधा देतों—असा भाव. 'देतां' असें पाठांतर. १२. अत्यंत श्रम. पूर्वी अमृताच्या प्राप्तीकरितां देवदैत्यांनीं मंदरगिरीचा मंथनदंड व वासुकी नागाची रज्जू करून क्षीरसागराचें मंथन केलें. तेव्हां त्यांतून चतुर्दश रत्नें निघालीं. त्यांपैकीं विष लोककल्याणार्थ शंकरानें प्राशन केलें व बाकीचीं अमृतादि त्रयोदश रत्नें देवांनीं घेतलीं—अशी कथा आहे. १३. शब्दांस, आपल्या भाषणास. १४. आत्मश्लाघा.

तव [1]निटिलें न विजयलिपि; वरिली पांडवललाटफलकांहीं. ।। ३२
ते ते भंग[3]द जाले, पांडुसुतांसीं रणीं समागम जे; ।
जीभ तुझी, नृपतिपुढें, करिती बहु नववधूसमा गमजे. ।। ३३
गंधर्वें प्र[4]भु धरिला, तेव्हां आधींच कीं पळालास; ।
तें पाप क्षाळाया, तूं दवदहनीं न कां जळालास ? ।। ३४
कर्णा ! उगेंचि कर्णप्रिय बोल वदों नकोच, कीरा ![5] हे ।
उचित न वीरास; तुझी या गोग्रहणीं न कों[6]चकी राहे. ।। ३५
जरि कळलें, एकाही पार्थाचें तेज नां[7]वरायाचें, ।
तरि 'सर्व वधिन' म्हणसी; बुडविसिलचि तेज, नांव, रायाचें. ।।३६
शू[8]र भुजांनीं क्षत्रिय, शब्दांनीं विप्र, पार्थ चापानें, ।
केवळ मनोरथांनीं कर्णा ! तूं शूर, न प्रतापानें. ।। ३७
व्यर्थचि गर्जन करितें तव मुख हें जेंवि शा[9]रदाभ्र महा; ।
वां[10]टे अनर्थक बहुत, वडबडसी जें वि[11]शारदा, भ्रम हा. ।। ३८
अर्जुन वर्जुन, गर्जुन, [12]अर्जुन घे क्षण उगेंच थोरपण. ।
'जिंकिन बृहस्पति,' म्हणुनि करिलचि वा[13]चाट [14]चॉट पोर प[15]ण.।। ३९
तदधिक कवण ? सुखविला हर जेणें, करुनि अतिसमरयज्ञ. ।
कैंचा श्रेष्ठ मग ख[16]ग ? त्रिजगींहि न पक्षिपति[17]सम र[18]यज्ञ. ।। ४०
त्या कृष्णसारथिपुढें होशिल मूक, न ज[19]राक ब[20]कशील; ।
कीं गरुडशील[21] तो, तूं सूता ! केवळ व[22]राक ब[23]क-शील." ।। ४१

---

१. कपाळानें, दैवानें. २. पांडवांच्या ललाटप्रदेशांनीं (दैवांनीं). ३. [कौरवांस] पराजय देणारे. ४. दुर्योधन. घोषयात्राप्रसंगीं चित्रसेन गंधर्वाशीं जें युद्ध झालें, त्यांत कर्णास पळून जावें लागलें होतें. (मोरोपंत–वनपर्व–अध्याय ७ पहा). ५. पोपटा. ६. पगडी, मोरोपंतकृत विराटपर्व–अध्याय ३ पहा. ७. न आवरायाचें. पार्थ=पृथापुत्र, कुंतीचे पुत्र (पांडव). ८. ह्या गीतींत **परिसंख्या** नामक अलंकार आहे. ९. शरदतूंतील मेघ. १०. जें तूं बहु अनर्थक बडबडसी तें विशारदा (शहाण्यास) हा भ्रम [आहे असें] वाटे– असा अन्वय. ११. शहाण्यास. १२. संपादून. येथील शब्दांची पुनरावृत्ति मराठी कवींची लाडकी दिसतेः–'अर्जुन वर्जुन देह विसर्जुन वाटे मजला मृत्यु बरा.'[काशीकवि]. १३. वाचाळ. १४. चाहटाळ. १५. प्रतिज्ञा. १६. पक्षी. १७. गरुडतुल्य. १८. वेगवान्. १९. अल्पहि. २०. बडबडशील. २१. अर्जुन. २२. नीच. २३. बकपक्षिसदृश, बगळ्यासारखा.

कर्ण म्हणे; "घन गर्जेति समयीं, तैसेचि सर्व योध रणीं ।
करणी करूनि दाविति. म्हणत्ये, 'तें फलद पर्व यो,' धरणी. ॥ ४२
उत्साहें वीरांहीं, करुनि विकत्थन यथेष्ट गर्जावें. ।
फल न दिसतां बुधांहीं काय प्रारंब्धकर्म वर्जावें ? ॥ ४३
द्रवतेंचि दैव, असतां निश्चय, नसतां मनांत निर्वेद. ।
तूं द्विज आम्हांत तसा, जैसा वैदिकजनांत निर्वेद. ॥ ४४
दैवें न पावले, रणरंगीं, बहुबळहि, काय नाश तसे ? ।
त्यां पांडव वधिले तरि, यांत तुझें सांग काय नाशतसे ? ॥ ४५
न वृथा गर्जेति शारदवारिदसे रणमखांत शूरवर. ।
विप्रा कृपा ! पहावें ऐसें दवडूनि दृष्टि दूरवर. ॥ ४६
गर्जेति पंडित निज बळ समजुनि; तूं वदसि, न समजोनीच. ।
वीराशयासि वीरचि समजे, नुमजेचि, न सम जो नीच. ॥ ४७
मी 'मारिन कृष्णार्जुन,' ऐसा उत्साह मानसीं धरितों; ।
म्हणुनि द्विपयूथपवधकामुक हरिसाच गर्जना करितों. ॥ ४८
सानुगें सकृष्ण पांडव मारुनि, देइन सुयोधना वसुधा. ।
हें गर्जनफळ पाहें, म्हणतिल माझें, सुयोध, नांव सुधा." ॥ ४९
गौतम[११] म्हणे, "तुझें हे, न ग्राह्य, मनोरथप्रलाप मला. ।
गमला कृष्ण प्राकृत; धर्महि, ज्या, स्पष्ट तो पशु भ्रमलो[१२]. ॥ ५०
कृष्ण श्रितांसि सकळें कल्याणें करुनि दे वशें, समज. ।
श्रीसी म्हणे जयश्री, 'काय वरिल,' भरुनि देव शेंसें[१३], 'मज ?'५१

---

१. धरणी म्हणते–असा अन्वय. 'म्हणती' असें पाठांतर. २. जल्पन. ३. आरंभिलेलें कार्य. ४. कंटाळा. ५. वेदाध्ययनहीन. ६. हत्तीच्या कळपाचा जो मोहोरक्या, त्याच्या वधाची इच्छा धरणाऱ्या सिंहाप्रमाणें. ७. स+अनुग=अनुचरांसह. ८. पृथ्वी. ९. 'गर्जित-फळ' असाही पाठ आहे. १०. सुयोध (उत्तम योद्धे) माझें नांव सुधा (अमृत, अमृतोपम) [आहे असें] म्हणतिल. ११. कृप. १२. भ्रमलेला, डोकें फिरलेला. १३. कुंकुमाक्षतांचा कपाळीं लेप करितात ती शेंस. देव शेंस भरुनि, 'मज वरील काय ?' [असें] जयश्री श्रीसी (लक्ष्मीस) म्हणे–असा अन्वय. जयश्री कृष्णास माळ घालण्यास उत्सुक आहे, असा भाव. पांडवांचा जय होणार असें पर्यायानें ध्वनित केलें आहे, म्हणून पर्यायोक्तालंकार.

श्रीकृष्णार्जुन जेथें, तेथें सादर सदैव जय नांदे; ।
राजर्षिधर्म विस्मय देवर्षिमहर्षियोगिनयनां दे. ॥ ५२
भीम नकुळ सहदेव ख्यात सकळ साधुशूरजन–महित; ।
यांचे संबंधीही **शक्रसम द्रुपदमत्स्यपतिसहित;** ॥ ५३
त्यांतें जिंकाया तूं बहु हुटहुटलासि; योग्य अनय न हा. ।
लावूनि सनयनासीं स्पर्धा, न म्हणेल काय अनैयन[3] 'हैं !' ?" ॥ ५४
कर्ण म्हणे, "जरि **पांडव** दुर्जय, तरि **शक्रदत्तशक्तीनें** ।
अर्जुन वधिन; न मथिला तो[6] काय तसाहि मत्त शक्तीनें[7]?' ॥ ५५
त्याविण **कृष्ण, युधिष्ठिर,** तदनुज[8], सुसमर्थहि, तरि पोकळ; तो ।
न **कुरूत्कर्ष[9]** तुज रुचे, आशय शब्देंचि हितें[10] रिपो ! कळतो. ॥ ५६
न रणा तूं योग्य; म्हणुनि 'हा ! **केशवसारथे[11]** !' रडायास. ।
कांय भिवविशिल, देउनि हाके, शवसार[12] थेरडा[13], यांस[13] ? ॥ ५७
अप्रिय वदसिल पुनरपि तरि, खड्गें करुनि जीभ कापीन. ।
सुकृतचि हें;[14] कीं कोणी निंदकसा त्रिभुवनांत पापी न. ॥ ५८
दैवचि कारण, **भी**ष्मप्रमुखमहावीरदेहपतनाचें. ।
अधमा **कृपा** ! नृपाच्या, होउनि, अहितस्तवीं[15]; न, रत, नाचें." ॥ ५९
अश्वत्थामा धांवे **कर्णा**वरि दिव्य खड्ग उपसून, ।
तक्षक जेंवि डसाया मर्मीं, दंष्ट्रा समूळ खुपसून. ॥ ६०
त्यासि म्हणे, 'यां[16] सिंहां[16] बोलावे बोल हे तुवां कोल्यां[17] ! ।
मारुतिशिं माकडानें दाखविल्या स्वांतहेतु[18] वांकोल्या. ॥ ६१

---

१. भगवद्गीतावचनही असेंच आहेः–'यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः । तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥' [अध्याय १८।७८]. २. उत्कंठित झालास. ३. अंध. ४. हाय हाय. ५. इंद्रानें दिलेल्या शक्तिनामक अस्त्रानें. मागें अध्याय १५ गीति १५ वरील टीपा पहा. ६. महिषासुर. ७. देवीनें. ८. धर्मराजाचे लहान भाऊ. ९. कुरु+उत्कर्ष=कौरवांची वृद्धि. १०. हितशत्रो. ११. 'हा अर्जुना !' असें म्हणून रडायाला योग्य आहेस. १२. प्रेतासारखा म्हातारडा (कृप). १३. या कर्णाला, मला. १४. जिभेचें छेदन. १५. शत्रूंच्या स्तुतींत. अधमा कृपा ! नृपाच्या अहितस्तवीं रत होउनि, न नाचें–असा अन्वय. १६. अश्वत्थाम्याला. १७. कोल्ह्या ! १८. स्व+अंत+हेतु=आपल्या मरणास कारण असा.

वदतां प्रभुपांडवगुण, ईश्वरसम, वेदसमहि मामातें[1], ।
निंदिशि; सत्पुरुषाचा, दुष्टा ! दूषूनि, न, महिमा, मातें[2] ? ॥ ६२
केला जयद्रथाचा, जिंकुनि तुज, अर्जुनें, वध मघासीं. ।
सन्मान्य तो गणावा दशदर्भीं[3], सूत तूं अधम घांसीं[4]. ॥ ६३
युद्ध हरासीं केलें; त्वां आयकिलें न काय मत्ता ! तें ? ।
तूं मारिशील त्याला, न अतिक्रमिलें जयासि मत्तातें[5] ? ॥ ६४
जें जय[6] जाणे, त्याचा न शतांशहि तुज कळे वराकास[7]. ।
घालिसि, भस्म कराया, पार्थशरें, निज कलेवरा, कास[8]. ॥ ६५
हित कथित्या आप्ताची, नीचा ! म्हणतोसि 'जीभ कापीन'. ।
तरि वधिन तुला; दे विष विषकामा सुरभिचेंहि[9] आपीनें. ॥ ६६
हा उडवितों, तुझी मी, बकऱ्याची जेंवि, शीघ्रतर मुंडी.' ।
ऐसें बोलुनि देता झाला गुरुपुत्र शीघ्र तरमुंडी[10]. ॥ ६७
'हां हां' म्हणे सकृप[11] कृप; नृप, कृपण जसें धना तसें, धरि त्या. ।
कीं गतसारा[12] सरिता तेंवि, पडाव्या स्ववाहिनी[13] न रित्या. ॥ ६८
कर्ण म्हणे 'सोड नृपा ! योग्यचि हा होय शासना, सत्य. ।
द्विजमदगद[14] शमवु सखा[15], जोडुनि या हो ! यशास, नासत्य[16].' ॥ ६९
द्रौणि म्हणे, 'कुमति तुला[17], तैसी आम्हांसि न क्षमा सोडी; ।

---

१. कृपातें. २. सत्पुरुषाचा महिमा दूषूनि, दुष्टा ! मातें न (उन्मत्त होऊं नको)–असा अन्वय. ३. दशदर्भ (?) ४. गवतांत. ५. मत्+तातें=माझ्या पित्यानें (द्रोणानें). ६. अर्जुन. ७. नीचास. ८. कास घालिसी=कंबर बांधिसी, सज्ज होसी. ९. कामधेनूची कास. विषकामा=विषाची इच्छा करणारास. १० मसांडी. ११. सदय. १२. निर्जला. १३. आपल्या सेना. १४. अश्वत्थाम्याचा गर्वरूप रोग. १५. कर्ण. १६. अश्विनीकुमार. हो (अहो !) या यशास (अश्वत्थाम्याचा वध केल्यामुळें प्राप्त होणाऱ्या यशास) जोडुनि (मिळवून) नासत्य [रूपी] सखा (मित्र, कर्ण) द्विजगदमद शमवू–असा अन्वय. नासत्य=अश्विनीकुमार. वडवा (अश्विनी) रूपधारिणी सूर्यपत्नी संज्ञा (त्वाष्ट्री) हिला अश्वरूपधर सूर्यापासून झालेल्या दोन पुत्रांस अश्विनीकुमार असें म्हणतात. यांतील ज्येष्ठाचें नांव नासत्य व कनिष्ठाचें दस्र. हे देवांचे वैद्य होत, म्हणून यांस 'स्वर्वैद्य' अशी संज्ञा आहे. रोगाचा बीमोड करण्यास वैद्यराजच पाहिजे. रूपकालंकार आहे. १७. [जैसी] तुला कुमति [न सोडी] तैसी आम्हांसि क्षमा न सोडी–असा अन्वय.

मोडील अर्जुन तुझ्या, दक्षाच्या वीरभद्र[1]सा, खोडी.' ॥ ७०
भूप म्हणे, 'गुरुपुत्रा ! क्रोध त्यजुनि, प्रसन्न हो; पावें; ।
सर्वांहीं एकमतें जोडुनि, यश, मज तुम्हींच ओपावें'. ॥ ७१
कृपहि विनवितां, होउनि मृदु, कर्णाला म्हणे, 'तुझा गर्व ।
सर्व श्वेताश्व हरिल, त्या खलरतिजानि[2]चा जसा शार्व[3]. ॥ ७२
द्रौणिकृपांतें जोडुनि कर, जों यत्नें नरेंद्र समजावी, ।
तों ये युधिष्ठिरचमू, जी लंघुनि सिंधु, कीर्तिसम, जावी. ॥ ७३
कर्ण पुढें होय; तया पाहुनि ते वीर म्हणति, 'या कलहा ।
जो हेतु, नीच दुर्मति दुर्जन दुर्योधनाप्त, तो खल हा[4]. ॥ ७४
मारा, घ्या, कोठें हा ? पाडा तोडूनि, हूं ! करा चूर्ण.' ।
ऐसें गर्जुनि, पांडव-सृंजय-पांचाळ धांवले तूर्ण[5]. ॥ ७५
त्यां सर्वांसहि ताडुनि भग्न करी, जेंवि वात मेघांस. ।
त्या काळमुखीं पडला पांडवभटसंघ तो गमे घांस[6]. ॥ ७६
अर्जुन धांवे कोपें, रोपें[7] त्याच्याहि तो[8] करा ताडी; ।
नाडी करूनि विकळा, पळभरि गांडीवचापही पाडी. ॥ ७७
धरि कोप अजितसारथि[9], वाटे आतांच नागविल याला. ।
गरुडातिक्रम[10] करितां पावेल कसा न नाग विलयाला[11] ? ॥ ७८

---

१. शिवाच्या जटेपासून उत्पन्न झालेला देवविशेष. दक्षप्रजापति हा शंकराचा सासरा. त्यानें शंकरपार्वतींस त्याच्याकडे सुरू असलेला यज्ञसमारंभ पाहण्यास बोलाविलें नाहीं. परंतु चुकीनें आपल्यास बोलवायाचें राहिलें असेल, असें समजून तीं दोघें यज्ञ पाहावयास गेलीं. तेथें दक्षानें त्यांचा अपमान केला. तेव्हां शंकरानें आपल्या वीरभद्र नामक पार्षदाकडून यज्ञाचा नाश करवून दक्षाचा वधही करविला, अशी कथा आहे. २. दुष्ट मदनाचा. (पृष्ठ २४० टीप १० पहा). ३. शिव. ४. कर्ण. ५. सत्वर, लौकर. ६. तो पांडव भटसंघ त्या काळाननांत घांस पडला [असें] गमे–असा अन्वय. त्या कर्णरूपी यमाच्या तोडांत तो पांडवपक्षीय योद्ध्यांचा समुदाय हा घांस (ग्रास) च पडला कीं काय असें वाटलें. प्रथमार्धांत उपमा व उत्तरार्धांत उत्प्रेक्षा आहे. येथें 'घांस' शब्दावर 'तृण' अशी आदर्शप्रतींत टीप होती. ती आम्हास प्रशस्त वाटत नाहीं कारण येथें 'अग्नि–तृण' अशी जोडी नाहीं. आमच्या मताच्या पुष्टीकरणार्थ अध्याय १६ गीति ६८ पहावी, अशी विनंति आहे. ७. बाणानें. ८. कर्ण. ९. अजित (कृष्ण) आहे सारथि ज्याचा तो (अर्जुन). १०. गरुड+अतिक्रम=गरुडाचा अपराध. ११. नाशाला.

झालें तसेंचि, राया ! केला विरथ क्षणांत तो मानी[1]. ।
त्यजिला असताचि, करुनि तदवनपण[2], शक्रसूर्यसोमानीं. ॥ ७९
कर्ण कृपरथीं चढला, पार्थापासूनि फार तो भ्याला; ।
कीं त्यासि यशाहुनि बहुमत जीवित, जेंवि वित्त लोभ्याला. ॥ ८०
धांवे धनंजयावरि दुर्योधन मित्र[3]परिभवक्षोभें. ।
तों कृप [4]भौच्याशि म्हणे, 'प्रभुला रक्षूनि सयशें शोभें.' ॥ ८१
[5]आटोपुनि गुरुपुत्र प्रभुसि, म्हणे, ऐक [6]भविकवच 'न रहा ।
विजयापुढें'. म्हणेलचि, अंगीं घालुनिहि [7]पविकवच नर 'हा!' ॥ ८२
असतां सजीव मी, तुज योग्य नव्हे अर्जुनासवें युद्ध; ।
[8]वारुनि किरीटिला, यश, द्याया तुजलाचि, जोडितों, शुद्ध.' ॥ ८३
भूप म्हणे, 'शक्ति असे, परि न म्हणसि, 'अर्जुनासि मारीन.' ।
स्नेह मनीं आहे तो न म्हणों दे, म्हणुनि म्हणसि 'वारीन.' ॥ ८४
आचार्य पुत्रवत् परिरक्षण करितो रणांत म[9]दरींचें. ।
तूंही सांडों देसी पुण्य यशोधन बळेंचि पदरींचें. ॥ ८५
नकळे, करिसी तूं [10]ममशत्रूपेक्षा रणांत, धर्माच्या. ।
प्रेमें, कीं कृष्णेच्या, कीं [11]मांद्यें आमुच्याचि कर्माच्या. ॥ ८६
करिते, प्रवाहमिलिता गंगा[12], मलिनाहि, धौत[13], मीना कीं. ।
सत्संगति [14]श्रितां तसि अदिति[15]सखी होउ गौतमी[16] नाकीं.' ॥ ८७
द्रौणि म्हणे, 'सत्य वदसि, पांडव आम्हांस फार आवडती. ।

---

१. गर्विष्ठ (कर्ण). २. तत्+अवन+पण=कर्णरक्षणाचा पण. ३. मित्र (कर्ण) याच्या पराभवानें संताप पावून. ४. अश्वत्थाम्यास. प्रभु=राजा, दुर्योधन. ५. आवरून धरून. ६. कल्याणदायक भाषण. ७. वज्रासारखें अभेद्य कवच. विजयापुढें [युद्ध करण्यासाठीं उभा] न रहा, [कारण] पविकवच घालुनि नर (वज्रासारखें अभेद्य कवच घालून युद्धास सज्ज झालेला पुरुष) 'हा !' म्हणेलचि–असा अन्वय. काव्यलिंगालंकार. ८. किरीटिला वारूनि, तुलाचि द्याया, शुद्ध यश जोडितों–असा अन्वय. ९. मत्+अरींचें=माझ्या शत्रूंचें (पांडवांचें). १०. माझ्या शत्रूची उपेक्षा. ११. मंदपणानें, कमजोरपणानें. १२. 'प्रवाह मिळतां गंगा' असें पाठांतर. १३. स्वच्छ. मलिनाही मीना धौत करिते–असा अन्वय. १४. आश्रितास. १५. गौतमी अदितीची बरोबरी करो–असा भाव. अदिति ही आदित्यसंज्ञक बारा देवांची माता. १६. अश्वत्थाम्याची आई. नाकीं=स्वर्गांत.

सन्मति गुरुसि बहुमता, जैसी रामेश्वरासि कावड ती[1]. ॥ ८८
त्यांसि द्रोण बहु प्रिय जैसा, तैसाचि मीहि कुरुपा ! हें ।
काय प्रेम वदावें ? [2]तनु-जीव तसे, सुशिष्य—गुरु, पाहें. ॥ ८९
परि त्यांहीं, आम्हीं, त्या प्रेमासि रणांत सोडिलें पाणी. ।
करितों तुझेंचि, जैसें करिती, विधिचेंचि, [3]शासन, प्राणी. ॥ ९०
कर्णादि सर्व आम्ही, नित्य यथाशक्ति, करितसों युद्ध. ।
काय करावें ? दुर्जय धर्म; त्रिजगीं तसा नसे शुद्ध. ॥ ९१
[4]प्रकृतिकुटिल, [5]पापाचल, खल तूं; मानिसि तसेंचि अन्यासी; ।
पाहे जडरूपचि जड, तें सर्व ब्रह्मरूप [6]संन्यासी. ॥ ९२
शिरतों पांडवकटकीं, शिरला एकार्णवीं जसा कोल[7]. ।
जातों युद्ध कराया; शत्रुशर बरे, न हे तुझे बोल. ॥ ९३
सृंजयपांचाळकटक आजि स्वरुधिरनदींत वाहेल. ।
पाहेल धर्म अश्वत्थाममय सकळ, सचिंत राहेल.' ॥ ९४
ऐसें बोलुनि गुरुसुत, गांठुनि पांचाळसोमकांस वदे, ।
'हूं वर्षा शस्त्रांहीं; घ्यावे सोडूनि सोम[8], कां सवदे[9] ?' ॥ ९५
स्वीकारी [10]घनतेला [11]परनिकर, द्रोणतनय [12]नगतेला. ।
कीं शोभाया अयशा भी सुकुलज, जेंवि [13]जडित [14]नग तेला. ॥ ९६
परदलनीं द्रौणि गमे, घननिकरीं निकर तो [15]मरुत् रचितो, ।
कीं करितो [16]शरदहनीं पांचाळत्रिपुरहोम रुद्रचि तो. ॥ ९७
तों धृष्टद्युम्न म्हणे, 'कथिला तुज धर्म काय हा तातें ? ।
दुष्टा ! दुर्बल[17]दलनें फळ आलें सांग काय हाता तें ? ॥ ९८

---

१. गंगेची कावड. २. 'तनुजीवितसे' असें पाठांतर. ३. आज्ञा. ४. स्वभावतः कपटी. ५. पापाचा पर्वत. 'आपल्यावरून जग ओळखावें' अशी म्हण आहे. तिचें स्मरण येथें होतें. ६. [जें] जड (मंदबुद्धी, मूर्ख) जडरूपचि पाहे, तें सर्व संन्यासी ब्रह्मरूप पाहे—असा अन्वय. ७. यज्ञवराह. ८. अमृत. ९. इतर क्षुद्र पदार्थ. सोम (अमृतकर चंद्र) सोडुनि सवदे कां घ्यावे ? अर्थात् घेऊं नये. त्याप्रमाणेंच युद्ध करून यश मिळवावयाचें तें सोडून बडबड करण्यांत अर्थ कोणता ?—असा भावार्थ. १०. मेघपणाला. ११. शत्रुसमूह. १२. पर्वतपणाला. १३. जडावाचा. १४. अलंकार. १५. वायु. १६. बाणरूप अग्नींत. रूपकालंकार. १७. 'दुर्बलदलनीं' असें पाठांतर.

अससील शूर तरि ये, चापीं शर शीघ्र जोडुनी [1]मीड. ।
कविनें कविराजाशीं सांगावा वाद, सोडुनी मीडे.' ॥ ९९
ऐसें बोलुनि हाणी द्रौणिप्रति [2]अतितरोग्ररोपांनीं. ।
गुरुसुत म्हणे, 'रहा, [3]पद देववितों [4]मृत्युमार्गसोपानीं.' ॥ १००
[5]खरतरवरशरविद्ध द्रुपदसुत म्हणे तयासि, 'हा मूढा ! ।
कशि आयकिली नाहीं, काय [6]मदुत्पत्तिची कथा गूढा ? ॥ १०१
आधीं मीं द्रोणाला, मग मारावें तुला असें आहे. ।
हा हेत पित्याचा हे भुज पुरवितिल; न विलंब [7]यां साहे. ॥ १०२
[8]धर्मी करिसी द्वेष, प्रेमा दुर्योधनीं खळीं अधर्मी; ।
त्यजिलें [9]स्वकर्म, ऐशा भ्रष्टाचा कां करूं नको वध मीं ?' ॥ १०३
अश्वत्थामा कोपें[10] [11]लक्षीकृतकाम [11]रुद्रसा पाहे. ।
गमले नसतिल लक्ष्मण[12]घनरवसे कां [13]मरुद्रसापा हे ? ॥ १०४
स्नात [14]क्षतजें झाले, आयकिलाही न हा निकर वीरें. ।
पळसें वरिलि, वरावी कां न, असुनि हीन, [15]हानि, [16]करवीरें? ॥ १०५
त्यां दोघांतें युद्धीं मानवले अर्जुनादि भट सारे. ।
सुर वदले, 'दाखवितो रंगांत नटासि नृत्य नटसा रे !' ॥ १०६
एक मुहूर्त महारण झाला; मग मोह तो, जसा बोधें, ।
क्रोधें केला भग्न, द्रोणाचार्यात्मजें महायोधें. ॥ १०७
केला रथिशतकाचा बाणांच्या, एकवेळ विलय, शतें. ।
तुमच्या कटकीं, ऐसें द्रौणिविना कोण मेळविल यश तें ! ॥ १०८
वधिलें [17]महारथत्रय मग गुरुपुत्रें शरत्रयेंचि रणीं. ।
द्रौणिशिरीं तेज अहितहर, रविच्या तिमिरहर जसें किरणीं. १०९

---

१. संकोच. २. अतितर+उग्र+रोप=अत्यंत कठिन बाण. ३. स्थान, जागा. ४. मृत्यूच्या मार्गांवरील जिन्यामध्यें. 'रहा क्षण, पाठवितों' असा पाठभेद. ५. अत्यंत प्रखर अशा श्रेष्ठ बाणांनीं विद्ध असा धृष्टद्युम्न. ६. मत्+उत्पत्तिची=माझ्या उत्पत्तीची. पुढें अध्याय १८ गीति १० वरील टीपा पहा. ७. या बाहुंस. ८. धर्मराजाचे ठायीं. ९. ब्राह्मणानें करावयाचें जें कर्म तें. १०. 'कोपे' असा अन्यपाठ. ११. मदनावर ज्यानें लक्ष (नेम) धरलें आहे अशा रुद्रासारखा. १२. लक्ष्मण व इंद्रजित् यांसारखे पराक्रमी प्रतिस्पर्धी. १३. मरुत्+रसा+प=देवेंद्र. १४. रक्तानें. १५. शोभेचा उणेपणा. १६. कण्हेरपुष्पानें. १७. तीन महान् पराक्रमी योद्धे.

केला बहु पांचाळक्षय हरिसारथिसमक्ष[1] खवळून; ।
हतशेष बहु पळाले[2] त्या विरथद्रुपदसूनुजवळून[3]. ॥ ११०

अध्याय अठरावा.

न धरिति, भीम धनंजय, येतांही द्रोण जवळ, लेखा[4] ते; ।
गमले विश्वप्रळयीं काळांतक[5] जेंवि खवळले खाते[6]. ॥ १
गमला, शिरतां पांडवसैन्यसमुद्रांत, मत्त मगर मला. ।
सात्यकिशरदर्शितपथसद्गतिशीं[7] सोमदत्त मग रमला. ॥ २
कुरुवृद्धवधक्रोधें बहु कौरवयोध धांवले शर्मना[8]. ।
सात्यकि न स्पर्शों दे तदिषु, तसा भीरुभावलेश[9] मना. ॥ ३
शक्राचा रुद्र जसा, सात्यकिचा धर्म होय कैवारी. ।
विघ्नें विघ्नेश्वरसा, कौरवकटकें पळांत कै[10] वारी. ॥ ४
कुरुबळ मथितां धांवे धर्मावरि तो सुशिष्यनाकद्रु[11]. ।
प्रसवे तच्चापलता बाणगणा, जेंवि दुर्जना[12] कद्रू[13]. ॥ ५
धर्म न साहे, समरीं द्रोण स्वध्वजधनुष्य खंडी तें; ।
तो बाणसहस्रीतें योजी, देवेशें[14] जेंवि चंडीतें. ॥ ६
त्या बाणसहस्रीनें गुरु केला विकळ, दोन घटिका, हो ! ।
सावध होऊनि म्हणे, 'प्रेमा होइल जनांत लटिका हो[15].' ॥ ७
योजी अजातरिपुवरि[16] वातास्त्रातें रणांत तो विप्र[17]; ।
त्याचें स्तंभन[18] धर्म प्रत्यस्त्रें-करुनियां करी क्षिप्र. ॥ ८
तों कृष्ण म्हणे, 'धर्मा ! गुरुसीं रण तूं करूं नको, परत. ।

१. अर्जुनासमक्ष. २. 'पळालें' असें पाठांतर. ३. रथहीन अशा धृष्टद्युम्नाजवळून. ४. गणना, पर्वा. ५. काळ+अंतक. ६. खाणारे. ७. सात्यकीच्या बाणांनीं दाखविलेल्या मार्गांतील सद्गतीला. ८. मरणार्थ. ९. भीतीचा अल्पांश. १०. कित्येक. 'तैं' असें पाठांतर. ११. सुशिष्य+नाक+द्रु=उत्तम शिष्यांस कल्पद्रुम असा द्रोण. १२. सर्पजना. १३. सर्पमाता. १४. देव+ईश=शिव. महादेवानें महिषासुराच्या वधाकरितां चंडीदेवीची योजना केली, व तिच्या हातून त्यास मृत्यु आला, अशी कथा आहे. १५. होवो. १६. धर्मावर. १७. द्रोण. १८. अवरोध.

जपतो नित्य तुला हा, त्वद्द्रुहणीं पण करून, कोपरत. ॥ ९
योचा अंतक धृष्टद्युम्न; उद्यां यासि तोचि मारील. ।
त्यावांचुनि यासि रणीं साक्षात् पविपाणिही न वारील. ॥ १०
राजानें राजासीं भांडावें, तेंदितरांस वैरजावें. ।
त्वां हे सेना घेउनि राजाधृतराष्ट्रसूनुवर जावें. ॥ ११
भीमार्जुन कौरवबळ वधितिल, यांला सहाय मी आहें. ।
परकटक मुखीं भरिलें काळाजगरें, करूनियां आ हें. ॥ १२
ऐसें हित सांगे, जो मधुकैटभसंकटीं अजा तारी. ।
देउनि मान प्रभुला, गेला भीमाकडे अजातारी. ॥ १३
पूर्वी जेंवि सुरचमू भ्याली, पाहोन अंधका, रांती ।
कौरवपांडवसेना भ्रमली पाहोन अंधकारा ती. ॥ १४
दुर्योधनें विनविले धरिती बहु दीपिका पदात रणीं; ।
गमलें, दीपमिषें, सुतमित्रार्थ प्रगटला तदा तरणी. ॥ १५
नारदपर्वतवचनें दिग्देवी, अप्सरा, भुजग, यक्ष, ।
दीप धरिति विद्याधर, गंधर्व, सुरर्षिही, बहुत लक्ष. ॥ १६
पांडवकटकींहि धरिति सर्वहि पादात सुजन दीपातें. ।

---

१. तुला धरण्याविषयीं. (अध्याय १ गीति ४५ पहा). २. द्रोणाचार्याचा. द्रोणाचार्यांनीं द्रुपदराजाचा अपमान केला होता. या अपमानाबद्दल सूड उगविण्याकरितां द्रुपदानें तपश्चर्या केली व अग्निकुंडांतून द्रोणाला मारणारा पुत्र (धृष्टद्युम्न) मिळविला. अशा रीतीनें धृष्टद्युम्नाचा जन्म द्रोणवधाकरितांच झाला होता. ३. वज्रपाणी, इंद्रही. ४. तत्+इतर=राजाहून इतरांस. ५. वर्जावें, चुकवावें. ६. काळ+अजगरें. ७. ब्रह्मदेवास. कथासंदर्भः—एकदां विष्णु निजला असतां, त्याच्या कर्णमलापासून मधु आणि कैटभ या नांवाचे दोन दैत्य (असुर) उत्पन्न झाले. ते उत्पन्न होतांच विष्णुनाभिकमलस्थ अजाला (ब्रह्मदेवाला) मारण्यास सिद्ध झाले. तेव्हां तो फार घाबरून गेला. यामुळें त्याचें कमल कंपित होऊन भगवंताची निद्रा भग्न झाली व ते जागृत झाले. नंतर ह्या दोघां दैत्यांना विष्णूनें मारिलें. (महाभारत—वनपर्व—अध्याय २०३, सप्तशती—अध्याय १ व देवीभागवत—स्कंध १ अध्याय ४–९ यांत ही कथा आहे). ८. अजात+अरि (शत्रु)=ज्याला शत्रु जन्मला नाहीं असा (धर्म). ९. अंधकासुरास. १०. रात्रीच्या वेळीं. ११. पदाति, पायदळ. १२. आपला सुत (पुत्र) जो कर्ण त्याच्या मित्रा (दुर्योधना)साठीं. उत्प्रेक्षालंकार.

कोण[1] न देइल समयीं असतां, श्रमत्यास, भुज, नदीपातें ? ॥ १७
दीपक सुगंधतैलें क्षितिगगनतळीं अनंत पेटविले. ।
स्वभर[2] उणा करित्यांतें सुमणि अनंतेंचि[3] काय भेटविले ? ॥ १८
प्रतिगज सप्त, प्रतिरथ दश दीप, प्रतिहयास एक रणीं; ।
ऐसी अचाट यांची, लोकीं कोणासही न ये, करणी. ॥ १९
व्यूह रचुनि, बंधूतें सांगे, व्हायास यश, सुयोधन हो ! ।
'यत्नें[4] गुरु रक्षा हा, द्रुपदसुतालाचि[5] वश सुयोध[6] न हो. ॥ २०
धृष्टद्युम्ना गुरुसुत, कर्ण जया[7], भस्म करिल रोपांनीं[8]; ।
भीमा मी मर्दिन, मग मारावे शेषशत्रु[9] गोप्तांनीं[10]. ॥ २१
गुरुसचि रक्षा, म्हणजे विजयश्री निश्चयेंचि मज वरिल. ।
रविवरिल घनपटलसें, सर्वहि संकट टळेल मजवरिल[11].' ॥ २२
गुरुचक्रगोप[12] होउनि, कृतवर्मा, शल्य, यत्न हे मानी ।
करिती बहु; कीं शोभा सुयशांनीं, ती न रत्नहेमानीं. ॥ २३
धर्महि, 'गुरुलाचि वधा,' ऐसी आज्ञा करूनि सैन्यातें, ।
धांवे आपणहि, यशें जो दे साधारणत्व वैन्यातें[13]. ॥ २४
कीं[14] तो, झाला तुमच्या[15] तनयांचा[15], विप्र, कारभारी हो ! ।
केले तुम्ही, धरुनि पथ अनयाचा, विप्रकार[16] भारी हो ! ॥ २५
केला धर्म विरथ; कृतवर्म्यानें खंडिलेंहि कवच रणीं. ।

---

१. नदीपातें (नदींत पडल्यामुळें) श्रमत्यास, समयी असतां (त्या वेळीं तेथें हजर असून), कोण भुज न देईल (हात कोण देणार नाहीं, मदत कोण करणार नाहीं बरें)?–असा अन्वय. २. आपला भार. पृथ्वीस शेषाच्या मस्तकाचा आधार आहे, अशी समजूत आहे. तेव्हां पृथ्वीवरील दुर्जनांचा संहार होऊन आपला भार हलका व्हावा, असें शेषास वाटणें साहजिकच आहे. ३. शेषानें. सर्पांच्या मस्तकांत देदीप्यमान मणि असतो, अशी समजूत आहे. उत्प्रेक्षालंकार. ४. 'यत्नें गुरु रक्षावा' असें पाठांतर. ५. धृष्टद्युम्नालाचि. ६. उत्तम योद्धा, द्रोण. ७. अर्जुनास. ८. बाणांनीं. ९. अवशिष्ट शत्रु. १०. गुराख्यांनीं. ११. माझ्यावरचें. १२. गुरूच्या रथाच्या चाकांचे रक्षक. १३. वेनपुत्र पृथुराजातें. ह्यानें पृथ्वी विषम होती ती सम केली. धर्म दुर्जनरहित पृथ्वी करणार, म्हणून दोघांमध्यें साम्य आहे. १४. कारण. धर्मराजानें 'द्रोणाचार्यांस वधा' अशी आज्ञा कां दिली, त्याचें कारण पंत सांगतात. १५. तूं धृतराष्ट्र) त्याच्या पुत्राचा (दुर्योधनाचा). १६. विपरीताचार.

[1]तें सर्व भस्म करिता, परि [2]त्याची बहुत भक्ति तव चरणीं. ॥ २६
शक्रें [3]बळसा वधिला, सात्यकिनें सोमदत्तसुत भूरी. ।
त्यांचि करविले स्वपरांकरवीं [4]काळानळांत हुत [5]भूरी. ॥ २७
सात्यकिवरि गुरुनंदन धांवे, त्यावरि घटोत्कच [6]पलाश. ।
झाले रक्तस्नात [7]द्विजराक्षस, जेंवि पुष्पित [8]पलाश. ॥ २८
मूर्च्छित केला द्रौणि, प्रथम [9]क्षणदाचरें दशशरानीं. ।
वदले पर, 'पशुहि बरा, कीं व्याघ्राच्या, शिरे न शश, रानीं.'॥२९
मग सावधान होउनि, गुरुपुत्रानें [10]धृतोग्रकोपानें, ।
मृतसांचि पाडिला तो राक्षस, एकाचि तीव्र[11]रोपानें. ॥ ३०
मूर्च्छित होतां राक्षस, तो मागें शीघ्र काढिला सूतें. ।
कीं [12]पर्वतता घेउनि, देईलचि अशनिता, ढिला, [13]सूतें. ॥ ३१
भीमें सुयोधनाचें [14]ध्वजकार्मुकखंडन प्रथम केलें. ।
तच्चापपंचक, लया, कुरुपतिनें मग अनुक्रमें, नेलें. ॥ ३२
त्यावरि, खंडी त्याच्या शक्तीतें, भूमिप, त्रिधा, राजा ! ।
पविधाराधिक [15]तीव्रां गमल्या, [16]त्वत्पुत्रपत्रिधारा, ज्या. ॥ ३३
स्वशिरीं फिरवुनि, निरखुनि रविमंडल, भीम तो गदा घाली; ।
कुरुपतिरथीं पडे ती, जेंवि गळां तीव्रभोग[17]दाघाली. ॥ ३४
प्रथम उडी घाली क्षितिवरि तव सुत, मग गदा रथावरि ती; ।

---

१. 'तें सर्व' असें पाठांतर. २. धर्माची. ३. बळासुरसा. बळासुर हा इंद्रानें मारिलेला दनायूच्या पुत्रांतील एक असुर. ४. काळरूप अभीत. ५. बहुत. ६. मांसभक्षक. ७. द्विज अश्वत्थामा आणि राक्षस घटोत्कच. ८. फुललेल्या पळसाप्रमाणें. ही संस्कृत व प्राकृत कवींची आवडती उपमा आहे. युद्धप्रकरणांत हिचा उपयोग ठिकठिकाणीं आढळतो. ९. रात्रिचरें, राक्षसें. १०. धृत+उग्र+कोपानें=धरिला आहे भयंकर क्रोध ज्यानें. ११. तीक्ष्ण बाणानें. १२. कीं (कारण) ढिला (दुर्बळ) [आपल्याकडे] पर्वतता घेउनि सूतें अशनिता देईलचि–असा अन्वय. [इंद्रानें आपल्या वज्रानें पर्वतांचे पंख तोडिले, अशी कथा आहे]. अर्थात् ढिला मनुष्य सुईपेक्षां अतिकोमल होतो. १३. सुईतें, सुईला. १४. ध्वज आणि धनुष्य यांचें खंडन. १५. 'तीव्रचि' असें पाठांतर. १६. तुझ्या पुत्राच्या बाणधारा. १७. तीव्र+भोग+द+अघ+आली=तीव्र भोगदात्री (दुःसह फळ देणारी) पातकपंक्ति.

नातरि हयसूतरथांसह, नृपतनु [1]सगरसुतपथा वरिती. ॥ ३५
नंदकरथीं, कुरुपति, स्वीकारुनि [2]मानसत्वरा, गेला. ।
'मेलाचि,' सर्व वदले, कीं [3]रुद्रसमानसत्व रागेला. ॥ ३६
कर्णें सहदेव विरथ केला, मग खड्ग चर्मही [4]नाहीं. ।
तद्यत्नांहीं कष्टचि मेळविला, जेंवि धर्महीनाहीं. ॥ ३७
पूर्वीं जी भीमाची, सहदेवाचीहि तीच गति केली, ।
जरि [5]तो [6]परनरकुंजरनिकरीं साक्षात् [7]मृगाधिपतिकेली. ॥ ३८
'बाळा ! न, [8]विशिष्टांसी कोणीहि, कधींहि, करुनि युद्ध, तरे. ।
झालासि बहु पृथेच्या लाडें, भावांचियाहि, उद्धत रे [9]! ॥ ३९
प्राणचि कुंतीचा तूं; यास्तव केलासि आजि म्यां मुक्त. ।
जिष्णुकडे जावें त्वां, अथवा कुंतीकडेचि, हें युक्त.' ॥ ४०
ऐसें हांसोनि वदे, कुंतीचें वाक्य आठवी, न वधी; ।
कीं [10]सत्यसंध दाता तो कर्ण महायशा, नव्हे [11]नवधी. ॥ ४१
कर्ण शिरे परकटकीं, जैसा जलधींत [12]सुत हिमाद्रीचा[13]; ।
मग जन्मेजयनामकपांचाल्यरथींच सुतहि माद्रीचा. ॥ ४२
सहदेव मनिं म्हणे, 'हा जन तव [14]नुति काय न शिकला ? पीडा ।
ऐसी नसो, असो मृति; पाव प्रणतासि, [15]शशिकलापीडा !' ॥ ४३
गुरुवरि विराट धांवे, त्यासि रणीं विरथ [16]मद्रपाळ करी, ।
[17]तदनुजनि शतानीकहि ये, [18]हरिवरि जेंवि चपळ [19]बाळकरी. ॥ ४४

---

१. सगरराजांच्या पुत्रांच्या मार्गास (स्वर्गपथास). पृष्ठ २५० टीप १ पहा. २. मनाप्रमाणें अत्यंत चपलतेनें. ३. रुद्रासारखा (भयंकर) सत्व (पराक्रम ज्याचा तो)= भीम. ४. नाहींसें केलें. ५. सहदेव. ६. शत्रुपक्षीय मनुष्यरूपी हत्तींच्या समुदायांत. ७. सिंहासारिखा क्रीडा करणारा. ८. विशिष्ट=मोठ्या पदवीचा, विशेष शिकलेला. ९. मोरोपंत–उद्योगपर्व–अध्याय ११ गीति ३–३० पहा. १०. सत्यप्रतिज्ञ. ११. नित्य नवी बुद्धि ज्याची असा, क्षणिकबुद्धि. १२. मैनाकपर्वत. हा हिमवान् पर्वतास मेनेपासून झालेल्या दोन पुत्रांतील ज्येष्ठ. पूर्वीं इंद्रानें पर्वतांचे पंख छेदिले, तेव्हां हा आश्रयासाठीं समुद्रांत घुसला व त्यास समुद्रानें आश्रयही दिला होता–अशी कथा आहे. १३. 'शिरे' हें अध्याहृत क्रियापद घ्यावें. १४. स्तुति. १५. शशिकला+आपीडा=चंद्रशेखरा, शिवा ! १६. शल्य. १७. विराटाचा कनिष्ठ बंधु. १८. सिंहावर. १९. गजशिशु. उपमा चांगली आहे.

त्याहि शतानीकाला, येतांचि रणांत, शल्य तो खपवी. ।
दे वहु कुरुपतिस, जसा [1]असुरवधें [2]शतमखास, तोख, [3]पैवी. ॥ ४५
मृतबंधुरथीं बैसे वीरवर विराट, हाक दे, वर्षे. ।
[4]पर्वत म्हणे, 'न दुर्लभ मोक्षहि [5]यां; काय नाक ? देवर्षे !' ॥ ४६
कांपे थरथर, सुटतां शल्याचा वज्रसा [6]सुरोप, मही. ।
वसतांचि उरीं, झाला मूर्च्छित [7]मत्स्येश तो [8]सुरोपमही. ॥ ४७
सारथि तेथुनि मागें त्यासि, म्हणत 'हाय ! हाय, !' काढी गा ! ।
शल्य परबळा उडवी, पवन जसा कापसाचिया [9]ढीगां. ॥ ४८
शल्याकडेचि रथवर चालविला [10]सर्वखळविलापार्थ, ।
जेणें[11] स्वसम अजित, या सुयशें, सर्वत्र कळविला पार्थ. ॥ ४९
वारिल न प्रळयींचा, पळही येवोनि आड वारा ज्या, ।
त्यास [12]अलंबुष राक्षस वाराया होय आडवा, राजा ! ॥ ५०
विरथ क्षणांत केला, गेला तत्काळ तो [13]पळीं शरण. ।
[14]रुद्रप्रतिवीरासीं करिल तसा काय हो ! [15]पळाश रण ? ॥ ५१
पळवुनि [15]पलाश पार्थें, पवनें तरुसे, उदंड, लोळविले, ।
वोळविले परलोकीं, बहुतांकरवीं स्वहस्त चोळविले. ॥ ५२
नकुळसुतशतानीकें [16]तव नंदन[16] चित्रसेन, जो चुलता, ।
केला विरथ; न जाता कृतवर्म्या शरण, निश्चयें डुलता. ॥ ५३
पाडी [17]वृषसेन, उरीं हाणुनि शर [18]वज्रभासुर, द्रुपदा; ।

---

१. वृत्रासुरवधानें. २. इंद्रास. ३. वज्र. ४. पर्वतनामा ऋषी. ५. (या शतानीकाला) मोक्ष(जन्ममरणापासून सुटका)हि दुर्लभ न, [मग] नाक (स्वर्ग) काय (स्वर्ग प्राप्त होईल यांत काय संशय ?)–असा भाव. ६. सु+रोप=उत्तम बाण. **अत्युक्ति** अलंकार. ७. विराट. ८. देवासारिखाही. ९. राशीला. 'ढीग' हा शब्द कोंकणांतील कुळंबी लोकांच्या प्रचारांतील आहे. येथील यमक पंतांचें आवडतें आहे. (सभापर्व, अध्याय ५।१२६). १०. सर्व+खळ+विलापार्थ. ११. जेणें स्वसम 'अजित' या सुयशें पार्थ सर्वत्र कळविला, तेणें···रथवर चालविला–असा अन्वय. **पर्यायोक्तालंकार**. १२. हा जटासुराचा पुत्र. भीमानें जटासुरास मारिल्यामुळें तो तें वैर स्मरून दुर्योधनाच्या पक्षास मिळाला होता. १३. पलायनाला शरण गेला; त्यानें पळ काढिला. १४. रुद्राशीं युद्ध करण्याला समर्थ अशा वीराशीं (अर्जुनाशीं). १५. राक्षस. १६. तुझा (धृतराष्ट्राचा) पुत्र. १७. कर्णपुत्र. १८. वज्रासारिखा तेजस्वी, वज्रप्रतिम.

पळवी सूत; म्हणे, 'हा कृष्णा ! श्रितवल्लभा ! सुरद्रुपदा[1] !' ॥ ५४
सोमक[2]चमू पळे; घनतिमिरींही गमति हित न दीप तिला. ।
अंधारालाचि भजति, जेंवि असुर शक्रजित नदीपतिला[3]. ॥ ५५
दुःशासनें विरथ जों केला प्रतिविंध्य[4], तों अनुज अवघे ।
झाले सहाय, कलिजितधर्मा भुजें विष्णुचे जसे चवघे[5]. ॥ ५६
शकुनि करी नकुळाला मूर्छित, मग तो नृपा ! तव श्याला[6] ।
पळवी सूत; म्हणे, 'हो या काळमुखीं न पात वश्याला.' ॥ ५७
करिती महारण बळी शतमख[7] शंबर[8] तसे, कृप शिखंडी[9]. ।
भैरव[10] वैर वहाती ते, जेंवि महासरीसृप[11] [12]शिखंडी. ॥ ५८
[13]कार्मुककर्तनकुपितें, त्या आचार्यें कृपें, नृपेंद्रहितें, ।

---

१. सुर+द्रु+पदा=कल्पतरूच्या स्थाना. २. पांचाळवंशीय नृपविशेष, त्याचें सैन्य. ३. समुद्राला. इंद्राच्या वज्रानें वृत्रासुराचा वध केल्यानंतर, त्याचें रक्षण करणाऱ्या कालेय नामक दैत्यांचा वध देव करूं लागले असतां, ते असुर समुद्रांत पळून गेले. पुढें विष्णूच्या मसलतीनें देवांच्या विनंतीवरून अगस्त्य ऋषींनीं समुद्राचें प्राशन करून तो रिता केला व मग देवांनीं त्या दैत्यांचा वध केला–अशी कथा आहे. ४. द्रौपदीच्या ठायीं धर्मापासून झालेला पुत्र. द्रौपदीस पांच पांडवांपासून पांच पुत्र झाले, त्यांचीं नांवें:—'प्रतिविंध्य धर्मराजकुमर । भीमापासाव श्रुतसोम । श्रुतकीर्ति धनुर्धर । अर्जुनपुत्र जाणावा ॥ ६८ ॥ नकुळवीर्यें शतानीक । श्रुतकर्मा पांचवा देख । सहदेवतनय राजतिलक । लावण्यगुणीं आगळा ॥ ६ ॥' [मुक्तेश्वरकृत आदिपर्व–अध्याय २१]. ५. कल्पनासादृश्यः—'कवि म्हणति, चतुर्भुजभुज जे धर्मसहाय दक्ष अजित रणीं । (मोरोपंत–सभापर्व–अध्याय २।२ पहा). ६. तुझा मेहुणा शकुनि, त्याला. ७. इंद्र. ८. शंबरासुर. ९. हा द्रुपद राजाचा पुत्र. हा प्रथमतः कन्यारूप असून त्याला पित्यानें पुत्रवेषानें वाढविलें होतें. पुढें हिरण्यवर्मा नामक राजाच्या कन्येशीं त्याचा विवाह झाला. गुह्य गोष्ट प्रकट झाल्यामुळें, तिच्या पित्यानें युद्धार्थ आगमन केलें. तेव्हां वनामध्यें पळून जाऊन त्यानें एका यक्षाला प्रसन्न करून घेतलें आणि त्याचें पुरुषत्व उसनें घेऊन त्याला आपलें स्त्रीत्व दिलें. पुढें आपल्या देशीं परत येऊन त्यानें स्त्रीचा स्वीकार केला. तथापि मूळचा स्त्रीरूप असल्यामुळें भारतीय युद्धामध्यें भीष्माचार्य त्याच्याशीं लढले नाहींत. यामुळें भीष्माचार्यांचा पाडाव झाला. हा राज्यकार्यांत दक्ष असून, शस्त्रास्त्रांतही चांगला प्रवीण होता. भारतीय युद्ध समाप्त झाल्यावर अठराव्या दिवशीं हा शिबिरांत निद्रित असतां यास अश्वत्थाम्यानें मारिलें. १०. भयंकर. ११. मोठा सर्प. १२. मयूर. १३. धनुष्य तोडल्यामुळें रागावलेल्या कृपाचार्यानें.

केला मूढ[1] शिखंडी; युद्ध बहुत मानलें[2] सुरांसहि तें. ॥ ५९
तेव्हां इकडिल तिकडिल, झाले बहु, युद्धभूमिवर कडबा[3]; ।
केलें त्वां मसण कुरुक्षेत्र, असे शुद्ध भूमि वरकड वा ! ॥ ६०
धृष्टद्युम्न गुरुवरि, द्विरदावरि सिंहसा, उठे. रागें. ।
पांडव पांचाळ, सकळ[4] रक्षाया त्यासि धांवले मागें. ॥ ६१
द्रोणातें रक्षाया सबळ तुझे पुत्र सर्वही जपले. ।
खपले ते खपलेचि[5]; प्रभुजि ! बहु बरेच शेषही टपले. ॥ ६२
सेनासमूह गमले अन्योन्यजिगीषु[6] दोन अर्णवसे[7]. ।
धृष्टद्युम्नसमीपचि सात्यकि; गुरुच्या समीप कर्ण वसे. ॥ ६३
प्रथमचि धृष्टद्युम्ना दे, सोडुनि बाण, विप्र तापातें; ।
कीं खंडी चापातें, पापातें[8] जाणवि प्रतापातें. ॥ ६४
वाटे वधिलचि गुरुला, जैं कोपें सज्ज तो नव धनु करी. ।
क्षितिसि नखांहीं हरि[9], जों करिचा चित्तांत ये न वध, नुकरी[10]. ॥ ६५
सोडी घोर शर[11], तया बहु भ्याले; कुरुपमुखकळा बदले. ।
'समरे[12] द्रोणायास्तु[13] स्वस्ति !' असें देव दानवहि बदले. ॥ ६६
कर्णं द्वादशधा तो[14] केला, जैसा अही नभोगामी[15]. ।
तें पाहुनि रोमांचित झालों, राया अहीनभोगा[16] ! मी. ॥ ६७
द्रोण द्रौणि सुयोधन कृतवर्मा शल्य शकुनि हे सारे, ।
युगपत्[17] ताडिति; म्हणती, 'हूं ! मारा दुष्ट सर्प, ठेसा रे !' ॥ ६८
युगपत् सर्वांचींही, द्रुपदात्मज, सकवचें उरें भेदी; ।
आधीं द्रुमसेनाचें मस्तक, मग कर्णकार्मुक, च्छेदी. ॥ ६९

---

१. मूर्छित. २. पसंत पडलें. 'केला मूढ शिखंडी युद्धीं, बहु मानलें सुरांसहि तें' असा पाठभेद. ३. कडब्यासारखे, गवतकाडीसारखे. ४. सैन्यासह. 'सकळ' असें पाठांतर. ५. मेलेच. ६. परस्परांना जिंकण्याची इच्छा करणारे. ७. समुद्रसे. ८. गुरूचा घात करणारा, म्हणून पापी (धृष्टद्युम्न). ९. सिंह. १०. न उकरी, उकरीत नाहीं. ११. 'शरव्रज' असें पाठांतर. १२. युद्धामध्यें. १३. समरे द्रोणाय अस्तु स्वस्ति=युद्धांत द्रोणाचें कल्याण असो. १४. शरव्रज (बाणसमूह). १५. आकाशगामी. १६. उत्तम भोग भोगणाऱ्या, महाभागा (धृतराष्ट्रा !). १७. एककालीं, एकदम.

पुच्छाचें [1]हरिस तसें, धनुचें, [2]कर्तन, असह्य कर्णास. ।
[3]प्राशिलें त्यास गमे तो, सिंधूच्या जेंवि [4]घटज [5]अर्णास. ॥ ७०
सक्रोध [6]योधमणि तो, शीघ्र करुनि सज्ज कार्मुका [7]सारा, ।
धृष्टद्युम्ना अरिवरि, करि [8]खरशरवृष्टि [9]वार्मुकासारा. ॥ ७१
तों सात्यकि कर्णावरि, [10]वासव बळिवरि जसा, तसा आला; ।
झाला दारुण रण, सम गमले, कोणास कोणहि न भ्याला. ॥ ७२
असें त्वत्पुत्रांचीं, कर्णाचींही, निवारिलीं क्रोधें. ।
वृषसेन पाडिला, शर हाणोनि उरांत त्या महायोधें. ॥ ७३
सुतशोकतप्त होउनि, सात्यकिसीं कर्ण करि महायुद्ध; ।
शुद्धयशा वृषसेनहि झाला, तितुक्यांत त्या रणीं, [11]बुद्ध. ॥ ७४
सात्यकिला दाखविती ते वृष-वृषसेन, बाप-लेंक, [12]बळें; ।
म्हणती काळमुखीं हो रिपुवपु, कीं देह आपलें, [13]कवळ. ॥ ७५
सात्यकिनें सहसा त्या दोघांचेही, सुबाण सोडून, ।
तत्काळ [14]पाडिलें हो ! सह[15]हस्तावाप चाप तोडून. ॥ ७६
ते सात्यकितें म्हणती, शर सोडुनि, सजुनि चाप नव, दोघे, ।
"अभिमन्युचा म्हणे, मग कां 'हाय!' तुझाचि बाप न वदो? [16]घे." ७७
सात्यकिसीं रण करितां, ऐकुनि गांडीवनाद, कुरुपातें ।

---

१. सर्पास. २. कापणें. ३. 'प्राशील त्यास गमतो' असा अन्यपाठ. ४. अगस्ति. घट (कुंभ)+ज=पूर्वी कित्येक असुर समुद्रामध्यें राहून इंद्रादि देवांस, ऋषींस व इतर प्रजेस अतिशय पीडा देत. यामुळें इंद्रानें अग्नि आणि वायु यांस समुद्र शोषण्यास सांगितलें. तें त्यांनीं अमान्य केल्यामुळें त्यानें त्या दोघांसहि शाप दिला कीं, तुम्हास मृत्युलोकीं जन्म घडेल. त्याप्रमाणें त्यांस मित्रावरुणांपासून जन्म प्राप्त झाला. मित्रावरुणांनीं आपलें तेज कुंभांत सोडिलें होतें, त्यापासून अगस्त्य व वशिष्ठ उत्पन्न झाले होते—अशी कथा आहे. ५. उदकास. (गीति ५५ वरील टीपा पहा). ६. वीरश्रेष्ठ. ७. श्रेष्ठा, दृढा. ८. तीक्ष्ण बाणांचा वर्षाव. 'वरशरवृष्टि' असें पाठांतर. ९. वार्+मुक्+आसार=घनवृष्टितुल्य. १०. इंद्र. ११. सावध. शुद्धीवर आला. १२. बळ. १३. ग्रास. १४. 'तात्काळ पाडिलें हो हस्तापासाव चाप तोडून' असा पाठभेद आहे. १५. हस्तावाप=ज्याघातवारण, धनुष्याची दोरी लागूं नये म्हणून केलेलें हातमोज्यासारखें चामड्याचें हस्ताच्छादन. १६. आमुचे शर मरायाकारणें घे—पंत.

कर्ण म्हणे, 'हा येतो जय, साधाया स्वकार्य गुरुपातें. ॥ ७८
त्या सौभद्रापरि हे सात्यकि पांचाळ वेढिले असती।
बहु; आम्हीं देतों या दोघांला आजि यमपुरीं वसती. ॥ ७९
पार्थास, कोंडिले हे दोघे आम्हीं, असें न समजावें. ।
तिकडेचि त्यासि समरीं रोधाया, बळ समुद्रसम जावें.' ॥ ८०
हें प्रिय-हित-मित्रवचन परिसुनि, नृप शकुनिला म्हणे, 'मामा ! ।
नामा अन्वर्थ करा, शीघ्र उडा, सफळ हो ! करा कामा. ॥ ८१
देउं न कां, सांपडतां अमिल पशु कंचीस, मान; होमा मीं; ।
जा वासविवर; मान्या देवींत शचीसमान हो भामी. ॥ ८२
अयुत गज, अयुत रथ, घे, जे साक्षात् सिंह परमहेभाचे; ।
दुःशासनादिक दिले तुज, समरसहाय परम हे भाचे. ॥ ८३
त्या पांडुसुतां, असुरां हरिसा, सोडोन उग्र शर, भाजीं. ।
तीं सत्वें कवण यशें ख्यातें होतिल, वशें न शरभा जीं ?' ॥ ८४
या बहुमानें फुगला, गेला धांवोनि अर्जुनावरि तो; ।
ज्याचा, सुकृती, मरणा, कीं कुकृती, शत्रु अर्जुना, वरितो. ॥ ८५
जाउनि धनंजयावरि, झाले, भट सर्व शलभसे, नाहीं. ।
कैसा तरी करावा, सिंहाचा भंग, कलभसेनाहीं ? ॥ ८६

१. अर्जुन. २. द्रोणाच्या पतनानें. ३. 'यमपुरी-वसती' असा पाठ रा० पराडकरांचे प्रतींत आहे. ४. हे दोघे (सात्यकी व धृष्टद्युम्न) आम्हीं कोंडिले, असें पार्थास न समजावें-असा अन्वय. ५. बळ......जावें=समुद्रासारखें अवाढव्य सैन्य गेलें पाहिजे. ६. अहो मामा. ७. शकुनि म्हणजे पक्षी, असा शब्दार्थ आहे. 'शीघ्र उठा' असें पाठांतर. ८. मनोरथा. ९. दुर्मिळ. १०. कचाटीस. ११. योग्य समयीं. [म=वेळ, समय, अवसर]. आदर्शप्रतींतील टीप आम्हीं कायम ठेविली आहे, पण 'म म्हणजे वेळ' असा अर्थ घेण्याची गरज दिसत नाहीं. अमिल पशु कचीस सांपडतां, [त्याची] मान मीं (स्वतः, दुर्योधन) होमां कां न देऊं (कां देऊं नये ?)-असा अन्वय करावा. 'देउं नका, सांपडतां...' असें पाठांतर. १२. इंद्रपुत्र अर्जुन, त्यावर. १३. होवो. १४. शकुनिपत्नी. १५. पर+महा+इभाचे=शत्रुरूप महागजाचे. १६. इंद्रसा. १७. जीं सत्वें शरभा वशें न [आणि] यशें ख्यातें होतील, तीं कवण ?—असा अन्वय. तीं सत्वें कवण=ते प्राणी तरी कोणते ? त्यांना नांव तरी काय द्यावें ? अर्थात् अत्यंत पराक्रमी पुरुषांस कशाची उपमाच देतां येत नाहीं—असा भाव. १८. ज्या (अर्जुना)चा सुकृती (पुण्यवान्) शत्रु मरणा वरितो; कीं (आणि) कुकृती (पुण्यहीन) शत्रु अर्जुना (तृणाला) वरितो (दांतीं तृण धरितो, शरणागत येतो). १९. तृणाला. २०. नाहींसे झाले, नष्ट झाले. २१. करिशावकसेनानीं.

शकुनि विरथ होय; बसे, वर्ण जपत चारि[1] पुत्रयानींच. ।
'भंगिन' म्हणे 'परास,' न जिंकुनि मनिंच्या रिपुत्रया[2] नीच. ॥ ८७

अध्याय एकोणिसावा.

रविचा, चहुंकडुनि तमें, मंदप्रभ न, कर[3], वेढिला, होतो[4]; ।
सात्यकि तसाचि कौरवकटकाला न करवे ढिला हो ! तो. ॥ १
अर्जुन तसाचि सात्यकि, बहु मारुनि, शेष कुरुकटक पळवीं; ।
पळ वीर पुढें न उरे; सर्वांचींही मुखें रणीं मळवी[5]. ॥ २
सात्यकिला माराया, खातचि धांवे तुझा तनय दांत[6]; ।
परि होय विरथ; याचें प्रागल्भ्य[7] तुम्हां अशा अनयदांत[8]. ॥ ३
होउनि विरथ, सुयोधन, कृतवर्मरथीं चढे, कढे कोपें. ।
सोपें श्रुतचि; परिभव वीरांचा कठिण संगरीं रोपें[9]. ॥ ४
क्रोधाविष्ट सुयोधन वदला राधासुतासि[10]; परिसा तें. ।
गुरुतेंहि दोष लावी, खापर, बा ! परम जेंवि परिसातें. ॥ ५
"वधितां जयें[11] जयद्रथ, समर तुम्हींच स्वयें प्रवर्तविला; ।
कदन उगेंचि पहातां, कां स्वोत्साहप्रवाह परतविला[12] ? ॥ ६
शक्त असोनि, निरखितां निजकटककदन, अशक्तसे परसे[13]. ।
चाळवितांहि न[14] पेटां[14], केले आर्द्रेंधनें[15] जसे परसे[16]. ॥ ७
समयीं[17] सोडावें मज, ऐसें तुमच्या मनांत जरि होतें, ।
'जिंकूं पांडुसुतांतें,' ऐसें वदलां कशास तरि हो ! तें ? ॥ ८
जरि भरंवसा न देतां, पडती बुद्धीस भूल काशाला ? ।

---

१. 'पार्थ मरो', अथवा 'काय करूं ?' हे चार वर्ण. २. मोह, मद, मत्सर या त्रयाला. ३. किरण. तमें चहुंकडुनि वेढिला (वेढिलेला, घेरलेला) रविचा कर (किरण) मंदप्रभ न होतो—असा अन्वय. 'करो वर्षोपले रश्मौ पाणौ प्रत्यायशुंडयोः' इति मेदिनी. ४. येथें दामयमक आहे. ५. अपयशानें मळवी—असा भाव. ६. दांत खाणें=संतापणें, फार रागावणें. ७. प्रौढी, तोरा. ८. अन्यायवर्ती जे त्यांत. ९. बाणानें. १०. कर्णाला. ११. अर्जुनानें. १२. परतविला, मागें फिरविला. १३. परक्याप्रमाणें. १४. पेटत नाहीं. १५. आर्द्र+इंधन=ओल्या काष्ठानें केलेले, अर्थात् मंद. १६. परसा=आगटी, शेकोटी. 'परसा' हा शब्द कोंकणांतील कुळंबी लोकांच्या प्रचारांतील आहे. १७. संकटकाळीं.

येतें तुम्हासि भाषण बहु नीरस[1], जेंवि फूल काशाला[2]. ॥ ९
जरि ठेवितां कर[3] श्रुतिवरि, करितों वैर हें कशाला हो ! ? ।
परिभूति[4] रुचे कवणा ? बाळहि न म्हणेल, 'वपु कशा[5] लाहो.'॥ १०
करणें नसेल माझा त्याग, यशचि बहु गमेल जरि शुद्ध, ।
तरि व्हा सिद्ध, करा निज[6]शस्त्रास्त्रपराक्रमानुगुण युद्ध." ॥ ११
मौनचि धरिलें ! द्यावें उत्तर बा ! त्यास काय काय तिहीं ? ।
न दुरुक्ति मनिं धराव्या सुजनांहीं, जेंवि बायका यतिहीं[7]. ॥ १२
पांडवकटकीं शिरले क्रोधी गुरु, कर्ण, करिकुळीं हरिसे. ।
झाले दुःसह सर्वा ते काळ[8] प्रळयपावकांसरिसे. ॥ १३
बहु वधिले वीर रणीं, बहुत पळविले कुलीन योध रणीं. ।
धर्म म्हणे, 'परतावें; जाउ, करा माउली न यो, धरणी.' ॥ १४
विजय म्हणे, 'श्रीकृष्णा ! भ्याला प्रभु धर्मराज कर्णाला; ।
जेंवि महाविषदृष्टि[9]हि अहि, महिवरि देखतां सुपर्णाला[10]. ॥ १५
मज हा परिभव दुःसह, लावियला जेंवि पाय सापाला; ।
ने रथ, मी यासि वधिन, विषतरुचा[11] प्रभुसि कायसा पाला ?' ॥ १६
कृष्ण म्हणे, "बा ! दीनों[12] माघहि[13] दे कंप न जितका शीतें, ।
तितका[14] देतो; यश हो राहो देईल न जितकाशी[15] तें. ॥ १७
तूं[16] एक, कीं घटोत्कच, आम्हांत समर्थ कर्णमदनाशा[17]; ।
विफळा करो पराशा भीमतनय, जेंवि रुद्र मदनाशा[18]. ॥ १८
कीं प्रियसख्या ! असे त्यांपाशीं[19] ती दिव्य शक्ति[20] माघवनी. ।

---

१. शुष्क. २. 'मोळ' नांवाच्या तृणविशेषाला. ३. कानावर. कानावर हात ठेवणें=एखाद्या गोष्टींत मन न घालणें, संबंध न ठेवणें. ४. पराभव. ५. चाबूक. ६. निज+शस्त्र+अस्त्र+पराक्रम+अनुगुण=आपलीं शस्त्रें, अस्त्रें, आणि पराक्रम यांना योग्य असें युद्ध. ७. संन्यास धारण केलेल्यांनीं. ८. 'सर्वा केवळ ते' असाही पाठ आहे. ९. भयंकर विष आहे नेत्रांत ज्याच्या असा सर्प. 'महादृष्टिविष' असें पाठांतर. १०. गरुडाला. ११. बलवंतापुढें विषवृक्षाच्या पाल्याची कथा काय ? तद्वत् ह्या हीनबल शत्रूची (कर्णाची) माझ्यापुढें कथा काय ? काव्यार्थापत्ति अलंकार. १२. दरिद्रास. १३. माघमासहि. १४. 'कर्ण' हा अध्याहृत कर्ता. १५. जयेंकरून शोभणारा, हा कर्ण. १६. अर्जुन. १७. कर्णाच्या गर्वनाशास. १८. मदनाची इच्छा. १९. कर्णापाशीं. २०. वासवी शक्ति.

कर्णे रणीं कांपवितो बहु मज, वृषभासि जेंवि माघ[1] वनीं. ॥ १९
'ने' म्हणसी, काय तुला गमला हा वासुदेव वेडासा ? ।
वाम अकार्यक्षमही भुज[2], भुजगमुखीं न देववे डासा[3]. ॥ २०
बा ! जें स्वयें करावें, तें सुमहत्कार्य जरि सुतें केलें, ।
तरि त्यांत सत्यसंधत्व, स्वयश, व्यर्थ काय गा ! गेलें" ? ॥ २१
'वत्सा घटोत्कचा ! ये,' ऐसें तो पुष्कराक्ष[4] जों बाहे, ।
वाहे नरनारायणचरणीं मस्तक, पुढें उभा राहे. ॥ २२
'हा आलों; मज आज्ञा काय ?' असें राक्षसेंद्र वदला, हो ! ।
कृष्ण म्हणे, 'वत्सा ! हो कर्णांतक; धर्म राज्यपद लाहो. ॥ २३
शस्त्रास्त्रराक्षसासुरमायाबळजलधि[5] पुत्र तूं पहिला; ।
कर्णाघरिक्षय करुनि, साधुनि दे निजपित्यासि या महिला.' ॥ २४
जिष्णु[6] म्हणे, "सत्पुत्रा ! हो गुहसा[7], सूतपुत्र[8] तारकसा[9] ।
आम्हां तूं ज्येष्ठ; तुझे प्रतिविंध्याद्यनुज पांच तार कसा". ॥ २५
राक्षस म्हणे, 'बहु बरें; मारीन रणांगणांत कर्णातें. ।
सुरवर कवीस म्हणतिल, 'रक्षःकृत[10] कर्णकदन वर्णा तें.' ॥ २६
आज्ञा घालं तुम्हीं, तरि देइल गुरुलाहि हा निधन[11] दास. ।
रात्रौ मजसीं भिडतां, होईल प्राप्त हानि धनदास[12].' ॥ २७
ऐसें वदतां, त्यातें कर्णावरि कृष्ण पाठवी राया ! ।
देती, भिवोनि कौरवसेना समरांत पाठ, वीरा या. ॥ २८

---

१. माघमास. अर्थात् माघमासांतील थंडीचा कडाका. २. कार्यें करण्यास असमर्थ असा डावा हात. ३. दंशास, चावण्यासाठीं. ४. कमलनयन (कृष्ण). ५. शस्त्र+अस्त्र+राक्षस+असुर+माया+बळ+जलधि. ६. अर्जुन. [जिष्णु=जयशील, जित्वर. 'जि' आणि 'भू' ह्या धातूंला 'ष्णु' प्रत्ययः लागून योग्यता, कुल, शील, जाति असे अर्थ दाखविणारीं विशेषात्मक नामें होतात. जसें:—भू+ष्णु=भूष्णु (भविष्णु=असणारा), जि+ष्णु=जिष्णु=जिंकण्यास समर्थ]. 'जिष्णुर्ना वासवेऽर्जुने । जित्वरे वाच्यवत्' इति मेदिनी. ७. कार्तिकेयसा, कार्तिकस्वामी-सारखा. गूहति रक्षति सेनामिति गुहः=सेनेचें रक्षण करितो म्हणून 'गुह' असें नांव आहे. ८. कर्ण. ९. तारकासुरसा. तारकासुर हा त्रिपुरांतील एक दैत्य. १०. राक्षसानें (घटोत्कचानें) केलेलें. ११. मरण. १२. कुबेरास. राक्षसांना रात्रीं बळ विशेष असतें, म्हणून त्या वेळीं तो कोणास हार जाणार नाहीं—असा घटोत्कचाच्या भाषणाचा मतलब.

त्यावरि अलंबुष खचर कुरुराजें[1] धाडिला जटासुरज[2]; ।
त्यासि घटोत्कच मारी, त्या वायुपुढें महाभटासु[3] रज. ॥ २९
कुरुपतिरथीं अलंबुषशिर ठेवुनि भीमसूनु पाय नमी; ।
विनयें म्हणे, 'पहायाँ[4] आलों, आणूनि हें उपायन[5] मी.' ॥ ३०
वर्षे दुजा अलायुध[6] रात्रिचर महोपलायुधग्रामा[7]; ।
पीडी भीमासहि, घननाद[8] जसा खळबलायुधग्रामा[9]. ॥ ३१
कृष्णें घटोत्कच रणीं रक्षाया भीमसेन आठविला. ।
रामें घननादावरि लक्ष्मणसा, तो बलाब्धि पाठविला. ॥ ३२
वैद्युतपावक[10] तरुला, तैसा तो त्या अलायुधा कवळी. ।
लावी बहु, गुरुकटका, त्याचें नाशुनि बलायु[11], धाक बळी. ॥ ३३
त्याचेंहि शिर तसेंचि, त्वत्तनयाच्या रथींच तो पाडी; ।
एका कर्णावांचुनि, सर्वांचा शौर्यधैर्यमद झाडी. ॥ ३४
प्रकटी बहुशत दुस्तर माया तो वीर्यमत्त मायावी. ।
कुरु म्हणति, 'यापुढें तों न जयश्री[12] देवसत्तमा[13] यावी. ॥ ३५
शांबर[14] शंभरहि उणे, वाटे कांहींच न मय मॉया[15] वी; ।

---

१. दुर्योधनें. २. जटासुरपुत्र. ३. महा+भट+असु=बलाढ्य योद्ध्यांचे प्राण. रज=धूळ. ४. भेटाया. to see. ५. भेट, नजराणा. गुरु, राजा आणि देव यांच्या दर्शनास रिकाम्या हातानें जाऊं नये, कांहींतरी त्यांस नजराणा घेऊन जावें, असें स्मृतिवचन आहे. 'रिक्तपाणिर्न पश्येत राजानं देवतां गुरुम्' असें वचन आहे. तसेंच 'रिक्तपाणिनें न विलोकावा गुरु ऐसी स्मृतिवाणी' असें पंतांचें सुद्धां वचन आहे. [पृथुकोपाख्यान–साकी ११]. पण घटोत्कचानें नेलेलें हें उपायन कोणत्या हेतूनें दुर्योधनास अर्पण केलें, हें वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. ६. राक्षसविशेष. ७. महा+उपल+आयुध+ग्रामा=महापाषाणरूप आयुधसमूहा. ८. मेघनाद (इंद्रजित). ९. खल+बल+आयु+धक्+राम=शत्रुसैन्याचें आयुष्य जाळणाऱ्या रामास. १०. विद्युत्संबंधी अग्नी. ११. बल आणि आयुष्य. त्याचें (अलायुधाचें) बल [आणि] आयु नाशुनि, बळी (तो बलवान् घटोत्कच) गुरुकटका (द्रोणाचार्यांच्या सैन्यास) बहु धाक लावी (मोठी दहशत उत्पन्न करी)–असा अन्वय. १२. 'मयश्री' (=मयासुर–शोभा) असें पाठांतर. १३. देवश्रेष्ठाला, देवेंद्राला. १४. शंबरासुर, दनुपुत्रदानवांतील एक. ह्यास कृष्णपुत्र प्रद्युम्न यानें मारिलें. १५. माया=कपट. वी=उत्पन्न करी. 'मायावी' असें पाठांतर.

अत्युग्रता कधींहि न भीमाच्या सूनुसम घमा यावी'. ॥ ३६
कौरव कर्णासि म्हणति, 'राक्षस हा स्पष्ट [1]कल्पनटशील; ।
किति भुजबळें तराया [2]दुस्तरगरसागराशि, झटशील ? ॥ ३७
नेणें कांहींच असा [3]मायाशस्त्रास्त्रबळविलास मच. ।
बा ! शेवटील, येणें आम्हां सर्वांसि कळविला, समय. ॥ ३८
बहु मारिले पहा, हा मारिल उरल्या बळा समस्तातें. ।
केलें अशेष अंधचि आम्हीं, डोळसहि, या [4]तमस्तातें. ॥ ३९
ती [5]ईश्वरें जशी त्या महिषावरि योजिली महाशक्ती, ।
त्वां या घटोत्कचावरि योजावी वासवी महाशक्ती. ॥ ४०
भीम धनंजय करितिल काय ? न ते [6]मानुषाद मायावी. ।
[7]या वीर वधिल जो, त्या विजयश्री निश्चयेंचि बा ! यावी.' ॥ ४१
त्या [8]भीताभयदाच्या हे [9]भीतप्रार्थना मना आली; ।
झाली कल्पलतेची, सद्रीति करूनि कामना, [10]आली. ॥ ४२
[11]खेचरशतघ्नीनें हय वधिले होते, तशांत सुचवीलें; ।
तें भगवत्संकल्पें कोपेंही तन्मनास रुचवीलें. ॥ ४३
कर्णे शक्तिस, जैसा सुरराजें, घालितांचि कर, पविला. ।
गिरिसा गुरु कठिनहि तो खचर, [12]त्रासें मनांत करपविला. ॥ ४४

१. कल्पांतीं नर्तनकर्त्या शिवासारिखा. २. दुस्तर विषसमुद्रास. ३. माया, शस्त्र, आणि अस्त्र यांच्या बळाचा विलास (क्रीडा). ४. अंधकाराचा बापच अशा काळ्याकुट्ट घटोत्कचानें. ५. अष्टभुजा देवी. महिषासुर हा रंभ नामक दानवास महिषीपासून झालेला पुत्र. यानें हेमगिरीवर वायुभक्षण करून तप केलें. त्यामुळें ब्रम्हदेव प्रसन्न झाले व 'वर माग' असें त्यास म्हणाले. तेव्हां त्यानें अमरत्व मागितलें पण ब्रह्मदेवानें तें त्यास न देतां दुसरें कांहीं मागावयास सांगितलें. तेव्हां त्यानें 'पुरुषव्यक्तीपासून मला मृत्यु नसावा' असें म्हटलें व तें ब्रह्मदेवानें मान्य केलें. पुढें हा प्राणिमात्रांस पीडा देऊं लागला; तेव्हां अष्टभुजांनीं युक्त अशी आदिशक्ति त्यास मारण्याकरितां प्रगट झाली व तिनें याचा वध केला—अशी कथा आहे. (देवीभागवत, स्कंध ५ अध्याय १–२०). ६. मनुष्य भक्षणारा (राक्षस). ७. या=याला, घटोत्कचाला. 'हा वीर' असें पाठांतर. ८. भिणाऱ्यांस अभय देणाऱ्या अशा कर्णाच्या. ९. भ्यालेल्यांनीं केलेली प्रार्थना. १०. सखी. ११. राक्षसानें फेंकलेल्या अग्न्यस्त्रानें. शतघ्नी=तोफेचा एक प्रकार, जंबुरा. १२. भयानें.

क्षिप्र पळे विंध्याकृति होय, भेरे भीमें खचर ती खांतें. ।
तद्धृदयीं शक्ति शिरे, कौरवबलचित्तवृत्ति तोखांत. ॥ ४५
राक्षसवक्ष विदारुनि, मागें नाहींच शक्ति ती फिरली. ।
ऊर्ध्वपथें, परमप्रिय तें स्वामीला कथावया, शिरली. ॥ ४६
मरतांहि, पांडवप्रिय अद्भुत केलें घटोत्कचें, परिसा. ।
सन्मस्तकं डोलेसें, पितृहित न करील पुत्र तो अरिसा. ॥ ४७
पितृहित किमपि न घडलें, धरुनि मनामाजि भाव हाचि, रडे. ।
करुनि बृहद्देह[10] पडे, तें कुरुकटकैकदेश[11] बा ! चिरडे. ॥ ४८
गुरुशवभारें[12] कौरवसेना अक्षौहिणीच तो खपवी, ।
तेजस्वी[13] सुत[13] जनका दे जेंवि, हरिस न तेंवि तोख[14] पवी. ॥ ४९
शक्र जसा वृत्रवधीं सुरसिद्धमहर्षिसाध्यधीरांहीं ।
स्तविला, घटोत्कचवधीं कर्ण तसा कौरवादिवीरांहीं. ॥ ५०
बसुनि नृपरथीं, स्वबळीं गेला, कांपवित कर्ण वसुधेतें, ।
साधुनि सुकीर्तितें, सुरपति जेंवि मथूनि अर्णव[15] सुधेतें. ॥ ५१
दुंदुभिपणवप्रमुखें[16], वाजविती, जे प्रवीण ते, वाद्यें. ।
श्रित हर्षविले कर्णें, जैसे रामें[17] समस्त देवाद्यें. ॥ ५२

अध्याय विसावा.

पांडव, घटोत्कचवधें अतिदुस्तरशोकसागरीं पडले. ।
अभिमन्युवधीं जैसे, सोडुनि धृतिला[18], तसेचि ते रडले. ॥ १
भेटे[19] जयासि[20]; हांसे[21] दिसति नभीं जों मयूख[22] दशनाचे[23]; ।

---

१. विंध्यपर्वताएवढा देह ज्याचा असा. २. थिरे. ३. भयंकर. 'भीत' असें पाठांतर. ४. घटोत्कच. ५. आकाशांत. ६. इंद्रदत्त शक्ति (अस्त्रविशेष). 'शक्तिरस्त्रान्तरे गौर्यामुत्साहादौ बले स्त्रियाम्' इति मेदिनी. ७. हर्षांत थिरे. ८. इंद्राला. ९. शत्रुतुल्य. १०. बृहत्+देह=विशाल शरीर. ११. कुरुकटक+एकदेश (एक भाग, एक पक्ष). १२. विशाल प्रेताच्या भारानें. १३. पराक्रमी पुत्र. 'यः प्रीणयेत्सुचरितैः पितरं स पुत्रः' [भर्तृहरि]. १४. वज्र. तोख=आनंद. १५. समुद्र. १६. दुंदुभि-पणव-प्रमुख वाद्यें. १७. देवश्रेष्ठ रामानें. १८. धैर्याला. १९. 'कृष्ण' हा कर्ता अध्याहृत. २०. अर्जुनास. २१. 'हसतां' असें पाठांतर. २२. किरण. २३. दंताचे.

हरिसा गर्जे, होउनि आनंदाच्या भरासि वश, नाचे. ॥ २
निर्धन, निधिच्या, जैसा पावे अत्यंत हर्ष, लाभानें, ।
वाटे तसाचि भगवान्, त्यजिला, अत्यंत हर्षला, भानें[1]. ॥ ३
पार्थ म्हणे, "गोविंदा ! कारण या कोण हर्षहास्याला ? ।
धृतराष्ट्राच्या, व्हावा असच्छोकांत[2] हर्ष हा, स्यालीं[3].' ॥ ४
भगवान् वदे, 'प्रियसख्या ! शक्ति अमोघा[4] घटोत्कचीं पडली. ।
बा ! कधिंही न पडावी जी, सुमहत्कार्यसिद्धि ती, घडली. ॥ ५
वरकवचकुंडलार्पण करुनि, महाशक्ति जोडिली[5] होती, ।
अर्जुनजी ! न तुम्हावरि, अल्पांविषयींच[6], सोडिली हो ! ती. ॥ ६
याच्या अंगीं असतें कवच, झळकतीं सुकुंडलें कानीं, ।
तरि हरिलें असतें धृतराष्ट्राच्या, अमृतकुंड, लेंकानीं. ॥ ७
कर्ण निमालाचि, असें जाण, सख्या ! निश्चयेंचि तूं. जरि हा[7] ।
असता शक्तिकर[8], दुजा अरिहा स्वामीच[9] म्हणविता तरि 'हां![10]' ॥ ८
शक्र, यम, वरुण, धनपति, जिंकुनि तत्कीर्ति कर्ण वरिता हो ! ।
केला शिवप्रसादें हा, घटजें[11] जेंवि अर्णव, रिता हो ! ॥ ९
असता सकवचकुंडल, तरि कर्ण, सख्या ! जगत्रयीं अमर; ।
तूं गांडीवें, मीहि न चक्रें[12], शकतों करावया समर. ॥ १०
हृतकवचकुंडलासहि पाहुनि, समरीं भ्रमेल वासवधी[13]. ।
सत्य शपथ करितों, तो न त्वदितरें[14], जो सुवीर यास वधी. ॥ ११
जेव्हां चक्र बुडेल श्वभ्रीं[15], बहु संकटीं वृष पडेल; ।
होइल असावध, तुला याचा तेव्हांचि बा ! वध घडेल. ॥ १२

---

१. भानें त्यजिला=देहभानानें कृष्णास सोडिलें, कृष्ण देहभान विसरला. २. असत्+शोक=आमच्या शोकांत. ३. स्याला, शालकाला, मेहुण्याला (शकुनीला). ४. निष्फळ न होणारी. ५. एथें 'कर्णानें' हा अध्याहार आहे. (पृष्ट २२४ टीप १८ पहा). ६. ज्याचें महत्व थोडें आहे अशावर. ७. हा=कर्ण. ८. शक्ति आहे करीं ज्याच्या असा. ९. शत्रूंचा नाशकर्ता कार्तिकस्वामी. १०. हाय ! हाय ! ११. अगस्तीनें. (मागें पृष्ट २७० टीप ३ पहा). १२. सुदर्शनचक्रानें. हें शिवानें विष्णूस दिलें होतें. १३. इंद्राची बुद्धि. १४. त्वत्+इतर=तुजहून इतर. १५. भूरंध्रीं, खळग्यांत. श्वभ्र=छिद्र, भेग, भोंक.

[1]मागध, [2]चैद्यहि, वधिला ज्यां [3]योगें, कीं न हो तुज [4]विषाद. ।
[5]व्यंगुष्ठ करविला ज्यां गुरुकरवीं [6]एकलव्यहि [7]निषाद. ॥ १३
योगबळें ज्यांचि सख्या ! आजि अलायुध, घटोत्कचहि, वधिले. ।
पूर्वी [8]हिडिंबब[9]कमुख बहु, हे [10]शरचि काळिजामधिले. ॥ १४
दुर्योधनासि मिळते मगधपतिप्रमुखवीरवर जरि ते, ।
धरिते बळ, रण करिते, अरितेज समस्त सर्वथा हरिते. ॥ १५
काळें राहु, गिळाया, योजावा, वीरसत्तमा ! रविला, ।

---

१. जरासंध (मोरोपंत–सभापर्व–अध्याय १ पहा). २. शिशुपाल (मोरोपंत–सभापर्व–अध्याय १). ३. युक्तीनें. ४. विषण्णता, खेद, निराशा. ५. अंगुष्ठहीन. ६. एकलव्य हा हिरण्यधेनुक नामक निषादाधिपतीचा पुत्र. हा अस्त्रविद्येचा अभ्यास करण्यासाठीं द्रोणाचार्यांपाशीं गेला, परंतु आचार्यांनीं याचा अंगीकार केला नाहीं. यामुळें त्यानें आचार्यांपासून त्यांच्या पादुका मागून घेतल्या व त्यांसच गुरु समजून, तो अस्त्रविद्येचा अभ्यास करूं लागला. एकदां कौरवपांडव व इतर राजपुत्र मृगया करण्याकरितां वनांत गेले असतां, त्यांच्या बरोबरच्या कुत्र्यांच्या तोंडांत एकलव्यानें अशा कौशल्यानें लहान लहान अनेक बाण मारिले कीं तेणेंकरून त्याचें तोंड बंद झालें, पण त्यास इजा मुळींच झाली नाहीं. पुढें चौकशी केल्यावर सर्व हकिकत द्रोणाचार्यांस समजली, तेव्हां 'हा प्रसंगवशात् अर्जुनासही भारी होईल' असें मनांत आणून याजपाशीं गुरुदक्षिणा म्हणून त्याचा आंगठा (अंगुष्ठ) तोडून मागितला. तो त्यानें तात्काळ तोडून दिला. हा भारती युद्धांत दुर्योधनाच्या पक्षास मिळाला होता, पण युद्धसमयीं आलाच नाहीं. ७. कोळी. ८. हिडिंब–हा हिडिंबा राक्षसीचा भाऊ. पांडव लाक्षागृहांतून वांचून बाहेर पडल्यावर फिरत फिरत याच्या अरण्यांत आले. तेव्हां यानें त्यांना आपल्याकडे घेऊन येण्यास हिडिंबेस पाठविलें. परंतु ती भीमास पाहून मोहित झाली. तेव्हां तो स्वतःच पांडवादि होते तेथें आला व भीमाच्या आंगावर धांवला. तेव्हां भीमाचें व याचें मोठेंच बाहुयुद्ध झालें. त्यांत भीमानें यास ठार मारिलें. (महाभारत, आदिपर्व अध्याय १५२–१५४). ९. बकासुर हा एकचक्रानगरीचे समीप राहात असे. हा जटासुराचा पुत्र होय. तो त्या नगरींतील लोकांस फार पीडा देत असे. त्यामुळें सर्व नागरिक त्रासून गेले व त्यास दररोज २० खंडी अन्न, एक टोणगा व एक मनुष्य इतकें देण्याचें त्यांनीं कबूल केलें. असा क्रम चालू असतां, कुंतीसहवर्तमान पांडव लाक्षागृहांतून वांचून एका गरीब ब्राह्मणाच्या घरीं उतरले होते व त्याच दिवशीं त्या ब्राह्मणाची पाळी होती. ब्राह्मणानें सर्व वृत्त निवेदन करितांच भीम एकटाच वनांत गेला. पुढें तेथें राक्षस आला व त्याचें भीमाशीं युद्ध होऊन त्यांत भीमानें त्यास मारिलें. (महाभारत, आदिपर्व, अध्याय १६३–१६४). १०. विद्युक्त बाण.

तेंवि वृषावरि योजुनि, म्यां राक्षस वीर्यमत्त मारविला. ॥ १६
कर्णे न वधिता तरि; मज मारावा लागताचि हा चक्रें. ।
कीं ब्रह्ममखद्वेष्टा[1]; वधिला जाता न संगरीं शक्रें. ॥ १७
आजिवरि, तुम्हांकरितां म्यां हा राक्षस उपेक्षिला होता; ।
हो तारक या तुमचें दास्य[2]; रणमखींहि जाहला होता[3]. ॥ १८
धर्मद्वेषिवधाची, रक्षिलि नाहीं जरि प्रतिज्ञा ते, ।
ध्यातिल, गातिल, नमितिल, शमितिलक[4] न मज हरिप्रति ज्ञाते.॥१९
न धरीं विषाद, बसविन नाकीं, मेले सुयोध नवधामीं[5], ।
कथिन उपाय वृषवधा तुज, भीमासहि सुयोधनवधा, मीं.॥ २०
पर लब्धलक्ष्य[6] झाले, हे हरिसे गर्जताति, सितवाहा ! ।
हीं पळताति स्वबळें; चाल, म्हणायास लाव किर्तवा, 'हा !" ॥ २१
धृतराष्ट्र म्हणे, 'कोणी पुत्राला हित नसेचि सांगाया. ।
पार्थी शक्तिप्रेरण कथिलें नाहीं तुंवांहि कां गा ! यां[11] ? ॥ २२
पाचारितां रणमखीं जावें, हें व्रत नव्हे वृथा ज्याचें, ।
प्रथमचि•हटकुनि केलें कां न वृषें भस्म त्या पृथाजाचें[12] ? ॥ २३
साधाया स्वार्थातें, करितो[13] मानूनि जन कपट हितसें, ।
ईश्वर होउनि लोकीं आचरतो केंवि कनकपटहि[14] तसें ? ॥ २४
श्ववराहरणीं[15] जैसा श्वपचाला[16] लाभ निश्चयें आहे, ।

---

१. ब्राह्मण आणि यज्ञ यांचा द्वेष करणारा, राक्षस. २. या (घटोत्कचास) तुमचें (अर्जुनादि पांडवांचें) दास्य (सेवा) तारक हो (होवो)—असा अन्वय. तो ब्रह्म-मखद्वेष्टा होता, तथापि त्यानें तुमची सेवा केली आहे म्हणून त्याचा उद्धार होवो—असा भावितार्थ. ३. हवनकर्ता. ४. शांतजनांमध्यें श्रेष्ठ, तपस्वीश्रेष्ठ. येथील 'न'काराचा अन्वय प्रत्येक क्रियापदाशीं लावावयाचा. येथें 'तिल' ह्या वर्णांची आवृत्ति असल्यामुळें छेकानुप्रास आहे. ५. नव्या गृहीं. ६. इष्टवस्तु ज्यांना साध्य झाली आहे असे. ७. हे अर्जुना ! ८. दुष्टा दुर्योधनाला. ९. हाय ! हाय ! १०. त्यां (संजयानें). ११. कर्णास. १२. अर्जुनाचें. १३. [जेंवि] जन कपट [हें] हितसें मानून [कपट] करितो, तसें ईश्वर होउनि (असून) कनकपटहि (पीतांबरधारी कृष्ण) लोकीं (ह्या मृत्युलोकांत) केंवि आचरितो ?—असा अन्वय. १४. कृष्णही. १५. श्व+वराह+रणीं=कुत्रा आणि डुक्कर यांच्या युद्धामध्यें. १६. अंत्यजाला. दोघांचें भांडण आणि तिसऱ्याला लाभ, ह्या न्यायानें.

कृष्ण तसा स्वार्थीतें [1]राक्षसराधेयसंगरीं पाहे.' ॥ २५
संजय म्हणे, "पृथेच्या कृष्ण करिता मस्म आज, तनयाला; ।
लोभी निधिला तैसा, प्रभु करितो बहुत बा ! जतन याला. ॥ २६
'पार्थी शक्तिविमोक्षण कथिलें नाहीं तुवांहि कां गा ! या ?' ।
म्हणतां, तरि कर्णाला, चुकलों नाहींच मीहि, सांगाया. ॥ २७
कर्णासि रात्रिं शिबिरीं दुःशासन-शकुनि-नृपहि विनवीती. ।
जी [2]जयवधप्रतिज्ञा, सांगावी काय नित्यहि [3]नैवी ती ? ॥ २८
कर्ण म्हणे, '[4]वैर देउनि, मग मागें काय मी कवि सरेन ? ।
शक्ति उद्यां पार्थावरि टाकीनचि निश्चयें, न विसरेन.' ॥ २९
[5]जय न, वधावा कृष्णचि; त्याविण ते सर्व काय पांगूळ. ।
हेंचि बहु सरस अमृत त्यजुनि, रसिक वरिल काय पां गूळ ?॥३०
[6]चवघांत करिल [7]अजितचि त्यास, सखित्वें जयास वरिल, हरी; ।
तोचि अमर, अमृताचा निधि[8] सोडिल ज्या [9]परासुवरि लहरी. ३१
तस्मात् प्रातःकाळीं कृष्णचि, सोडुनि शक्ति, मारावा. ।
[10]यूथप वधितां, हरिच्यां[11], कैसें साहेल [12]यूथ, आरावा ? ॥ ३२
ऐसा दृढतर निश्चय शिबिरीं व्हावा, जसा जप, [13]दिसवड. ।
न रणीं राहे, पाहे, [14]पैरावारा तसा, [15]सपदि [16]सवड. ॥ ३३
वधबुद्धि युद्धकाळीं मोहेचि, न सावधान राहे ती. ।
कृष्ण हृषीकेशीं[17] धरूं देईल कसा वधा नरा हेती ? ॥ ३४

---

१. घटोत्कच आणि कर्ण यांच्या युद्धांत. २. अर्जुनवधाची प्रतिज्ञा. ३. अर्जुनाच्या वधाविषयीं दररोज नवीन प्रतिज्ञा करी, तिचें वर्णन काय करावें ? ४. अर्जुनाला मी मारीन, असें वचन देऊन. ५. 'न जय वधावा, कृष्णचि' असें पाठांतर आहे. ६. चारचौघांत, मंडळींत. ७. अजिंक्यचि. ८. समुद्र. ९. मृतावरि. १०. यूथ+प=कळपाचा मोहोरक्या. ११. गजसमुदाय. १२. सिंहाच्या गर्जनेला. १३. दररोज. १४. समुद्राच्या दोन्ही बाजूस. १५. त्वरित. ह्या गीत्यर्धाचा अर्थ नीट लागला नाहीं. १६. शेवट. १७. हृषीक+ईश=इंद्रियांचा स्वामी, ज्याचीं स्वतःचीं किंवा सर्वप्राणिमात्राचीं इंद्रियें ज्याच्या स्वाधीन असतात असा. 'हृषीकेश' हें विशेषण साभिप्राय असल्यामुळें परिकरालंकार. हृषीकेश कृष्ण [कर्णासारख्या] नरा वधा (अर्जुनाच्या वधाकरितां) हेती (हत्यार, आयुध) कसा धरूं देईल—असा अन्वय.

योजी इतर[1]; म्हणे 'जय[2] अरिदृष्टिपुढें न सर्वथा राहो.' ।
ऐसें सख्यास रक्षी, प्रभुवर होऊनि सर्व थारा[3], हो ! ॥ ३५
ऐसा श्रितरक्षणपटु जो, म्हणतो सेंद्रनाक[4] थारा ज्या, ।
त्या चक्रधरप्रभुच्या हननाची काय गा ! कथा ? राजा !" ॥ ३६
सात्यकि कृष्णासि म्हणे, 'प्रभुला विज्ञापना असी मौजी[5]. ।
पार्थी न टाकिली कां शक्ति वृषें, धरि बळा असीमा[6] जी ?'॥ ३७
कृष्ण म्हणे, 'शैनेया ! म्यां कर्ण भ्रमविला, बकासुरसा[7]. ।
भक्ता मी बहु जपतों, जपतो शतमख[8] जसा सुधा-सु-रसा. ॥ ३८
पंथकरिलें[9], चालविलें, आपण हें वर्तन, या न राखावें[10] ? ।
त्या उग्रशक्तिनें या कुंतीच्या न तनया नरा[11] खावें. ॥ ३९
वसुदेव-देवकी-बलदेवादि तुम्ही समस्त मत्प्राण; ।
जाण, प्रिय पार्थ जसा, न तसा कोणी, खरें; तुझी आण[12]. ॥ ४०
व्यसनीं, रक्षिन, बुडतां आधीं पार्था, तसा न भवना[13] मीं. ।
या मित्रीं मत्प्रेमा निश्चळ, उपमन्यु[14] जेंवि भवनामीं[15]. ॥ ४१

---

१. दुसरा, अन्य, घटोत्कच. २. अर्जुन. ३. आश्रय. ४. स+इंद्र+नाक=इंद्रासहवर्तमान जो स्वर्ग तो. ५. माझी. ६. जिला अमर्याद बळ आहे अशी. ७. भस्मासुराप्रमाणें. भस्मासुर हा भस्मापासून उत्पन्न झालेला असुर. यानें शिवाची आराधना करून, ज्याच्या मस्तकीं आपण हस्त ठेवूं तो दग्ध व्हावा, असें वरप्रदान संपादिलें होतें. पुढें हा फार उन्मत्त होऊन प्राणिमात्रांस पीडा देऊं लागला व याच्या मनांत पार्वतीविषयीं अभिलाषाही उत्पन्न झाली. आपली दुष्ट वासना परिपूर्ण व्हावी म्हणून तो शंकराच्या मस्तकीं आपला हात ठेऊं लागला. तेव्हां शंकर पळून स्वर्गांत विष्णूकडे गेले. पुढें विष्णूनें मोहिनीचें रूप धारण करून, भस्मासुरास आपल्यासारखें नृत्य करावयास लाविलें. अशा रीतीनें याचा हात याच्याकडूनच याच्या मस्तकीं ठेववून, यास दग्ध केलें—अशी कथा आहे. ८. इंद्र. ९. पत्करिलें. १०. 'आपण हें जतन, यान, राखावें' असा रा० पराडकरांच्या प्रतींत पाठ आहे. ११. अर्जुनास. १२. शपथ. १३. गृहाला. १४. उपमन्यू हा वसिष्ठकुलोत्पन्न व्याघ्रपादनामक ऋषीचा ज्येष्ठ पुत्र. हा लहान असतां बहुतकरून घरींच खेळत असे. परंतु एकदां हा दुसऱ्या आश्रमांत जाऊन तेथील मुलांशीं खेळत असतां, तेथें ह्यानें गाईचें दूध काढतांना पाहिलें, व तेथील मुलांच्या मातेनें आपल्या मुलांस व यास गोरस पान करण्यास दिलें. तेथून तो आपल्या घरीं येऊन आपल्या मातेजवळ गोरस मागूं लागला. तेव्हां त्याच्या मातेनें नेहमीप्रमाणें पाण्यांत पीठ कालवून तें त्यास दूध म्हणून दिलें. परंतु तें तो न

झाला सजीव हा, व्येसु होउनि; लाभासि या नसे जोडा. ।
मज वाटे प्रद्युम्नप्रत्यागमनप्रहर्ष तो थोडा. ॥ ४२
अर्जुन मूर्धा, याच्या नाशें होईल आपुला घात; ।
बा ! तत्काल घटोत्कच हा, म्यां केला परांपुढें हात.' ॥ ४३
यापरि सात्यकिकेशवसंवाद श्रवण करुनि, संमुदा या ।
सूतांसि बोल लावी नृप; निंदी सुतमुखाप्तसमुदाया. ॥ ४४
'होतों कृतार्थ, जरि ती गोविंदीं शक्ति सोडिली असती; ।
गेली कीं हातींची, सर्वस्वें जेंवि जोडिली अं-सती.' ॥ ४५
सूत म्हणे, "स्वामीचें जें मत, ऐसेंचि आमुचें; परि तें ।
झालें विफळ; कपाळ, प्रभुजी ! तुमचेंचि घात हे करितें. ॥ ४६
भलत्या कृष्णीं टाकिन शक्ति, असा वृष विचार करि पक्क; ।

पितां 'दुसऱ्या आश्रमांत दूध प्यालों, तसें दूध दे' असें म्हणूं लागला. यामुळें त्याची आई जरा खिन्न होऊन म्हणाली कीं, 'असें दूध आपणास मिळण्यायोग्य ईश्वराराधन पूर्वजन्मीं आपल्या हातून घडलें नाहीं.' हें ऐकतांच त्या भगवनिष्ठ बालकानें शिवाराधन करण्यास आरंभ केला व त्यास प्रसन्न करून त्याच्याकडून आकल्प आयुष्य व क्षीर-सागराचें आधिपत्य हीं संपादन केलीं. हा शैव होता व कृष्णासही यानेंच शैवी दीक्षा दिली. हा धौम्य ऋषीचा ज्येष्ठ भ्राता व तंडी ऋषीचा शिष्य होता. (महाभारत, अनुशासनपर्व, अध्याय १४). १५. शिवनामीं.

१. अर्जुन. २. गतप्राण. ३. तुलना, बरोबरी. ४. प्रद्युम्न+प्रत्यागमन+प्रहर्ष= प्रद्युम्न परत आल्याचा मोठा हर्ष. प्रद्युम्न=कृष्णपुत्र, त्याला शंबरासुरानें बाळपणीं चोरून नेऊन समुद्रांत टाकिलें; त्याला मत्स्यानें गिळिलें. माशाला कोळ्यानें पकडून शंबराच्या पाकशाळेंत पाठविलें; तेथें पाककर्त्रीनें माशाला कापितांच प्रद्युम्न जिवंत सांपडला. मोठा झाल्यावर शंबरासुराचा वध करून तो कृष्णगृहीं परत आला. त्या कथेचा एथें निर्देश आहे. भागवत–दशमस्कंध–उत्तरार्ध–प्रद्युम्नकथा पहावी. ५. मस्तक. ६. सहर्षा. ७. धृतराष्ट्रसारथी संजय याला. ८. धृतराष्ट्र. ९. सुत+मुख+आप्त+समुदाया=दुर्योधनप्रभृति पुत्र व आप्त यांस. १०. जारिणी. कल्पनासादृश्यः–'टाकुनि जातीच बहु प्रेमें जरि सतत सांलिली असती ।' (सभापर्व–अध्याय ४ गीति ३९). ११. प्रभुजी (राजा धृतराष्ट्रा !) तुमचेंचि कपाळ (दैव, प्रारब्ध) हे घात (कर्णाचें मन चंचल होणें वगैरे) करितें, असा अन्वय. 'घात हें करितें' असें पाठांतर. १२. भलत्या= दोघांतून कोणत्या तरी एकावर.

नित्य म्हणे, 'सिंहोऽसि[1], श्वस्त्वं गंतासि कृष्णकरिप ! क ?'॥ ४७
योजावें तें समयीं आम्हां कोणा न आठवावें, हो ! ।
दैव प्रभु[2], अष्टांगुल जें, त्यासि म्हणेल, 'आठ वावें हो.' ॥ ४८
गतशोक यशास ? पुरे. होउनि सावध[3], पुढील परिसा, हो ! ।
गुरुवधवृत्त सुदुःसह, बहु तुमचें हृदय मृदुल[4] परि, साहो."॥ ४९
भीमाला, जयमत्तद्वेषिकटकमर्दनासि[5], पाठवुनी, ।
राजा[6] रडे, घटोत्कचकृत[7] बहुसेवोपकार[8] आठवुनी. ॥ ५०
कृष्ण म्हणे, 'विकळत्वा अनुचित तूं, धीर शुद्ध समयज्ञ; ।
सोडुनि शोक, करावा समर, नसे श्रेष्ठ युद्धसम यज्ञ.' ॥ ५१
धर्म म्हणे, 'बहु दुःसह सदपत्यवियोग विषम, हा, देवा ! ।
मज वाटे न गिळेलचि सदपत्यवियोगविष महादेवा. ॥ ५२
वत्सें घटोत्कचें बहु केलें, होउनि वनांत नत दास्य; ।
गुरुवत्सलांत[9] खालीं झालें या त्रिभुवनांत न तदास्य[10]. ॥ ५३
जी सहदेवीं, तीच प्रीति, मुकुंदा ! घटोत्कचीं मौंजी[11]. ।
बा ! जीवदान दिधलें विजयासि, मरोनि शेवटीं आजी. ॥ ५४

---

१. कर्ण म्हणेः–सिंहः अस्मि=मी सिंह आहें. कृष्णकरिप ! त्वं श्वः क्व गंतासि=हे कृष्णरूप हस्तिश्रेष्ठा ! तूं उद्यां कोठें जाशील ? २. दैव प्रभु (समर्थ) होय, [कारण] जें अष्टांगुळ (आठ अंगुळें अंतरावर आहे, जवळ आहे) त्यासि 'आठ वावें हो' (आठ वावें अंतरावर जा, दूर जा) असें म्हणेल–असा अन्वय. एकंदरींत सर्व गोष्टी दैवाधीन असतात, हा भाव. 'विधिरहो बलवानिति मे मतिः' [भर्तृहरी]. ३. स्वस्थचित्त. ४. मऊ. विषमालंकार. ५. जयप्राप्तीमुळें उन्मत्त अशा शत्रुसैन्याच्या नाशार्थ. ६. धर्म. ७. घटोत्कचानें केलेल्या. ८. बहुसेवारूप उपकारास. पांडव वनवासांत असतां, तीर्थयात्रा करीत हिंडतेवेळीं त्यांस हिमालयाच्या गंधमादन शिखरावर जाण्याचा प्रसंग आला. तेव्हां भीमाखेरीज द्रौपदीसह सर्व पांडव इतके थकून गेले, कीं त्यांस एक पाऊलही पुढें टाकवेना. भीम अशा प्रसंगीं फक्त पांडवांस वाहून नेण्यास समर्थ होता, पण त्यांच्या समागमें असणाऱ्या ऋषींसह सर्वांस नेण्यास असमर्थ होता. म्हणून भीमानें घटोत्कचाचें स्मरण केलें. त्या वेळीं तेथें तात्काळ प्रगट होऊन, त्यानें सर्वांस एकाच वेळेस व एका क्षणांत पर्वतावर नेऊन, नरनारायणाश्रमीं सोडिलें (वनपर्व–अध्याय १४५)–अशी कथा आहे. ९. वडिलांच्या ठायीं प्रीति करणारांत. १०. तत्+आस्य=त्याचें मुख. ११. माझी.

आम्ही तुम्हींहि नव्हतों, अरिंनीं अभिमन्यु मारितां जवळ; ।
जिष्णुसमक्ष कसा हा झाला, त्या शक्तिच्या मुखीं, कवळ ? ॥५५
अभिमन्युघातकारण ते मुख्य द्रोण कर्ण सोडून, ।
काय मिळविलें, स्वल्पागस्कृतसैंधवशिरासि तोडून ? ॥ ५६
न बहु मम प्रिय केलें, मारूनि जयद्रथा अधन्या या; ।
कर्णाचा कीं गुरुचा, करितां तरि मानतों, वध, न्याय्या. ॥ ५७
ते हे प्रवर्तले वृष गुरु अहि, शरगर वमून, भाजाया; ।
कैसें साहों, पाहों, कीं भर्त्ता मीं, चमू न भाजा या. ॥ ५८
पाठविला भीम, मथुनि बळ, गुरुलाही रणीं मथिल आजी; ।
मी कर्णावरि जातों. [६]तो मृत, कीं हां, तुम्हां कथिल आजी.'॥५९
ऐसें बोलुनि, कोपें कर्णावरि नीट धांवला राजा; ।
मागुनि हरि हरि हांकी; तों झाला प्रकट त्यापुढें आंजा. ॥ ६०
व्यास म्हणे, 'बा धर्मा ! क्रोध सिताश्वीं करूं नको; परत. ।
सावध हो; बा ! व्यसनीं पडतो, साहस करून, कोप[११]रत. ॥ ६१
जरि कर्णार्जुन भिडते, तरि समरीं सकल योजिते शस्त्रें; ।
परमास्त्रज्ञ धनंजय, राधेयाचीं निवारिता अस्त्रें. ॥ ६२
त्या शाक्रशक्तितें जरि पार्थी वृष टाकिता, कसें होतें ? ।
व्यसन, तरं[१२]डकभंगें होय समुद्रीं जसें, तसें हो ! तें. ॥ ६३

---

१. अभि (निर्भय) आणि मन्युमान् (क्रोधवान्) होता म्हणून त्याला अभिमन्यु असें नांव पडलें (आदिपर्व–अध्याय २२१।६७). २. स्वल्प पातक करणाऱ्या जयद्रथाचें शिर तोडिल्यानें. ३. न्याय्य झाला असता. ४. शररूप विष. ५. भार्या. मी भर्त्ता (पति) असून या (याला, अर्थात् मला) चमू (सैन्यरूपी) भाजा (भार्या) न (नाहींशी होणें, नष्ट होणें) ही गोष्ट मी आपल्या डोळ्यांनीं कशी पाहूं व सहन करूं ? 'चमू नभा जाया' असा पदच्छेद करूनही अर्थ लावितां येईलः—मी भर्ता (स्वामी, धनी) असून चमू (सैन्य) नभा जाया (आकाशांत जाण्यास, नष्ट होण्यास) कैसें पाहों व कैसें साहों ? ६. घटोत्कच. ७. मी धर्म. ८. संग्राम. ९. घोडे. १०. व्यास. ११. क्रोधवश. १२. तरांडें, तारूं, त्याच्या भंगानें. जसें (समुद्रांत) तरंडकभंगें (तारवांच्या भंगामुळें) व्यसन (संकट) [उत्पन्न होतें] तसें तें (अर्जुनावर कर्णानें शक्ति सोडिली असती व तो मरण पावला असता तर) व्यसन झालें असतें—असा भाव.

सर्वस्वान्त[1] चुकविला जेणें, तो कां नको पैलाशान्त[2] ? ।
हें किति ? गा ! बा, वधितां शत[3]मिततोकां, न कोपला शांत[4].॥ ६४
काळें वधिला राक्षस; ती शक्ति निमित्तमात्र; हें साचें. ।
आवंड बुद्बुदों[5]चें वपु, अतिनिःसार, मित्र फेंसाचें. ॥ ६५
विकळत्वें यश, पात्रच्छिद्रें पीयूषसें, न सांडावें. ।
मांडावें निजधर्मानुष्ठान तुवां; असेंचि मांडावें. ॥ ६६
पंचमदिवसीं, धर्मा ! होइल सकळाहि हे तुझी व[6]सुधा. ।
लोकत्रयीं बहुमता कीर्तिहि, बहु तृप्तिहेतु, जीव[7]सुधा.' ॥ ६७
सांगुनि हित, अंतर्हित[8] झाला तो वेद[9]खगनभ व्यास, ।
ज्याच्या पदरेणुपुढें, पटु धाया देव[10]नग न, भव्यांस[11]. ॥ ६८
मग, 'सफळ हो पितृमनोरथ !' पंचमवेद[12] पाठ वीरा ज्या, ।
ऐसें म्हणोनि, गुरुवरि धृष्टद्युम्नासि पाठवी राजा. ॥ ६९
तैसेंचि परबळातें, विजयाद्यखिलांसि पाठवी, रगडी; ।
आम्हांकडीलहि सकळ, देती न रिपूंसि पाठ, वीर गडी. ॥ ७०
रात्रि परम दारुण, तैं मेले बहुलक्ष योध, यां[13]माजी ।
जाली जरि त्रियामा, तरि अतिघोरा सहस्रयामा जी. ॥ ७१
जाले निद्रांध सकळ भट, न वधिति शत्रु, जवळ राहुनि जे; ।
अत्यद्भुत तें वाटे मिळतांहि सुधांशुकवळ[14], राहु निजे. ॥ ७२

---

१. सर्वस्वाचा नाश. २. पलाश+अंत=घटोत्कचाचा नाश. ३. शंभर पुत्रांना. ४. वसिष्ठ ऋषी. वसिष्ठ ऋषी विश्वामित्रास 'ब्रह्मर्षि' असें म्हणण्यास कबूल नव्हते. यामुळें विश्वामित्रानें वसिष्ठाचे शक्ति आदिकरून शतपुत्र राक्षसाकडून भक्षविले. आपल्या पुत्रांविषयीं वसिष्ठांस फार दुःख झालें, तरी त्यानें संतापून जाऊन विश्वामित्रास शापिलें नाहीं–अशी कथा आहे. ५. पाण्यावरील बुडबुड्यांचें. ६. पृथ्वी. ७. प्राणिमात्रास अमृताप्रमाणें वाटणारी. ८. गुप्त. ९. वेदरूप पक्ष्यांस आकाशरूप असा. १०. कल्पतरु. ११. कल्याणास. १२. धनुर्वेद. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्वणवेद, हे बाकीचे चार वेद. १३. यामध्यें. जी त्रियामा (जींत तीन प्रहर आहेत अशी रात्र) ती अतिघोरा (अत्यंत भयंकर) [असल्यामुळें] सहस्रयामा (जींत हजार प्रहर आहेत अशी, अर्थात् फार मोठी) झाली किंवा वाटली–असा भाव. १४. अमृतमय किरण आहेत ज्याचे अशा चंद्राचा ग्रास.

पार्थ स्वपरांसि म्हणे, 'स्वस्थ निजावें तुम्हीं, न पेंगावें. ।
मग यश शशिप्रकाशें जोडावें, जें महातपें गावें.' ॥ ७३
त्या अभिमतवैरदानें पार्थासि स्वपर सर्व मानवले; ।
दुष्काळीं क्षुधितांतें जाणो दिधलें यथेष्ट कानवले. ॥ ७४
अश्वीं, रथीं, गजीं जे जेथें होते तसेचि ते निजले; ।
क्षतजें, जयसाधुत्वप्राप्तप्रेमाश्रुजळभरें, मिजले. ॥ ७५
शोभे बळ, जेंवि लिही, चित्रपटीं रंग अर्जुन, चितारी; ।
व्यसनीं स्वपरांसहि सम तो सश्रीरंग अर्जुनचि तारी. ॥ ७६
स्त्रीकुचलीन तरुणसे, क्षत्रिय गजकुंभलीन ते गमले; ।
रमले मुहूर्तपरिमित निद्रेसीं सर्व जीव विश्रमले. ॥ ७७
मग भगवान् विधु उगवे, पळवी, देऊनि कांप, तिमिरासी; ।
खोट्याला, तेजस्वी नांदों देईल कां पति मिरासी ? ॥ ७८
करिति पुन्हा, सुखवाया शक्रमुखां सृष्टिपां, रणारंभो; ।

---

१. स्वपक्षीय व शत्रुपक्षीय सैनिकांना. 'स्वभटांसि' असें पाठांतर. २. चंद्रोदय झाल्यावर. ३. इच्छित वस्तु प्राप्त झाल्यामुळें. ४. पक्वान्नविशेष (करंज्या). उत्प्रेक्षालंकार. ५. रक्तानें. ६. मिळवून. ७. हत्तीच्या गंडस्थळाला चिकटलेले. ८. ह्या व पुढील गीत्यर्धांत **समासोक्ति** नामक अलंकार आहे. [ह्या] अर्धांत अचेतन निद्रेवर रममाण झाल्याचा आरोप केला आहे, तो असल्या स्थळीं स्त्रीसच योग्य आहे. या आरोपाचें पर्यवसान शृंगारांत होतें. 'निद्रा' ही जशी काय एखादी विसांवा देणारी स्त्रीच, असा निद्रेवर झालेला स्त्रीत्वाचा आरोप स्पष्ट शब्दांनीं दाखविलेला नसल्यामुळें, ही **'समासोक्ति'** झाली. 'रमणें' या क्रियेप्रमाणें 'निद्रा' शब्दाचें स्त्रीलिंग ही 'समासोक्ती' ची कल्पना झटकन लक्ष्यांत आणून देण्याच्या उपयोगीं पडत आहे. [पुढील] अर्धांत 'विधु' शब्दाच्या पुल्लिंगाचा व 'कांप देऊन पळविणें' या क्रियेचाही तसाच उपयोग होत आहे. इतकेंच कीं या स्थळीं पर्यवसान वीररसांत आहे, शृंगाररसांत नाहीं." [अलंकारमीमांसा]. ९. खोटेपणानें हक्क सांगणाराला. १०. मिरासदार (वतनदार). हा शब्द आरबी आहे. ११. इंद्रप्रमुख लोकपालांस. आठ दिशांचे आठ पालक (पति, स्वामी) आहेत, त्यांस 'लोकपाळ', 'दिग्पाल' 'दिग्पति' असें म्हणतात. त्यांचीं नांवें:—इंद्रो वन्हिः पितृपतिर्नैर्ऋतो वरुणो मरुत् । कुबेर ईशः पतयः पूर्वादीनां दिशां क्रमात्. ॥ (अमरकोश). १२. रण+आरंभ=युद्धाला सुरुवात.

पावे, पराक्रमि पुरुष पति पाहुनि, दृष्टिपारणा, रंभा[1].' ॥ ७९
चंद्रोदय झाल्यावरि, कुरुपति गुरुला म्हणे, 'बहु श्रमले ।
पांडव पांचाळ, रणीं होउनि निद्रांध केवळ भ्रमले. ॥ ८०
कैसे निजों दिले.बा ! ? आले होतेचि आयते हातीं. ।
म्हणतचि होतीं शस्त्रें[2], 'भ्रमतां धरणार राय ते हा,' तीं. ॥ ८१
गुरुजी ! प्रियार्थ तुमच्या हें आम्हीं साहिलें, गरळ गिळिलें. ।
स्वापत्याचें[3] नरडें व्याघ्रीनें मात्र, ऐकतों, पिळिलें. ॥ ८२
शस्त्रास्त्रज्ञ त्रिजगीं स्पष्ट तुम्हांसमें[4] तुम्ही; तदपि त्यांचें[5] ।
लंघनें सुखें सहातां, कळलें कीं गुरुकडे पद पित्यांचें[6]. ॥ ८३
'ते[7], मीहि, शिष्य तुल्यचि; परि तिकडे प्रेम, न इकडे, कां जी ? ।
हतभाग्या ये धांवुनि, जातां पीयूषनइकडे[8], कांजी.' ॥ ८४
ऐसें द्रोणाला बहु वदला जें काय राय, तें नाकीं[9] ।
नहुषचरितसें[10] दुःसह झालें; कीं जेंवि रायतें नाकीं[11]. ॥ ८५

---

१. रंभेसारखी सुंदर स्त्री. २. तीं शस्त्रें म्हणतचि होतीं, [कीं] ते भ्रमतां हा राय [त्यांस] धरणार (खात्रीनें धरीलच).–असा अन्वय. ३. स्व+अपत्याचें=आपल्या संततीचें. ४. अनन्वयालंकार. ५. त्यानें (अर्जुनानें केलेलें) उल्लंघन. ६. पिता=पाति (रक्षति) इति पिता, जो रक्षण करितो तो पिता. गुरूकडे पित्याचें पद असतें, म्हणजे गुरु हा पितृतुल्य असतो, हें आतां माझ्या ध्यानांत आलें–असा दुर्योधनाच्या भाषणाचा मतलब. [रक्षणादि कारणांनीं जे पितृत्व पावतात त्यांचा निर्देश पुढील श्लोकांत केलेला आढळतोः–(१) शरीरकृत् प्राणदाता यस्य चान्नानि भुंजते । क्रमेणैते त्रयोऽप्युक्ताः पितरो धर्मशासने. ॥ (२). कन्यादाताऽन्नदाता च ज्ञानदाताभयप्रदः । जन्मदो मंत्रदो ज्येष्ठभ्राता च पितरः स्मृताः ॥] ७. ते=पांडव. ८. हतभाग्य, अमृताच्या नदीकडे धांवून जातां कांजी त्याकडे धांवून येते. नई=नदी. ९. स्वर्गलोकांत. १०. नहुष राजाच्या आचरणासारखें (मागे पृष्ठ १७८ टीप ३ पहा). ११. नाकांत. 'निबंधमाला'कारांनीं येथील रायत्याचा दृष्टांत ग्राम्य ठरविला असता. कारण पंतकृत आदिपर्व–अध्याय ११ तील गीति 'गेला स्वर्गासि अमित सुकृतें जोडोनि राय, तें नाकीं । होय सु दुःसह शंका, जैसें बाळासि रायतें नाकीं ॥ ७५ ॥' हींतील 'रायत्या'च्या दृष्टांतावर त्यांनीं '[या] आर्येतील रायत्याचा दृष्टांत वाचून तर थोडेच वाचक हांसल्यावांचून राहातील ! इंद्र कोणीकडे आणि रायतें तें काय !!' अशी टीका केली आहे (निबंधमाला–अंक ६३). पण ही टीका रास्त दिसत नाहीं, कारण स्वर्गांतील देवादिकांनीं रायतें खाल्लें असें वर्णन नसून, केवळ 'नाक्यांत तिडीक जाण्याविषयीं हा दृष्टांत दिला आहे. रायत्यांत मोहऱ्या

कोपें द्रोण म्हणे, 'मी वृद्ध, तरि तरुण-सहस्र-सम झटतों. ।
मजसम कटकीं टिकता[1] न दिसे, भीष्माविना इतर, भट तों.॥८६
शक्त्यधिक यत्न करितों, जरि सर्व स्वपरबल[2] मला गातें; ।
परि वृद्ध भोरपीसा[3], तूं एकचि मानिसी न लागोतें[4]. ॥ ८७
धर्म असा, मारावें अस्त्रें, ज्या विदित अस्त्र; तें ज्यातें ।
न विदित, त्या न वधावें, प्रगटूनि रणांत अस्त्रतेजातें. ॥ ८८
परि अस्त्रें मी परबळ जाळिन, काढीन तरिच हें वर्म[5]; ।
कर्म क्रूर करिन, कीं लेशहि लुब्धाश्रितीं[6] नुरे धर्म. ॥ ८९
हें युद्ध काय ? रुद्रेंहि न नारायणसखा नर थकविला. ।
रविच्या रथाहुनि उणा तेजें थांचा[7] गमे न रथ कविला. ॥ ९०
न हरि[8], न निवातकवच[9], न षष्टिसहस्रहि[10] हिरण्यपुरवासी[11] ।

वांटून घातलेल्या असतात, आणि तें रायतें मुखप्रिय असतें. म्हणून [माणसें] एकदम तें पुष्कळच खाऊं लागलीं असतां त्यांचे नाकांत फणफणाट होऊन, मस्तकांत तिडीक जाते, ती त्यांस सहन होत नाहीं.' [कै. गणेशशास्त्री लेले] तसें द्रोणाला दुर्योधनाचें भाषण अत्यंत दुःसह झालें, असा अर्थ उघड आहे. या गीतींत **मालोपमा** आहे. कीं=किंवा.

१. टिकाव धरणारा. २. स्वपक्षाकडील व शत्रूकडील बल (सैन्य). ३. म्हाताऱ्या बहुरूप्यासारखा. भोरपी=कोल्हाटी; कळसूत्री, दशावतार इत्यादि भोरीप (खेळ) करून उपजीविका करणारा. भोरपी फार हांवरे असतात. द्रोणाचार्य म्हणतात, कीं तूं फार हांवरा आहेस. गीति ८६ मध्यें वर्णन केल्याप्रमाणें मी पराक्रम करीत असतां तूं त्यांत संतोष मानीत नाहींस. ४. लाभातें (लाग=लग्गा) ५. कवच. ६. लुब्ध. (लोभी, आशाळभूत) मनुष्याच्या आश्रिताच्या (सेवकाच्या) ठिकाणीं. 'लुब्धश्रितीं' असें पाठांतर. ७. अर्जुनाचा. ८. इंद्र. श्वेतकी नामक राजानें असंख्य यज्ञ केले. त्यांत हविर्भक्षण केल्यामुळें अग्नीला इतकें जाड्य आलें कीं 'त्याचा प्रतिकार कसा करावा ?' असें विचारण्यासाठीं त्याला ब्रह्मदेवाकडे जावें लागलें. 'खांडववनभक्षण करून अग्नीनें आपलें जाड्य निरस्त करावें, असा उपाय पितामहानें सांगितला. पण तें वन इंद्ररक्षित असल्यामुळें अग्नीस सुप्राप्य नव्हतें म्हणून अग्नि विप्रवेषानें कृष्णार्जुनांस शरण गेला; तेव्हां त्या उभयतांनीं खांडववन भक्षणार्थ देण्याचें कबूल केलें व अग्नि तें वन भक्षण करूं लागला. हें इंद्राला कळतांच, तो अग्नीचें निवारण करण्यासाठीं आकाशांतून जलवृष्टि करूं लागला. तेव्हां कृष्णार्जुनांनीं त्याचा पाडाव करून, त्यास परत लाविलें. नंतर अग्नि तें वन पंधरा दिवस यथेच्छ भक्षण करून व्याधिनिर्मुक्त झाला.—अशी कथा आहे. (मोरो-

झकले, ज्याच्या धनुच्या, सोसाया संगरांत, सु-रेखासी. ॥ ९१
ऐसा बहु तेजस्वी नरमूर्ति न होय कामहा, काल ? ।
पळतांहि त्यापुढें हय न, मग कसे हंतुकाम हा काल ? ॥ ९२
गंधर्वगर्व सर्वहि हरुनि, हरी तुमचियाहि बंधातें. ।
श्रुतें राहो, अनुभूतहि न स्मरसी, वीर्यसंपदंधा[६] ! तें. ॥ ९३
प्रत्यक्ष तव बलक्षय करितो, सर्वहि उदंड जरि झटतों; ।
भट तों विजयचि, आम्ही जिंकाया ईश्वरापुढें नटतों.' ॥ ९४
कुपित नृप म्हणे, 'गुरुजी ! पार्थगुणाचें पुरे करा कथन. ।
करुनि द्विधा बळ, करूं आम्ही चवेंघेचि जिष्णुचें मथन'. ॥ ९५
द्रोण म्हणे, 'स्वस्ति असो.' 'हरिलां मारिन' म्हणेल कोण ससा? ।
तूं भव्य, बा ! गरुडसा जय, 'त्या खाईन' म्हणसि घोणसा[११].९६
वदसी भलतेंचि कसें, जें हास्यावह वदोत बालिश, तें ? ।
[१२]एकें काय ? पराभव रामाचा न घडताचि [१३]बालिशतें. ॥ ९७
प्राणाधिक बहुमत जो श्रीकृष्णा गोपतोकपाळाला[१४], ।

पंत–आदिपर्व, अध्याय ३७ गीति ९३–१०२ पहा). ९. मागे पृष्ठ १४३ टीप ९ पहा. १०. साठ हजार राक्षस. ११. सुवर्णपुरांत राहाणारे. पुलोमा आणि कालका अशा दोन दैत्यकन्यका होत्या. त्यांस ब्रह्मदेवाच्या प्रसादानें पौलोम आणि कालिकेय असे अनुक्रमें पुत्र झाले. ते देवांस अवध्य होते. परंतु त्यांचा मृत्यु मानवाच्या हातून होता. त्यांचें नगर यथेच्छगामी हिरण्यपुर म्हणून होतें. त्यांस अर्जुनानें मारिलें. (वनपर्व–अध्याय १७३).

१. उत्तम शब्दास (टणत्कारास) २. कामहंता, मदनारि (शिव). काल=यम. 'न होय कां महाकाल' असा पाठभेद. ३. मारण्याची इच्छा ज्यांस आहे असे. ४ चित्रसेन गंधर्वाचा गर्व. पांडव वनवासांत असतां, घोषयात्रानिमित्तानें त्यांस छळावें अशी कर्णानें दुर्योधनास मसलत दिली. त्याप्रमाणें ते घोषयात्रेस गेले असतां, तेथें चित्रसेन गंधर्वानें दुर्योधनास पकडून, तो त्यास आपल्याबरोबर घेऊन जात असतां अर्जुनानें गंधर्वाचा पराजय करून दुर्योधनास सोडविलें, अशी कथा आहे. ५. श्रवण केलेलें, ऐकिलेलें. ६. बळ आणि संपत्ति यांनीं अंध (उन्मत्त) झालेल्या (दुर्योधना !). ७. तांडव करणाऱ्या शिवाला जिंकण्यास्तव त्यापुढें व्यर्थ नटावें, त्याप्रमाणें आम्ही नटतों. ८. सैन्याचे दोन भाग करून. ९. गीति १०१ पहा. १० सिंहाला. ११. एका जातीच्या सापासारखा. १२. एका वालीची कथा काय ? काव्यार्थापत्ति अलंकार. १३. शेंकडों वालींच्या हातून. (अध्याय २२ गीति १७ वरील टीपा पहा). १४. गोपांच्या लहान मुलांचें रक्षण करणाऱ्या.

करिल मृषा अमरांच्या, येतां क्षण कोप, तो, [illegible]. ॥ ९८
मूळ अनर्थाचें तूं; कां क्षत्रिय निरपराध मारविसी ! ।'
जा, विजयशरें मरतां भेदुनि[1] जासिल[2], नराधमा ! रविसी.'॥ ९९
दुःशासनाहि मारिल, मारिल[3] कर्णाहि त्याहि कितवा[4], हा. ।
हितें[5] वा हानिकर सम सुगतिदा देवा; तसेंचि[6] सितवाहा. ॥ १००
'मी, दुःशासन, तिसरा कर्ण, तिघे पांडवांसि माराया ।
आह्मीं समर्थ; युद्धचि व्हावें चिंता नसेचि बा ! राया !' ॥ १०१
ऐसें त्या अंधाला सांगत होतासि सर्वदा; साचें ।
तें व्हावें, तुज काम-क्रोध-कपट-लोभ-गर्व-दासाचें. ॥ १०२
तो पार्थ विशंक पुढें आहे, जा गांठि घाल बापा ! हूं ! ।
कर्तव्य सर्व केलें ! कैसें करितोसि युद्ध, बा । पाहूं. ॥ १०३
जिष्णुशरें मरण तुज श्लाघ्यचि; शेवट नृपा ! करीं गोड; ।
सोड स्वजीवितांशा, लोडँ[7] करीं धैर्य, शर गुणीं[8] जोड. ॥ १०४
अद्भुत ऐश्वर्य बळें मेळविलें, भोगिलें, दिलें, उरलें; ।
स्फुरलें बरें रणमरण, त्यांत तुझें श्रेय[9] सर्वही पुरलें.' ॥ १०५
ऐसें वदोनि गेला गुरुहरि[10] परगजघटेकडे[11] नीट[12] ।
धीट, द्विधा करुनि बळ, करिति समर, धरुनि जीवितीं वीट[13]. १०६

अध्याय एकविसावा.

(पंचमदिनयुद्ध)

नसतांही[14] शस्त्र[15], करी चवथ्या[16] यामांत घात–लात[17] रणीं[18]; ।

१. देवाला. २. रविमंडळाचा भेद करून स्वर्गांत जाशील. (मागें पृष्ठ १३० टीप १४ पहा). ३. 'तारिल' असें पाठांतर. ४. द्यूतनिपुण जो शकुनि त्यास. ५. हितकर्ता. ६. 'तसेचि' असें पाठांतर. ७. टेंकण्यास आधार, टेंकण, टेंका. ८. गुणीं=धनुष्याच्या दोरीवर. ९. कल्याण, सुदैव. १०. गुरुरूप हरि (सिंह). ११. शत्रुरूप गजसमुदायाकडे. रूपकालंकार. १२. सारखा, सरळ, थेट. १३. येथे रात्रियुद्ध संपलें. १४. द्रोणाचार्यांच्या हातांत शस्त्र नव्हतें, तरी सुद्धां. येथून पंचमदिन युद्धाला आरंभ. १५. 'करी' ह्याचा कर्ता द्रोण. 'नसतांही शस्त्र करीं' असें पाठांतर. १६. प्रहरीं. १७. तुमुलयुद्ध–पंत. १८. समरभूमीवर.

[1]दैवें, स्वपरविवेचन जें, या कामांत घातला तरणी[2]. ॥ १
वाटे स्वकरैं[3]सहस्रें, करुनि द्रव दिव्यकनक सारवितो. ।
शुचि करि हरुनि तमोमळ, होय जगदपत्यजनकसा[4] रवि तो. ॥ २
संध्याविधि संपवुनि, जपती जोडुनि अंजलीला हो ! ।
भट धरिती, क्षण वीक्षण[5] करितां, संफुल्लकंजलीला[6], हो ! ॥ ३
करि जों परांसि, विजयानुमतें, तो देवं[7] सात्वतप सव्य, ।
करवी, बळेंचि दूरुनि हाका मारुनि, भीम अपसव्य[8]. ॥ ४
डावविले, भीमाच्या आज्ञेनें, अर्जुनें वृष द्रोण. ।
न करिल, समयीं सुज्ञें सूचविलें कर्म[9], धर्मपर कोण ? ॥ ५
दीप्तदवा[10] जेंवि, तसे, शकले कोणीं जया न वाराया. ।
खवळे, अधिक विकळ करि, शमनपरा[11] ज्वर जसा नवा[12] राया! ॥ ६
दुर्योधन, कर्ण, शकुनि शस्त्रांच्या शीघ्र वर्षती व्रातें[13]; ।
तप्तस्नेहा[14] जळसें, त्या [15]क्षोभवि शस्त्रवर्ष, तीव्रा, तें. ॥ ७
त्या सर्वांसहि दशदशबाणांहीं तो महातपा वेधी; ।
भीतिनदींत[16] कुरूंची, बहु मोहातें, वहात, पावे, धी. ॥ ८
पार्थ, प्रलयजलदसा, दे वृष्टि करूनि हर्ष तिमिरांसी[17]. ।
पेर्चक[18] पुनरपि, जैसे बहु भरतां[19] ग्राम, हर्षति, मिरासी[20]. ॥ ९

---

१. अंधकार असल्यामुळें आपपर ओळखण्याचें काम केवळ दैवाकडून होत असे, त्या कामावर आतां सूर्याची योजना झाली; अर्थात् सूर्योदय झाल्यामुळें आपपर ओळखतां येऊं लागले. २. सूर्य. ३. आपल्या हजार हातांनीं, अर्थात् किरणांनीं. ४. सर्व जग हेंच जणुं काय अपत्य, त्यास पित्याप्रमाणें. 'होय जगदपत्य, जनकसा रवि तो' असा पदच्छेद केला तरी अर्थहानि होत नाहीं. ५. अवलोकन. ६. प्रफुल्लित कमळांची लीला (शोभा). ७. यादवपति कृष्ण. ८. डावीकडे सोडले. ९. 'सूचविले धर्म' असा पाठभेद. धर्म=शास्त्रोक्त आचार. १०. पेटलेल्या वणव्यास. 'दीप्तदवा जेंवि सले' असा पाठभेद. ११. औषधानें ज्वर शमन करणाऱ्यास. १२. तरुण. ज्वराच्या तारुण्यावस्थेंत शमनपर औषधें दिल्यास ताप अधिक अपाय करितो, असें वैद्यशास्त्रांत सांगितलें आहे. १३. समुदायानें. १४. तापलेल्या तेलास. १५. 'शोभवि' असा पाठभेद. त्या=पार्थाला. १६. कुरूंची धी भीतिनदींत वाहत [असतां] बहु मोहातें पावे—असा अन्वय. १७. अंधकाराला. १८. घुबड. १९. ओसाड पडलेल्या गांवांत लोक राहावयास आले असतां. २०. वतनदार.

अकुळी श्रीविंधाशा, समरीं शरवृष्टि घनरजोवृष्टी ।
असतांहि करिति सहसा नाहींच, तमें भरूनियां दृष्टी. ॥ १०
तो व्यामोहक संगर संसारचि, त्यांत सर्वही भमला. ।
भ्रमला न गुरुचि, दूर त्यागुनि गेला, विरक्तसा गमला. ॥ ११
उत्तरदेशीं होता द्रोण, रणांतुनि निघोनि एकिकडे, ।
बा ! त्यांकडे न पाहों शकले पर, सर्प जेंवि केकिकडे, । १२
द्रुपद, विराट तयावरि गेले; तत्तेज परम राया ! तें. ।
द्रोण म्हणे, 'योग्य रणीं हे दोघे वृद्ध पर मरायातें.' ॥ १३
द्रुपदाचे पौत्र तिघे, तीं बाणांनीं, पळांत लोळविले; ।
स्वर्गासि चेदि, केकय, सृंजय वीर क्षणांत बोळविले. ॥ १४
वृद्ध तरुणसे झटले, समयीं कर्तव्य किमपि न विसरले. ।
द्रोणें शिर हरितांहि, न मागें ते एक पदहि कवि सरले. ॥ १५
द्रुपदें धरितां प्रकुपितसिंहातिक्रमणकरकरीशपथ, ।
क्रोधें धृष्टद्युम्न, द्रोणवधाकारणें, करी शपथ. ॥ १६
मग खगपतिगति धांवे, पांडव पांचाळवीरसहित, रणीं. ।
तो धृष्टद्युम्न गमे साक्षात् महि[11]राहु, विप्र[12] महितरणी[13]. ॥ १७
कर्ण शकुनि दुर्योधन तदनुज जे मुख्य मुख्य, ते ज्यातें ।
रक्षित होते, त्याच्या, कैसे पर साहतील, तेजातें ? ॥ १८
वध[15] कैंचा ? दूरू[16]नहि पांचाळां गुरुकडे पहावेना; ।
तें पळहि भीमाला हृदयींचें शल्यसें सहावेना. ॥ १९
भीम म्हणे, 'रे धृष्टद्युम्ना ! कळलासि आज पोकळसा. ।

१. दाट धुळीची वृष्टि. २. 'शरवृष्टि' आणि 'घनरजोवृष्टि,' दृष्टी असतांही तिला सहसा नाहींच करिती; श्री आणि विद्या या जशा अकुलीं दृष्टि नाहींशी करितात त्याप्रमाणें. ३. मोहकारक. ४. युद्ध. ५. सर्व=प्रत्येकजण. ६. मयूराकडे. ७. द्रोणावर. ८. नातू. ९. प्रकुपित+सिंह+अतिक्रमणकर+करीश+पथ=कोपलेल्या सिंहानें उल्लंघन करणारा जो करींद्र त्याचा मार्ग. १०. गरुडासारखा मोठ्या वेगानें. ११. पृथ्वीवरचा राहु. १२. विप्र (ब्राह्मण)=द्रोण. १३. पृथ्वीवरचा सूर्य. १४. द्रोणाचार्यांच्या. १५. वधाची गोष्टच बोलावयास नको. काव्यार्थापत्ति अलंकार. १६. 'न दुरूनहि' असें पाठांतर. १७. 'ते पळती' असा अन्यपाठ.

वचनासि कुळज[1], न शिरा, स्वरासि[2], न, देवता, जपो, कळसा.[3] २०
पितृसुतमरण[4] करें तूं, तेजस्वी शिखिसमान[5], साहसि, तें।
मरणाधिक दुःख तुज्या, होइल वांचोनि, मानसा, हसितें[6]. ॥ २१
तूं मजकडे तरि पहा, जरि तुज त्यां अरिकडे[7] पहावेना.' ।
जातों मीच; मला तों[8] सोसूनि स्वजनवध, रहावेना.' ॥ २२
द्रोणबळांत वृकोदर शिरला हो !, बळिबळांत[9] मघवासा[10]. ।
तें[11] त्यां[12] बहु भी; हरिपदतुळसीच्या[13], जेंवि सर्व अघ, वासा.॥२३
धृष्टद्युम्नहि, देहीं ज्वरसा[14], कुरुगुरुबलांत शिरला हो ! ।
निकट भिडोनि म्हणे, [15]'असि माझा, मत्तातशत्रुशिर लाहो.'॥२४
अपसव्य करुनि नकुळें तेव्हां कुरुपति रणीं विमुख केला. ।
सहदेवें दुःशासनसूत, न कळतां, यमालया नेला. ॥ २५
भीमाची, कर्णानें शरनिकरें फिरविली, गदा मागें. ।
ध्वज मथुनि, सूत मूर्च्छित करि, कृत्या जेंवि मुरडली[16] रागें. ॥२६
होउनि विरथ, वृकोदर नकुलरथावरि चढे, कढे कोपें. ।
द्रोणार्जुनरणहि परिस, ज्याचें कथनहि नृपा ! नव्हे सोपें. ॥ २७
गगनांत आमिषार्थ[17] श्येनांचें युद्ध नरवरा ! स्वतें, ।
तेंवि म्हणावें तरि, हा दृष्टांतीं शुद्ध न रव[18]; राहो तें.[19] ॥ २८
करिवर, हरि, शरभहि, पशु; अशुचि निशाचर; तसेच दानवही. ।
यांसम हे[20]; यांच्या गुणलिपिसि[21] पुरेल न महीसमान वही. ॥ २९

---

१. उच्च कुलोत्पन्न. २. आपल्या प्रतिज्ञेस, आपल्या वर्चनास. मागें अध्याय १ गीति १२४ व अध्याय ९।७३ आणि त्यांवरील टीपा पहा. **परिसंख्या** अलंकार. ३. वचनासि कुळज जपो, न शिरा जपो, देवता स्वरासि जपो, कळसा न जपो—असा अन्वय. ४. 'पितृसुतमारण जें तूं' असा अन्यपाठ. ५. अग्नीसारखा. ६. [लोकांच्या] हसण्यामुळें, चेष्टेमुळें. ७. द्रोणाकडे. ८. मला तों=मला तर. 'मला तो स्वजनवध' असें पाठांतर. ९. बळीच्या सैन्यांत. (पृष्ठ १७७ टीप २० पहा). १०. इंद्रासारखा. ११. सैन्य. १२. भीमा. १३. विष्णूच्या चरणकमलीं अर्पिलेल्या तुळसीदलाच्या वासाला. १४. **उपमालंकार**. १५. खड्ग. १६. मागें फिरली. १७. मांसार्थ. १८. हा रव शुद्ध नव्हे—हा शब्द योग्य नाहीं. रव=शब्द. १९. तें युद्धवर्णन राहो. २०. **अनन्वयालंकार**. २१. सद्गुणलेखनास. **अतिशयोक्ति अलंकार**.

कौरवपांडवकटकें झालीं, जैसीं पटार्पितें चित्रें; ।
गुरुनें जैशीं केलीं कुतुकें, तैसींच विष्णुच्या [1]मित्रें. ॥ २०
शिष्याला गुरु, गुरुला शिष्यहि, त्या रणमखांत आटेना; ।
दाटे [2]नारदकंठहि; युद्ध पुरेसें कदापि वाटेना. ॥ २१
शिष्यें निवारिलीं बहु ऐंद्रप्रमुखेंहि [3]वाडवेशास्त्रें. ।
[4]म्हणतीं, 'सच्छिष्या तों तिळमात्र उणें न पाडवें' [5]शास्त्रें. ॥ २२
पार्थापुढें न चाले यत्न; परि न सुगुरु तो अ-सुख पावे. ।
'झालों मी धन्य,' म्हणे, 'यासीं भिडतां रणीं असु खपावे.' ॥ २३
स्वगुरुसि म्हणे, 'यशें तुजसम सु[6]चिर विभो ! टिकों.' [7]परम हर्षें ।
पितृमन, लागुनि, दे, प्रियशिशुचा, सुखकोटि, कोंपर, महर्षे ! ॥ २४
'जरि आपणासि आपण [8]कल्पुनि रुद्र द्विधा, करिल स[9]मरें, ।
तरि उपमा होय,' असें म्हणती शक्रादि सर्वही अमर. ॥ २५
सुर नर करीत होते, मानुनि परमेश्वरासम, स्तवन. ।
ते चंद्र सूर्य [10]जाणों, जलजांचें [11]कटक तें समस्त वन. ॥ २६
मग भगवान् द्रोण करी ब्रह्मास्त्राचा प्रयोग, बा राजा ! ।
असमर्थ सहायाला, बहु तेजस्वीहि [12]अर्क बारा, ज्या. ॥ २७
लोक गडबडे, जैसा निरुदकदेशीं दवानळीं [13]सार्थ. ।
शमवी ब्रह्मास्त्रेंचि ब्रह्मास्त्रातें प्रबुद्धधी पार्थ. ॥ २८

---

१. अर्जुनानें. पर्यायोक्तालंकार. २. विमानांत बसून युद्धचमत्कार पाहाणाऱ्या नारदासही गहिंवर आला. ३. वाडव+ईश+अस्त्रें=ब्राम्हण+ईश (द्रोण) त्याचीं अस्त्रें. ४. द्रोणाचार्यानें अर्जुनास शिकविलेलीं शास्त्रें म्हणती—असा अन्वय. ५. प्राण. ६. दीर्घकाळपर्यंत. ७. प्रियशिशुचा कोंपर लागुनि सुखकोटि दे, [आणि] पितृमन हर्षे—असा अन्वय. मुलांच्या कोंपराचा (अर्थात् शरीराचा) स्पर्श बापास फार आनंददायक होतो, त्याप्रमाणें माझ्या शस्त्रास्त्रद्वारा आपणास होणारा स्पर्श सुखदायक होवो, असें अर्जुन द्रोणाचार्यास म्हणतो. ८. चिरून. कल्पना=कापणें, कातरणें. ९. युद्ध. १०. जणु काय ते (द्रोण व अर्जुन) चंद्र व सूर्य [व] तें कटक (सैन्य) जलजांचें (कमळांचें) वन (समुदाय) [आहे कीं काय असें वाटलें]. येथील उत्प्रेक्षा बहारीची आहे. ११. 'विश्व' असें पाठांतर. १२. सूर्य (आदित्य) बारा (द्वादश) आहेत, अशी समजूत आहे. त्यांची नांवें:— विवस्वान, अर्यमा, पूषा, त्वष्टा, सविता, भग, धाता, विधाता, वरुण, मित्र, शक्र व उरुक्रम. सहायाला=सहन करण्यास. १३. मनुष्यादिकांचा समुदाय. पृष्ट २४७ टीप २० पहा).

तों दुःशासन धांवे, वाराया द्रुपदराज[1]तनयातें. ।
त्यास रणीं विमुख करी तो, धर्मन्याय जेंवि अ-नेयातें[2]. ॥ ३९
कृतवर्मा एक, तिघे तव सुत, हे वीर कोपले चवघे; ।
दोघे नकुळें, दोघे सहदेवें, त्वरित वारिले अवघे; ॥ ४०
पाहुनि, वात नगांनीं तैसे, भट रोधिले निज यमांनीं[3]. ।
धांवे दुर्योधन, ये मध्यें, साधावया विजय, मानी. ॥ ४१
हरिवरि हरिसा, उठला कोपें सात्यकि सुयोधनावरि तो. ।
समर्थीं[4] दाता हाता, ताता[5]! त्राता सुयोध, नावरितो[6]. ॥ ४२
सात्यकिला दुर्योधन पाहुनि, हांसे; म्हणे, 'सख्या ! सु-कवी ।
शुक वीत[7]मोह चुकवी भोगा; घटजन्मि[8] पयोधिला सुकवी[9]. ॥ ४३
बाल्यापासुनि तुज मज, सहवासें परम सुख, कसें गा ! तें ।
सख्य जिरालें ? क्षत्राचारांला[10] सुकविमुख कसें गातें[11] ?' ॥ ४४
शर धरुनि यदु[12] म्हणे, 'कुरुगुरुसदनीं सख्य आमुचें होतें. ।
तेथेंचि स्वस्थ असो; आणावें संगरांत कां हो ! तें ?' ॥ ४५
भूप म्हणे, 'कोठें ती, कोठें ही प्राणघातक, क्रीडा[13] ? ।
दुरतिक्रम काळ; उरे धनलोभें प्रीति नीति न व्रीडा.' ॥ ४६
सात्यकि म्हणे, 'कुरुवरा ! ऐसाचि क्षत्रधर्म हा क्रूर; ।
दूर स्नेह त्यागुनि, हाणिति गुरुतेंहि संगरीं शूर. ॥ ४७
जरि मी प्रिय तुज, तरि तूं भेदाया शिर, उर, प्रहार करीं. ।
धरिल[14] मज वराया, गति[15], बा ! त्वां धरितां क्षुरप्र[16], हार करीं[17].॥ ४८
जरि वधिशिल या समरीं, तरि मी पावेन सुकृत[18]लोकातें. ।

---

१. धृष्टद्युम्नाला. २. अन्यायातें. उपमा सुरेख आहे. ३. नकुलसहदेवांनीं. ४. समर्थीं दाता हाता नावरितो. तसा त्राता सुयोध [हाता नावरितो]–असा अन्वय. ५. हे धृतराष्ट्रा. येथील 'ता' काराचा अनुप्रास युद्धाच्या धुमश्चक्रीस साजेसाच आहे. ६. आवरीत नाहीं. ७. गतमोह. ८. अगस्त्य ऋषि (मागें पृष्ठ २७० टीप ३ पहा). ९. शुष्क करी. १०. क्षत्रियांच्या धर्माला. ११. वर्णितें. १२. यादव, सात्यकि. १३. विषमालंकार. १४. लज्जा. १५. सुगति. १६. बाणविशेष. ह्याच्या अग्राची आकृति घोड्याच्या खुरासारखी केलेली असते. १७. हातीं. त्वां क्षुरप्र धरितां, मज वराया गति हार करीं धरिल–असा अन्वय. १८. पुण्यलोकातें.

मजला न देखवे प्रिय-मित्र-स्वजन-प्रणाश-शोकातें.' ॥ ४९
झालें प्रेमें भाषण, मग त्यांसीं युद्ध परम कोपानें. ।
रचिती बहु शरपटलें, जाणों [1]ते, [2]स्वर्गमार्गसोपानें. ॥ ५०
सात्यकिचें धनु कुरुपति, कुरुपतिचें [3]धन्व सात्यकी, छेदी. ।
भेदी मर्में, रविसा पाहोंही आपणाकडे नेदी[4]. ॥ ५१
भंगे भूप, निघे मग सावध होउनि, पुन्हाहि करि लगट. ।
तों [5]तदवनार्थ धांवे कर्ण, म्हणे, शत्रु यासि करिल गट.' ॥ ५२
त्यावरि भीम उठे; तों कर्ण तयाच्या शरांसि तोडून, ।
छेदी धंनु, सूतातें विकल करी विशि[6]खजाल सोडून. ॥ ५३
दुःसह गदाप्रहारें, ध्वजकार्मुकसूतकनकरथचक्रें ।
मर्दुनि, भीमें व्याकुळ केला क्षण कर्ण, [7]बल जसा शक्रें. ॥ ५४
रथ एकचक्र रविचा जैसा शोभे, तसाचि कर्णाचा; ।
स्वर्णाचा[8] मद नुरवी; होताचि असा प्रकर्ष वर्णाचा[9]. ॥ ५५
तों धर्म भटांसि म्हणे, 'लिहिलें न चळेचि आयु [10]धात्यानें. ।
जेणें हस्तीं धरिलें, सफळ करावेंचि, आयुधा, त्यानें. ॥ ५६
जे आमुचे प्रिय परम सर्वस्व, प्राण, शिर, अहो ! भट हो ! ।
[11]ते अडकले अरिबळीं; धांवा रे ! काय पाहतां ? [12]फुटे हो.[13] ॥ ५७
मेलों, कीर्ति[14]धनाचा, जरि, करितां सोस, [15]वेचुनों नाकीं. ।
सोसे कुलजा मृत्यु, न अयशाचा सोसवे चुना [16]नाकीं.' ॥ ५८

---

१. ते स्वर्गमार्गसोपानें रचिती–असा अन्वय. उत्प्रेक्षालंकार. २. स्वर्गमार्गाच्या पायऱ्या. 'सोपान' हा शब्द संस्कृतांत नपुंसकलिंगी आहे. ३. धनुष्य. ४. न देई. ५. त्याच्या रक्षणार्थ. ६. शरसमूह. ७. बलासुर; दनायु नामक दैत्याचा पुत्र. ८. सुवर्णाचा. ९. कांतीचें आधिक्य. १०. ब्रह्मदेवानें. ११. ते=भीम व सात्यकी. १२. मार्ग. १३. शत्रूच्या सैन्याची फळी फोडून मार्ग होवो. १४. कीर्तिधनाचा सोस (लोभ, हावरेपणा) करितां (करीत असतां) मेलों, तरी [आपण] नाकीं (स्वर्गी) वेंचुना (वेंचले जाणार नाहीं, आपण निवडून काढले जाणार नाहीं); आपण क्षीणपुण्य म्हणून स्वर्गांतून परत मृत्युलोकीं पाठविले जाणार नाहीं–असा भाव. १५. स्वर्गी आमचा तोटा होणार नाहीं. क्षीणपुण्य होवूं ना–पंत. १६. नाकावर. नाकाला चुना लावणें म्हणजे मोठा अपमान करणें होय. (मोरोपंत–सभापर्व, अध्याय ५।६० पहा).

या धर्मोच्या बोवें गेले पांचाळमत्स्य गुरुवरतें; ।
कीं निजधर्मोपासुनि मिळती, जे जे अभीष्ट गुरु वर, ते. ॥ ५९
[1]यम, भीम म्हणति, हाका मारुनि, 'ये, धांव, अर्जुना ! क्षिप्र, ।
त्वां कुरु मर्दावे; मग माराया सांपडेल हा विप्र.' ॥ ६०
त्या समयीं द्रोणानें[2], प्रकट करुनियां महात्म कोपानें ।
केला बहुशत्रुबळक्षय, पूर्वी जेंवि रुद्ररोपानें. ॥ ६१
गुरुशरनिकर दवानल, सृंजय पांचाळ भासले [3]शलभ. ।
[4]बलभद्रानुजनि म्हणे, 'हा सिंहचि सर्व यापुढें [5]कलभ. ॥ ६२
अति तूर्ण [6]जयाविषयीं [7]योग करा, त्यजुनि धर्म, पांडव हो ! ।
या विप्ररूपदहनीं, तुमचें न समग्र सैन्य, खांडव हो.[8] ॥ ६३
जों आहे चाप करीं, तों हा ब्राह्मण न आवरायाचा. ।
जाईल यापुढें बा ! त्या [9]देवांच्याहि, [10]अंव, रायाचा. ॥ ६४
होइल मनुष्यवध्य द्विजवर, जरि करिल [11]आयुधन्यास; ।
या, जेव्हां सोडिल धनु, सोडिल तेव्हांचि आयु, धन्यास. ॥ ६५
जरि तो मरेल अश्वत्थामा, हा तरिच शस्त्र सोडील. ।
हें न घडतां, शिरें, या सर्वांचींही, रणांत तोडील. ॥ ६६
'अश्वत्थामा मेला' हें, मिथ्या म्हणुनि 'हाय !' सांगावें. ।
अनृत बहुमत [12]व्यसनीं; जाया [13]प्रेतत्व, [14]वायसां [15]गोवें. ॥ ६७
हाचि उपाय, [16]प्राणव्यसनीं, सर्वांसहि आज तारील. ।

१. नकुळ, सहदेव. २. द्रोण. ३. कीटकविशेष (टोळ). ४. बलभद्र+अनुजनि= बळिरामाचा धाकटा भाऊ, कृष्ण. ५. हत्तींचे छावे. ६. जयप्राप्त्यर्थ. ७. योग= युक्ति, कपटप्रयोग. ८. खांडववनासारखें भस्म न होवो. (मागें पृष्ठ २९१ टीप ८ पहा). ९. इंद्राचा. १०. धैर्य, अवसान. ११. शस्त्रत्याग. १२. संकटकाळीं. १३. पिशाच-योनीतील दशा. मनुष्याच्या मरणानंतर और्ध्वदेहिक क्रिया करितात. तेव्हां पिंडांस कावळा न शिवल्यास त्या मृताच्या आत्म्यास मुक्ति मिळत नाहीं व तो पिशाच होतो, अशी समजूत आहे. तीस उद्देशून येथील वर्णन आहे. १४. कावळ्यांना. या गीतीशीं पंतकृत उद्योगपर्व, अध्याय ३ गीति ८१ ताडून पाहाण्यासारखी आहे. १५. अर्थान्तरन्यासालंकार. १६. प्राणावर बेतली असतां. खोटें बोललें तरी कोण कोणत्या प्रसंगीं पाप लागत नाहीं, तें पुढील श्लोकांत सांगितलें आहेः—'विवाहकाळे रतिसंप्रयोगे प्राणात्यये सर्वधनापहारे । विप्रस्य चार्थे ह्यनृतं वदेत पंचानृतान्याहुरपातकानि.' ॥ या

वारील शक्रहि न या; सर्वांसहि संगरांत मारील. ॥ ६८
बाल्यापासुनि, बहु गुरुवत्सल, जो गुरुसि तो[1]कसा मान्य, ।
होइल अर्जुन तादृश[2] घातोपायासि तो, कसा मान्य ?' ॥ ६९
भीमादि सुखें वळले; म्हणति, 'जयोपाय हा असामान्य[3], ।
हितकर न जगीं कोणीं आम्हां या कृष्णजी-असा मान्य. ॥ ७०
'कष्टें धर्मा[4] झाला, बहु हिक्कातोसि[5] लशुनसा, मान्य; ।
कीं त्रिजगद्गुरुवरवच जो न करिल, तोचि पशु, न सामान्य[6]. ७१
शत्रु[7]प्रदीप, ज्याच्या लीलाश्वासेंचि मालवे शतदा, ।
तो कदन करित होता, पांडवकटकांत, मालवेश[8] तदा. ॥ ७२
तन्नाम 'इंद्रवर्मा,' 'अश्वत्थामा' तदीय नागाचें[9]. ।
त्याचें भीमें केलें, पक्षिवरें, कंदन[10], जेंवि नागाचें[11]. ॥ ७३
'मेला अश्वत्थामा,' हें ऐकविलें गुरूसि मग, राज्या[12] ! ।
तो[13] भी सुतशोका; कीं नच तरले दशरथादि मगरा[14] ज्या. ॥ ७४
श्रवणीं शिरतां प्रथमचि, ती द्रोणा होय शोकदा वार्ता. ।
सुत[15]वीर्यविचार-सखा-घन, निववी शीघ्र शोकदाव[16]ार्ता. ॥ ७५
'लटकी वार्ता,' ऐसा निश्चय चित्तीं करूनि, जो जवळ ।

मुद्यासंबंधीं पंतकृत कर्णपर्वातील गीति वाचकांच्या सोईसाठीं पुढें देतों:—'लग्न, रति, प्राणक्षय, सर्वस्वविनाश, विप्रकार्य, अशा । पांचां ठायीं अनृतहि बोलावें, तें करी न नाश यशा. ॥ ४१ ॥ जोडे धर्म बरा तरि अनृतहि बोलोनि धर्म जोडावा । जोडे अधर्म सत्यें तरि सत्याचाहि संग सोडावा. ॥ ४२ ॥ सत्यानृततत्त्वज्ञचि, धर्मज्ञ, तदन्य मूढ फारचि तो; । धर्मरहस्य न जाणे कर्मभर शिरीं कशास बा ! रचितो. ॥ ४३ ॥ [अध्याय ४१].

१. अपत्यसा. २. तशा प्रकारच्या. ३. असाधारण, विशेष, अलौकिक. ४. तो गुरुघातोपाय धर्मा (धर्मराजाला) मान्य झाला. ५. उचकीनें पीडित झालेल्यास. ६. तोचि सामान्य पशु न, अर्थात् तो असामान्य पशु होय. ७. रूपकालंकार. ८. मालवदेशाधिपति. ९. त्याच्या हत्तीचें. १०. वध. ११. सर्पाचें. १२. धृतराष्ट्रा ! १३. गुरुद्रोण. १४. सुसरीला. (सुतशोकरूप मगरानें दशरथादिकांस गिळून टाकिलें तसें मला गिळील—असा भाव). १५. आपल्या पुत्राच्या पराक्रमाविषयीं विचार, हाच मित्ररूपी मेघ. १६. शोकरूप अरण्याग्नीनें पीडित अशा द्रोणास. रूपकालंकार.

मिडला होता द्रौपद[१], त्याचा पाहे करावया कवळ[२]. ॥ ७६
ध्वज, धनु, खंडुनि, मारी तो तात्काळ स्वमृत्युसूतातें[३]. ।
त्या अहितातें न गणी, हरिसेवक जेंवि काळदूतातें. ॥ ७७
दुसरेंहि खंडिलें धनु; जें हस्तीं शस्त्र शत्रुनें धरिलें, ।
तें तें सर्व द्रोणें, दुर्दैवें वस्तुमात्रसें, हरिलें. ॥ ७८
धृष्टद्युम्न स्वहय, द्रोणहयांमाजि, होय शिरकविता; ।
त्याची मिठी, सकळ बळ कंपित करि, जेंवि तज्ज्ञशिर[४] कविता.॥ ७९
तत्काळ द्रोण प्रभु, ईषा[५], रथचक्रबंधनें, तोडी; ।
धृष्टद्युम्न तयावरि, गरगर फिरवुनि, महागदा सोडी. ॥ ८०
विप्र क्षिप्र गदेतें, खंडी, दंडी[६] जसाचि आशेतें. ।
पसरिति, त्याच्यां[७] विजया कटकें, जैसीं घनासि 'आ' शेतें. ॥ ८१
मग खड्ग चर्म घेउनि, यत्न करी श्येनसाचि[८], झडपाया. ।
वाटे त्यास स्वतनु[९]प्रासादाचा नसेचि[१०] धेंड[११] पाया. ॥ ८२
रथें[१२]-शक्तिनें पर-तुरंग[१३] वधुनि, करी स्वहय मोकळे विप्रें[१४]; ।
विप्रतिम[१५]-द्विषदसितें खंडी वैतस्ति[१६]केषुनीं क्षिप्र. ॥ ८३
विरथ विशस्त्र करुनि त्या, द्रुपदसुतवधार्थ बाण जों सोडी, ।
त्यातें दश विशिखांहीं शिनिपुंगव[१७] बहुपराक्रमें तोडी. ॥ ८४
तें पाहुनि पार्थ म्हणे, 'पीतपटा[१८] ! परमपुरुषा ! पाहें, ।
कर्णद्रोणकृपांत स्वस्थ कसा सात्यकी ? नवल बा ! हें. ॥ ८५
सत्कवि निज वाचेला म्हणतिल, 'बहु मधुर वाणिमैने[१९] ! या ।
रामा, कृष्णा मग गा, आधीं तूं तत्प्रियाचि शैनेया[२०].' ॥ ८६

१. धृष्टद्युम्न. २. ग्रास, नाश. ३. आपला मूर्तिमंत काळच असा जो धृष्टद्युम्न त्याच्या सारथ्याला. ४. कवितारसज्ञाचें शिर. मागें अध्याय १७ गीति ७ व तीवरील टीपा पहा. ५. रथाची धूर. ६. संन्यासी. ७. 'त्यांच्या' असें पाठांतर. ८. बहिरीससाण्यासारखा. ९. आपल्या शरीररूप राजवाड्याचा. १०. 'जगांत' असा पाठ रा० पराडकर ह्यांच्या प्रतींत आहे. ११. बळकट. १२. रथावरून फेकावयाच्या अस्त्रविशेषानें. १३. शत्रूचे घोडे. १४. द्रोणाचार्य. १५. विप्रतिम+द्विषत्+असि=प्रतिमारहित (निरुपम) जो शत्रूचा खड्ग त्यातें. १६. वीतवीत लांबीच्या बाणांनीं. १७. सात्यकि. १८. हे कृष्णा. १९. हे वाणिरूप मैने. रूपकालंकार. २०. सात्यकीला.

कर्णद्रोणकृपांत, द्विरदांत विशंक सिंहसा, साजे. ।
लाजविले ते, धन्वी म्हणवुनि घेते, जगन्निवासा ! जे. ॥ ८७
तेज न तव प्रसादें कोणांतहि, सात्यकिस[2] लया नेतें. ।
येणें दृष्टिसुख दिलें, ध्यावें त्वत्पाद[1]किसलयानें तें.' ॥ ८८
इतुक्यांत सुयोधनमुख तव सुत, कृप, कर्ण, अन्यही योध, ।
क्रोधमदांध, चहुंकडुनि करिती शिनिसूनुचा रणीं रोध. ॥ ८९
यम[3] भीम धर्म समरीं बहुतचि शैनेयरक्षणीं जपले. ।
तपले, परि पर-पशु[4] ते यदुपतिपशुपति[5]पुढें प्रचुर[6] खपले. ॥ ९०
वदले सुर देवासुरसम[7] त्या आयोधना[8], शपथ करुनी, ।
न तुम्हीं किमपि मिळविलें, ऐसा हा योधनाश पथकरुनी.' ॥ ९१
धर्म म्हणे, 'क्षत्रिय हो ! यत्न करा, कुंभयोनिला[9] वेढा. ।
जाणा पार्षत तेजें[10] गिळिलाचि, बुभुक्षितें जसा पेढा. ॥ ९२
आज्ञा होतांचि, सकळ पांचाळप्रमुख वीर बलजलधी, ।
बुडवाया धांवे; परि तो घटज तसाचि, हीहि[11] निश्चलधी[12]. ॥ ९३
गुरु परबळें[13], बळकरग[14] जेंवि न करिजेल[15], भग्न[16], हळ, दीनें[18]. ।
पीतिमगुणें[19] शुचिकनकरुचि, कीं लज्जेंत मग्न हळदीनें. ॥ ९४
धांवे रणार्थ गुरु; तों तद्वामाक्षि[20] स्फुरे, पडे उल्का[21]; ।

१. तुझ्या पदपल्लवानें. २. सात्यकीचा. ३. नकुळ व सहदेव. ४. शत्रुरूपी पशु. ५. श्रीकृष्ण हाच कोणी शंकर त्यापुढें. रूपकालंकार. ६. पुष्कळ. ७. देव आणि दैत्य यांच्या युद्धासारखें. ८. युद्धास. ९. द्रोणाला. १०. द्रोणाच्या तेजानें. ११. धृष्टद्युम्न. १२. स्थिरबुद्धि. १३. शत्रूच्या सैन्यानें. १४. बलरामाच्या हातांतील. १५. जेंवि दीनें बळकरग हळ भग्न न करिजेल, कीं (किंवा) लज्जेंत मग्न [असणाऱ्या] हळदीनें पीतिमगुणें शुचिकनकरुचि (शुद्ध सुवर्णाची कांति) [भग्न न करिजेल] तेंवि द्रोण परबळें [भग्न न करिजेल]—असा अन्वय. १६. 'लग्न' असा पाठ आदर्शप्रतींत होता. १७. नागर. १८. निर्बळ पुरुषें. १९. पिंवळेपणानें. २०. तद्+वाम+अक्षि=त्याचा डावा डोळा. पुरुषांचा दक्षिणाक्षि (उजवा डोळा) स्फुरण पावणें शुभसूचक व वामाक्षि (डावा डोळा) लवणें अशुभसूचक आहे, अशी समजूत आहे. 'अंगविस्फुरणं नृणां दक्षिणं सर्वकामदं । तदेव शस्यते सद्भिर्नारीणामप्रदक्षिणम्' ॥. या शकुनांविषयीं विशेष माहिती बृहत्संहिता–अध्याय ८६, ८८–९० यांत आणि मुहूर्तमाला, यात्राप्रकरण-श्लोक ९६–१०५ यांत आहे. ती जिज्ञासु वाचकांनीं

समजुनि म्हणे, 'वरावी सुगति, समर्पूनि जीविता शुल्का[1].' ॥ ९५
योजुनि तो ब्रह्मास्त्र, क्षत्रिय विंशतिसहस्र[2] बा ! मारी. ।
अन्य दशायुत[3] मर्दुनि ठाके निःशंक, जेंवि कामारी. ॥ ९६
सुविषण्ण[4], विरथ, पार्षत[5] परमापद्ग्रस्त[6] पाहिला भीमें, ।
धांवोनि स्वरथीं तो, बा ! जेंवि स्कंद, वाहिला भीमें[7]. ॥ ९७
त्या परिभवविकळाला सुस्यंदन, चाप, धीर, दे; हातें ।
थापटुनि पृष्ठदेशीं, कुरवाळुनि, तो सुधीर, देहातें. ॥ ९८
'अनन्यसुदुर्वह[8] हा गुरुवधभार, शिरीं तुझ्याचि आजि, असे[9].' ।
बाहु न तुटतां, व्हांवें[10] निर्विण्ण न, आदरूनि आजि[11], असे[12].' ॥ ९९
घेतां, भीमकृत असा उत्साहविवृद्धिहेतु बोध, मनें, ।
होय अधिक तेजस्वी; जाणों नररूप वन्हि तो धमनें[13]. ॥ १००
द्रुपदसुत गुरुसि गांठुनि, झांकी इषुंनीं[14] हुतांशविषकटुनीं[14]. ।
तद्रक्षक शिबि-बाल्हिक-कौरवकटकें क्षणांत विसकटुनी. ॥ १०१
काळें पाठविला, 'द्विज मारावा,' हा निरोप ज्याला, तें ।
अरिधनु खंडुनि, गुरुनें त्याहि दिली हानि रोपजालातें[15]. ॥ १०२
तेव्हां पांचालांहीं कांहीं मागें पुढें न पाहून, ।
गुरु गांठिलाचि, जाणुनि रणमरण अधिक जपातपाहून. ॥ १०३
घनजालें रवि गगनीं, क्षण नाहींसाचि, लोपला[16] होतो.[18] ।
गुरुहि तसाचि परशरव्रातें; मग फार कोपला हो ! तो. ॥ १०४
परसर्वधैर्यपर्वत[17] गमला गुरु हरि[18], तदीय विशिख पवी[19]; ।

तेथें पहावी. तसेंच बाणकृत 'पार्वतीपरिणयनाटकां' तील पुढील पद्य पहाः—'अदक्षिणमिदं चक्षुः स्फुरितैः शंसतीव मे । देवकार्यविघाताय जाग्रतो वामतां विधेः ॥ १ ॥' (अंक ३). २१. आकाशांतून जो अग्निरूप तारा पडतो ती.

१. मोलासाठीं. २. विंशति+सहस्र=वीस हजार. ३. दश+अयुत. अयुत=दहा हजार. ४. फार खिन्न. ५. धृष्टद्युम्न. ६. परम+आपत्+ग्रस्त=महाविपत्तीनें ग्रासलेला. ७. शिवानें. स्कंद–हा देवांच्या सेनेचा अधिपति होता. ८. दुसऱ्याला वाहाण्यास अत्यंत कठीण असा. ९. राहे. १०. 'व्हावे' असें पाठांतर. ११. युद्ध. १२. 'बाहूं' चें विशेषण. १३. फुंकण्यानें. १४. अग्नि आणि विष यांसारिखे तीक्ष्ण असा बाणांनीं. १५. बाणसमूहातें. १६. लोपलेला होतो, लोपतो. १७. शत्रूंचें सर्व धैर्य हाच कोणी पर्वत. १८. इंद्र. उत्प्रेक्षालंकार. १९. वज्र.

कीं सकळांला लीलालेशें, कुरवाळुनीहि मिशिं[1], खपवी. ॥ १०५
वधिले पांचाळ अयुतयुग, सृंजय षट्सहस्र समरांत. ।
गज अयुत, हय अयुत; तें कर्म करी प्रकट कंप अमरांत.॥ १०६
जे मत्स्य वीर मथिले, गमले ते मर्त्य न, रवि पन्नास. ।
प्रेमें कां गतिनवरी[2] न वरील द्रोण[3]शरविपन्नास ? ॥ १०७
क्षत्रविनाशी द्रोण श्रीभार्गवसा[4] प्रवर्ततां, क्षिप्र ।
तेथें धांवुनि आले विश्वामित्रादि जे महा विप्र. ॥ १०८
भृगु अंगिरा मरीचि पृश्नि सिकत वालखिल्य हे, राया ! ।
अग्नि[5] पुढें करुनि वदति, कीं शकति मुखाकडे न हेराया[6]. ॥ १०९
'बा ! हा तव निधनसमय, चाल कसा, ब्रह्मलोकवास करीं. ।
यावा नित्य कुशांचा, या बाणांचा कधीं न, वास, करीं[7]. ॥ ११०
ये उत्तमलोका यां[8]; म्हणती 'घात' कवि 'लोकवासासी'. ।
विनविति नयनांतें, कीं, 'विप्र न घातक बिलोकवा[9] सासी[10].'॥१११
त्वां ब्रह्मास्त्रें केले दग्ध अनस्त्रज्ञ[11] नर; न हा धर्म; ।
शर्म समस्तां जीवां जेणें, उचित द्विजांसि तें कर्म. ॥ ११२
घडला अधर्म; आतां शीघ्र करावाचि आयुध-न्यास[12]. ।
जेणें भूतहित नव्हे, न रुचे तें, पळहि, आयु धन्यास. ॥ ११३
भीम[13] मुनिवचन परिसुनि, पाहुनि वधसिद्ध रिपु पुरोवर्ती[14], ।
द्रोण म्हणे, 'आयूची सरलीच, पुरेल तों पुरो, वर्ती[15]. ॥ ११४
सुत मृत, कीं न मृत, असें, जावें, धर्मासि तरि पुसायास; ।

---

१. मिशांवर ताव देऊन. २. सद्गतिरूप नवरी. ३. द्रोणशरांनीं विपन्न (मृत) जे त्यांस. युद्धांत मृत होणाऱ्या वीरांस सुगति प्राप्त होतेच, मग आचार्यांच्या बाणांनीं मरण पावणाऱ्या वीरांस सुगति प्राप्त कशी होणार नाहीं ? प्रश्नालंकार. ४. परशुरामासारखा. परशुरामानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली, अशी कथा आहे. ५. द्रोणाच्या तेजापासून आपणास पीडा न व्हावी, म्हणून ऋषींनीं अग्नीस आपल्यापुढें धरिलें होतें–असें वाटतें. ६. पहाण्यास. ७. हातीं. ८. ब्रह्मलोकवासास. ९. दाखवा. १०. स+असि=सखड्ग. ११. अस्त्र न जाणते. १२. शस्त्रत्याग. हें पंतांचें आवडतें यमक आहे. (अध्याय २१।६५ पहा). १३. भयंकर. १४. समोर असलेला. १५. [दिव्याची] वात, आयुर्दीप. Life's taper. आयुष्य हें दोरीसारखें मानण्याचा प्रघात विशेष आहे. उदाहरणः–'सखे ! तूटली मुख्य आयुष्य-दोरी' [अनंतकवि].

कीं एक सत्यवादी हा[1], भासे, रिपुहि न रिपुसा यास[2]. ॥ ११५
मिळतां त्रिभुवनराज्यहि, अनृत[3] न बोलेल धर्मसुत[4] लेश. ।
हा सत्यसंध[5] जाणे, जैसा तो सत्यधर्म सुतलेश[6]. ॥ ११६
ठावी मज प्रतिज्ञा[7] वत्साची सत्यशी; लहानपणीं ।
बाळांत खेळवां, तिळभरि चळला सत्यशील हा न पणीं. ॥ ११७
गुरु होय, असें योजुनि, जों, सिद्ध, युधिष्ठिरा विचाराया, ।
जाणे त्रिजगत्साक्षी कृष्ण द्रोणाचिया विचारा या. ॥ ११८
'अश्वत्थामा मेला, कीं आहे ?' गुरु असें पुसे धर्मा. ।
तों कृष्ण म्हणे, 'मेला म्हण.' कवि अनृतेंहि जोडिती धर्मा[8]. ११९
दिवसार्ध होय तों जरि युद्ध करिल, वधिल सकळही सैन्य. ।
दैन्यद होइल, कार्मुकतेजें, भूभृत्कुळा[9], जसा वैन्य. ॥ १२०
'प्राणात्ययप्रसंगीं[10] अनृत वदावें सुखें, असें आहे. ।
तुज जीवनदा[11] मेघा, चातकसे, सर्व पसरिती 'आ' हे. ॥ १२१
आम्हां सर्वांतें, गुरुकाळापासूनि, आजि वांचीव, ।
बहुलक्षजीवजीवनदानामितसुकृतसुवसु[12] सांचीव'. ॥ १२२
भीम म्हणे, 'गुरुवरहरिवचन अहो धर्मराज ! परिसा हो !. ।
दुःसह विषसेंचि अनृत, हरसा युष्मत्प्रताप[13] परि साहो. ॥ १२३
'अश्वत्थामा मेला' हें, मारुनि मालवेंद्र[14]वर्म-करी, ।

१. धर्म. २. धर्माला. ३. खोटें. ४. यमपुत्र (युधिष्ठिर). ५. सत्यप्रतिज्ञ. ६. सुतल+ईश=बळी. ७. वचन, कबुलायत. ८. धर्माला. धर्माची व्याख्या–'जगतः स्थितिकारणं प्राणिनां साक्षादभ्युदयनिःश्रेयसहेतुर्यः स धर्मः'—म्हणजे, जगाची व्यवस्था जेणेंकरून नीट चालते व ज्याच्या योगानें प्राण्यांना उत्तम प्रकारचें साक्षात् सुख मिळून, शेवटीं मोक्ष प्राप्त होतो तो धर्म होय. एकंदरींत लोकक्षेम किंवा समाजस्वास्थ्य हा धर्माचा हेतू आहे, ही गोष्ट मान्य केल्यास, 'कवि अनृतेंहि जोडिती धर्मा' ह्या सिद्धांतास नांव ठेवण्यास जागाच नाहीं. धर्म=पुण्य. 'धर्मोऽस्त्री पुण्य आचारे, स्वभावोपमयोः क्रतौ । अहिंसोपनिषन्न्याये ना धनुर्यमसोमपे.' ॥ इति सुधा. ९. राजकुळास, (पक्षीं) पर्वतकुळास. (मागें पृष्ठ २६६ टीप १२ पहा). १०. प्राण+अत्यय+प्रसंग=प्राणनाशसमयीं. (मागें गीति ६७ वरील टीपा पहा). ११. जलदात्या. १२. लक्षावधि प्राण्यांना जीवदान दिल्याचें अगणित पुण्यरूपी उत्तम संपत्ति. १३. आपला प्रताप. १४. मालवेंद्र नामक

म्यां कथिलें; परि सत्यप्रत्यय मद्वचन तन्मनीं न करी. ॥ १२४
त्यजिल गुरु धैर्य धनुसह; तुमचाचि असे तयास विश्वास. ।
कीं 'धर्म सत्यवादी' हे आहे कीर्ति विदित विश्वास. ॥ १२५
वळला प्रभु [3]भीमोक्तें धर्महि; कीं अचुक अर्थ तो भावी. ।
क्षुद्रपदीं लोभ धरी, यन्मति न [4]स्वःपदींहि [5]लोभावी, ॥ १२६
तो धर्मराज, होउनि अनृतभयजलधिनिमग्न, जयसक्त, ।
'अश्वत्थामा मेला,' [6]व्यक्त म्हणे, 'गज' असेंहि [7]अव्यक्त. ॥ १२७
रथ, भूवरि [8]चतुरंगुल [9]उंच्छ्रित, त्या धर्मसूनुचा, चाले; ।
जांले, ऐसें वदतां, [10]भूस्पृक्, प्राकृतपणासि हय आले. ॥ १२८
'अश्वत्थामा मेला,' हें ऐकुनि धर्मवाक्य, [11]तो, कानें, ।
जीवितनिराश झाला, गुरु, होउनि तप्त पुत्रशोकानें. ॥ १२९
पांडव साधु, तयांचा आपण केवळ कृतघ्न अपराधी;' ।
ऐशी, त्या, ऋषिवाक्यें झाली, नाहींच त्यास [12]अपरा, धी. ॥ १३०
त्या धृष्टद्युम्नासहि पाहुनि उद्विग्न होय परम, रणीं. ।
गेला [13]सखाहि सोडुनि तो, जो उत्साहहेतु पर-मरणीं. ॥ १३१
तों [14]पार्षत दिव्य विशिख, तक्षकसा, [15]जैत्रकार्मुकीं योजी, ।
'आपणचि गुरुविनाशीं कारण', तुमच्या मनीं असें [16]यो, जी!' १३२
त्याच्या निवारणीं करि यत्न, परि न योग्य राहिलें शस्त्र. ।
त्या समयीं एकहि बा! कुरुगुरुहृदयांत न [17]स्फुरे अस्त्र. ॥ १३३
चारि दिवस, एक निशा, पंचमदिवसत्रिभागपर्यंत ।
पुरले शर, सरले मग, गुरुला कैसा घडेल [18]अर्यंत ? ॥ १३४

राजाचा गज. 'वर्मा' हें उपपद क्षत्रियांच्या नांवांपुढें व 'शर्म' हें ब्राह्मणांच्या नांवांपुढें लावण्याचा प्रचात अद्याप उत्तरहिंदुस्थानांत आढळतो.

१. त्याच्या (द्रोणाच्या) मनांत. २. जगास. ३. भीम+उक्त=भीमाच्या बोलण्यानें. ४. स्वर्गपदींहि. ५. लोभयुक्त न व्हावी. ६. स्पष्ट. ७. अस्पष्ट. ८. चार अंगुळें. ९. उंच. १०. पृथ्वीस स्पर्श करणारे. ऐसें वदतां, [हय] भूस्पृक् जाले— असा अन्वय. ११. द्रोण. १२. अन्य बुद्धी, दुसरा विचार. १३. प्रियपुत्र अश्वत्थामा. १४. द्रुपदाचा पुत्र, धृष्टद्युम्न. १५ जयनशील अशा धनुर्ष्यी. १६. येऊ. १७. प्रेरणा न होई, अस्त्राचा उपयोग कसा करावा, हें सुचेना. १८. अरि+अंत=शत्रु-नाश.

द्रुपदसुतें सोडावा शर, तों गुरुनिकट भीम ये, राजा ! ।
बोले उक्ति, वदवतिल न कधींहि तशासमीप येरां[1], ज्या. ॥ १३५
'गुरुजी ! क्षत्रक्षय कां होता ? जरि न करितां तुम्हीं युद्ध ? ।
शुद्ध[2] स्वधर्म सोडुनि, परधर्मी न प्रवर्तले बुद्ध[3]. ॥ १३६
धर्म[4] अहिंसा; त्याचें मूल[5] ब्राह्मण, तुम्हींच हें कथिलें. ।
रजता[6]पुढें कसें जी ! मिरवावें तेज आपुलें कथिलें[7] ? ॥ १३७
करितां काय, ब्राह्मण मुख्य तुम्ही ब्रह्मवित्तम[8] रणातें ? ।
मेळवितां, पुत्राच्या, परिसुनि, काशास वित्त, मरणातें ? ॥ १३८
परधर्मस्थ[9] तुम्ही, कां निजधर्मस्थां[10] जनांसि बुडवीतां ? ।
जे चरणा शरणागत साष्टांगप्रणत, त्यांसि तुडवीतां ? ॥ १३९
ज्या एका पुत्रास्तव अर्थ, अनयही करूनि, जोडावा, ।
तो मेला, फळें[11] झालें; आजुनि तरि हा अधर्म सोडावा. ॥ १४०
कोण्ही, सुतादिनाशव्यसनीं[12], न करूनि अनय[13], न बुडाला. ।
दाटुनि अमृतघटाच्या[16], नुकरिल[14] भवदन्य अनयन[15], बुडाला[16].॥ १४१
ज्याच्या वचनीं धरिती बहु, सर्वहि सुज्ञ लोक, विश्वास. ।
अनृत वदेल कसा तो, सोडीना व्यर्थ जो कवि श्वास ? ॥ १४२
त्या धर्माच्या वचनीं तुमचा नाहींच लेश विश्वास. ।
हेंहि अधर्माचें फळ. पाहे स्वसमचि खलेश[17] विश्वास[18].' ॥ १४३

---

१. इतरास. २. स्वच्छ, पवित्र. 'स्वधर्म' शब्दाचें विशेषण. ३. बुद्धिमान्, विद्वान्. 'शुद्ध' असें पाठांतर. शुद्ध=शुद्धपुरुष. ४. 'अहिंसा परमो धर्मः' हें धर्मतत्व आबालवृद्धांच्या परिचयाचेंच आहे. पंतकृत पुढील गीति पहा:–'अनृतहि वचन वदावें, परि कोणासहि कधींहि न वधावें; । सरस अहिंसा, न सुधा; एकहि सेवुनि तिचाचि लव धावें. [कर्ण-पर्व, अध्याय ४१।२५]. ५. आदिकारण, मूळकारण. ६. रुप्यापुढें. ७. कथिलानें. **अप्रस्तुतप्रशंसालंकार**. ८. ब्रह्मज्ञश्रेष्ठ. ९. ब्राह्मणधर्मातील. १०. क्षत्रियधर्मस्थांस. ११. कर्माचें फळ प्राप्त झालें. १२. अनय न करूनि (अन्याय न केल्यामुळें, अर्थात् न्यायानें वागल्यामुळें) सुतादिनाशव्यसनीं (पुत्रादिकांचा नाश हेंच संकट त्यांत) (कोणीही) न बुडाला, असा अन्वय. न्यायानें वागणाऱ्याचें हितच होतें– असा ध्वनितार्थ. १३. अन्याय. १४. न उकरिल, सच्छिद्र न करील. १५. अंध. १६. अमृतघटाच्या तळाला. १७. खल+ईश=दुष्टश्रेष्ठ. १८. जगास. **अर्थान्तरन्यासालंकार**.

एवंविध भीमवचन परिसुनि, मुनि[1] निराश जीवितीं होय. ।
[2] तों यज्ञसेनसुतभय[3] धनु सोडी, जीवितासही[4] तोयें. ॥ १४४
गुरु मग म्हणे, 'अहो कृप ! नृप ! कर्ण ! समस्त वीर हो ! हा मीं ।
शस्त्रास्त्रांतें त्यजितों, विटलों अत्यंत जीवितीं, धामीं[5]. ॥ १४५
पांडुसुतांपासूनि स्वस्ति[6] तुम्हांकारणें असो; भट हो ! ।
सत्त्वा मार्कंडेया,[7] देव, रणैकार्णवांतरीं,[8] वट हो.' ॥ १४६
करि, 'हा ! अश्वत्थामन् ! सत्पुत्र !' असें म्हणोनि, आक्रोश. ।
त्या सुतमृति, व्रजा[9] जसि, मोही क्षण, ती[10] पडोनि सा[11] क्रोश. ॥ १४७
करुनि परांतें, योजुनि परमात्मविदीप्तभल्ल,[12] भस्म, रणीं, ।
शस्त्रें सोडुनि, झाला निरत[13] श्रीप्राणवल्लभस्मरणीं.[14] ॥ १४८
तों धनु ठेवुनि पार्षत धांवे, घेऊनि असि, वधा त्याच्या. ।
आलें मनासि, अरिच्या, किंवा, तें कर्म अशिवें,[15] धात्याच्या. १४९
कौरवकटकीं 'हा ! हा !,' पांडवकटकींहि होय बहु 'हा ! हा !'. ।
'हा ! हा !,' दशदिग्भागीं म्हणति 'वध न योग्य रुक्मवाहा[16] हा.' १५०
निजयोगधारणेनें[17] द्रोणमुनि करी शरीरसंन्यास. ।

---

१. अत्यंत निराश. २. 'तों' असें पाठांतर. ३. धृष्टद्युम्नाचें भय ज्याला तो, द्रोण. ४. पाणी; जीविताची आशा सोडी, असा भाव. ५. गृहीं, घरादारास. ६. कल्याण. ७. सत्वरूप मार्कंडेयाला. मार्कंडेय ऋषीनें भगवंताची माया पाहाण्याची इच्छा धरिली. तेव्हां अकस्मात् समुद्र वाढल्याचा भास होऊन हा त्यांत गटकळ्या खाऊं लागला. शेवटीं त्यांतच एक वटवृक्ष दिसला, त्यावर एक बालक दिसलें. मार्कंडेय त्या वटाला धरून वर चढतो, तों त्या बालकाच्या श्वासासंगतीं हा त्याच्या पोटांत ओढिला जाऊन, त्यानें बाहेरच्या सारखीच संपूर्ण सृष्टि तेथें पाहिली, आपणालाही पाहिलें. आणि पुनः उच्छ्वासासंगतीं बाहेर येऊन पडला, आणि पाहतों तों समुद्रही नाहीं आणि वटही नाहीं; आपण आपल्या आश्रमांत एकसारखे तप करीत आहों. हें पाहून तो परमेश्वराचा धांवा करूं लागला. परमेश्वरानें प्रसन्न होऊन त्याचा उद्धार केला—अशी कथा आहे. ८. रण हाच कोणीएक अर्णव (समुद्र) त्यांत. वट=वडाचें झाड. (मोरोपंत—सभापर्व, अध्याय ५।५५ पहा). ९. गोकुळाला. १०. पूतना. (पृष्ठ १९१ टीप १२ पहा). ११. सहा. १२. ब्रह्मास्त्ररूप प्रदीप्त भाला. १३. रममाण. १४. श्रीकृष्णस्मरणीं. १५. निंद्य, अमंगळ. १६. सुवर्णाचा आहे रथ ज्याचा अशा द्रोणाचार्याला. १७. आपणास साध्य असलेल्या योगाभ्यासाच्या योगानें. योग=चित्त अंतर्मुख व्हावें; त्याचा रोंख बाह्यसृष्टीकडे लागूं नये आणि आत्म्याच्या ठिकाणीं लय लागावा म्हणून जो वृत्तिशून्य

त्याचें त्याला किंवा तज्ज्ञाला, तें कळे; न अन्यास. ॥ १५१
ज्योति[1]र्भूत द्रोण व्योमीं दुसरा द्युदीप[2]सा गमला, ।
तो ब्रह्मलोकगामी दुष्टां दुर्दर्श; पार्षत भ्रमला. ॥ १५२
अश्वत्थामा, अर्जुन, कृष्ण, युधिष्ठिरहि तेज तें पाहे. ।
आहे प्रसाद मुनि[3]चा; तद्दर्शन म्हणुनि दास[4] हा लाहे. ॥ १५३
धांवे, न्य[5]स्तायुधशिर कापाया धरुनि मति कुंडी[6]; लाजों[7] ।
नेणे पार्षत, गुरुच्या तो नव्हता स्पर्शला कुबीला जों. ॥ १५४
पार्थ, रथावरुनि उडी टाकुनि, धांवूनि शीघ्रतर वारी. ।
तरि लाविलीच दुष्टें, कंठीं, कच[8] धरुनि शीघ्र, तरवारी. ॥ १५५
'न वधावें,' 'न वधावें,' ऐसें म्हणतांहि, तो महापापी ।
कापी गुरुचें मस्तक; तच्छोक[9] सुरांसही बहु व्यापी. ॥ १५६
तें कौरवांकडे शिर, बहु गर्जुनि, पार्षतें उडविलें हो ! ।
यश सर्व बुडविलें हो ! गमलें पंकज[10] पदें तुडविलें हो ! ॥ १५७
भीम प्रळयजलदसा[11] गर्जे पार्षतगळां मिठी घाली. ।
भ्याली बहु कुरुसेना, शीघ्र पलायनपरायणा[12] झाली. ॥ १५८
भीम तसा, जैसा हरि[13]; हरिनें वधितांचि कनककशिपु[14], निवे.[15] ।
पार्षतचमू म्हणे, 'निर्जपति[16]च म्हणसि 'हर्षजनक' कशि? पुनिवे[17]!' १५९
दुःशासन, कर्ण, शकुनि, कृप, कृतवर्मा, सुयोधनहि, मानी ।
सर्वहि विरे, नृपा ! ज्यापरि परितापें सुयोध, न हिमानी[18].॥ १६०

चित्ताचा प्रयत्न त्याचें नांव योग होय. धारणा=मनाची एकाग्रता. १८. शरीरत्याग.

१. तेजोरूपी. २. आकाशदीपसा, सूर्यसा. ३. व्यासाचा. (पृष्ठ १० टीप ९ पहा). ४. संजय. ५. ज्यानें शस्त्र टाकून दिलें आहे अशा द्रोणाचें मस्तक. ६. दुष्टमति. ७. लज्जित व्हायास. ८. केश. ९. त्याच्याबद्दल शोक. १०. कमळ. ११. प्रळयकाळच्या मेघासारखा. १२. पलायनतत्परा. १३. इंद्र. १४. हिरण्यकशिपु. (मागें पृष्ठ १५८ टीप ४ पहा). १५. शांत होई. १६. आपला स्वामी (चंद्र) तोच. १७. हे पौर्णिमे ! चेतनधर्मारोपोक्ति अलंकार. १८. हिमसंहति, घट्ट बर्फ, बर्फाची शिळा. ज्यापरि परितापें (मनोव्यथेनें, दुःखानें) सुयोध (योद्धा) विरे, [तेंवि] हिमानी न [विरे]—असा अन्वय. थोर पुरुषांचीं मनें 'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि' ह्या भवभूतीच्या उक्तीप्रमाणें असतात. (उत्तररामचरित्र, अंक २।७ पहा).

नै कळ पडे[1], सकळ पडे व्यसनीं, पाहे सुयोध न हित रणीं. ।
झाला गुरुपातमहाभयराहुमुखीं[2] सुयोधनहि तरणी[3]. ॥ १६१
सुटतां[4] पळ, बळ देउनि, बा ! जो बळजलधि[5] आवरायाचा, ।
कुरुपगुरुपतन होतां प्रथमचि, त्या, जाय आव, रायाचा[6]. ॥ १६२
कौरवबळ सकळ पळे; त्यांत तुझा पुत्रही असाम्यकर[7]. ।
तों ये अश्वत्थामा वीर, स्रोतोभिमुख[8] जसा मकर[9]. ॥ १६३
करुनि, शिखंडीप्रमुखप्रबळभटांसीं, महासमर, सुटला[10]; ।
स्फुट[11] लाजवुनि परांला आला, तों कुरुबळाब्धि हा फुटला. ॥ १६४
कुरुपतिस पुसे, 'कां हो ! पळतां, पळत्यांचियाचि सांगातें[12] ? ।
ऐशा पलायनाचें, जें काय निमित्त, तूर्ण सांगा तें.' ॥ १६५
गुरुशोकें गहिंवरला महिवर[13]; लाजे स्वयें कथायास; ।
पाहे कृपाकडे; तो सांगे गुरुहानिची कथा यांस[14]. ॥ १६६
वृत्त सविस्तर सर्व श्रवण करुनि, परशुरामसा खवळे. ।
कीं मंतुकरा[15], तक्षक सर्प, कराया, डसोनि, राख, वळे[16]. ॥ १६७

अध्याय बाविसावा.

द्रौणि म्हणे, 'मदधिक जें केलें वात्सल्य नित्य मत्तातें[17], ।
रे धर्मा ! रे भीमा ! कैसा रे विसरलासि मत्ता ! तें ?[18] ॥ १
गोपीजन ठकवावा, खाया नवनीत साय, कनकपटा[19] ! ।

१. चैन पडेना. २. गुरुपतनापासून झालेलें भय, हाच राहू, त्याच्या मुखीं. रूपकालंकार. ३. सूर्य. ४. पळ सुटतां (पळापळीस सुरवात होतांच) पळभर बळ देऊन–असा अन्वय. ५. सैन्यसमुद्र. ६. दुर्योधनाचा. ७. संधी न करणारा. साम=सल्ला. शत्रूस वश करून घेण्याचे उपाय चार आहेत. 'भेदो दण्डः सामदानमित्युपायचतुष्टयमित्यमरः' भेद=फितुरी; दण्ड=शिक्षा करणें; साम=संधी करणें व दान=प्रतिपक्षास द्रव्य देऊन वश करणें. ८. उदकप्रवाहाकडे मुख करून. ९. ग्राह, सुसर. १०. मोकळा झाला. ११. स्पष्ट. १२. संगतीनें, समागमें. १३. भूपति. १४. अश्वत्थाम्यास. १५. अपराधकर्त्यास. १६. कीं तक्षक सर्प, मंतुकरा(अपराधकर्त्याला) डसोनि, राख करावा वळे–असा अन्वय. येथें द्रोणवधप्रकरण संपलें. १७. माझ्या पित्यानें. १८. वात्सल्य. १९. श्रीकृष्णा ! 'कनकपटें' असें पाठांतर.

चालों देइल, [1]माझा, शिरतां अवनींत, सायक न कपटा. ॥ २
गुरुच्या, सफळ कसा रे ! होइल, तव [2]राज्यकाम हा, घातें ? ।
हा मंदा ! संपादुनि इच्छावें राज्य कां, [3]महाघातें ? ॥ ३
शिव ! शिव ! कोण कुलज नर, कपटें गुरुच्या करील [4]अहितातें? ।
पांडव न शिष्य, पाजुनि पय केले पुष्ट, दुष्ट [5]अहि, तातें. ॥ ४
[6]परमास्त्ररहस्य नृपा ! आहे उपदेशिलें मला तातें. ।[7]
[7]पांडव काय ? भजे, स्मरहरनयना तेज जें, [8]अलाता तें ? ॥ ५
समुपेक्षिलें, ठकविलें [9]पूतनामहिमानका पित्या; सहसा ।
म्यां मारावे खळ ते, [10]कृतनामहि, मान कापित्यासह [11]सा. ॥ ६
नारायणास्त्र योजुनि, करितों अहितांसि आजि भस्म, [12]रहा. ।
[13]कुतुक पहा; म्हणतिल सुर, 'जग खातो काळ, परम [14]घस्मर हा.'॥ ७
ऐसी महाप्रतिज्ञा परिसुनि, कुरुकटक सर्वही परते. ।
[15]गर्जे सिंहरवें; तों धर्मादि समस्त [16]वचकले पर ते. ॥ ८
धर्म पुसे विजयातें, 'सर्व पळाले भिवोनि [17]गुरुपातें ।
गर्जति कां हे ? झाला बा ! कोण सहाय वीर कुरुपातें ?' ॥ ९
हा रव कोणाचा गा ! [18]दर-दुंदुभि-सिंहनाद लोपवितो ? ।

---

१. [श्रीकृष्ण] अवनींत शिरतां, माझा सायक [त्याच्या] कपटा चालो नै देईल– असा अन्वय. 'सायक न कपटा' असाही पाठ आहे. २. राज्य मिळविण्याची इच्छा. ३. महा+अघातें=महापातकातें. ४. अकल्याणातें. ५. सर्प. येथें **अपह्नुति** अलंकार आहे. ६. सर्वोत्तम अस्त्र (ब्रह्मास्त्र) त्याचें रहस्य, गूढज्ञान. ७. माझ्यासारख्या परमास्त्ररहस्य ज्ञात्यापुढें पांडव काय ? (पांडवांची कथा काय ? पांडवांची काय किंमत आहे ?) [ह्याला दृष्टांत] स्मरहरनयना जे तेज (शंकराच्या नेत्रांत जें तेज आहे) तें अलाता (ज्वलितकाष्ठास, कोलितास) भजे काय ? (नम्र होईल काय ?); अर्थात् 'नाहीं' हें उत्तर. ह्या गीत्यर्धांत **काव्यार्थापत्ति, दृष्टांत** व **प्रश्न** असे अलंकार आहेत. ८. ज्वलितकाष्ठास. ९. पूतना+महिमा+आनक (नौबद)= सेनेचा महिमा कळविण्याविषयीं नोबदीसारिखा अशा, कौरवसेनायशाची प्रसिद्धि करणाऱ्या नगाऱ्यासारखा जो माझा पिता त्यास. १०. ज्यांनीं नांव (कीर्ति) केली आहे असे. 'कृतनमन' असें पाठांतर. ११. पांच पांडव आणि धृष्टद्युम्न. १२. युद्धासाठीं समोर उभे रहा, पळूं नका. १३. कौतुक. १४. भक्षक, खादाड. १५. 'गर्जे सिंहरवें तो,०'' असें पाठांतर. १६. भ्याले. १७. गुरुद्रोणाचार्यांच्या पतनामुळें. १८. दर=शंख.

वाटे सहाय त्याला झाला, धरितो सदैव जो पेवि तो.' ॥ २०
जिष्णु म्हणे, 'पेल, पर-बल-सागर जेणें गमे अनाद रिता. ।
हा गुरुसुतरव, जैसा भास्कर, तेजोऽतरा अनादरिता. ॥ ११
कुपित गुरुसुतरव, सकळपरदारांच्या, आजि हरिल, टिकल्यांला. ।
जें करिवरमदहर, तें साहजिक, न, तेज, हरि, लटिक त्याला. १२
अनृत सुतमरण सांगुनि, गुरुकरवीं त्वां धनुष्य सोडविलें. ।
पार्षतकरें, पितृशतोधिक[12] गुरुचें शिर, रणांत तोडविलें. ॥ १३
त्वां, वधुनि घेतलें, यश गति व्हाया, कां न देशिकाकरवीं[13] ? ।
जरि हंसकाक[14] सत्यानृत, तरि तूं कान देसि काक-रवीं[15]. ॥ १४
स्वर्गपद, ब्रह्मपदहि, किंबहुना मोक्षपदहि, सोडावें, ।
'श्रीगुरुपदचि,' म्हणति कवि, 'सर्वस्वार्पण करूनि जोडावें.' १५
राज्यपद अनर्थास्पद[16]; केवळ त्याच्या धरूनि लोभातें, ।
गुरुपद गमाविलें, कीं गेलें घेऊनि सत्य शोभा, तें. ॥ १६
वालिवधीं[17] रामाचें; द्रोणवधीं हें तुझें अयश[18]; राजा ! ।

---

१. कुरुपाला (दुर्योधनाला). गीति ९ पहा. 'त्यांला' असें पाठांतर. २. वज्र. ३. इंद्र. **पर्यायोक्तालंकार** ४. पळभर. 'पळ पळ परसागर' असें पाठांतर. ५. नाद-रहित. ६. अन्यतेजास. ७. अनादरकर्ता. हेंच यमक पंतकृत सभापर्व, अध्याय ११६ मध्यें आढळतें. ८. सक्रोध. ९. सकळ शत्रुस्त्रियांच्या. १०. कुंकुमतिळ-काला. शत्रुस्त्रियांस वैधव्यदशा प्राप्त होईल, असा भाव. **पर्यायोक्तालंकार.** ११. जें करिवरमदहर (गजश्रेष्ठाचा मद नाहींसें करणारें) तें तेज साहाजिक (निसर्गदत्त) [होय]. हरि (सिंह) [तें] लटिक (उगाच, निरर्थक) न त्याला (धारण करिता न झाला)—असा अन्वय. तो आपल्या तेजाचा प्रभाव दाखवीलच—असा भाव. १२. पित्याहून शंभरपट अधिक पूज्य अशा. १३. गुरूकडून. गति आणि यश मिळ-विण्यासाठीं, गुरूच्या हातून मरण कां मिळविलें नाहींस ? १४. हंस आणि कावळा हे अनुक्रमें सत्य आणि असत्य आहेत अशी कल्पना केली तर. **यथासंख्यालंकार.** १५. काकशब्दीं (अनृतीं). १६. अनर्थाचें स्थान. १७. वाली हा किष्किंधेचा राजा. ह्याचा कनिष्ठ भ्राता सुग्रीव हा युवराज होता. वालीनें सुग्रीवाच्या भार्येचें हरण केल्यामुळें, त्या दोघांमध्यें वैरभाव उत्पन्न झाला होता. पुढें राम वनवासांत असतां, सीतेचा शोध करीत दक्षिणेकडे जात असतां, त्याची व सुग्रीवाची गांठ पडली. त्यांनीं एकमेकांस साहाय्य करण्याचें कबूल केल्यामुळें त्यांचें सख्य झालें. पुढें सुग्रीव व वाली

तो व्यर्थ, असोनि सुखी[1], सत्य नरा ज्या नसे, अये[2] शरा ज्या[3]. १७
पक्षांत[4] हलुच शिरला, जेंवि भरतनायका ! पिलें[5] शिरतें; ।
मंदुरुचें[6], निष्करुणें वालुकसें[7] होय कापिलें, शिर तें. ॥ १८
गुरुघातकासि आतां रक्षीं, सामात्य[8] तूं अजातारी[9] ! ।
नच, परनरकुंजर[10] जो, त्या, हरिपासूनियां, अजा[11], तारी. ॥ १९
बहु वय सरलें, उरलें थोडें; तों काय कर्म ओढवलें ? ।
सिंधु बहु तरुनि, शेषीं, कैसें बा ! सत्वउडुप[12] फोडवलें ? ॥ २०
हा ! हा ! उपेक्षिला गुरु, या पापें पावलोंचि नरका मीं. ।
बुडतो, सर्व बुडवितो, लोभी, क्रोधी, तसाचि नर कामी.' ॥ २१
सर्वहि उगेचि होते, ऐसा गुरुशोक अर्जुनें करितां, ।
वरितां उदासपण बहु, चापलता[13] त्यजुनि मृदुलता[14] धरितां. ॥ २२
भीम म्हणे, 'चालविला, वर्षें, संन्यासिधर्म हा, तेरा. ।
क्षत्रिय धरिति, कराया समरीं ऐसेंचि कर्म, होतेरा[15]. ॥ २३
सर्वस्व हरुनि कपटें, स्त्रीचीही सोडिली निरी हातें. ।

त्यांचें युद्ध चालू असतां, रामानें वृक्षाच्या आडून वालीस बाण मारिला, व त्यामुळें तो मरण पावला. मरणकाळीं वालीनें रामास उद्देशून पुढील भाषण केलें:–'तूं धर्मवेत्ता असून माझें दुसऱ्याशीं युद्ध होत असतां व मी तुला किंवा तूं मला युद्धास आव्हान केलें नसतां, वृक्षाच्या आड उभा राहून तूं मला मारिलेंस, हा तूं केवळ अधर्म केलास...' (वाल्मीकिरामायण, किष्किंधाकांड, सर्ग १६–१७ पहा). ह्या भाषणावरून रामाच्या पदरीं अपकीर्ति कशी येते, हें स्पष्ट होतें. येथें 'वृद्धास्ते न विचारणीयचरिताः' इत्यादि भवभूतिकृत उत्तररामचरित्रांतील पद्याचें स्मरण होतें (अंक ५ श्लोक ३५ पहा). १८. अपकीर्ति.

१. 'मुखीं' असें पाठांतर. २. लोहाग्र. ज्या शरा अय नसे तो व्यर्थ होय, तसाच ज्या नरा सत्य नसे, तो सुखी असोनि व्यर्थ होय–असा अन्वय. अय=लोखंड. ३. 'नसे' हें अध्याहृत क्रियापद. ४. आपल्या पक्षाच्या लोकांत (?) कोण शिरला ? ५. पिलूं. ६. 'सद्गुरुचें' असा पाठभेद. ७. कांकडी कापतात तसें. ८. आपल्या अमात्यांसह. ९. अजातशत्रु, धर्मराजा ! १०. परपक्षीय नर हाच हत्ती. जो परनरकुंजर त्या हरिपासूनियां (सिंहापासून) अजा (शेळी) न तारी (रक्षण करूं शकत नाहीं)–असा अन्वय. ११. शेळी. १२. सत्वरूप नौका. शेषीं=शेवटीं, अखेरीस. १३. चनुष्य. १४ मृदुता, मनाची कोमलता. १५. मुकाम.

सोसिलें खलकृत धर्षण, दुःसह कपिला अशा निरीहीं तें. ॥ २४
समयें न विलंघिला, तरि जीवनहि हरावया झगडतात. ।
सुझहि, दगाचि आम्हांविषयीं झाला खरा दगड, तात. ॥ २५
त्वदनुमतें, या हिततमकृष्णानुमतेंचि धर्म वर्ततसे. ।
तरि खल अतिदुस्तर हे तिमिरीं पथ सर्पगर्भगर्त तसे. ॥ २६
सर्व यथाशक्ति रणीं झटतों, विजयार्थ वहनियां सेदसी. ।
त्या आम्हां अतिदुःसह, जेंवि क्षार क्षतीं, असें वदसी. ॥ २७
वर्णुनि गुरुसुत सिवविसि मज खलबलशतभयावहा काय ? ।
आहे गदा सहाय, द्रौणिपुढें धरिल दरें न हों कार्यें. ॥ २८
व्यसनीं, मद्धृदयातें, ऐसें बोलों नको, विदाराया. ।
व्यसनीं दुखविसि निष्ठुर कैसें बोलोन ? कोविदा ! राया ! ॥ २९
द्रौणि किती ? द्रोणाचल [15]यो; भस्मचि करिन तो गदाघातें, ।
भगवत्स्मरणें भगवद्भक्त जसा नरकभोगदाघातें. ॥ ३०
'त्यजुनि भय, स्वस्थ रहा,' म्हणवी धर्मोद्दतासि 'हा !' न, रवा. ।
हा नरेंवासव देइल न, सॅलोकपमृत्युच्याहि, मान, रवीं. ॥ ३१
भ्यालासि, कृष्ण सारथि असतां, वद सत्य पांडवा खातो ? ।
नरें कीं नग पाहेलचि जरि गिळिलहि सत्यपांड वाखा तो.' ॥ ३२

---

१. सोसिलें. २. बलात्कार. ३. ऋषिविशेष, त्यासारख्या. (पृष्ठ २३२ टीप १६ पहा). ४. निरीच्छार्ते. ५. ठराव, किंवा नेमलेली वेळा. अज्ञातवासांतून प्रगट होण्याची वेळा. ६. दगडाप्रमाणें कठिणहृदय. तात=धृतराष्ट्र. ७. त्वत्+अनुमतें=तुझ्या अनुज्ञेनें, तुझ्या अनुमोदनानें. ८. सर्प आहेत ज्यांचे पोटीं असे खळगे. ९. सत्+असि—उत्तम खड्ग. १०. मणांत. ११. दुष्टांच्या शेंकडों सेनांला भय उत्पन्न करणाऱ्या मला. १२. भीति. १३. हा देह=मी (भीम). १४. जाणत्या. १५. येवो. १६. नरक+भोग+द+अघातें=नरकभोग देणाऱ्या अघातें (पापातें). १७. धर्माचा आदरसत्कार ज्यानें केला आहे त्यास, सद्धर्मानें वागणाऱ्यास. १८. दिव्य. रवा=दिव्य. रवा काढणें=दिव्य करणें, आपला खरेपणा सिद्ध करण्यासाठीं तापलेल्या तेलांतून धातूचा तुकडा, हातास इजा न होतां, काढणें. रवा धर्मोद्दतासि 'भय त्यजुनि, स्वस्थ रहा' [असें म्हणे]. [त्यास] 'हा !' [असें] न म्हणवी—असा अन्वय. १९. [illegible]. २०. अष्टदिक्पालांसहित यमाच्या. २१. [illegible]. २२. 'नरकीं' असें पाठांतर. २३. सत्पप+अंड=ब्रह्मांड.

पार्षतहि म्हणे, 'होता षट्कर्मी निरत काय हा नियमें ? ।
केली, जेंवि करावी, बहुजीवनिकायकायहानि, यमें. ॥ ३३
त्यजुनि स्वधर्म, झाला परधर्माश्रित, अशांत जरि पिकला, ।
ब्राह्मणब्रुव, ध्रुव धन घेउनि, कौरवां स्वयें विकला. ॥ ३४
क्षत्रियधर्मेहि उत्तम परि त्यातें नीट चालवीना कीं; ।
यन्निष्ठापुरुषातें, स्वर्गश्री नित्य पाँलवी नाकीं. ॥ ३५
मद्बांधवचि खपविले; इतरांसि नसेचि अवधि लेखाया; ।
या अधमापरि वाटे त्या घटकर्णेंहि न वधिले खाया. ॥ ३६
यांवा, कनककशिपुचा जैसा, तैसाचि हा वध, मनातें. ।
कैंचा द्विज ? कैंचा गुरु ? 'दुरित करुनि बुडवितो अधम नातें.॥३७
अर्जुनजी ! सुकृत नव्हे, अरि अतिदारुण असा वधाना, तें. ।
खल सावधान न मरे, तरि मारावें असावधानातें. ॥ ३८
केला त्वत्सातेंही, खाया तांबूलकवळ, 'आ' ज्यास, ।
शरशयनीं न निजविलें काय तुवां, त्या तशाहि ओज्यास ? ॥ ३९
बापाचा परम सखा, जो नृप भगदत्त, बापसा मान्य, ।
पौती पाडुनि कपटें वधिला; तें काय पाप सामान्य ? ॥ ४०

---

१. ब्राह्मणानें अवश्य केलीं पाहिजेत अशीं जीं षट्कर्मे त्यांत. 'इज्याध्ययनदानानि याजनाध्यापने तथा । प्रतिग्रहश्च तैर्युक्तः षट्कर्मा विप्र उच्यते ।' म्हणजे, स्वतः यज्ञ करणें, दुसऱ्याकडून करविणें, शिकणें, शिकविणें, दान घेणें व दान देणें ह्या ब्रम्हणास अवश्य असणाऱ्या सहा कृत्यांमुळें त्याला 'षट्कर्मा' असें म्हणतात. २. बहु+जीव+निकाय+काय+हानि=बहुत जीवसमुदायांच्या शरीरांची हानी. ३. वृद्ध. ४. ब्राह्मण म्हणविणारा, ब्राह्मणजातींत जन्म घेऊन ब्रह्मकर्म न करितां, ब्राह्मणेतरांस योग्य असें कर्म करून, उपजीविका करणारा. ५. निश्चयेंकरून. ६. ज्या क्षत्रिय धर्मामध्यें निष्ठा आहे ज्याची, अशा पुरुषाला. ७. बोलावी. नाकीं=स्वर्गांत. ८. गणना करावयास. ९. कुंभकर्णेंहि. १०. मान्य व्हावा, आपली त्यास संमती मिळावी. ११. पाप. १२. पुण्य. १३. असा अतिदारुण अरि वधाना, तें सुकृत नव्हे–असा अन्वय. १४. पांडूनेंही. १५. भीष्मास. १६. पापण्या, नेत्रांचें झांकण. भगदत्त वृद्ध झाल्यानें त्याच्या डोळ्यांच्या पापण्यांचे केश फार लांब झाले होते, म्हणून तो त्या पापण्या रेशिमाच्या दोरीनें मुकुटास बांधित असे. (मागें अध्याय २ गीति ४२–७८; पृष्ठें ३३–३९ पहा).

गेलें काय तुझें, म्यां जरि पितृघातक[1], हरूनि मद, वधिला ?।
खल जो प्रवर्तला जन सकल वधाया, करूनि मदवधिला[2]. ॥ ४१
भगिनीभाच्यांकरितां, आवरुनी चाप-रोपें[3] हा साहे; ।
द्रुपदसुतभुज स्तवना योग्य; न नीचा ! परोपहासा[4], हे. ॥ ४२
रामें रावणसा, हा म्यांचि वधावा रणीं, असें होतें, ।
याजोपयाजमुनिकृत[5] होइल लटिकें तुम्हां कसें हो ! तें[6] ? ॥ ४३
धर्माकडे, मजकडे, नाहींच अधर्मलेश हा कांहीं. ।
शिष्यद्रोहें मेला, गेला, परतेल काय हा कांहीं ?' ॥ ४४
पार्षतकृत गुरुदूषण बहुतचि; मैंज[7] सर्व वर्णवेना तें. ।
'धिक् ! धिक् !' सकळहि म्हणती त्यांस, जसें सर्व वर्ण[8] वेनातें[9].४५
अश्रुपरिप्लुतनयनें[10] धृष्टद्युम्नाकडे विजय पाहे. ।
राहे धर्म अधोमुख, भीमहि; कोणासही न तें साहे. ॥ ४६
शैनेय[11] म्हणे, 'कैसें वदतो, जाणों[12] नव्हेचि पापीसा !' ।
नाहीं कोणी येथें, याची जिव्हा समूळ कापीसा. ॥ ४७
सत्य रसज्ञा[13] म्हणतों, गुरुनिंदा बोलतां, तडकलीला[14]. ।

---

१. पिता द्रुपद, याचा वध करणारा द्रोण. २. मत्+अवधि=माझ्या मर्यादेला करून, मजपर्यंत सर्वांना मारण्याचा उद्योग करून. ३. धनुष्य आणि बाण. ४. पर+उपहास=शत्रूंनीं केलेल्या निंदेस. ५. याज आणि उपयाज नामक ऋषिविशेष, त्यांची कृति. ६. एकदां द्रुपदराजानें द्रोणाचार्यांचा अपमान केला होता. त्याबद्दल सूड उगविण्यासाठीं द्रोणाचार्यांनीं द्रुपदराजाशीं युद्ध करून, त्यास पदच्युत केलें, व त्यास बांधून आपल्यापुढें आणविलें. अशाप्रकारें त्याचा पाणउतारा करून त्याचें अर्धें राज्य घेऊन त्यास सोडून दिलें. त्या अपमानाचा सूड उगवावा म्हणून, 'द्रोणाचार्यांस मारील असा पुत्र आपणांस व्हावा,' ह्या हेतूनें द्रुपदराजानें याज आणि उपयाज नाम ऋषींची सेवा करण्यास सुरुवात केली. पुढें त्या ऋषींच्या संमतीनें त्यानें मोठा यज्ञ केला, त्यांत त्यांच्या तपोबळानें अग्नीपासून धनुर्बाणधर धृष्टद्युम्न नांवाचा पुत्र व वेदीपासून सौंदर्यसंपन्न द्रौपदी नामक कन्या अशीं दोन अपत्यें निर्माण झालीं—अशी कथा आहे. ७. संजयाला. ८. 'त्यासम जे सर्व वर्ण' 'त्यास जसे सर्व वर्ण' असे अन्यपाठ. ९. वेन राजाला. (मागें पृष्ठ २३४ टीप १२ पहा.) १०. रोदनोदकयुक्त नेत्रानें. ११. सात्यकी. १२. हा असें भाषण करितो, कीं अणु काय ह्यानें पाप केलेंच नाहीं ! १३. जिव्हा. १४. गुरुनिंदा बोलतां तडकलीला (जी तडकेल, द्विधा होईल, तिला) सत्य रसज्ञा

करितील दर्शनार्थ, प्रियसख हे बोल, तांतड कलीला.[1] ॥ ४८
जीभ चिरावी शतधां, शिरहि उलावें, खला ! मुख गळावें, ।
श्वपचगृहाला[2] पथिक द्विजसे, सोडुनि तुला, असु पळावे. ॥ ४९
हित[3]शत्रु काममुख हे, 'नरकीं' म्हणती 'अपत्रपा[4] ! पड,' सा[5]. ।
पाप[6] डसाया लाविल अहि वृश्चिक; भाजशील पापडसा. ॥ ५०
त्वां सप्त, अवर, पर[7] जे, त्यांतें नरकांत घातलें. कानें[8] ।
परिसुनि म्हणेल पार्षत[9], 'केला द्रोणें न घात, लेंकानें[10].' ॥ ५१
भीष्में महानुभावें आदरिला तो तसा स्वयें स्वांत[11]. ।
तूं जेंवि कृतघ्न तसें मानी शुद्धासही तुझें स्वांत[12]. ॥ ५२
भीष्मवधींहि शिखंडी कारण उत्पादिला[13] तुझ्या बापें. ।
कोण तुम्हां द्रुपदसुतांवांचुनि जोडील हीं महापापें ? ॥ ५३

(रस जाणणारी खरोखरच होय) असें म्हणतों (म्हणालों असतों)—अन्वय. जिव्हेला रसज्ञा असें म्हणतात तें यथार्थ नाहीं, कारण भाषणाचा रस (स्वारस्य) तिला कळत असता, तर ती तडकली असती—असा भाव.

१. हे बोल (असलें हें भाषण) प्रियसख कलीला दर्शनार्थ तांतड करितील—असा अन्वय. ह्या असल्या एकमेकांचें उणें काढणाऱ्या भाषणाचा मित्र जो कली त्याला ह्या भाषणाच्या भेटीस यावयास मोठी घाई होईल. ह्या तोंडातोंडी'प्रकारानंतर गोष्टी हातघाईवर येतील—असा भाव. २. चांडाळगृहाला. ३. काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर हे सहा हितशत्रु. ४. निर्लज्जा ! 'हे अप-त्रपा ! [तूं] नरकीं पड' [असें काममुख (कामप्रभृति) सा (-सहा) हितशत्रु म्हणती—असा अन्वय. जो षड्रिपूंना वश झाला तो नरकांत पडेलच—असा भाव. ५. सहा. ६. त्वां केलेलें पाप हें अहि आणि वृश्चिक यांना, [तुज] डसायाला लावील. ७. आलिकडचे (वंशज) सात, आणि पूर्वज सात नरकांत घातले. खोटी साक्ष देणाऱ्यासद्धां शास्त्रकारांनीं हीच शिक्षा सांगितली आहे. (मोरोपंत, सभापर्व—अध्याय ५ गीति १०६ पहा). ८. द्रुपद युद्धांत मरण पावला होता, म्हणून 'कानें परिसुनि' ह्या शब्दांची योजना समर्पक आहे. ९. द्रुपद. १०. त्वां धृष्टद्युम्नानें. द्रोणाचार्यांच्या हातून द्रुपदास युद्धांत मरण आल्यामुळें, द्रोणाच्या हातून द्रुपदाचा घात झाला नाहीं. कारण समरांगणांत मरणाऱ्या वीरांस उत्तम गति प्राप्त होते. पण धृष्टद्युम्नाच्या पापामुळें (प्रथमार्धांत सांगितल्याप्रमाणें) द्रुपदास नरक प्राप्त झाला असावा. म्हणून 'मुलानें घात केला' असे द्रुपदाच्या तोंडून उद्गार निघणें साहजिकच आहे. ११. स्व+अंत=आपलें मरण. १२. अंतःकरण. १३. उत्पन्न केला. (पृष्ठ २७० टीप ९ पहा).

ग्रहाग्रा जन पाहे तुज, सहसा आजि पाहुनि र्‍यीका. ।
द्विजराजग्रा ! बहुधा विधिनें तुजलाचि राहु निरवीला. ॥ ५४
सरलें आयुष्य तरिच, निंदिसि तूं मत्तमक्ष गुरुगुरुतें[3]. ।
मांजर[4] वांचेल कसें ? करिल व्याघ्रासमीप 'गुरुर्गुरु,' तें ? ॥ ५५
नाहीं उपयोग तुझा, कटकीं पळमात्रही नसावास. ।
श्वेततुरग[5] मृगमदसा[6]; तूं अस्तुतिपात्र हीनसा वास. ॥ ५६
साहेन तुझे शत मी, एकचि माझा गदाप्रहार सहा. ।
पापा ! पळों नको; घे, अमृतरस असा नसे, महारस[7] हा.' ॥ ५७
पार्षत् म्हणे, 'वदेल न दुर्वचनें मत्त अशुभ जन[8] कां हीं ? ।
नेणे क्षमारतांचें, त्वत्तुल्य मनुष्यपशु, भजन कांहीं ? ॥ ५८
हृदयीं क्षमा असावी; सर्वत्र सदा असों नये, पण, ती. ।
म्हणति[9] क्षमितां 'दुर्बळ;' न क्षमितां करिति दुर्जन प्रणती. ॥ ५९
गिळिलासि महादुरितें, दुष्टा ! करिशील काय वध मांजा[10] ? ।
पाहों नये तुजकडे. माझ्या दृष्टीपुढोनि अधमा ! जा. ॥ ६०
[11]जो घोळसी[12] तुज, जसा सुरतीं अतिकामरस कलत्रास[13], ।
पाहोनि पावले, ज्या नरसिंहा; सामर[14] सकल, त्रास; ॥ ६१
भूरिश्रवा, सिताश्वच्छिन्नभुज, प्रायगत[15], महातेजा, ।

१. हे द्रोणास मारणाऱ्या; (पक्षीं) चंद्रास ग्रासणाऱ्या. २. माझा गुरु अर्जुन, त्याच्या गुरूतें, द्रोणातें. ३. अप्रस्तुतप्रशंसालंकार. ४. हेंच यमक पंतकृत उद्योगपर्व, अध्याय ४ गीति ८९ मध्यें आहे. ५. अर्जुन. ६. कस्तुरीसारखा. ७. वीररस. ८. मत्त [म्हणून] अशुभ जन हीं दुर्वचनें कां न वदेल–असा अन्वय. अर्थात् वदेल हें अपेक्षित उत्तर. ९. या गीत्यर्धाशीं भर्तृहरिकृत नीतिशतकांतील 'मौनान्मूकः......क्षान्त्या भीरुः......' इत्यादि श्लोक ताडून पाहण्यासारखा आहे. १०. माझा. ११. येथील 'जो' चा संबंध गीति ६३ मधील 'त्यातें' या सर्वनामाशीं आहे. येथें गीति ६१–६३ या गीतींचा अन्वय आहे, म्हणून हें 'विशेषका'चें उदाहरण होय. 'द्वाभ्यां युग्ममिति प्रोक्तं त्रिभिः श्लोकैर्विशेषकम् । कलापकं चतुर्भिः स्यात्तदूर्ध्वं कुलकं स्मृतम्.' ॥ अर्थः–दोन पद्यांचा अन्वय एकत्र असला म्हणजे त्या पद्यद्वयास 'युग्म', तीन पद्यांचा असल्यास 'विशेषक', चारांचा असेल तर 'कलापक' आणि पांच किंवा त्यांहून ज्यास्त पद्यांचा असेल तर त्यास 'कुलक' असें म्हणतात. १२. 'जो घोळवी तुज' असें पाठांतर. घोळसी=घुसळी, दमवी, थकवी. १३. स्त्रियेस. १४. देवांसहवर्तमान. त्रास=भय, भीति. १५. प्राण देण्यासाठीं योगधारणा करून बसलेला.

'बहु धन्य' म्हणत होते, [1]अमर-समर-रसिक-बुध पहाते, [2]ज्यां;॥६२
त्यातें वधुनि न लाजसि, नरकफळा वरुनि, वीरहानीच्या[3]. ।
मिरविसि पुरुषार्थ, म्हणसि लोकीं आपणचि वीर, हा[4] ! नीचा!॥६३
केवळ चांडाळचि तूं झालासि, प्रायगत-सुजन-घातें. ।
पाप्या ! तुलाचि घडलें कर्म, तसें नच घडेल अनघातें[5]. ॥ ६४
म्यां, नसतां छिन्नभुज प्रायगत, द्रोण मारिला [6]मदरी[7]. ।
[7]बदरी निवेल, विप्राधमशमनें, सर्व-शांत-धाम-दरी[8]. ॥ ६५
द्रोणशिर कापिलें तें, नाक तुझें काय ? जेंवि [9]घटकर्ण, ।
तैसाचि रणीं मर तूं, येणेंचि फिटेल [10]आम्रकटकर्ण. ॥ ६६
दुर्वाक्य पुन्हा वदतां, द्रोणशिर तसें, तुझेंहि कापीन !
न मथितिल खळा तरि, हे भुज केले व्यर्थ काय गा ! पीनें[11] ॥ ६७
मूढा ! केवळ धर्में राज्यव्यवहार चालतो काय ? ।
न[12] करी अधर्म ऐसा, जो एक तुम्ही रचाल तो कायें[13]. ॥ ६८
दुर्योधनें अधर्में द्यूतक्रीडेंत वंचिला पार्थ. ।
लुटिला कुटिलानें हा, चोर[14]समूहें वनीं जसा [15]सार्थ. ॥ ६९
छळिली सती अधर्में; होता फेडीत पापजन [16]वासा. ।
पाठविले, वल्कलधर करुनि, अधर्मेंचि; सर्व वनवासा. ॥ ७०
धांवोनि येत होता, जो [17]द्रुप [18]एक भट, कळवळून, ।

---

१. देव आणि युद्धप्रिय झाते जन. 'अमरसम रसिकहि बुध' असें पाठांतर. २. द्रोणास. ३. वीरहानीच्या (वीरांचा नाश करणाऱ्या) नरकफळा वरुनि—असा अन्वय. ४. खेदार्थी अव्यय. ५. पातकरहितातें. ६. माझा शत्रु (द्रोण). ७. बदरिकाश्रम. सात्विक तपस्वीजनांचें निवासस्थान असा जो बदरिकाश्रम तो ब्राह्मणाधमाच्या (द्रोणाच्या) शमनें (मरणानें) निवेल (संतोष पावेल)—असा भाव. ८. सर्व सात्विक तपस्व्यांचें स्थान असें गिरिकंदर. ९. कुंभकर्ण. १०. आम्र आणि कटक ह्यांचें ऋण. ११. पुष्ट. १२. ह्या गीत्यर्धाच्या स्पष्टीकरणार्थ पंतांची टीप पहाः—अधर्म न करी असा ब्रह्मयानें तों क्षत्रियकाय रचिला नाहीं. तुम्ही एक ब्रह्मयापरीस महासमर्थ पुढें नवा रचाल, असा उपहास यांत [आहे]. १३. देह. १४. 'चौरसमूहें' असें पाठांतर. १५. स+अर्थ=द्रव्यवान्; अथवा, प्रवासी जनसमूह. १६. वव्रास. १७. शस्त्र. १८. मुख्य वीर.

नेला पुजुनि, अधर्में[1], व्हाया यांचेंचि फटकळ, वकून[2]. ॥ ७१
वधिला बाळ[3] अधर्में कोंडुनि; [4]विपिनीं जसा शशक[5]; सारे ।
झटले वृकसे; नाहीतरि होता त्यांसि तो वश कसा रे !? ॥ ७२
भीष्मप्रभुच्या पातें[6], घडलाचि अधर्म धवलतुरगाही[7]. ।
पूस खरें कीं खोटें, देतिल देवर्षि, सिद्ध, सुर, गाही[8]. ॥ ७३
भूरिश्रवा अधर्में संहरिला त्यांहि पंडितंमन्यें[9], ।
देवद्रुम[10] दुर्दैवें जेंवि मदांधें करीश्वरें वन्यें[11]. ॥ ७४
त्यांहीं[12] तसाचि यांहीं[13], केला जाहे अधर्म हा कांहीं[14]. ।
'हां[15] !' कां हीं म्हणति बळें[16] ? होईल तुझ्याहि काय हाकांहीं? ॥ ७५
जें धर्माधर्माचें तत्व, कळेनाच बालिशमनीं[17] तें; ।
मातें, नेणुनि, निंदिशि तूं, पामर जेंवि बालिशमनातें[18]. ॥ ७६
पूस[19] परांचे पथ तूं पांचाळांच्याचि, सांड गावांचे. ।
अजशशमृगांतचि[20] बळी; पळहि हरिपुढें न लांडगा वांचे.' ॥ ७७
[21]कोपे सात्यकि, ठेउनि शर कार्मुक, घे, महाभुज, गदे[22], तो. ।
वाटे गरुडासि शिव्या, बहु चक्षुर्विष[23] महाभुजग, देतो. ॥ ७८
त्यावरि सात्यकि धांवे; पार्षत टाकी उडी रथावरुनी. ।

---

१. विषम (विपरीत), अकल्याण. २. 'वकून' ह्या शब्दाचा प्रयोग 'वळवून' ह्या अर्थी केलेला दिसतो. ३. अभिमन्यु. ४. अरण्यांत. ५. ससा. वृक=लांडगा. ६. पतनानें. ७. अर्जुनालाही. ८. ग्वाही, साक्ष. ९. आपल्यास पंडित असें मानणारा अशानें. १०. कल्पतरु. ११. अरण्यासंबंधी अशा, रानटी. १२. कौरवांनीं. १३. पांडवांनीं. १४. थोडासा. १५. 'हा ! कांहीं म्हणति बळें' असें पाठांतर. येथें द्वामयमक आहे. १६. सैन्यें. हीं बळें 'हां !' कां म्हणती ?—असा अन्वय. १७. मूर्खांच्या मनाला. १८. रामातें. मागें गीति १७ पहा. १९. जेंवि सांड (वृषभ) गावांचे (गाईचे) [पथ पुसे] (गाईच्या पाठोपाठ हिंडून मदोन्मत्त सांड त्यांस त्रास देतो) त्याप्रमाणें पांचाळांच्याचि परांचे (शत्रूंचे) पथ (मार्ग, आचरण) पूस (त्यांच्या वर्तणुकीसंबंधीं चौकशी कर)—असा अन्वय. सांड गरीब गाईस त्रास देतात, त्याप्रमाणें पांचाळांचे शत्रु उन्मत्त होऊन त्यांस त्रास देतात—असा भाव. २०. [लांडगा] अज (मेंढे), शश (ससे) आणि मृग (हरिण) ह्यांतचि बळी (बळवान्) होय—असा अन्वय. २१. 'कोपें सात्यकि, ठेउनि शरकार्मुक' असा पाठभेद. २२. गदेतें. २३. ज्याच्या नेत्रांत विष आहे असा.

गमले ते अंतकसे, अन्योन्यक्षयकरा पथा वरुनी. ॥ ७९
प्रभुवचनें हुत धांवे भीम, बळें माधवासि कवटाळी. ।
यमुनाह्रद गरुडाची, वृष्णिवराची तसीच कर्वे टाळी. ॥ ८०
आवरितां आटोपी त्यासि पदीं भीमसेन तो साल्या. ।
त्यांतें सहदेव म्हणे, 'आम्हांकरितां दुरुक्ति सोसाव्या.' ॥ ८१
पांचाल्य म्हणे, 'सोडा, सोडा, धरितां कशास ? भावोजी ! ।
खलदलनें हर्षो द्या; दैत्य राघवयशा समा 'वो' जी. ॥ ८२
येऊं द्या हो ! मजवरि; हा, सात्यकि सत्य वात, पर्वत मीं. ।
तुरवीन या वराकीं, तुरवी रवि, जेंवि, तिळहि गर्व, तमीं. ॥८३
हे कौरव आले कीं; यांचेंही मथन हें महाकार्य. ।
आम्हीं मुदित करावा सर्वांनीं मथुनि अहित, हो आर्य. ॥ ८४
अथवा यांचा कांहीं नाहीं पार्था महातपा लेखा. ।
म्हणतो काळा, दावुनि, अरि, जेंवि गजा महात, पाले,'खा.'॥८५
जो छिन्नबाहु वधिला कौरव्य, मला तयापरि समजला ! ।
वाटे, अधिक शतगुणें तेजस्वि अलात, यापरिस, मजला. ॥ ८६
तेजस्वी धरवेना. कळलासि स्पष्ट तूंचि फुसका रे !' ।
हें परिसुनि, मारुतिभुजधृत सात्यकि, सर्पसाचि फुसकारे. ॥ ८७
भीमभुजांतुनि न सुटे, संसारांतुनि जसाचि संसारी. ।
त्यातें धांवुनि यत्नें समजाविति धर्मराज, कंसारी. ॥ ८८

---

१. सत्वर. २. सात्यकीस. ३. कालियावर गरुडाची झडप यमुनाऱ्हदें पडों न दिली, तसीच भीमें सात्यकिची पार्षती [पडों न दिली]–पंत. ४. सात्यकीची. ५. झडप. ६. सहाव्यास (धृष्टद्युम्नास). ७. सात्यकि व धृष्टद्युम्न यांतें. ८. धृष्टद्युम्न. ९. सज्जनांचा समुदाय. १०. वराक=नीच. तम=अंधकार, काळोख. ११. शत्रु. १२. धर्मराज. १३. गणना, पर्वा. १४. जेंवि महात गजा पाले दाउनि 'खा' म्हणतो, [तेंवि अर्जुन] काळा अरि दाखवुनि [त्यांस] 'खा' असें म्हणतो–असा अन्वय. १५. भूरिश्रवा. १६. यापरीस तेजस्वी अलात (कोलीत) शतगुणें अधिक [आहे] असें मला वाटे–असा अन्वय. अलाततेज वाढवितां वाढेल–पंत. १७. कोलीत. १८. भीमाच्या भुजांनीं धरलेला. १९. येथील उपमा भीमाच्या चिकाटीची कल्पना उत्तम रीतीनें करून देते.

कोपी[1] ऐकुनि कुरु-रव[2] त्यांवरि ते शीघ्र, नरवरा ! गेले. ।
तैसे हरि, परिसुनियां मत्त गजांचाहि, नं, रव, रागेले. ॥ ८९
क्रुद्ध व्याघ्रचि सात्वत-पार्षत,[3] ते भौमसोदराक्ष,[4] ससे[5] ।
पर, गमले; तदिषुहि[6] असृगास्वादनलब्धमोद[7] राक्षससे. ॥ ९०

अध्याय तेविसावा.

पडले गळांचि धांवुनि, सेवुनि बहु रुद्सुरा,[8] सुरथ डंकले[9] ॥
अभिमानडिंकें,[10] न सुटति कुरु पांडु, जसे सुरासुर थडकले. । १
नारायणास्त्र योजी गुरुपुत्र परांबलाविलापार्थ.[11] ।
वाटे, त्या[12] असुरांच्या[13] दुर्दैवें, तो बलाविला पार्थ. ॥ २
वृष्टि, विविधशस्त्रांची, बहु होऊं लागली, अ-सु-सहा[14] ती. ।
कलिलीलेला बुधसे, नच, वीरांचे तिला असु सहाती.[15] ॥ ३
जाळी परकटकातें, ग्रीष्मीं दवदहन जेंवि कक्षातें,[16] ।
कोणाचीही चालों नेदी नारायणास्त्र, कक्षा, तें. ॥ ४
पेटे अधिकचि, जों जों वाराया करिति यत्न ते जन, गा ! ।
तावी परां,[17] जसें रविकांतांच्या,[18] दिवसरत्नतेज,[19] नगां. ॥ ५
धर्म म्हणे, 'क्षत्रिय हो ! करितां काशास काय-होमातें ? ।
मी मंदभाग्य केवळ पापी, ताराल काय हो ! मातें ? ॥ ६
धृष्टद्युम्ना ! उरलें बळ रक्षावें, वृथा न भाजावें. ।

---

१. रागावलेले, क्रुद्ध. 'कोपीं' असें पाठांतर. २. कौरवांवर. ३. सात्यकी व धृष्टद्युम्न. ४. मंगळाचे बंधु असे नेत्र ज्यांचे, मंगळासारखे (लाल) नेत्र ज्यांचे असे. रक्ताक्ष—असा भाव. ५. पर (शत्रु) ससे गमले—असा अन्वय. उत्प्रेक्षालंकार. ६. तत्+इषु=त्यांचे बाण. ७. रक्ताच्या आस्वादनानें आनंद प्राप्त झाला आहे ज्यांना असे. ८. क्रोधरूप मद्य. ९. चिकटले. १०. अभिमानरूपी गोंदानें. ११. शत्रूंच्या स्त्रियांच्या विलापार्थ. १२. कौरव हेच अणुं काय राक्षस त्यांच्या. १३. बलाविला गेला, आव्हान करून बोलावून आणिला. १४. अत्यंत दुःसहा. १५. गवतातें. १६. कोठी, मात्रा. कक्षा=कक्ष्यांत वादीप्रतिवादींच्या परस्परांवर ज्या कोट्या होतात त्या प्रत्येक. १७. शत्रुजनास. १८. सूर्यकांताच्या पर्वतास. १९. सूर्यतेज.

वा ! विहंगांहीं[1], सोडुनि देवपरिवृतपादपा[2], नभा जावें. ॥ ७
जा, शैनेया[3] ! माझें मामावें[4] सांग नमन, मामीतें; ।
'जें केलें साह्य तुवां, शतजन्में आठवीन वा ! मी तें. ॥ ८
आहे सुज्ञ समर्थ, स्वश्रेय करील हा यदुपदेश[5], ।
विपदब्धिसेतु[6]-होउनि, लोकांला तारितो यदुपदेश[7]. ॥ ९
सानुज मीं, या अस्त्रज्वलनीं शिरतों, अरे-अहीनकुला[8] ! ।
सहदेवा ! मेलाही तो धन्यचि, जो न भी[9] अही, नकुला[10]. ॥ १०
जननीस शोक बाधे, पुत्राचा वेचतां वृथा कार्य[11]. ।
रणमरणें[12] हर्षेल प्राकृतमाता, तसी पृथा[13] काय ? ॥ ११
भीष्मद्रोणसमुद्रीं तरलों; या द्रौणिगोष्पदीं[14] बुडतों. ।
अचल प्रकंपनीं[15] जे, ते व्यजनें[16] तुच्छ तूळसे[17], उडतों. ॥ १२
जिष्णुमनीं, गुरुपुत्रें, पांडव पांचाल शेष आहेत[18], ।
हे मारुनि, पुरवावा गुरुचा, वधिले न सर्व हा, हेत. ॥ १३
अभिमन्यु बाळ जेणें, कथुनि वधाचा उपाय, मारविला, ।
लाजविले उग्रत्वें[19] दुष्प्रेक्षत्वें[20] गुणें यमा रविला; ॥ १४

---

१. पक्ष्यांनीं. २. दावानलानें वेष्टित अशा वृक्षा. ३. हे सात्यके. जा=द्वारकेस जा. ४. पांडवमाता कुंती ही यदुकुलोत्पन्न व सात्यकीचाही जन्म त्याच कुळांतील तेव्हां सात्यकीचा बाप हा पांडवांचा मामा असावा, असें दिसतें. ५. यदु+पद+ईश=कृष्ण. ६. विपत्+अब्धि+सेतु=विपत्तिरूप समुद्राविषयीं सेतु. ७. यत्+उपदेश=ज्याचा उपदेश. ८. अ+हीन (उच्च)+कुला=उच्च=कुलोत्पन्ना ! ९. जो अही (सर्प) नकुला (मुंगुसाला) न भी (भीत नाहीं) तो मेलाही (मेला तरी) धन्यचि [होय]–असा अन्वय. अहिनकुळांचें वैर प्रसिद्धच आहे. १०. मुंगुसाला. ११. देह. १२. केवळ युद्धांत मृत्यु आला एवढ्याच गोष्टीमुळें. १३. कुंती. १४. अश्वत्थामारूपी टवक्यांत. गोष्पद=जमिनींत उठलेलें गाईचें पाऊल. रूपकालंकार. १५. महावातास. १६. विंजण्यानें, पंख्यानें. १७. कापसाप्रमाणें. १८. 'पांडव, पांचाळ शेष आहेत, [ते] सर्व न वधिले,' हा गुरूचा हेत, हे (अवशेष राहिलेले पांचाळ पांडव) गुरुपुत्रें मारुनि, पुरवावा, [असें] जिष्णुमनीं (अर्जुनाच्या मनांत) [आहे कीं काय न कळे]–असा अन्वय. अर्जुन हा द्रोणाचा पट्टशिष्य, तेव्हां गुरूची इच्छा पूर्ण करावी असें त्यास वाटलें असावें, अशी शंका धर्मराजाच्या मनांत आली. १९. क्रूरपणानें. २०. अवलोकन करण्यास कठीण अशा धर्मानें. उग्रत्वें यमा आणि दुष्प्रेक्षत्वें गुणें रविला–असा अन्वय. यथासंख्यालंकार.

ससुतें[1] जेणें, पुसतां धर्मधूतांस, वेदन[2] वासून, ।
कृष्णा[3] उपेक्षिली[4], दे हर्ष, नमुनि नित्य पद नवा सून. ॥ १५
जेणें जयद्रथातें, त्या व्यसनमहार्णवांत ताराया, ।
लेववुनि कवच, केला क्षमें[5] कुरुपति, अर्जुनासि माराया. ॥ १६
पांचाल सत्यजिन्मुख[6] जे होते मज्जयार्थ[7] झटत रणीं, ।
ब्रह्मास्त्रराहुकरवीं जेणें, ते गिळविले सुभटतरणी[8]; ॥ १७
धाया आम्हां सर्वां स्वर्गनिवास, प्रवर्तला होता, ।
कल्याणवृत्त[9] गुरु, म्यां मारविला युद्धमन्युचा[10] होता[11] ! ॥ १८
अस्त्राग्नींत जळावें, हें प्रायश्चित्त सर्वथा युक्त, ।
उक्त प्रकार जे जे, त्यांत बरा शीघ्र करिल हा मुक्त.' ॥ १९
प्रभु, भुज उभारुनि, म्हणे, 'सैनिक हो ! शीघ्र आयुधें सोडा. ।
यानावरूनि उतरा; कर, या अस्त्रासि सर्वही, जोडा. ॥ २०
भस्म करिल योधजना बहुतां; शरणागताविना; शम हो[12], ।
न धरिल; उरविल कोणा न, हुताश, रणागता, विनाश महा[13]. ॥ २१
तों भीम म्हणे[14], 'कथितो हा हितहि तमालनील[15]; परि सारे ।
मानधन कुलज्जन हो ! मन हो न त्रस्त; वाक्य परिसा, रे ! ॥ २२

---

१. आपला पुत्र जो अश्वत्थामा त्यासह ज्यानें. २. तोंड पसरून. ३. द्रौपदी. [जी] सून (पुत्राची स्त्री) पद नमुनि नित्य नवा हर्ष दे (देत्ये) [अशी ती] कृष्णा उपेक्षिली (संकटसमयीं तिचें संरक्षण केलें नाहीं .)—असा अन्वय. ४. मोरोपंतकृत सभापर्व अध्याय ५ पहा. ५. समर्थ. मागें अध्याय ९ गीति ८९–९५ पहा. ६. सत्यजित् आहे प्रमुख ज्यांत असे. ७. मत्+जय+अर्थ=माझ्या जयासाठीं. ८. उत्तम योद्धे हेच कोणी सूर्य त्यातें. ह्या गीत्यर्धांत रूपकालंकार आहे. ९. कल्याणानें आच्छादित, हितबुद्धीनें युक्त. हें भाषण औपरोधिक दिसतें. १०. युद्धरूप यज्ञाचा. ११. हवनकर्ता. होता=हा ऋग्वेदी असून त्याचें काम यज्ञांतील देवतांस स्तुतिपूर्वक आव्हान करण्याचें असतें. १२. ब्रह्मास्त्रानल. १३. शरणागताविना (ब्रह्मास्त्रवह्नि) शम न धरील (शमन पावणार नाहीं, शांत होणार नाहीं), बहुता योधजना भस्म करील. [हा] हुताश (अग्नि) रणागता (युद्ध करण्यासाठीं आलेल्या) कोणा (कोणासही) न उरवील; महाविनाश (मोठा नाश, मोठा अनर्थ) [होईल]—असा अन्वय. १४. 'कथितों हितहितहि तमालनील' असा पाठ रा.-पराडकर ह्यांच्या प्रतींत आहे. १५. श्रीकृष्ण, तमालपत्रासारखा नीलवर्ण ज्याचा आहे असा.

सोडावें[1] कुळजांहीं जीवित, समरीं, न शस्त्र सोडावें. ।
मोडावें आप्तवचन; अयश, शरीरार्थ, केंवि जोडावें ? ॥ २३
धरितों मीं, या अस्त्रीं न डराया तिळहि उर, गदा हातें. ।
रे ! [2]गरुडसंश्रिताच्या, विषदहनें, करिल, उरग, दाहातें ? ॥ २४
पावेल मजपुढें, हा, घेउनियां हार[3], विप्र, तापातें. ।
भेटुनि[4] रघुरामा भृगुराम कसा हारवि प्रतापातें ? ॥ २५
रे जिष्णो[5] ! त्वां समरीं भिउनि परां, सत्त्व[6]-बळ न सोडावें. ।
कर[7]पद्म तुझें उजवें विशर[8], विगांडीव[9] पळ, नसो, डावें.' ॥ २६
जिष्णु म्हणे, 'आर्या ! मी न करिन अन्यत्र कार्मुक-न्यास; ।
नारायणा[10]गोद्विजतेजा द्यावा, न मान, अन्यास.' ॥ २७
तें [11]जयवच परिसुनि, तो अत्यद्भुत[12]मानसत्त्व रागेला. ।
घनसाचि द्रौणिवरि, स्वीकारुनि[13] मान[13], सत्वरा, गेला. ॥ २८

---

१. ही गीति उत्तम सुभाषितरूप आहे. मागें अध्याय ७ गीति ६७ पहा. २. उरग विषदहनें गरुडसंश्रिताच्या दाहातें करिल [काय] ?—असा अन्वय. गरुडाचा आश्रय ज्याला आहे, त्याला सर्प आपल्या विषानें बाधा करूं शकेल काय ?—अर्थात् 'नाहीं' हें उत्तर. प्रश्नालंकार. ३. जितपणा, माघार, पराभव. ४. भृगुऋषीचा पुत्र राम (त्यासच परशुराम म्हणतात) व रघुकुलोत्पन्न दशरथपुत्र राम हे दोघे विष्णूचे अवतार. परशुराम हा सातवा व दाशरथि राम हा आठवा अवतार. श्रीरामानें स्वयंवरकाळीं महेशचाप भंगिलें व विवाहसमारंभ आटोपल्यावर तो अयोध्येस जाऊं लागला, तेव्हां मार्गांत परशुरामानें त्यास अडविलें व त्या दोघांचें युद्ध झालें. त्या वेळीं भगवदिच्छेनें परशुरामाच्या अंगीं असलेलें विष्णुतेज दाशरथिरामाच्या शरीरांत प्रविष्ट झालें. परशुराम हा चिरंजीवि असल्यामुळें ऋषींसारखें आचरण करून राहूं लागला—अशी कथा आहे. परशुराम रघुरामाला पराजय करूं शकेल काय ?—अर्थात् 'नाहीं' हें उत्तर. ५. अर्जुना. अर्जुनाला निरनिराळीं दहा नांवें होतीं:—'अर्जुन, फाल्गुन आणि जिष्णु । किरीटी, पांचवें श्वेतवाहनु । बीभत्सु, विजयी, आठवें कृष्णु । सव्यसाची, धनंजय. ॥' [मुक्तेश्वरकृत विराटपर्व—अध्याय ६।७५]. ६. सत्त्व, रज आणि तम ह्या मायेच्या तीन गुणांपैकीं एक. ह्याच्या योगानें दया, क्षमा, शांति इत्यादिकांची वृद्धि होते. सत्त्व+बळ=सत्त्वाचें बळ, सत्त्वशीलपणा, किंवा सत्त्व आणि बळ (पराक्रम). ७. करकमळ. ८. बाणरहित. हे अर्जुना ! तूं धनुष्यबाणांचा त्याग करूं नको—असा इत्यर्थ. ९. धनुष्यविरहित. १०. नारायणास्त्र, गाई व ब्राह्मण ह्यांच्या तेजाला. ११. अर्जुनवचन. १२. अति (अत्यंत) अद्भुत मान (स्वाभिमान) आणि सत्त्व (शौर्य, वीर्यातिशय) यांनीं युक्त असा (भीम). १३. मान=अहंमति, तोरा, गर्व. गर्वाचा स्वीकार करून, मोठ्या औदार्यें—असा इत्यर्थ.

हास्य करुनि, गुरुनंदन ताडी, अस्त्राभिमंत्रितशरांनीं. ।
वाटे [1]दावग्रस्तीं, शिरला तो द्विरद, काळवश, रानीं. ॥ २९
[2]भीमाचलावरिच बा ! अस्त्रजलदपटल तें सकळ वळलें. ।
कटक कळवळे बहु, परि हृदय [3]पवनसूनुचें न कळवळलें. ॥ ३०
क्षितिवरि उतरुनि, सर्वहि करिती, तत्काळ, [4]आयुध-न्यास. ।
म्हणती सुरनरहि, 'असो देवा ! या विपुल आयु [5]धन्यास'. ॥ ३१
[6]जय आच्छादी भीमा, अस्त्रज्वलनांत, [7]वारुणें अस्त्रें. ।
केशवकृपाचि झांकी त्या बाळा, त्या महातपीं, वस्त्रें. ॥ ३२
[8]दहनीं मिळोनि कळवी, कीं दहनसमान, वेगळा मीं न. ।
मजहि गमे, तो अस्त्रा प्रथम, जसा, मानवे गळा, मीनें[9]. ॥ ३३
वारुणपरिवृत म्हणउनि, भस्म न करि दहनराशि, शिरल्यांला[10]. ।
[11]सुखदचि [12]परप्रतापातप त्या, जो [13]हरिदयाशिशिर त्याला. ॥ ३४
भीमावनार्थ धांवे ब्रह्म, करी जें [14]चिरायु [15]धोत्यातें. ।
[16]पदधावन बहु यश दे, [17]विस्त्रस्तपटा [18]निरायुधा [19]त्यां, तें. ॥ ३५
[20]दीप्तालयांत शिरवी, जेंवि कृपणधनिकमानवास [21]वही, ।

---

१. वणव्यानें ग्रासलेल्या अरण्यांत. २. भीमरूप पर्वतावर. ३. भीमाचें. ४. शस्त्रत्याग. ५. या धन्यास=भीमास. आयु=आयुष्य. ६. अर्जुन. ७. पर्जन्यास्त्रानें. महातपीं=अत्यंत उष्णतेंत. ८. अग्नींत अग्नि मिळून जावा, त्याप्रमाणें भीम नारायणास्त्रापासून उत्पन्न होणाऱ्या अग्नींत मिळून गेला, व भीम आणि अग्नि हे एकच आहेत, असें प्रेक्षकांच्या प्रत्ययास आलें. माशाला गळ जसा प्रथम मानवतो (मान्य होतो, गोड वाटतो) त्याप्रमाणें भीम हा भस्म करण्यास योग्य आहे असें नारायणास्त्रास वाटलें पण माशाप्रमाणेंच त्याची स्थिति झाली, तें अस्त्र त्यास भस्म करूं शकलें नाहीं—असा स्पष्टार्थ. मजहि गमे=मला (संजयाला) असें वाटलें, कीं. गळ=मासे पकडण्यासाठीं एका काठीच्या शेवटास दोरी बांधतात व त्या दोरीला एक आंकडा असतो. त्यास मांस किंवा इतर कांहीं खाद्य पदार्थ लावून ठेवितात व ती दोरी पाण्यांत सोडितात. ९. मासा. १०. अग्निराशींत शिरलेला जो भीम त्यास. ११. सुखदचि [होतो]—दुःखद होत नाहीं. १२. शत्रुप्रतापरूप सूर्य. रूपकालंकार. १३. श्रीकृष्णकृपारूप बर्फ. १४. दीर्घायु. १५. मडयातें. १६. पायांनीं धांवणें. १७. गेलें (सुटलें) आहे वस्त्र ज्याचें अशा. १८ ज्याच्या हातांत आयुध नाहीं अशा, निःशस्त्रास. भक्ताच्या संरक्षणासाठीं कोण ही धांवपळ ! येथें सुरेख 'स्वभावोक्ति' आहे. १९. कृष्णास. २०. पेटलेल्या घरांत. २१. उधाराची वही. 'शिरवी'

प्रभुसि तसा अर्धी [1]तो; पावेना भ[2]क्तमान वासवही. ॥ ३६

दोघे नरनारायण थांठिति भीमासि, धरुनि सु[3]रयातें. ।
जरि हा असा दुराग्रह, वदले बहु 'धन्य', [4]वरुनि सुर यातें. ॥३७

झोंबति ते भीमाच्या, जैसे याचक करास दात्याच्या. ।
[5]वंदन दुराग्रहा, स्वदुराग्रह जाया, करा सदा त्याच्या. ॥ ३८

घे धनु धनंजय, नृपा ! शौरि शरातें, बळेंचि झोंबोनी. ।
ओढिति रथावरुनि मग घालूनि मिठी, भुजांसि लोंबोनी. ॥ ३९

तों तों गर्जे भीम, प्रभु जों जों बळ करूनि आकर्षी. ।
नारायणास्त्र खवळे, भ्याले बहु नारदादि [6]नाकर्षी. ॥ ४०

कृष्ण म्हणे, 'हें काय ? त्यज आग्रह, बा ! न उचित [7]हठ कविला. ।
उतर रथावरुनि क्षण, अभिमानें कोणकोण न ठकविला ? ॥ ४१

युद्धें निवारितें, तरि कां आम्हीं सर्व न करितों युद्ध ? ।
क्रुद्ध नको होऊं, बा ! या अ[8]स्त्रशमीं उपाय हा शु[9]द्ध. ॥ ४२

शस्त्रन्यास करुनि, हे वीर तुझे उतरले, पहा, सारे. ।
या [10]रेवतीधवानुजवचना दे मान, मानदा ! बा ! रे !' ॥ ४३

दुर्योधनदुर्दैवें प्रभुकरवीं तो बळेंचि उतरविला. ।
कीं, देणार पवनसुत शोक [11]तुला, जेंवि [12]शक्रसुत [13]रविला. ॥ ४४

ज्या स्मरतां, कामाद्यरिषट्काहंकार सर्व हरपावे, ।
भीम [14]वळे बहुकष्टें, [15]पूर्वीं त्या प्रभुसि जेंवि हर, पावे. ॥ ४५

या क्रियापदाचा संबंध काकाक्षिगोलकन्यायानें समजावयाचा.

१. भीम. २. भक्ताला दिलेली मानमान्यता, मोठेपणा. ३. उत्तम वेगातें. ४. गगनांतून, स्वर्गांतून. ५. ह्या भीमाच्या दुराग्रहाला वंदन करा. ह्या भीमाच्या हट्टाला दुरूनच नमस्कार असो—असा भाव. ६. नाक+ऋषि=स्वर्गस्थ ऋषी. ७. आग्रह, हट्ट. ८. अस्त्रशांतीविषयीं. ९. धर्म व शास्त्र यांस मान्य असलेला. १०. रेवतीपति (बळिराम), त्याचा कनिष्ठ बंधु (कृष्ण), त्याच्या भाषणास. बळिराम हा भीमाला गदायुद्धांत निष्णात करणारा गुरु. म्हणून त्याच्या व गुरुपत्नीच्या नांवांचा उल्लेख साभिप्राय आहे. परिकरांकुरालंकार. ११. धृतराष्ट्राला. दुर्योधनाचा वध करून, असा भाव. १२. अर्जुन. १३. कर्णाला मारिल्यानें. १४. 'बळें' असें पाठांतर. १५. समुद्रमंथनसमयीं समुद्रांतून विष निघालें व त्यामुळें सर्वलोकक्षय होऊं लागला. त्या वेळेस

भीम, प्रेमबळेंचि[1], न पावुनि नारायणास्त्रदर[2], बळला. ।
त्या सुयशें जेंवि, तसा सुरतरुकुसुमें[3] न, नाक दरवळला[4]. ॥ ४६
नारायणास्त्र शमलें, जेव्हां तो वायुचा तनय शमला. ।
प्रभुचेंसें[5] प्रभुच्यांचें[6], सांगो दे, दुसरि मात न, यश मला. ॥ ४७
पुनरपि पर[7] प्रमुदित प्रेक्षुनि, पौरवपती[8] असुख पावे. ।[9]
त्यांसि[10] म्हणे, 'उरल्यांचे, याचि महास्त्रानलें, असु खपावे.' ॥ ४८
द्रौणि म्हणे, 'मृत्युपरिस भंग[11] अधिक शतगुणें, असें आहे. ।
मृतमारण[12] नीचोचितें[13]. होते पसरीत कीं पदर आ हे. ॥ ४९
'अस्त्रप्रदीप', म्हणसी 'उजळीं, नुरवावयासि परतेल,[14]' ।
योजूं नये पुन्हा हें, योजिन तरि मजवरीच परतेल. ॥ ५०
मज हरिपुढें[15] उरावें न, पळभरिहि, शत्रुकटककाळविटें[16]. ।
केला दिव्यास्त्रप्रतिघात[17] खरा, गोपदारबाळविटें[18].' ॥ ५१
भूप[19] म्हणे, 'न जयश्री देशिल तूं, बा ! परंतु कां मातें ।
देतो सुवधू, साधुनि यत्नें, प्रभु[21] बाप[22], रंतुकामातें[23]. ॥ ५२

सृष्टीचें पालन करणाऱ्या विष्णूची प्रार्थना मान्य करून लोकक्लेशनिवारणार्थ महादेवानें विष प्राशन केलें-अशी कथा आहे.

१. भगवंताच्या ठिकाणीं असलेल्या प्रेमामुळें. २. नारायणास्त्राचें भय. ३. कल्पतरूच्या पुष्पांच्या योगानें. नाक=स्वर्ग. ४. सुवासित झाला. ५. प्रभूच्या यशासारखें भक्तांचें यश देखील मला (पंतांना) दुसरी मात (गोष्ट) सांगूं देत नाहीं, बोलूं देत नाहीं. प्रभुयशासारखेंच भक्तजनांचें यश वर्णन करण्यास योग्य आहे-असा भाव. ६. भक्तांचें. ७. शत्रु. ८. दुर्योधन. ९. येथें 'प' वर्णाची चमत्कारिक अनुवृत्ति पहावी. १०. अश्वत्थाम्यास. ११. मोड, अपमान. १२. मेलेल्यास मारणें. १३. नीच+उचित=नीचाला योग्य. १४. शत्रुरूप तेल. १५. सिंहापुढें. १६. शत्रुसैन्यरूप हरिणानें. १७. दिव्य (तेजस्वी) अस्त्राचा प्रतिघात (निवारण). १८. गोपस्त्रियांचा अल्पवयस्क उपपति जो कृष्ण त्यानें. येथील 'विट' शब्दाची योजना पंतांनीं जाणूनबुजून केलेली दिसते. अश्वत्थाम्याच्या अस्त्राचा उपशम कृष्णाच्या युक्तीमुळें झाला व त्याचा डाव फसला. यामुळें चिडून जाऊन संतापातिरेकानें तो कृष्णाचें उणें बाहेर काढीत आहे, असें आम्हांस वाटतें. शत्रूंनीं एकमेकांचीं वर्मेंकर्में बाहेर काढावीं, हें मनुष्यस्वभावास अनुसरूनच आहे. १९. दुर्योधन. २०. 'परंतु कामातें' असा पाठभेद. काम=मदन. २१. परंतु (असें आहे तरी) तूं मला जयश्री कां न देशील ? अर्थात् देशीलच. उदाहरणार्थ—प्रभु बाप (समर्थ पिता) रंतुकामातें [पुत्रातें] यत्नें साधुनि (मोठ्या प्रयत्नानें संपादन करून).

त्र्यंबक अस्त्री कीं तूं न पळों देसील पदहि, सुत्राम्या; ।
तुजवरि, गुरुघ्नवध हा भार दिला फार न गुरुपुत्रा ! म्यां.' ॥ ५३
नृप गुरुसुता स्तवें, पटु जेंवि हया, तापवी, प्रतोदानें, ।
धांवे परांसि धाया, चिंतुनि तें पाप विप्र तो दानें. ॥ ५४
शरभ जसा सिंहातें, गांठुनि करि भग्न पार्षता, राया ! ।
सात्यकि भेटे व्यसनीं त्या, श्रोत्या जेंवि आर्ष ताराया. ॥ ५५
द्रौणि म्हणे, 'शैनेया ! रक्षिसिल न आपणाहि आपण, जा. ।
रक्षिल न शक्र; याचा जरि बा, आजाहि, करिल आं पणजा. ॥५६
पांचाळ सर्व वधिल्यावांचुनि, पावेल कोप उपशम न. ।
वेंचुनि वाढविसिल तूं, ज्वलनाचें करिल काय, तुप, शमन ?'॥५७
ऐसें गर्जुन अर्जुनसम, जो समजोनि, करुनि पाठ, कवी ।
पाठक विख्यात जगीं, तैशांसहि तो महातपा ठकवी. ॥ ५८
एकेंचि शरें भेदुनि कवच, उर, क्षतज ओकवी, राया ! ।
सात्यकिला लोळवितां, भ्याले बहु, सर्व लोक, वीरा यां. ॥ ५९
गमला, झाला तो गुण-सद्रत्नांचा डबा परेत रणीं. ।

सुवधू (उत्तम स्त्री) देतो. दृष्टांतालंकार. २२. मदनपिता, कृष्ण–असा पूर्वार्धातील पाठांतरास अनुसरून अर्थ करणें इष्ट आहे. २३. क्रीडा करणाऱ्यातें.

१. अस्त्रशास्त्रप्रवीण. 'अस्त्रीं' असें पाठांतर. अस्त्रीं=अस्त्रांच्या बाबतींत. अस्त्री (अस्त्रज्ञ) त्र्यंबक कीं (किंवा) तूं सुत्राम्या पदहि (एक पाऊलभर देखील) पळों न देशील–असा अन्वय. २. इंद्रास. [सुत्रामन्=सुष्टु त्रायते भुवनमिति सुत्रामा=जो भुवनाला उत्तम प्रकारें संरक्षितो तो सुत्रामा (इंद्र)]. ३. गुरूचा नाश करणाऱ्याचा वध करण्याची जबाबदारी (भार). ४. स्तुतीनें. ५. कुशल सारथी. ६. चाबुकानें. ७. गुरुवधपापाच्या मरणपराभव-नरकादि फळांचीं दानें–पंत. केलेल्या पापांचीं फळें–असा इत्यर्थ. ८. धृष्टद्युम्नास. ९. आर्ष=ऋषिप्रणीत ग्रंथ, आचार वगैरे. येथें वाल्मीकिरामायण. १०. तोंड पसरील, करुणा भाकील; धृष्टद्युम्नाचें संरक्षण करण्याविषयीं प्रार्थना करील. बा=बाप. ११. शांति. १२. अग्नीचें. १३. जो कवी (बुद्धिमान् पुरुष) समजोनि पाठ करूनि (अर्थज्ञान करून घेऊन तोंडपाठ केल्यामुळें) जगीं पाठक (गुरु, पढविणारा) [म्हणून] विख्यात [झाला] तैशासही (अर्थात् सात्यकीस) तो महातपा (मोठा तपस्वी अश्व-त्थामा) अर्जुनसम गर्जुन (अर्जुनासारखी गर्जना करून) ठकवी (फसवी, डोळ्यांत धूळ टाकून आपलें कार्य साधी)–असा अन्वय. १४. रक्त. १५. अश्वत्था-म्यास. १६. प्रेत, मृत.

वदला असेलचि, धरुनि तेजाची चाड, बा ! परे[1] तरणी. ॥ ६०
सूतें शीघ्र पळविला सात्यकि तो, त्यजुनि समरमहि[2], मागें, ।
ज्या शुचिगुणा[3] म्हणावें 'स्वशिरीं[4] तूं शंभुसम रम' हिमागें[5]. ॥ ६१
पाडी द्रुपदसुता, शर हाणुनि जैं विप्र, भौंवयांमाजी, ।
पाहे दृष्टि[8], परां, रविभीतां[6] जेंवि, प्रभो ! वयां[7], माजी. ॥ ६२
पांचाळचमू खवळे; स्वर्गाप्रति शीघ्र बोळवी तीतें. ।
रणमृत्यु नच रुचे, जरि बहु हित तरि, जेंवि बोळ वीतीतें[9]. ॥ ६३
भीम, धनंजय, मालव, पौरव, युवराजनाम चेदिपती, ।
हे पांच धांवले, ज्यां, डोळे, पाहोनि, आमचे, दिपंती[10]. ॥ ६४
वधिला युवराज पळें[11], पौरवहि पळें, पळेंचि मालव तो, ।

---

१. मृतोद्यापनमंत्रविशेष, मृतकर्मांतील मंत्रविशेष. वेदांतील मंत्रांस नांवें देण्याचा परिपाठ आहे. हीं नांवें त्या मंत्रांतील वर्णिलेल्या देवतांवरून किंवा त्यांतील आद्याक्षरांवरून दिलेलीं असतात; जसें–त्रिसुपर्णमंत्र, मृत्युंजयमंत्र, रुद्र, पवमान, पुरुषसूक्त इत्यादि. 'परे' हें मंत्राचें नांव त्या मंत्रांतील आद्याक्षरांवरून पडलेलें आहे. 'परे युवांसं' असा ह्या अंत्येष्टिकर्ममंत्राचा प्रारंभ आहे. येथें 'परे' शब्दावर जी टीप दिलेली आहे ती 'सर्वसंग्रह'कार, रा. तेंडूलकर व रा. पराडकर यांनीं आपापल्या प्रतींत दिली आहे म्हणून ती आम्हीही कायम ठेविली आहे. पण तिच्या यथार्थत्वासंबंधीं आम्हास शंका आहे. सूर्यानें 'परे' हा मंत्र कां म्हणावयाचा ? सूर्य सात्यकीचा उपाध्याय होता कीं काय ? आम्हांला असें वाटतें कीं 'बा ! परे' च्या ठिकाणीं 'बाप रे !' असा पदच्छेद करावा. असें केलें असतां, तेजाची चाड धरूनि (सात्यकीच्या तेजाची किंमत जाणून) तरणी 'बाप रे !' [असें] वदला असेलचि–असा सरळ अन्वय लावितां येतो. आपणास आश्चर्य वाटलें असतां आपण 'अरे ! बाप रे' असें म्हणतों. त्याप्रमाणें सात्यकीचें तेज पाहून सूर्यासही आश्चर्य वाटलें असावें, व वरच्यासारखा उद्गार त्याच्या तोंडून निघाला असावा. २. युद्धभूमि. ३. ज्याचें आचरण पवित्र आहे अशा त्या सात्यकीस. ४. माझ्या मस्तकावर (हिमालयाच्या शिखरावर). ५. हिमाचलानें. ६. सूर्याला पाहून भ्यालेल्यांस. जेंवि रविभीतां वयां तेंवि माझी दृष्टि परां पाहे–असा अन्वय. आमचे शत्रु (पांचाळादि) माझ्या दृष्टीला घुबडांसारखे दिसले व म्हणून अश्वत्थामा हा सूर्यासारखा दिसला–असा स्पष्टार्थ. उपमाध्वनि अलंकार. ७. रविभीतां वयां म्हणजे दिवाभीतांस (घुबडांस). ८. माझी दृष्टि. ९. बाळंतिणीतें. 'वीती' ह्या शब्दाच्या औचित्याबद्दल तरफदारी कोणास करितां येईल, असें आम्हांस वाटत नाहीं. बोळ=एका झाडाचा औषधोपयोगी चीक. १०. ज्यां पाहोनि आमचे (कौरवपक्षपाती वीरांचे) डोळे दिपती [असे] हे पांच [वीर] धांवले–असा अन्वय. ११. पळांत, क्षणांत.

त्या गुरुसुतापुढें पर, वायुपुढें जेंवि दीप मालवतो[1]. ॥ ६५
नंदांवरि[3] हरि[4], बुडवुनि निजमख, करितां, जसा, परमख[5], वळे; ।
शरवृष्टि गुरुसुतावरि भीम तसा बहु करी, परम खवळे. ॥ ६६
तेज, परहृदयकंपद[6] राम, तसें द्रौणिही किमपि[7], त्याला. ।
उचिततचि, जरि हरिणीच्या, येइल, वृकदर्शनें[8], हिमें[9], पिल्याला.॥ ६७
एक जगत्प्राणात्मज[10], एक महाचार्यराजकायज[11], गा !।
ते क्रुद्ध, युद्ध करितां, कल्पांतभ्रम न होय काय, जगा ? ॥ ६८
समरमखीं कोपविला प्रथमचि आचार्यपुत्र; [12]तो धनुतें ।
खंडुनि, मुहूर्त मूर्च्छित केला भीमें, समस्तयोधनुतें[13]. ॥ ६९
नभ त्यांच्या शरजाळें कोंदे, वाहों शके न वात रणीं. ।
एक कुपित रुद्र गमे, एक प्रळयीं जसा नवा[14] तरणी. ॥ ७०
भीमाचेंहि द्रौणि च्छेदी कोदंड दोनदां; देवा ! ।
वाटे गजा महागज भंग[15] दे, महानदचि तो नदा, दे, वा[16]. ॥ ७१
सूतासि, अलिक[17] भेदुनि पाडी, प्रकटूनि अस्त्रमायेतें[18]. ।
जैसें देणें[19] धृतितें[20], गुरुपुत्रीं तुरवि, शस्त्र, मायेतें[21]. ॥ ७२
अश्व स्वैर उधळले, मूर्च्छित होतांचि [22]रश्मि 'आवरितो[23]; ।

---

१. 'मालवती'-हें क्रियापद येथें अध्याहृत घ्यावयाचें. २. येथील उपमा वस्तुस्थितीची निदर्शकच आहे. ३. कृष्णादिनंदावर. ४. इंद्र. निजमख बुडवुनि परमख करितां, जसा नंदावरि हरि वळे-असा अन्वय. ५. गोवर्धनपर्वतास समर्पितयज्ञ. मागें पृष्ठ १७१ टीप ११ पहा. ६. शत्रूंच्या हृदयास (भीतीमुळें) कंप देणारा. ७. विशेष, अवर्णनीय, निस्तुल. ८. लांडग्याला पाहण्याबरोबर. दृष्टांतालंकार. ९. हिंव. १०. वायुपुत्र, भीम. ११. द्रोणाचार्यपुत्र, अश्वत्थामा. १२. अश्वत्थामा. १३. सर्व योद्ध्यांनीं स्तुति केली आहे ज्याची अशा भीमानें. १४. प्रळयकाळांत सर्व सृष्टी भस्म करण्यासाठीं नवीनच उत्पन्न झालेला सूर्य. (नेहमींचा सूर्य नव्हे, त्याच्यापेक्षां 'प्रखर' सूर्य, असा अर्थ 'नवा' ह्या विशेषणाच्या योजनेनें पंतांनीं व्यक्त केला असावा, असें दिसतें). उत्प्रेक्षालंकार. १५. भंग दे=पराभव करी. उत्प्रेक्षालंकार. १६. अथवा. १७. ललाट. १८. अस्त्ररूप कपटातें. १९. ऋण. २०. धैर्यातें. २१. माया=स्नेह, दया. [भीमाचें] शस्त्र गुरुपुत्रीं मायेतें तुरवी-असा अन्वय. २२. सारथी. रश्मि=वाग्दोर, लगाम.

पडला भीम, गुरुसुतक्षोभें, समयीं असोनि आव; रिता[1]. ॥ ७३
जैसा, करिता झाला दैत्यांसीं धरुनि शाकसंग[2] रजी; ।
तैसा गुरुसुत, पांडव-पांचालांसीं, असीमसंगर[3], जी[4] ! ॥ ७४
गेली द्रुपदसुताला पांचालचमू[5]; तिलाहि सोडुन भा[6]. ।
तपनप्रतापसमयीं, न म्हणति, कोणीहि, 'सेंदु[7]' 'सोडु[8]', नभा. ॥ ७५
द्रौणि परचमू मर्दी, देऊनि भयव्यथा पिटी[9] कांहीं; ।
मूलमहत्व[10] न हरिलें, मोठ्या झाल्या तथापि, [11]टीकांहीं. ॥ ७६
केले भग्न बहुत परि, न मनीं तो अजितसारथि वरमला[12]. ।
त्या कटकांत न कोणी आढळला, अजि ! तसा रथिवर[13] मला. ७७
होउनि गुरुसूनुपुढें, श्वेताश्व म्हणे, त्यजुनि मीड, 'अरे[14] ! ।
उद्वृत्ता[15] ! अबळांतें[16] कां वधिसी ? मजसवेंचि भीडें[17] अरे[18] ! । ७८
हरितों मी तव दर्पा; त्याही, ज्या माजलासि, भांडवलें[19]. ।
या मागें, बहु निष्ठुर होउनि, तुजसीं मला न भांडवलें. ॥ ७९
आम्हांवरि जो द्वेष, प्रीति तुझी जी सुयोधनावरि ती, ।
शक्तिहि, दावीं. समयीं निजतेजातें सुयोध नावरिती. ॥ ८०
नाशिल सर्व तुझा हा मद, तोचि द्रोणपौत्रकर[20], हातें. ।
सोडुनि साहंकारा[21], अन्यजनीं[22], कोण पातक रहातें ?' ॥ ८१

---

१. रिता पडला=[घोडे उधळल्यामुळें] रिकामा (निरुपयोगी) झाला. आव=धैर्य. २. इंद्रपदाची आशा. रजी=पुरूरव्याचा पौत्र (मागें पृ. १९६ टी. १३ पहा). ३. अमर्याद युद्ध. ४. अजी. ५. एकावली अलंकार. ६. कांति. ७. स+इंदु=चन्द्रान्वित. ८. स+उडु=तारान्वित. ९. पिटाळून लावी. १०. मूळग्रंथाचें महत्व. ११. व्याख्यांहीं. १२. लज्जित झाला, म्लानवदन झाला. १३. रथिश्रेष्ठ, बलवान् योद्धा. १४. संबोधनार्थ अव्यय. 'रे' इति हीनसंबोधने अधमामंत्रणे वा [स्तुतिकुसुमांजली-टीका]. १५. दांडग्या. १६. निर्बळांतें. १७. युद्ध कर. १८. शत्रो ! १९. द्रव्यानें. शस्त्रास्त्रांमध्यें प्राविण्य हेंच धन त्याच्या बळावर. २०. धृष्टद्युम्न. २१. गर्विष्ठ पुरुषाला. २२. तुझ्याखेरीज दुसऱ्या कोणाच्या ठायीं. [तुज] साहंकारा सोडुनि अन्यजनीं कोण (कोणतें) पातक राहातें ?–असा अन्वय. तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाच्याही ठिकाणीं कोणतेंही पातक राहात नाहीं, म्हणजे, तूं गर्वानें उन्मत्त झालेला असल्यामुळें सर्व पातकें तुझ्या ठिकाणीं राहातात–असा भावार्थ.

पुससि, 'कसें अति अप्रिय गुरुसुतकोपार्थ अर्जुन वदे ? हें; ।
कापुरुषत्व[2] असें जरि अर्जिलें[3] तो पार्थ अर्जु, नव-देहें[4]. ॥ ८२
तरि पैरुष[5] भाषणाचीं, कथितों तुज कारणें, नृपा[6] ! परिस. ।
बहु गुरुपुत्रीं पार्थप्रेमा गुरुपरिस, त्या कृपापरिस. ॥ ८३
पार्थाचा विनय, कृपीं द्रोणीं भीष्मीं युधिष्ठिरीं विदुरीं; ।
तोचि गुरुसुतीं; लोभहि बहुतचि, बा ! जेंवि जिष्णुच्या[7], भिदुरीं[8]. ८४
परि भवदनयें[9] पडला विघड, तशाही सख्यांत, हा राजा ! ।
अहितें[10], अहि तसा, झाला, उचित गळविहार[11] रत्नहारा ज्या. ॥ ८५
वधिले मालव पौरव युवराज सुकीर्तिभाजन तिघे ते. ।
सात्वत पार्षत मारुति [12]दमिले, जे वीरराज [13]नति घेते. ॥ ८६
पडले होते हृदया [14]धर्मोक्तें, धिरडियासि जेंवि, घरे. ।
कीं उदकें ढेंकुळसें, [15]परुषें [15]वचनें पळांत जें,[16] विघरे. ॥ ८७
दैवें पार्षत सात्यकि यांत [17]कलीभेद घातला खोटा. ।
तो[18] उकलिला मनें, जो करिता धृतिदृष्टिघात[19], लाखोटा. ॥ ८८
यास्तव [20]अभूतपूर्व क्रोध श्वेताश्वमानसीं पेटे; ।
[21]कक्षीं जेंवि दवानल, बळ ज्याला द्यावया सखा[22] भेटे. ॥ ८९
झाला गुरुसुतहृदयीं, तो बहु कटु [23]परुषवाद, शर भाला. ।

---

१. संजय धृतराष्ट्रास म्हणतो, तुम्हीं असें विचाराल कीं 'अर्जुनानें अश्वत्थाम्याला राग येण्यासारखें कठोर भाषण कां केलें ? अशा प्रकारचा नीचपणा करावयाचा असेल, तर तो त्यांनें पुढील जन्मीं करावा'–असा स्पष्टार्थ. २. नीचपणा. ३. संपादील. ४. देहांतरीं, दुसरा देह धारण करून. जरि तो पार्थ असें कापुरुषत्व अर्जिल, [तरि तो तें] नव–देहें अर्जु (संपादो)–असा अन्वय. ५. कठोर भाषणाचीं. ६. हे धृतराष्ट्रा. ७. इंद्राचा. ८. वज्रावर. उपमालंकार. ९. तुझ्या अन्यायास्तव. १०. सर्पासारखा अकल्याणकर्ता. ११. कंठाच्या ठायीं क्रीडा. १२. हतवीर्य केले. १३. नमस्कार. शत्रूकडून नमस्कार करूनि घेती–असा भाव. १४. अ० २३ गी० १३ ते १९ पहा. १५. कठोर अशा वचनें. १६. जें हृदय. १७. कलहास कारणीभूत असा बिघाड. 'यांतहि कलिभेद' असें पाठांतर. १८. द्यूतव्यवहार आठवला, संविषपत्राचालाखोटा उकलून वाचितां दृष्टिघात होतो, तसा द्यूतव्यवहार मनांत येतांचि धृतिपात करितो–पंत. लाखोटा=लखोटा, पत्राची थैली. १९. धैर्य आणि दृष्टि यांचा घात. २०. पूर्वी न झालेला. २१. गवतांत. २२. मित्र, वायु. २३. कठोर भाषण.

निद्रेंत लाविला मृगराजानें काय पाद शरभाला[1] ॥ ९०
कोपे बहु, तो[2], वाटे उन्मूलिल कृष्णयुग्म-रोपें[3], करी[4]. ।
हरसा, दृश्यादृश्याहितें[5]गणदाहार्थ, सिद्ध रोपें[6] करी. ॥ ९१
परमाग्नयस्त्रें, सकळहि शत्रु कराया परासु[7], रोपास्या[8] ।
करुनि प्रदीप्त, सोडी, तृण मानुनि त्या परा सु[9]रोपास्या[10]. ॥ ९२
अस्त्र प्रकटी ज्वालामालाकुल शर अनंत[11]; राया ! तें ।
करि सांतराय[12] योगीश्वरयोगातें अनंतरायातें[13]. ॥ ९३
त्यजिती, जलाशया[14] गुरुगंभीराही नदीनदा, यादें[15]; ।
गुरुच्या[16], परबळ केलें, क्षणमात्रें हीन दीन, दायादें[16]. ॥ ९४
अहि बाहेर निघाले, सोडुनि, बहु तापतां महि, बिळाला. ।
कोणासहि अभयप्रद आश्रय त्या संकटांत न मिळाला. ॥ ९५
त्या अग्न्यस्त्रें सहसा सेना अक्षौहिणीमित जळाली. ।
बहुत न हुत होणारी जी, तीच सुटोनि तेथुनि पळाली. ॥ ९६
ऐसा करिता झाला, एकचि सोडून बाण, विप्र, लय. ।
रुद्राधिक गमला तो; कीं नसतां समय, जाणवि प्रलय. ॥ ९७
धरि परचमू धृति, जसी श्रुतसिंहरवा[17] दवावृता, न, गजी. ।
पार्थें, सर्वास्त्रप्रतिपक्ष ब्रह्मास्त्र योजिलें मग, जी ! ॥ ९८
घन[18] शस्त्रवर्ष[18] शमलें, शमतां अग्न्यस्त्र सर्व तमही तें ।
सुर म्हणति, 'मुख्य[19] कृष्णचि, हे धरिति, न शेष पर्वत, महीतें.' ९९

---

१. पाद लाविला कीं काय, असें वाटे. उत्प्रेक्षालंकार. २. कृष्ण आणि अर्जुन हेच बालवृक्ष. ३. रूपकालंकार. ४. अश्वत्थामारूपी गज. ५. दृश्य आणि अदृश्य अशा सर्व शत्रूंच्या नाशार्थ. ६. बाण. ७. मृत. ८. रोप+आस्य=बाणमुखास. ९. सुरोपास्या तप्त करुनि [रोप] सोडी—असा अन्वय. १०. सुर+उपास्य=देवांस सेव्य अशा कृष्णावर. ११. ज्वाळांच्या कल्लोळांनीं युक्त असे असंख्य बाण. १२. विघ्नयुक्त. १३. विघ्नरहित अशा. ('योगातें' या शब्दाचें विशेषण). १४. सरोवरासारखे जे जलसंचय त्यांस. १५. प्रचंड जलचर. १६. द्रोणाचार्यांच्या पुत्रें. १७. जिनें सिंहाची गर्जना ऐकिली आहे व जी वणव्यानें घेरलेली आहे, अशी हत्तीण. परचमू धृति न धरि—असा अन्वय. काय ही पांडवसेनेची दुर्दशा ! १८. दाट अशी शस्त्रवृष्टि. १९. सुर म्हणती [कीं] कृष्णचि मुख्य (श्रेष्ठ) [आहे] शेष [आणि] पर्वत हे

मेलेचि कृष्ण[1], ऐसें बा! सर्वांनींहि मानिलें होतें. ।
अक्षतें[2] शस्त्रप्रशमीं पाहुनि, बहु तेज वानिलें[3], हो! तें. ॥ १००
घनपटलमुक्त[4]रविशशिनिभकृष्णांहीं स्वशंख वाजविले, ।
गाजविले लोक[5] सकळ, तावक[6] गुरुनंदनादि[7] लाजविले. ॥ १०१
शोकध्यानपरायण[8] अश्वत्थामा करांगुळी मोडी[9]; ।
जोडी हस्त श्रुतिलां[10]; दीर्घोष्णश्वास, चापही, सोडी. ॥ १०२
तो[11] 'धिक्! धिक्! सर्वमिदं मिथ्या,' ऐसें म्हणे; रथावरुनी ।
टाकुनि उडी, पळे हो! शीघ्र, तपोयोग्यवनपथा वरुनी. ॥ १०३
तों, ज्याच्या उपदेशें बहु जनिमरणाद्यनर्थ[12] चुकतात, ।
तो भेटे भर्गप्रभ[13] भगवान् भव्यप्रभाव शुकतात[14]. ॥ १०४
व्हावें धन्य जयाचे, तीर्थांचें तीर्थ, पद नमुनि, पतितें[15], ।
त्या, वंदी, तो चिंताशोकपरिम्लानवदन, मुनिपतितें. ॥ १०५
सविनय, पुसे, 'अहो! म्यां आग्नेयास्त्रप्रयोग हा केला; ।
रुद्रेंहि न पावावें[16], यद्भीत[17]गुहाचियाहि हाकेला[18]. ॥ १०६
सर्व चमू न जळाली, कृष्णार्जुन वांचले कसे? बाहे ।
जें हरचक्षुसि[19], त्याची प्याले कीं आंच लेकसे बा! हे. ॥ १०७
हे माया, कीं काळें केलें विपरीत, पूर्व[20] कीं चुकलों? ।

महीतें (पृथ्वीतें) न धरिती (हे पृथ्वीला आधारभूत नाहींत)—असा अन्वय. शेषाच्या मस्तकावर पृथ्वी आहे, अशी समजूत आहे. व पर्वताला 'महीधर' असें म्हणतात.

१. कृष्णार्जुन. २. नाशरहित. ३. 'मानिलें' असें पाठांतर. ४. मेघपटलांतून बाहेर आलेल्या सूर्यचंद्रांसारख्या [तेजस्वी] कृष्णार्जुनांनीं. ५. स्वर्ग, मृत्यु व पाताळ. ६. तुझे, स्वपक्षीय. ७. 'कुरुनंदनादि' असें पाठांतर. ८. शोकामध्यें ज्याच्या चित्तवृत्ति गुंग झाल्या आहेत असा, दुःखमग्न. ९. बोटें मोडणें—हें संतापाचें लक्षण आहे. १०. धनुर्वेदाला. ११. अश्वत्थामा. १२. जन्ममरणादिरूप अनर्थ. १३. शिवसदृश. १४. व्यास. १५. पतितानें, पातक्यानें. १६. संरक्षण करण्यास समर्थ न व्हावें. १७. ज्या अस्त्रापासून भ्याला असा जो कार्तिकस्वामी त्याच्या. १८. बोलावी, आव्हान करी. १९. जें शंकराच्या तृतीय नेत्रास युद्धार्थ आव्हान करितें असें जें उग्र अस्त्र त्याची आंच (उष्णता) हे लेकसे (लेंकासारखे कृष्णार्जुन) प्याले कीं काय ? कृष्णार्जुन वांचले तेव्हां ते शंकरास पुत्राप्रमाणें प्रिय असले पाहिजेत—असा ध्वनितार्थ. २०. परंपरा, परंपरागत आचारविचार.

सांगा कीं गायत्रीजपपर मीं, मंत्रसिद्धिला मुकलों ?' ॥ १०८
व्यास म्हणे, 'नारायण होउनि कार्यार्थ धर्मसुत, पर्णा[2] ।
जळहि न सेवुनि, पूर्वी करि मैनाकीं[3] अखिन्न सु-तपाळा[4]. ॥ १०९
सासष्टसहस्र समा[5], धृतयमनियमांसि, सर्वदा अमळा. ।
तितुकेंचि पुन्हा तप, तो ऊर्ध्वभुज, स्थाणु[6], वातभुक् तपळा. ॥ ११०
तो ब्रह्मभूत[7] जेव्हां, प्रभुची तेव्हांचि पूर्ण होय दया, ।
मग दर्शन दे भगवान् भव हर[8] सेवकमयूरतोयद[9], या. ॥ १११
प्रेम-स्मितीं[10] निववितो शशिशत[11]मददलन देवदेवरद[12] ।
[13]नमितां शिरीं कर, स्तुति करितां [14]श्रुति चित्तें दे; वदे वरद. ११२
'मद्भक्त ! मत्प्रसादें हो तूं मत्तुल्य, मदधिकहि, समरीं, ।
त्वदधिक तेज यश नसो कोणाही, योगिमुनिजनीं अमरीं. ॥ ११३
त्या तारिसिल, वधिसिल, म्हणसिल ज्या ज्यासि 'तारिन,' 'वधीन.'।
शस्त्रास्त्रापासुनि भय तुज किमपि नसो; असो जय अधीन[15].'॥ ११४
विश्वेश, असे पुष्कळ, होउनि परम प्रसन्न, दे वर ज्या; ।
तो हा यदुपति, याच्या, नमिति, पदाच्या[16], समस्त देव, रजां. ११५
याच्याचि तपापासुनि झाला, यासमचि नर महातेजा; ।
तो हा अर्जुन 'नारायणचि,' म्हणति कवि बरें पहाते[17], ज्या. ११६
[18]रक्षिति युगीं युगीं हे साधूंतें, आदरें अवतरून; ।

---

१. स्वायंभुव मन्वंतरांत धर्मऋषीस मूर्तिनामक भार्येपासून विष्णूच्या अंशानें नर आणि नारायण असे दोन पुत्र झाले—अशी कथा आहे. २. झाडाचीं पानें. ३. मैनाकपर्वतीं. ४. उत्तम तपाला. ५. वर्षें. ६. खांबासारखा निश्चळ (स्थाणु) राहून, एकसारखा एक हात वर करून (ऊर्ध्वभुज) आणि वायु भक्षण करून (वातभुक्). ७. परब्रह्माशीं तद्रूप, ईश्वरमय. ८. शिव. ९. सेवकरूप मोरांचा मेघ असा शिव. १०. प्रेमयुक्त मंदहास्यानें. 'प्रेमें स्मितीं' असें पाठांतर. ११. शेकडों चंद्रांचा गर्व हरण करणारे, अर्थात् अत्यंत शुभ्र दंत. १२. शंकरदंत. १३. नारायणानें नमन करितांच. 'नमिती' असें पाठांतर. १४. कर्ण व मन. १५. स्वाधीन. १६. पायांच्या धुळीला. १७. बरें पहाते=नीट पाहाणारे, दिव्यदृष्टि ज्यांना आहे असे. 'बरे पहाते' असें पाठांतर. १८. 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥' ही श्रीकृष्णोक्ति प्रसिद्धच आहे (भगवद्गीता, अध्याय ४ श्लोक ८).

यांचा पद्मपदरजःकणहि न होइल शचीधवतरून. ॥ ११७
श्रीकृष्ण रुद्रसंभव, पूजितसे शंकरासि ह्या लिंगीं[2] ।
अहि[3] चंदना तसा, तूं मनिं तरि कृष्णद्वयासि आलिंगीं. ॥ ११८
तूंही रौद्र तपस्वी, तेजस्वी रुद्रभक्त पूर्वींचा[4] ।
ईश्वरवरप्रसादें झालासि त्रासकर[5] रिपूर्वींचा[6]. ॥ ११९
इत्यादि तत्व ऐकुनि, तो कुरुगुरुचा कुमार, बहु मानी[7], ।
श्रीशंभुकारणें नति करुनि, श्रीकेशवासि बहु मानी. ॥ १२०
हृष्टात्मा व्यासातें वंदुनि, अवहार[8] शीघ्र तो करवी. ।
आवरि वीरां; स्वकरां[9], निववाया जेंवि सर्व लोक, रवी. ॥ १२१

अध्याय चोविसावा.

अर्जुन निज-विजयावह भोठें आश्चर्य किमपि पाहोनी, ।
वाहोनि विस्मयभर, ध्यानीं होता, तटस्थ राहोनी. ॥ १
तों व्यासातें पाहे, नमुनि म्हणे, ‘करुनि आ, तपस्वा[10] ! मीं ।
पुसतों सांगा, न तुम्ही उरवाल तमासि[11], आतप[12], स्वामी !.॥ २
जेव्हां जेव्हां करितों, जिकडे जिकडे शिरोनि, परम रणा, ।
तिकडे तिकडे दिसतो दिव्य पुरुष, तोचि हेतु पर-मरणा. ॥ ३
वर्णें कृष्ण, भयंकर बहु, चालतसे त्यजूनि तो धरणी. ।
मरती, तच्छूलोत्थितशूलसहस्रेंचि[13] सर्व योध रणीं. ॥ ४
सु. दीपपुरोवर्ति तिमिर, वायुपुरोवर्ति घनपटल, फाटे; ।

---

१. शची+धव+तरु+ऊन=इंद्रतरु (कल्पतरु) त्याहून उणा. २. मृत्तिकेची शिवमूर्ति करून. ३. सर्प. ४. पूर्वजन्मांतील. ५. पीडा देणारा. ६. रिपु+ऊर्वींचा=शत्रूंच्या भूमींचा. आदर्शप्रतींत ‘त्रासक रवि पूर्वींचा’ असा पाठ असून ‘पूर्वींचा’ ह्या शब्दावर ‘सख्यानें चक्रावर घालून तेज कमी करण्यापूर्वींचा’ अशी टीप दिलेली होती. ७. अभिमानी. ८. अवहार=युद्ध, द्यूत इत्यादिकांत थोडा वेळपर्यंत केलेला तहनामा, सावधिक संधि. Armistice. ९. आपल्या किरणांस. १०. तपोरूपधना. ११. तुम्हीं आतप [असल्यामुळें] तमासि (अज्ञानरूपी अंधकारास) न उरवाल—असा अन्वय. १२. तेज. १३. त्याच्या शूलापासून उत्पन्न होणाऱ्या सहस्रावधी शूलांनीं.

तैसें तयापुढें परबल, तें पाहुनि मला नवल वाटे. ॥ ५
मागुनि मीं, आधीं [1]रविशतसंप्रभ बलसमुद्र अनवधि तो, ।
शूलविनि:[3]सृतशूलप्रकरें, मच्छत्रुयोधजन वधितो. ॥ ६
जन मानितसे, 'वधितो पार्थ परांचीं [4]शरोत्करें कटकें.' ।
मृतमारणचि मज रणीं घडलें; दिसतें जनास तें लटकें. ॥ ७
स्वामी ! तो पुरुषोत्तम कोण बरें ? हें तुम्हीच सांगाल; ।
आपण सर्वज्ञ म्हणुनि, [5]पर गर्वें फुगविनात कां [6]गाल ?' ॥ ८
व्यास म्हणे, 'ज्या साहे न शशी, न हुताश, न रवि, शंकर तो. ।
प्रभु-भाव असा, स्वपदीं होउनि असप[7]त्न [8]नर, विशंक, रतो. ॥ ९
[9]सैंधववधपणसमयीं कृष्णें स्वप्नांत दाविला परवां, ।
झालासि हेतु, वंदुनि, ज्या, अ[10]सुरींच्या तदा विलापरवां. ॥ १०
प्रचुर प्रसाद तुजवरि, म्हणुनि, प्रभु चालतो पुढें, पार्था ! ।
बहु जपतो भक्तजना भगवान्, [11]सार्थप जसा सदा सार्था. ॥ ११
जा त्यासि शरण, चरणस्मरणच रणमरणसंकटीं तारी. ।
मारी तोचि खलांतें, दासांसि पडों न देचि [12]जडभारी. ॥ १२
कृपवृषगुरुसुतरक्षितसेनेतें वक्र दृष्टिनें पाहे, ।
बा ! [13]हेतिधर असा, या प्रभुवांचुनि अन्य कोण गा ! आहे ?॥ १३
नमन त्रिकाल करिती, स्वर्गीं, शक्रादि सुर, तरिच [14]असती. ।
दाखविती झाली या प्रभुचरिताची जना बरि चव [15]सती. ॥ १४

---

१. शंभर सूर्यासारखी कांति ज्याची. २. अमर्याद. ३. शूळापासून निघालेल्या शूळांच्या समुदायानें. 'शूल-प्रसूत-शूलप्रकरें' असें पाठांतर. ४. शर+उत्कर=बाणांची राशी; बाणसमूहानें. ५. आपल्याखेरीज इतर लोक. ६. गाल फुगविणें हें गर्वाचें, आनंदाचें व क्रोधाचें एक लक्षण आहे. 'आर्यामुक्तामाला दावीन परंतु जरि न मागाल । लागाल प्रभुकंठीं घालूं, फुगवील कीं रमा गाल' ॥. [पंतकृत-नामरसायन, गीति १०९, स्त्रीपर्व-अध्याय ४।२० व अनुशासनपर्व-अध्याय ६।६५ पहा.] ७. शत्रुरहित. ८. अर्जुन. नर असपत्न होऊन, स्वपदीं विशंक रतो, असा प्रभु-भाव [असे]-असा अन्वय. ९. जयद्रथवधप्रतिज्ञेच्या समयीं. १०. असुरस्त्रियांच्या. अर्जुनानें मारिलेल्या निवातकवचादि राक्षसांच्या स्त्रियांच्या. ११. व्यापारी लोकांच्या तांड्याचा पुढारी. १२. जडजोखीम, अनर्थांत. 'पडतां जडभारी । दासीं आठवावा हरी' असें तुकारामबोवा म्हणतात. १३. शस्त्रधर. १४. आपापल्या स्थानीं राहूं शकती. १५. पार्वती.

प्रभुवर दृष्टा, जेंवि सदर्पा सर्पोधमा सुपर्ण, कुटी; ।
याचा प्रसाद इच्छुनि, वरिली कविंनीं, वनीं सु-पर्णकुटी. ॥ १५
जें खेचरें लोहरजतकनकमय त्रिपुर पांडवा ! तें गा ! ।
एकेंचि शरें केलें भस्म; उडविलेंहि कांडवातें गा ! ॥ १६
एके समयीं अंकीं घेउनियां खेळवी कुमार मणी, ।
देवाला, 'सांगा हा कोण ?' म्हणे शंभुची उमा रमणी. ॥ १७
'तेजस्वी शिशु दिसतो; हा मत्पद, वाढतां, हरिल, याला ।
न उपेक्षावें;' चिंतुनि हें धांवे न्यावया हरि लयाला. ॥ १८
तत्काळ सवज्र भुज स्तंभित झाला; अगा ! धवळवाहा ! ।
भ्रमले सर्व; न कळला कोणालाही अगाध-बळ वा ! हीं. ॥ १९

१. मागें पृष्ठ २६० टीप १ पहा., २. गरुड. ३. आकाशामध्यें संचार करणारें. ४. त्रिपुर=मयासुरानें दीर्घकालपर्यंत तप करून ब्रह्मदेवास प्रसन्न करून वर मागून घेतला कीं, 'देवांस अभेद्य अशीं तीन फिरतीं पुरें असावीं. तीं अनुक्रमें लोह-रजत-कनकमय असून ब्राह्मणांच्या शापास अभेद्य अशीं असावीं. महादेवाच्या बाणानें जरी कदाचित् त्यांचा नाश झाला, तरी त्यांतून जें पुर अवशेष राहील त्याचा नाश होऊं नये.' कांहीं कालपर्यंत मयासुराचे अनुयायी नियमानुरूप राहिले, पण पुढें देवांना त्रास देऊं लागतांच त्यांचे प्रार्थनेवरून महादेवांनीं पृथ्वीस रथ, ब्रह्मदेवास सारथी, विष्णूस धनुष्य इत्यादि करून तीं तीन पुरें समसूत्रांत येतांच तो क्षण साधून तिहींचाही नाश केला—अशी कथा मुळांत आहे. ५. बाणवायूनें. ६. कुमार=मयासुराचीं अंतरिक्षपुरें जेव्हां त्रिपर्वयुक्त बाणानें महादेवांनीं एकाएकीं भस्म केलीं तेव्हां तो चमत्कार पाहण्यास पार्वती आली असतां महादेवाच्या शिखांचें एक बालक होऊन तें पार्वतीच्या मांडीवर बसलें. त्या काळीं तें शिवाचें स्वरूप जाणण्याकरितां पार्वती देवांस 'हा कोण आहे ?' असें विचारूं लागली—वगैरे मुळांतील कथाभागास उद्देशून हें लिहिलें आहे. ७. वाढला तर, मोठा झाला तर. ८. इंद्र. ९. निश्चळ, ज्याची हालचाल बंद झाली आहे असा. १०. धवळवाहा (श्वेताश्वा=अर्जुना). प्रासाकरितां 'धवळवाहा.' 'श्वेतवाहन' नांव पडण्याचें कारण अर्जुनानें विराटपुत्र उत्तर यास असें सांगितलें:–युद्धप्रसंगीं माझ्या रथास सुवर्णालंकारविभूषित शुभ्र अश्व जुंपलेले असतात म्हणून मी श्वेतवाहन ह्या नांवानें प्रसिद्ध आहें. (विराटपर्व–अध्याय ४४ श्लोक १३-२२). येथें यमकपोषणार्थ 'व' आणि 'ब' यांत अभेद मानिला आहे. 'बकार व वकार यांत भेद नाहीं, हें शास्त्र यमककुतुकार्थ कृपा करून येथें अंगीकारावें.'—पंत. (मागें पृष्ठ २०१ टीप २३ पहा). ११. शंकर.

सामरें[1] शक्र विधिकडे जाय पळत; बहु भुजास कळ लागे. ।
स्वमनीं उमा म्हणे, '[2]गुरुमति ! तुजही मूढ हा न[3] कळला गे!'॥ २०
परिसुनि वृत्त, विधि म्हणे, 'रे शक्रा ! देवदेव अज तो कीं; ।
हरि ! हरि ! हरिपरिभवबळ[4] तुजें[5] आढळलें असेल अज-[6]तोकीं!॥ २१
प्रेमें तसीच भजली शुचिगुणमणिसुखनिधी[7] उमा पतितें. ।
देतो[8] नाना सुख, बहुरूप प्रभु सुखनिधी उमाप[9] तितें. ॥ २२
[10]येतों, चला, भ्रमाया संसारीं चाकवत[11]; चुकाना कीं ? ।
कैंचें अमृत मिळेल ? न चाखाया चाकवतें[12], चुको, नाकीं. ॥ २३
आला धांवुनि सामर विधि विनवाया प्रभूसि कैलासीं. ।
काळाचेंहि न चाले बळ, ज्याच्या द्वारपाळबैलासी. ॥ २४
पसरी, विधि करुनि सुरांसह नमन, स्तवन, दीनपा[13], पदर. ।
प्रभुपदयुगुली निववी; कां हरिल विबुध-नदी[14] न पाप-दर[15] ? ॥ २५
प्रभुनें न शूल धरिला, न असि, न, नाशावया मद, पिनाक[16] ? ।
नाकभ्रष्ट[17] न व्हाया[17], वज्री[18] घांसी पुढें तदपि नाक. ॥ २६
ऐसा प्रताप, ऐसी लीला, ऐसें दयाळुपण समज ।
बापा ! पहा प्रभुयशें केलें केवळ पळांत पणस[19] मज. ॥ २७
[20]मातेची सरि येना उपमातेला, अगाध-बळ[21] बा ! हा ।

---

१ देवांसह. २. बृहस्पतिबुद्धे !–पंत.ब्रह्मदेवा ! ३. हा मूढ (हा मूर्ख इंद्र) तुला कळला नाहीं, म्हणजे हा किती मूढ आहे, हें तुला कळलें नाहीं–असा भाव दिसतो. ४. सिंहाचा पराभव करण्यास लागणारें बळ. येथें अप्रस्तुतप्रशंसेनें महादेवाच्या सामर्थ्याचें वर्णन केलें आहे. ५. ज्याला सहस्र नेत्र आहेत असा जो तूं त्या तुला (शक्राला). ६. मेंढ्यांच्या पिलांच्या ठायीं. ७. पवित्र असे जे सद्गुणरूप मणि (रत्नें) त्यांच्या सु-खनीतें (उत्तम खाणीतें) धी (धारण करणारी) अशी पार्वती. ८. 'देता' असें पाठांतर. ९. पुष्कळ. १०. हें कोणाचें भाषण ? ह्या गीतीचा स्पष्टार्थ कळत नाहीं. ११. चक्रवत्, चाकासारखे. १२. शाकविशेष. १३. दीनांचा प्रतिपाळ करणाऱ्यापुढें. पदर पसरणें=करुणेची याचना करणें, चुकीची माफी मागणें. १४. देवांची नदी भागीरथी. १५. पापाची भीति. विबुधनदी पाप-दर कां न हरील–असा अन्वय. 'हरील'–हें अपेक्षित उत्तर. १६. अजगवसंज्ञक शिवधनु. १७. आपण पदच्युत होऊं नये म्हणून. १८. इंद्र. १९. फणसाप्रमाणें सकंटक, अर्थात् रोमांचित. २०. ह्या गीतीच्या स्पष्टीकरणार्थ पंतांची टीप पहा:–'देवदयेसारिखी अन्य दया म्हणों नये, असें तुपासारिखें तेल

काय तुपाची साजे उपमा तेला ? अगा ! घवळवाहा ! ॥ २८
हरिहर सहाय झाले, तेव्हां तत्तुल्यं तूंहि अजित रणीं. ।
काय इतर तेजस्वी ? वत्सा ! तुजला म्हणेल 'अजि' तरणी.॥ २९
[3]माधवमित्रमयूरा मुनिमुविरें मुदित करूनियां गेला. ।
केला धन्य जय असा, शिबिरा शिबिराजनुतपदें तेला. ॥ ३०

उपसंहार[6]

श्रीगुरुरामपदांब्जीं भावें हें द्रोणपर्व वाहून ।
झालों प्रसादभाजनं; सर्वहि होतिल असेचि पोहून. ॥ ३१

॥ इति श्रीमन्महाभारते द्रोणपर्व समाप्तम् । श्रीकृष्णार्पणमस्तु. ॥

न म्हणावें;कीं देवाचें अनंत सामर्थ्य.' २१. ज्याचें बळ अमर्याद आहे असा. ही गीति सुभाषितरूप असून संदष्टक नामक यमकाचें एक उदाहरण आहे. ज्या पद्याचे द्वितीय आणि चतुर्थ पाद समवर्णात्मक असतात तेथें संदष्टक यमक असतें. 'प्रत्येकं पश्चिमयोरावृत्त्या पादयोर्द्वितीयेन । यमके संजायते गर्भः संदष्टं चेति.' ॥ [काव्यालंकार, अध्याय ३ श्लोक ७].

१. तुझ्यासारखा अजिंक्य तूंच. अनन्वयालंकार. २. येथें तेज शब्दावर श्लेष आहे. तेजस्वी=(१) पराक्रमी, (२) प्रकाशणारा, देदिप्यमान. सूर्य सुद्धां तुला 'अजि !' म्हणेल (तुझा पराक्रम ओळखून तुझा आदरसत्कार करील) मग इतरांची कथा काय ? काव्यार्थापत्ति अलंकार. ३. मा-धवा (लक्ष्मीपती) चा मित्र (अर्जुन) हाच मयूर त्यास. रूपकालंकार. मेघाचें दर्शन मयूरास हर्षप्रद होतें, असा कविसंकेत आहे. ही मेघमयूरांची उपमा कविसंमत असून पंतांची तर ती अत्यंत आवडती होय, हें बहुश्रुत वाचकांस सांगावयास नकोच. येथें मकाराचा अनुप्रास साधिला आहे. ४. व्यासमुनिरूप मेघ. ५. शिबिराजानें स्तवन केलें आहे पायांचें ज्याच्या असा कृष्ण, त्यानें ६. 'वरदानस्य उक्ति यां काव्य उपसंहृतिः' म्हणजे ज्या पद्यांत वरदानाचा उल्लेख असतो, त्याला 'उपसंहार' असें म्हणतात. ह्या न्यायानें प्रस्तुत गीतीच्या चतुर्थ चरणांत वरदानाचा उल्लेख आहे. ७. श्रीगुरु (उपास्यदेवता) जो राम (श्रीराम) त्याच्या किंवा आपला पूज्य पिता जो राम (रामाजीपंत) त्याच्या चरणकमळांवर. ८. प्रसादास पात्र (योग्य). भाजन=पात्र, भांडें. ९. श्रीरामचरणकमलांचें दर्शन करून; किंवा द्रोणपर्व पाहून म्हणजे वाचून. असेचि=प्रसादपात्र.

मोरोपंतकृत द्रोणपर्वाचीं परिशिष्टें.

१. अपरिचित शब्दांची सूचि. *

आण २०।१७
आर १६।८८
आव १।५०; ३।६७; ३।११४; ४।१९; २१।६४; २३।७३ अवसान.
आवांका १।४; ३।११३ = धैर्य, अवसान.
उकळणें ६।७५
उदंड १३।५८
कचकरणें १६।२१
कव ९।९५; २२।८०
कळावा १२।२६
कक्षा २३।४
कावे १५।२०
कुणगा ४।७१, ५।८
केवळ १।११४
कै १८।४
गमजा १७।३३
गरळें १४।१७
गळ २३।३३
गावणें १४।१६
घोणस २०।९६
घोळसणें २२।६१
चवकळ १२।११६
जराक १७।४१
ढीग १८।४८
तम १६।६७
तगणें १२।३२
तरकटणें १२।११५
तरमुंडी १२।१३३; १७।६७
तरंडक २०।६३
तांतड २२।४८
थर १५।२८
धिरडें २३।८७
नई २०।८४
निपट १६।११३
परसा १९।७
पालवणें २२।३५
फटकाळ १६।११४; २२।७१
फुसका १५।२५
बोळवणें २३।६३
बोळ २३।६३
भगाण १५।२७
मात २३।४७
लाग २०।८७
लेखा १८।१; २२।८५
वरमणें २३।७७
विहिरे ५।७६
वीती २३।६३
वेंधणें १५।२०
सवे १२।२४
सिता १०।३०
सुपाक १।२४
हुटहुटणें १७।५४
हुरूक १०।६४
हेरणें ५।३८; २१।१०९

---

* प्रत्येक शब्दापुढील पहिला अंक अध्याय व दुसरा अंक गीति यांचा दर्शक आहे.

२. भाषणसंप्रदायांची सूचि.

३. शुद्धिपत्र.

पृष्ठांक	पद्य किंवा टीपा	अशुद्ध	शुद्ध
१०	टी० १०	एक	ऐक.
१०	गी० ४४	वर मागें	वर मागें'.
,,	,,	गुरुप्रसादचरमागें'	गुरुप्रसादचरमागें.
४४	टी० २१	परक्रमी यशानें	पराक्रमी यशानें
५१	गी०,५७	परघमू	परचमू
६०	गी० ११२	पेविला	[१३]पैविला
१०२	,, ७	कोळी[१८]	कोळी[१८]
११६	,, २०	भुजसाकुर्मीय[१६]	भुजसौकुर्मीर्य[१६]
१२८	,, १५	गांडीव चापयोद्धा	गांडीवचापयोद्धा
१२९	,, २४	गाव	गावें
१५६	,, ३८	शर भैंवनीं[१४]	शर-भैंवनीं[१४]
१६५	,, २९	श्वर्मारातिकायहोम	ध्वर्मारातिकायहोम
१६६	,, ३५	प्रशस	प्रशस्त
२४०	,, २३	नोंत	नातें
२७८	,, ३८	नेणें	नेणे
,,	,, ४४	पविला.	पविला,
२८६	,, ४९	यशास ?	कशास ?
२९७	टी० ८	कल्पना=	कल्पन=
३१२	टी० १	'सायक न कपटा'	'सायक न कपटें'
३१३	टी० १७	मला युद्धांस	मला युद्धास
३२१	टीप १६	'हां' !	'हा !'
३२४	गी० १३	न सर्व हा,	न सर्व, हा
३२५	टी० ९	हितबुद्धानें	हितबुद्धीनें